कै० हरिभाऊ आपटे यांच्या

# आठवणी

व

# सामाजिक कादंबऱ्या

[ विवेचनात्मक टीकालेख ]

लेखक

वाग्भट नारायण देशपांडे,

बी. ए., एल्.एल्. बी,

हायकोर्ट वकील—सातारा.

प्रस्तावनालेखक

नरसिंह चिंतामण केळकर

१९२४

ग्रंथ

किंमत १॥ रुपया

प्रकाशकः—अनंत पांडुरंग बापट,
बुकसेलर, बुधवार पेठ, पुणें.

मुद्रकः—अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

माझे परममित्र व सहाध्यायी

**कै. श्री. राजेसाहेब पंत**

**बी. ए. एल्एल्. बी., बार-ॲट-लॉ.**

यांस

त्यांच्या प्रेमळ आणि अकृत्रिम स्नेहाच्या

**स्मरणार्थ.**

But thou and I have shaken hands,
Till growing winters lay me low;
My paths are in the fields I know,
And thine in undiscovered lands.

—*In Memoriam.*

“ मित्रा, शोकष्टचा प्रणाम तुजला, आतां पुनर्मीलन
वर्षामागुनि वर्ष जाऊनि जधीं संपेल हें जीवन;
होता मार्ग अभिन्न आजवरिचा, आतां पुढें भिन्नता;
कंठीं मी पथ तोचि, त्वत्पथ परी अज्ञात कीं सर्वथा!”

## वाचकांसः—

या पुस्तकांत प्रसिद्ध झालेले लेख यापूर्वी मनोरंजन आणि विविध-ज्ञानविस्तार यांत प्रसिद्ध झाले असून, ते पुनः एकत्र प्रसिद्ध केल्यास त्यांचा हरिभाऊंच्या कादंबऱ्या वाचणारांस उपयोग होण्याचा संभव आहे असें वाटल्यावरून सदरहू पुस्तक प्रसिद्ध करण्याचें धाडस केलें आहे. प्रस्तुत निबंधांतून करण्यांत आलेलें परीक्षण केवळ सामाजिक कादंबऱ्यांचें असून, तेंही बहुतेक गुणदर्शनात्मक असल्यामुळें तें पूर्ण नाहीं हें खरें. कारण भाषा, संविधानक चातुर्य, कल्पनाशक्ति, स्वभाव-चित्रलेखनकौशल्य, अशा अनेक बाजूंनीं हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचा अभ्यास होणें जरूर असून, त्याप्रमाणें त्यांच्या सर्व कादंबऱ्यांचा विचार झाल्याशिवाय परीक्षण पूर्ण झालें असें केव्हांहि म्हणतां येणार नाहीं. अशा प्रकारचें सर्वांगीं परीक्षण पुढें मागें कोणाकडून तरी होईलच; परंतु तोंपर्यंत माझा हा अल्प प्रयत्न—तो अपूर्ण असला तरी—वाचक मानून घेतील अशी मला आशा आहे.

सातारा
१५ मार्च १९२४.

वाग्भट नारायण देशपांडे

# प्रस्तावना

तारीख 3-3

मराठींतील श्रेष्ठ कादंबरीकार म्हणवून घेण्याचा मान जसा कै० हरिभाऊ आपटे यांना निर्विवादपणें मिळतो, तसाच हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचे उत्कृष्ट समालोचक म्हणवून घेण्याचा मान श्री० वाग्भट देशपांडे यांनाच निर्विवादपणें द्यावा लागेल. आपटे यांचें कादंबरी-लेखनाचें काम २५ वर्षांवर चालू होतें. व त्यांनीं इतक्या कादंबऱ्या निर्माण केल्या आहेत कीं, 'त्या सर्व मीं वाचलेल्या आहेत' असें छातीला हात लावून म्हणूं शकेल असा मराठी वाचक विरळा. मग त्या सर्वांचें सशास्त्र पृथक्करण करून, मार्मिक दृष्टीनें त्यांचें सार काढून, त्यांच्या गुणावगुणांची तपशीलवार चर्चा करणारा वाचक त्याहूनहि विरळा असावा यांत आश्चर्य नाहीं. श्री० देशपांडे यांचें प्रस्तुत पुस्तक वाचणारास, तें किती साधार व त्यांतील विधानें किती सकारण केलेलीं आहेत हें पाहून त्यांच्या वाचनाचा दीर्घोद्योग आणि चरित्र-विषयासंबंधानें अढळ सहानुभूति हीं दोन्हीं लक्षांत आल्यावाचून राहत नाहींत. व्यक्तिविषयक भक्तीशिवाय तन्निर्मित वाङ्मयाचें इतकें खोल व चिकाटीचें परिशीलन कोणीहि करूं शकणार नाहीं.

कादंबरी-ग्रंथ-वाचनाशिवाय, कै० आपटे यांचे परिचित स्नेही व ऋणानुबंधी याजकडून, श्री० देशपांडे यांनीं जी अवांतर माहिती परिश्रमपूर्वक मिळविलेली आढळून येते, तीं त्यांच्या चर्चेपेक्षांही आम्हांस अधिक मौल्यवान् वाटते. कोणाही लेखकाची मनोरचना त्याच्या लेखांवरून सामान्यतः अनुमानितां येतेच. पण प्रत्यक्ष कादंबऱ्यांतून दिसून येणारी आपटे यांची मनोरचना, हा सर्वांना सारखाच दृष्टीस पडणारा असा वाङ्मयरंगभूमीवरील फक्त पुढचा पडदा होय. त्या पडद्याच्या पलीकडे असलेली वस्तुस्थिति ही पात्रें रंगण्याच्या खोलीसारखी, किंवा रंगपटासारखी, विचित्र व बोधप्रद असून, श्री० वाग्भट

यांनीं परिश्रमपूर्वक मिळवून दिलेल्या अंतरंगांतील माहितीमुळें त्यांच्या वाचकांना या रंगपटाचेंहि दर्शन घडलेलें आहे.

"प्रतिभाप्रवाहाचें गोड पाणी प्यालें म्हणजे झालें, त्या प्रवाहाचा उगम शोधण्याचें काय कारण? व शोधला तरी येथें अधिक काय मिळणार?" असें सकृद्दर्शनीं वाटतें. परंतु मच्छलीपट्टणापाशीं कृष्णानदीचें गोड पाणी प्यावयास मिळावयाचें त्याचा अंश महाबळेश्वर येथील गायमुखापाशीं मिळतोच तथपि निसर्गसुंदर असें तें उगमस्थान पाहून नदीच्या वस्तुस्थितीच्या साद्यंत ज्ञानाचाही लाभ वरती घडतो. प्रस्तुत उदाहरणांत, 'पण लक्षांत कोण घेतो' या कादंबरींतील नायिकेचें प्रतिभाशलाकेनें रंगविलेलें उत्कृष्ट चित्र पाहण्याचा आनंद, हें चित्र हरिभाऊंच्या प्रत्यक्ष परिचयाच्या एका अभागी विधवेच्या करुणास्पद कहाणीनें सुचविलें गेलें हें समजल्यानें, कमी न होतां उलट द्विगुणितच होतो. जादूगार आपल्या हातांत रुपया काढून ठेवतो तो टांकसाळींतील रुपयाइतकाच वास्तविक खरा असतो. पण जादूगारानें हातावर ठेविलेला रुपया कदाचित् खरा नसेल, तो भ्रम असेल, असा संशय आल्यानें त्या रुपयाची जी किंमत वाटते, त्यापेक्षां टांकसाळींत जाऊन हातावर रुपया घेतल्यास त्याची किंमत अधिक वाटते. जादूगारानें हातावर ठेवलेला रुपया त्यानें नजरबंदीनें उत्पन्न केला हें त्याचें कौशल्य खरें; पण तो रुपया खरोखरच टांकसाळींतला आहे अशीही त्याबरोबर खात्री पटण्यास कांहीं साधन असेल, तर जादूचा खेळ पाहण्याची गंमत व रुपयाचे सोळा आणे मूल्य हीं दोन्ही आपणांस लाभतात.

'आजकालच्या गोष्टी' या हरिभाऊंनीं स्वतंत्र छापखाना काढून त्यावर छापल्या काय किंवा 'पुणेंवैभवां'त खंडशः छापून प्रसिद्ध केल्या काय, त्यांचें स्वारस्य तेंच असणार. पण त्या गोष्टी मूळ 'पुणेंवैभवां'त निनावी छापल्या गेल्या ही माहिती झाल्यास त्या स्वारस्यांत भरच पडते. चित्राची शोभा चित्रांतच मुख्यतः असली, तरी त्याची चौकट तिला उपकारी होते. वाङ्मयचित्राला ग्रंथकाराची व्यक्तिविषयक माहिती ही

एकप्रकारची चौकटच होय. 'आजकालच्या गोष्टी' 'पुणेंवैभवा'तून प्रसिद्ध केल्या त्यावेळीं हरिभाऊ हे अगदीं तरुण नवशिके लेखक होते. आपलें नांव प्रसिद्ध करण्याइतका त्यांना आत्मविश्वास आला नव्हता. छापखानेवाल्यानें ग्रंथकारास आर्जवावें अशी त्यांची स्थिति तेव्हां नसून, ग्रंथकारानें छापखानेवाल्यास आर्जवावें अशीच तेव्हां त्यांची स्थिति होती. किंबहुना समाजसुधारणेचें समर्थन हें उदार तत्त्व ज्यांच्या सर्व कादंबऱ्यांतून अनुस्यूत आहे त्यांना, 'पुणेंवैभव'कारासारख्या सुधारणा–विद्वेषी प्रतिगामी व कुचेष्टेखोर वर्तमानपत्राचा आश्रय ग्रंथप्रसिद्धीकरितां करावा लागला, असल्या बाह्य पण मनोरंजक गोष्टी कळल्यानें 'आजकालच्या गोष्टीं'तील स्वभावचित्रें किंवा वर्णनें किंवा कथानक यांना कांहींच कमीपणा येत नाहीं; उलट त्यांची मनोरंजकता एक प्रकारें वाढतेच. ही मनोरंजकता आपटयांच्या अनेक कादंबऱ्यांना मिळवून दिल्याबद्दल वाचकवर्ग प्रस्तुत निबंधकाराचे आभारीच होतील.

वाग्भट देशपांडे यांना आपटे यांच्या कादंबरींत जितके दोष दिसतात त्यापेक्षां अधिक दोष दिसणारे वाचक बरेच आढळतील. व हें लक्षांत येऊनच कीं काय, दोषदर्शनाचा विषय देशपांडे यांनीं बहुतेक गाळला आहे. तथापि या श्रेष्ठ कादंबरीकाराच्या गुणदोषांची आणेवारी ठरविण्यापेक्षां, त्याच्या कादंबरीवाचनानें होणारा स्थूल आनंद हा जसा अधिक ग्राह्य, तसेंच त्याच्या सर्व कादंबऱ्या वाचून त्यांतून काढतां येण्यासारखें असेल तें संकीर्ण ध्येय हेंच अधिक ग्राह्य व उपयुक्त असें आम्हांस वाटतें. हरिभाऊंच्या पुस्तकांत सामाजिक सुधारणेची टवाळी नाहीं, पण सुधारणेच्या नांवाखालीं त्यांच्या काळीं कोठें कोठें दिसून येणाऱ्या थिल्लर आचारविचारांचे गोडवे गाऊन त्यांचें स्तोमही त्यांनीं माजविलेलें नाहीं. त्यांनीं निरनिराळ्या पात्रांच्या द्वारें सुचविलेली समाजसुधारणा मध्यममार्गावलंबिनी अशीच आहे. यामुळें त्यांच्या कादंबऱ्या केव्हांही व कोणींही वाचल्या तरी जसें वाचकाचें विरोधानें पित्त भडकणार नाहीं, तसेंच सहानुभूतीचा वीटही त्याला येणार नाहीं.

देशपांडे यांच्या विवेचक पद्धतीनें आपटे यांच्या कादंबऱ्यांच्या वरील वर्णनाचें समर्थन होतें असेंच दिसून येईल. तथापि मूलग्रंथवाचनानेंच ती गोष्ट अधिक पटेल; व हे मूलग्रंथ प्रत्यक्ष वाचण्याविषयीं देशपांडे यांचें विवेचन अत्यंत क्षुद्बोधक झालेलें असल्यामुळें, प्रस्तुत निबंध वाचणाऱ्या दहा वाचकांपैकीं निदान आठ तरी, त्यांनीं पूर्वीं न वाचलेल्या अशा आपटे यांच्या कादंबऱ्या वाचण्यास, एकदम प्रवृत्त होतील अशी आम्हांस खात्री वाटते. आजपर्यंत दुसऱ्या कोणत्याही मराठी कादंबरी-काराच्या ग्रंथांचें इतकें सोपपत्तिक विवरण झालेलें नाहीं तें करून देशपांडे यांनीं स्वतःचें मित्रऋण जितकें फेडलें त्यापेक्षांही वाचकवर्गावर अधिक ऋण करून ठेविलें आहे असें म्हणून हा प्रस्तावनालेख पुरा करितों.

दिल्ली,
२५ फेब्रुवारी सन १९२४

न. चिं. केळकर

## प० वा० हरि नारायण आपटे यांच्या

# आठवणी व कादंबऱ्या.

मृत्यूचा घाला रोज जरी सहस्रावधि मनुष्यांवर पडत असला, तरी त्याची तीव्रता बहुतेक ठिकाणीं मृताचें कुटुंब आणि स्नेहीवर्ग यांपुरतीच मर्यादित असते; परंतु ज्या थोर पुरुषानें आपल्या कार्याचें क्षेत्र स्वतःपुरतें न आंखतां आपल्या बांधवांचा त्यांत समावेश केलेला आहे, अगर ज्यानें आपल्या कृतीनें किंवा लेखणीनें आपल्या पिढीचे किंवा राष्ट्राचे आचार आणि विचार यांत क्रांति घडवून आणण्याचें श्रेय संपादिलें आहे, आणि आपल्या समाजाचें आणि वाङ्मयाचें भूषण म्हणून ज्याच्याकडे मोठ्या अभिमानानें आपण बोट दाखवूं, असा एकादा थोर पुरुष गत झाला असतां त्या दुःखाचें वैयक्तिक स्वरूप निघून जाऊन त्याला एक प्रकारच्या राष्ट्रीय आपत्तीचें स्वरूप येतें. अशा थोर विभूतीच्या निधनानें प्रत्येकजण कांहीं काळपर्यंत अगदीं भांबावून जातो. अशा दुःखाच्या बुडाशीं स्वार्थाचा लेशही नसून, त्या मृत व्यक्तीविषयीं वाटणारा अभिमान आणि प्रेम, तिच्या गुणांबद्दल वाटणारें कौतुक व तिच्या कृतीं-बद्दल वाटणारा आदर हींच त्या दुःखाचीं कारणें असतात. श्रीयुत हरि नारायण आपटे यांच्या मृत्यूमुळें आज प्रत्येकाला वाईट वाटत आहे याचें कारण हेंच होय. श्रीयुत हरि नारायण आपटे यांची सहज व मृदु भाषाशैली, तेजस्वी प्रतिभा आणि विशाल कल्पनाशक्ति या तिहींचा इतका हृदयंगम मिलाफ पुनः कोठें व केव्हां पहावयास सांपडेल ? मनुष्यस्वभावाचें इतकें सूक्ष्म

व मार्मिक अवलोकन करून त्यांच्या दोषांकडे इतक्या सदय दृष्टीनं पाहणारा लेखक पुनः कधीं उत्पन्न होईल ? आणि अशा अप्रतिम कादंबरीकाराच्या व विद्वानाच्या मृत्यूनें झालेली मराठी भाषेची हानि कधीं भरून निघेल ? या विकारांनीं आज प्रत्येकाच्या मनांत कल्लोळ करून सोडला असेल यांत तिलप्राय संशय नाहीं. देशहितासाठीं निरंतर कळकळ बाळगून राष्ट्राची उन्नति व्हावी म्हणून विधायक उपाय शोधण्यासाठीं रात्रंदिवस तळमळणारा एक आत्मा आपल्यांतून आज निघून गेला! वातावरण सर्वत्र अंधकारमय झालें असतां त्यांतून आपल्या पिढीला मार्ग दाखविण्या-साठीं जे थोर महात्मे, मुत्सद्दी, कवि अगर लेखक यांपैकीं एखाद्या रूपानें राष्ट्रांत अवतरतात, त्यांपैकीं एकाच्या सहवासाला आणि उपदेशाला आज आपण अंतरलों ! मनुष्य कितीही विद्वान् अगर ज्ञानी झाला, तरी त्याला शेवटीं मृत्यूच्या आधीन व्हावें लागतेंच, या गोष्टीची दुःखद जाणीव अशा प्रसंगीं आपणांला अधिक तीव्रतेनें पटते. परंतु न्यायी आणि अन्यायी, सद्गुणी आणि दुर्गुणी, श्रीमंत आणि दरिद्री, निस्सीम देशभक्त आणि अस्सल देशद्रोही या सर्वांना मृत्यु जरी एकाच मापानें मोजीत असला, तरी थोर पुरुषांच्या निधनामुळें होणाऱ्या शोकांत एक प्रकारचें गांभीर्य, पावित्र्य आणि त्यांचे गुण व कृति आठवण्यांत एक प्रकारचें 'रम्य औदासीन्य' असतें, हें नाकबूल करतां येणार नाहीं. तें कसेंहि असलें तरी, मागल्या पिढींतील ज्या लोकांना हरिभाऊ आपल्यांसारख्या थोर पुरुषांशीं सहवास आणि स्नेह लाभण्याचें भाग्य मिळालें आहे, आणि या पिढींतील ज्या पुष्कळ तरुणांना हरिभाऊ आपल्या विचारांनीं, ग्रंथांनीं व विद्येनें पितृस्थानीं झाले आहेत, त्या त्यांच्या स्नेह्यांना आणि अनुयायांना, हरिभाऊंची ती प्रेमळ मूर्ति आपल्या दृष्टीला आतां पुनः कधींही पडणार नाहीं;

त्यांचे सहज विनोदी भाषण ऐकण्याचें आपलें भाग्य आतां संपलें; आणि त्यांच्या मृत्यूनें खऱ्या उच्च दर्जाच्या व सूक्ष्म अवलोकन आणि उदात्त विचार यांनीं भरलेल्या कादंबऱ्यांचा झरा आतां आटला, यामुळें अपरिमित दुःख झाल्याशिवाय खचित राहणार नाहीं. एवढी विद्वत्ता, मार्मिकता आणि रसिकता, इतकी परिणत बुद्धिमत्ता, अशी न्यायप्रियता आणि सत्याबद्दलची जिज्ञासा, या सर्वांचा मृत्यूच्या एका फटकाऱ्यासरशीं लोप—अजीबात लोप व्हावा, हें पाहून चित्त जरी कांहीं काल भयचकित व निराश झालें, तरी हरिभाऊंच्याबरोबर त्यांच्या विचारांचा लय झाला नसून, त्यांनीं करून ठेविलेलें कार्य वाङ्मयांत चिरंजीव राहून पुढील अनेक पिढ्यांना स्फूर्तिदायक होईल, व आपट्यांनीं आपल्या ओजस्वी लेखणीनें सचेतन केलेली ही लाट येथेंच थांबणार नसून हिची गति आतां अशीच अप्रतिहत चालेल, ही कल्पना या दुःखांत मनाला कितीतरी मोठें समाधान प्राप्त करून देते.

श्रीयुत हरि नारायण आपटे हे महाराष्ट्रांतील पहिल्या दर्जाचे व अत्युत्कृष्ट कादंबरीकार होते, तथापि त्यांच्या कृतीचें परीक्षण करून त्यांचें वाङ्मयांतील स्थान ठरविण्याचें, अगर त्यांचें चरित्र कथन करण्याचें या लेखाचें कार्य नाहीं. तें अधिक महत्त्वाचें कार्य अधिकारी लेखकांकडून होईलच. श्रीयुत आपट्यांसारख्या प्रतिभाशाली कादंबरीकाराच्या व विद्वानाच्या परिचयाचा व सहवासाचा मान ज्या भाग्यशाली लोकांना मिळाला असेल त्यांनीं त्या आपल्या सहवासांत त्यांच्या विद्वत्तेविषयीं, स्वभावाविषयीं, लेखनकौशल्याविषयीं आपणांला जो कांहीं अनुभव आला असेल तो प्रसिद्ध करणें हें त्यांचें एक प्रकारें कर्तव्यच आहे. कारण त्यामुळें हरिभाऊंच्या चरित्रावर प्रकाश पडून अशा लोकप्रिय पुरुषाबद्दल अगर थोर पुरुषाबद्दल शक्य ती माहिती मिळण्याबदल जी एक सार्वत्रिक

आतुरता असते तीही थोडीबहुत तृप्त होईल. आणि याच हेतूनें व इच्छेनें या लेखांत त्यांच्या कांहीं आठवणी देण्याचें योजिलें आहे.

हरिभाऊंचा स्वभाव किती प्रेमळ आणि मनमिळाऊ असे, हें त्यांच्या जवळच्या स्नेह्यांनाच नव्हे, तर त्यांच्याशीं अल्पस्वल्प संबंध आलेल्यांनासुद्धां माहीत आहे. त्यांच्या स्वभावांतला दुसरा विशेष गुण म्हणजे परोपकाराविषयीं सदैव तत्परता. गरीब लोकांच्या उपयोगी पडण्यास व आपल्या स्नेह्यांना अगर अल्प परिचयाच्या लोकांनाही आपल्या ओळखीचा किंवा वजनाचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष फायदा होण्यासारखा असल्यास तो करून देण्यास ते केव्हांही तयार असत.

हरिभाऊ आणि नामदार गोखले यांचा स्नेह प्रसिद्धच आहे. ना० गोखल्यांचा उल्लेख त्यांच्या भाषणांत नेहमीं होत असे. त्यांनीं ना० गोखल्यांबद्दल कित्येक आठवणी सांगतांना ज्यांनीं ऐकिलें असेल त्यांना त्यांचें गोखल्यांवर किती प्रेम व भक्ति होती हें समजून आलेंच असेल. ना० गोखल्यांच्या मृत्यूच्या प्रसंगाचें वर्णन आपट्यांच्या तोंडून मीं स्वतः चारपांच वेळ ऐकिलें आहे; आणि प्रत्येक वेळीं तो प्रसंग ते इतक्या भावनेनें व हृदयद्रावक रीतीनें वर्णन करीत, कीं त्यांची स्वतःची वृत्ति तर त्या वेळीं गहिंवरून येईच, पण ऐकणाराच्या मनावरसुद्धां गंभीर परिणाम होत असे. असा शेवटचा प्रसंग त्यांच्या शेवटच्या आजारांत ता. १९ फेब्रुवारी रोजीं आला. त्या दिवशीं हरिभाऊंची मनोवृत्ति सर्व दिवसभर अत्यंत खिन्न व उदास होती. शरीराच्या अस्वास्थ्यामुळें आज कदाचित् ते असे झाले असतील, असा आसपासच्या मंडळींचा साहजिक समज झाला; पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांनीं आपल्या आदल्या दिवशींच्या खिन्नतेचें कारण सांगितलें. ते म्हणाले, "१९ फेब्रुवारी हा दिवस माझ्या आयुष्यांतील अत्यंत दुःखाचा आहे; कारण याच दिवशीं सात वर्षांपूर्वीं माझी एकुलती एक मुलगी,

आणि चार वर्षांपूर्वीं एक अत्यंत जिवलग स्नेही मला सोडून गेला!" शरीरप्रकृति आधींच फार क्षीण झालेली आणि त्यांत या मनाच्या अस्वस्थतेमुळें त्यांना फार त्रास झाला, असें दिसलें. कारण वरील शब्द बोलून ते कांहीं वेळपर्यंत डोळे मिटून स्वस्थ पडले. या वेळीं कदाचित् गोखल्यांच्या मृत्यूचा प्रसंग त्यांच्या मनश्चक्षूंपुढून जात असावा. कांहीं मिनिटांनीं डोळे उघडून आपलें बोलणें त्यांनीं पुनः सुरू केलें. "गोपाळराव वारले त्या सकाळीं मी त्यांच्याजवळ होतों; संध्याकाळीं घरीं परत आलों. जरा बसतों तों रात्रीं दहा वाजतां सोसायटींतून निरोप आला, कीं गोखले अत्यवस्थ आहेत. तेव्हां वामनराव पटवर्धन यांना घेऊन मी लागलींच निघालों. सोसायटींत येऊन पहातों तों गोपाळराव आरामखुर्चीवर पडले असून अगदीं शेवटल्या स्थितींत आहेत. आणि सर्व मंडळी सभोंवार उभी आहे. मी जवळ जातांच त्यांनीं डोळे उघडले, व माझ्याकडे पाहून, 'हरिभाऊ, जातों आतां' असें हंसून म्हणून नमस्कार केला. लागलींच मान टाकिली; आणि सर्वच आटोपलें. जणूं काय माझा निरोप घेण्यासाठींच ते वाट पहात होते." हीं शेवटचीं वाक्यें बोलत असतां हरिभाऊंचा कंठ अगदीं दाटून आला, आणि त्यांच्या डोळ्यांत अश्रुही उभे राहिले. पुन्हां कांहीं वेळ ते स्तब्ध राहिले आणि डोळे उघडून व एक दीर्घ निःश्वास सोडून म्हणाले, "I lost two of my dear persons yesterday. I thought I would be the third to follow them !"

हरिभाऊंचें आपल्या एकुलत्या एक कन्येवर अत्यंत प्रेम असून तिच्या भावी चरित्राबद्दल त्यांनीं फार उच्च आकांक्षा बाळगिल्या होत्या, असें त्यांच्या बोलण्यावरून दिसत असे. त्या मुलीची केव्हांही आठवण झाली तरी त्यांच्या डोळ्यांना लागलींच पाणी येई, व तो विषय ते लागलींच बदलीत. एकदां सर ऑलिव्हर लॉज

यांच्या " रेमंड " या पुस्तकावरून हरिभाऊंशीं पुनर्जन्माच्या अस्तित्वाबद्दल बोलणें निघालें असतां पुनर्जन्मावर आपला दृढ विश्वास असल्याचें त्यांनीं बोलून दाखविलें. तेव्हां मीं म्हटलें, "आत्म्याचें अमरत्व व पुनर्जन्म यांवर विश्वास असतांना आपल्या आवडत्या मृत माणसांबद्दल दुःख कां व्हावें ? " यावर ते म्हणाले, "याचें कारण हेंच कीं, आपली ममता आत्म्यावर नसून ज्या विशिष्ट देहांत तो आत्मा वास करतो त्या देहावर असते म्हणून." यानंतर बऱ्याच वेळानें ते पुनः म्हणाले, " मला जरी या सर्व गोष्टी पटतात तथापि उद्यां जर मला खात्रीलायक समजलें, कीं माझी मुलगी अमुक एका ठिकाणीं पुनः जन्माला आली आहे, तरी ती पहिल्या देहानें दृष्टीला पडली असतां मला जो हर्ष वाटेल तो तिच्या या नव्या देहांत येण्यानें वाटणार नाहीं.

मीं विचारलें, "पण तुम्हांला या नव्या देहांतील तिच्या आत्म्याबद्दल प्रेम तरी वाटेल कीं नाहीं ?"

यावर कांहीं वेळ विचार करून त्यांनीं सावकाश उत्तर दिलें, " तेंही मला खात्रीपूर्वक सांगतां येणार नाहीं !"

त्यांच्या वाचनाच्या खोलींत टेबलाच्या एका बाजूला या मुलीचा सभोंवार कांहीं खेळणीं घेऊन खेळतांनाचा असा एक फोटो फ्रेममध्यें घालून टांगलेला आहे. या फोटोच्या खालीं पुढील एकच अर्थपूर्ण व प्रेमळ असें वाक्य आहे. तें हें; "आमची करमणूक व तिची करमणूक !"

हरिभाऊंच्या मनावर या मुलीच्या मरणाचा इतका परिणाम होण्याचें कारण ती त्यांचें एकच अपत्य होती हें तर होतेंच; पण त्यांना लहान मुलें नेहमीं विशेष प्रिय होतीं, हेंही आणखी एक कारण असूं शकेल. लहान मुलांशीं स्नेह संपादन करण्याची हरिभाऊंच्या अंगांत विशेष कला होती; आणि त्यांच्या बहुतेक

स्नेह्यांच्या मुलांमुलींशीं त्यांचा फार प्रेमळ स्नेह असे. पुष्कळदां ते त्या मुलांमुलींत मोकळेपणानें मिसळून त्यांचे खेळ खेळत असत. "लहान मुलांच्या निष्कपट मनाचें निरीक्षण करण्यासारखें इतर कांहींच मला प्रिय नाहीं" असें ते पुष्कळदां म्हणत. लहान मुलांमुलींना उपयुक्त पुस्तकें आणि बक्षिसें देण्यांत त्यांचा बराच पैसा खर्च होत असे.

ना० गोखल्यांशिवाय ज्या दुसऱ्या दोन स्नेह्यांचा उल्लेख हरिभाऊंच्या बोलण्यांत नेहमीं येत असे, ते स्नेही म्हणजे परलोकवासी गोविंद वासुदेव कानिटकर, आणि त्यांच्या पत्नी श्रीमती काशीबाई कानिटकर हीं दोघें होत. श्री० काशीबाईंच्या विद्वत्तेबद्दल व बुद्धिमत्तेबद्दल आपणांला वाटत असलेला विशेष आदर हरिभाऊ पुष्कळदां व्यक्त करून दाखवीत. तसेंच गोविंदराव कानिटकरांच्या सारखा रसिक आणि विद्याव्यासंगी मनुष्य क्वचितच सांपडतो, असेंही त्यांनीं अनेकदां बोलून दाखविलें होतें. या जोडप्याचा आपल्या विचारांवर व जीवनक्रमावर बराच परिणाम झाला असल्याचेंही हरिभाऊंनीं एकदां कबूल केलें. हरिभाऊंना आपल्या मित्रांबद्दल नेहमीं अतिशय प्रेम आणि अभिमान वाटत असे; इतका कीं, ना० गोखल्यांवर त्यांच्या सार्वजनिक जीवनक्रमांत कित्येक प्रसंगीं जी कुत्सित व खोडसाळपणाची टीका झाली त्याबद्दल कधीं गोष्ट निघाली तर हरिभाऊंना अगदीं संताप चढत असे; व एकदां ते असें म्हणाले कीं, "माझ्यासारख्या सामान्य मनुष्यावर लोकांनीं टीका केली तर त्याबद्दल मला कांहीं वाटणार नाहीं; पण गोपाळरावांचा जो नाहक छळ झाला तो मी कधींही विसरणार नाहीं."

हरिभाऊंच्या विद्वत्तेबद्दल आणि विद्याव्यासंगाबद्दल जी प्रसिद्धी आहे, ती वास्तविक त्यांच्या खऱ्या विद्वत्तेच्या मानानें किती तरी

कमी आहे असें म्हटलें पाहिजे. त्यांना युनिव्हर्सिटीचें उच्च शिक्षण नसतां, त्यांनीं इतकें अध्ययन व वाचन केलें तरी कधीं व कसें, याचें राहून राहून नवल वाटतें. त्यांच्या विद्वत्तेबद्दल बाहेरच्या लोकांना–पुण्यांतीलसुद्धां–फारच थोडी माहिती आहे असें म्हटलें तर त्यांत फारशी चूक होईल असें मला तरी निदान वाटत नाहीं. त्यांनीं अर्थशास्त्राचें चांगलें अध्ययन केलें असून, अनेक हिंदी राजकीय, आर्थिक व औद्योगिक प्रश्नांचा त्यांनीं फार बारकाईनें विचार केला होता. आणि त्यांपैकीं कांहीं प्रश्नांवर आपलीं मतें ठरवून ठेविलीं होतीं. त्यांनीं इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका या तिन्ही देशांच्या राजशासनपद्धतीचा व इतिहासाचा फार चांगला अभ्यास केला होता. सर्व युरोपचा इतिहासही त्यांनीं वाचला होता. पाश्चात्य तत्त्वज्ञान त्यांनीं चांगल्या प्रकारें वाचलें होतें. मिल-स्पेन्सरपासून तों फ्रेंच, जर्मन व अमेरिकन तत्त्वज्ञानी–नास्तिक व आस्तिक दोन्ही–त्यांनीं वाचले होते. तसेंच काव्य आणि नाटक या विषयांवरीलसुद्धां पुष्कळ ग्रंथ त्यांनीं वाचिले होते. "कविता आणि तिचें स्वरूप" या विषयावर तात्त्विक ग्रंथ लिहावयाचें त्यांच्या मनांत होतें व त्यासाठीं त्यांनीं बरीच तयारीही केली होती. सदरहू ग्रंथांत कवितेची व्याख्या भिन्नभिन्न भाषांच्या वाङ्मयांत कशी केली आहे हें सांगून इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, संस्कृत इत्यादि भाषांतील उत्कृष्ट उतारे देऊन त्यांचा विचार करावयाचा, आणि मग मराठी भाषेच्या जुन्या व नव्या कवींबद्दल तुलनात्मक सापेक्ष विचार करावयाचा असा त्यांचा हेतु होता; व तो त्यांनीं मजजवळ दोनतीनदां बोलून दाखविला होता. इंग्रजी भाषेशिवाय फ्रेंच व बंगाली या दोन्ही वाङ्मयांचाही त्यांचा फार चांगला व्यासंग होता. कादंबरीलेखन हा तर त्यांचाच विषय असल्यामुळें इंग्रजी आणि फ्रेंच कादंबरीकार त्यांनीं सगळे वाचले असले तर त्यांत नवल

नाहीं, पण इतर विषयांचेंसुद्धां त्यांचें वाचन इतकें अफाट आणि विस्तृत होतें कीं, त्याची नुसती सांगून कल्पनाही करतां येणार नाहीं. त्यांचें संस्कृत वाचनही तसेंच दांडगें होतें, याची साक्ष महाभारतावर व गीतेवर त्यांनीं लिहिलेल्या निबंधांवरून पटते. मराठी वाङ्मयांतलें त्यांचें वाचन व अध्ययन यांबद्दल त्यांच्या अनेक फुटकळ लेखांवरून अनुमान होतें. एम्. ए. ला मराठीचे परीक्षक नेमण्याच्या बाबतींत हरिभाऊंच्या अंगची विद्वत्ता इतर लोकांना न कळतां एकट्या युनिव्हर्सिटीच्या सीनेटलाच अचानक ती कशी समजली, असा एक कुत्सित प्रश्न एका संपादकांनीं आपल्या हरिभाऊ आपट्यांवरील मृत्युलेखांत केला आहे. तथापि खरी गोष्ट अशीच आहे कीं, पक्षभेदानें अंध झाल्यामुळें पुण्याच्या पुष्कळ लोकांना हरिभाऊंची खरी योग्यता व विद्वत्ता कधींही समजून आली नाहीं. आणि हरिभाऊ आपटे म्हणजे अधिकारी वर्गाला खूष करून त्यांच्या "My dear friend Mr. Apte" असें म्हणण्याला हुरळून जाणारे एक सामान्य गृहस्थ होते असा या मंडळींचा अद्यापि समज आहे. पण हरिभाऊंच्या स्वाभिमानी व बाणेदार स्वभावाची ज्यांना माहिती नाहीं, व त्यांचें अधिकारी वर्गांत असलेलें वजन केवळ अंगच्या विद्वत्तेमुळेंच त्यांना प्राप्त झालें होतें, याची ज्या लोकांना कल्पना नाहीं, त्यांनीं पक्षभेदानें अंध होऊन हरिभाऊंसारख्या थोर गृहस्थावर असे आरोप न केले तरच आश्चर्य होय! असो.

मराठींतले सर्व जुने कवि व ग्रंथ हरिभाऊंनीं वाचले असून तुकाराम तर त्यांना बहुतेक मुखोद्गत होता. तुकारामाच्या अभंगां-वर हरिभाऊंची भक्ति विशेष असून त्याचा व्यासंगही त्यांनीं फारच चांगला केला होता, व याचें प्रत्यंतर त्यांच्या "सहा अभंगांत तुकाराम" या लहानशा पण गोड पुस्तकांत पहावयास मिळेल.

ज्ञानेश्वरी हा त्यांचा दुसरा आवडता ग्रंथ असून एकनाथ, रामदास वगैरे कविही त्यांनीं बारकाईनें वाचिले होते. पाली भाषेवरही त्यांचा थोडाबहुत व्यासंग असावा. जर्मन भाषाही त्यांना थोडी अवगत होती. आणि लाटिन व ग्रीक भाषांचाही त्यांचा अभ्यास सुरू असावा, असें मला वाटतें.

त्यांच्या वाचनाचा दुसरा आवडता विषय म्हणजे इतिहास. महाराष्ट्राच्या इतिहासाची त्यांना किती गोडी आणि अभिरुचि होती, हें त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांवरून दिसून येतेंच; पण इतर बहुतेक सर्व देशांचे इतिहास त्यांनीं काळजीपूर्वक वाचले होते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे वाङ्मयाची अशी एकही शाखा नव्हती कीं, जिकडे हरिभाऊंनीं आपलें लक्ष्य पोंचविलें नव्हतें. आणि या सर्वांत नवल हें कीं, आपल्या या विद्वत्तेचा त्यांना अभिमान अगर ताठा बिलकूल नसे. एकदां शेक्सपिअरच्या कांहीं सॉनेट्स्चें भाषांतर करीत असतां तें भाषांतर चुकलें आहे कीं बरोबर झालें आहे, हें पहावयाला त्यांनीं आपल्या एका तरुण ग्रॅज्युएट मित्राला सांगितलें. तो गृहस्थ हरिभाऊंची योग्यता पूर्णपणें जाणीत होता; शिवाय तो नुकताच ग्रॅज्युएट झाला असून शेक्सपिअर त्यानें फारसा वाचलाही नव्हता. म्हणून असें काम करावयाला तो साहजिकच फार नाखूष होता. तथापि हरिभाऊंच्या आग्रहास्तव त्यांचें भाषांतर मुळाशीं ताडून पाहण्याचें त्यानें कबूल केलें. हरिभाऊंसारख्या, शेक्सपिअरचा कसून अभ्यास केलेल्यानें केलेलें तें भाषांतर, त्यांत चूक थोडीच असणार; पण एकदोन ठिकाणीं त्या गृहस्थाला शंका आल्या, व एकदोन ठिकाणीं त्यानें दुसऱ्या प्रकारची वाक्यरचना सुचविली. हरिभाऊंनीं त्याची सूचना मान्य करून, त्याच्या दुसऱ्या शंका होत्या त्यांचें सविस्तर निराकरण केलें. त्या तरुण गृहस्थाची अल्प विद्वत्ता व वय आणि हरिभाऊंची

विद्वत्ता हीं पाहतां त्यांच्या मोकळेपणाचें कौतुक वाटल्यावांचून रहात नाहीं.

हरिभाऊंना वाचनाचा नाद म्हणजे एक व्यसनच होतें. त्यांच्यामागें अनेक प्रकारचीं शेंकडों कामें असत; पण जरासा रिकामा वेळ सांपडला कीं, त्यांच्या हातांत पुस्तक आलेंच. अलीकडे बरींच वर्षें त्यांची झोंप कमी झाली होती; यामुळें पहांटे तीन वाजल्यापासून बहुतेक त्यांचें वाचन सुरू होई. ते कोठेंही प्रवासाला गेले तरी त्यांच्याबरोबर पुष्कळशीं पुस्तकें असावयाचीं, व कोठेंही आणि कसाही वेळ सांपडला कीं, त्यांनीं वाचन सुरू केलेंच. गेल्या आक्टोबरांत त्यांना डोळ्यांच्या पापणीचा 'पॅरेलिसिस' झाला, त्या वेळीं त्यांनीं आपल्या कित्येक तरुण स्नेह्यांना एकएक दोनदोन तास आपल्याकडे येऊन आपणांला कांहींतरी वाचून दाखविण्याबद्दल विनंति करून, त्या दुखण्यांत त्यांनीं मोर्ले-कृत कॉब्डेन्चें चरित्र, व बेजहॉटचे निबंध हीं दोन पुस्तकें वाचून घेतलीं! त्यांच्या शेवटल्या आजारांतसुद्धां त्यांच्यासभोंवार पुस्तकें पसरलेलीं असून, शक्य होतें तोंपर्यंत त्यांचें वाचन चालूंच होतें! जलोदरामुळें पुष्कळदां पोटाला ओढ लागून त्यांना फार त्रास होत असे; पण अशा स्थितींतसुद्धां त्यांचा उपाय म्हणजे वाचन! एकादें चांगलें पुस्तक पाहण्यांत किंवा ऐकण्यांत आलें कीं, तें त्यांनीं लागलींच विकत घेतलेंच. उदराच्या या दुखण्यांतून आपण उठूं अशी हरिभाऊंना कांहीं आशा नव्हती. पण "Makers of Modern Italy" या पुस्तकाची एकाकडून स्तुति ऐकतांच तें पुस्तक पाठविण्याबद्दल त्यांनीं तावडतोब मॅक-मिलन् कंपनीला पत्र लिहिलें; व हें पुस्तक मागविल्यापासून बाराव्या दिवशींच त्यांचा अंत झाला!

मराठी जुन्या कवींत त्यांचे आवडते कवि तुकाराम व ज्ञानेश्वर

होते हें वर सांगितलेंच आहे. आधुनिक कवींमध्यें "केशवसुतां" च्या कवितेबद्दल त्यांना विशेष आवड असे. एकंदर आधुनिक कवितेबद्दल त्यांचें मत इतकें उत्तम असलेलें मला फारसें आढळून आलें नाहीं. इंग्लिश व फ्रेंच कवींच्या मानानें आपली कविता कितीतरी मागें आहे असे उद्गार त्यांनीं पुष्कळदां काढलेले मीं ऐकिले आहेत. मराठी लेखकांमध्यें विष्णुशास्त्री चिपळूणकरांबद्दल त्यांना फार आदर असे. कारण आपणाला लिहिण्याची स्फूर्ति शास्त्रीबुवांमुळें झाली, असें ते म्हणत; व लेखनाच्या बाबतींत त्यांना ते आपल्या गुरुस्थानीं मानीत. चिपळूणकरांचीं मतें व मर्म-भेदी टीका करण्याची पद्धति दोन्ही हरिभाऊंना पसंत पडण्या-सारखीं नव्हतीं. तथापि त्यामुळें चिपळूणकरांविषयींचा त्यांचा आदर कधीं कमी झाला नाहीं. आगरकरांबद्दल सुद्धां त्यांना विशेष आदर होता. आधुनिक लेखकांबद्दल ते कधीं मत देत नसत; पण श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर यांची लेखनशैली फार साधी आणि मार्मिक असल्याबद्दल त्यांनीं एकदां बोलून दाखविलें होतें.

इंग्रजी कवींमध्यें शेक्सपिअरवरचें त्यांचें प्रेम व व्यासंग हीं सर्व-विश्रुतच आहेत. शेक्सपिअर सर्व वाङ्मयांतला राजा आहे असें ते म्हणत. त्यांनीं त्याच्या ग्रंथांचा अभ्यास चांगल्या रीतीनें केला होता. त्यांना शेक्सपिअरच्या नाटकांतील उत्तमोत्तम उतारे तोंडपाठ असत. मनुष्यस्वभावाचें सूक्ष्म अवलोकन करण्याच्या हरिभाऊंच्या शक्तीबद्दल त्यांची एका स्नेह्यानें स्तुति केली, तेव्हां ते म्हणाले, "तुम्हीं शेक्सपिअर पाहिला आहे कोठें ? त्यानें सगळें जग उष्टें केलें आहे. त्याच्यापुढें माझ्यासारख्या क्षुद्र जीवाची कथा काय !" शेक्सपिअरच्या नाटकांत टेंपेस्ट व हॅम्लेट हीं दोन नाटकें त्यांच्या आवडीचीं असून, शेक्सपिअरच्या स्फुट काव्यांत त्यांच्या सप्तपद्या Sonnets त्यांना फार प्रिय होत्या. त्यांपैकीं कित्येक

पद्यें त्यांच्या स्वतःकडून समजावून घेण्याचा योग मला एकदां आला होता. तो प्रसंग मी केव्हांही विसरणार नाहीं. परभाषेंतील कवीच्या आत्म्याशीं पूर्णपणें तादात्म्य पावून त्याचे विचार मराठी भाषेमध्यें मूळांतलें स्वारस्य जाऊं न देतां सुंदर रीतीनें आणण्याचें काम किती कठीण आहे तें पुष्कळांना अनुभवानेंच कळणार आहे; पण हें कठीण काम करावयाला एकट्या हरिभाऊंची लेखणी समर्थ होती असें म्हणण्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं.

शेक्सपिअरच्या खालोखाल त्यांचा दुसरा आवडता कवि मिल्टन होता; त्याचें "पॅराडाइज लॉस्ट" हें काव्य त्यांनीं अनेकदां वाचलें असून त्यांतलेही कांहीं सुंदर उतारे त्यांना पाठ असत. त्यांच्या शेवटल्या आजारांत ते नेहमीं मिल्टनचें 'पॅराडाइज लॉस्ट' हें काव्यच पुनः पुनः वाचीत; आणि शरीराच्या अस्वस्थतेचा भास होऊं लागला म्हणजे मन दुसरीकडे लागण्यासाठीं मिल्टन-मधील उतारे किंवा तुकारामाचे कांहीं आवडते अभंग पाठ म्हणत.

मिल्टनच्या खालोखाल त्यांचा तिसरा आवडता कवि ब्रौनिंग. याच्या काव्यावर अद्यापि Annotations प्रसिद्ध झालेलीं नाहींत; यामुळें बऱ्याच वाचकांना ब्रौनिंग समजावयाला अवघड जातो; परंतु हरिभाऊंनीं ब्रौनिंगचींही अनेक पारायणें करून त्यांतलीं उत्तम स्थळें हस्तगत करून घेतलीं होतीं. ब्रौनिंगची आपल्याला गोडी लावल्याचें श्रेय ते आपले मित्र ना० गोखले यांना देत. टेनिसन्, वर्डस्वर्थ, शेले, कीट्स वगैरे कविही त्यांनीं अर्थातच सर्व वाचिले होते. पण या कवींनीं त्यांचें चित्त फारसें आकर्षिल्यासारखें दिसलें नाहीं. अमेरिकन कवींमध्यें लॉंगफेलो व आधुनिक कवयित्री मिस व्हीलर विलकॉक्स हे त्यांच्या आवडीचे कवि होते.

इंग्रजी गद्यलेखकांपैकीं त्यांच्या अतिशय आवडीचा लेखक म्हणजे लॉर्ड मोर्ले. " मोर्लेशिवाय इतर कोणताच लेखक मला अलीकडे

आवडेनासा झाला आहे " असें त्यांनीं माझ्याजवळ पुष्कळदां बोलून दाखविलें होतें. मोर्लेचे सर्व ग्रंथ त्यांनीं अनेकदां वाचले होते; व " त्याच्या सर्व ग्रंथांमध्यें त्यांनीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या ' आठवणी ' ( Recollections ) फार सुंदर आहेत " असें ते नेहमीं म्हणत. " मीं वाचली नाहीं अशी मोर्लेची एक ओळसुद्धां नाहीं " असें त्यांनीं एकदां बोलून दाखविलें.

मोर्लेच्या खालोखाल त्यांचा दुसरा आवडता ग्रंथकार मिल. परंतु मिल केवळ मोर्लेचा गुरु एवढ्याच कारणास्तव मिलबद्दल त्यांचा आदर असे, असें मला वाटतें. तथापि मिलचे तत्त्वज्ञानावरील सर्व ग्रंथ त्यांनीं वाचले होते, व त्यामुळें आपल्या जीवनक्रमांत व विचारांत फार फरक झाला असें ते कबूल करीत. मिलकडे आपलें लक्ष प्रथम त्याच्या " Subjection of women " या अप्रतिम ग्रंथामुळें लागलें, व त्याचें श्रेय आपले स्नेही गोविंदराव कानिटकर यांना आहे, असें त्यांनीं सांगितलें. स्पेन्सरवरही एके काळीं आपली भक्ति असल्याचें त्यांनीं सांगितलें.

इंग्रजी कादंबरीकारांत ते पहिला नंबर डिकन्सला देत. आणि आपल्या सामाजिक कादंबऱ्या लिहितांना त्यांनीं डिकन्सला आदर्शवत् पुढें ठेविला असावा, अशी पात्रांचें स्वभाववर्णन विनोदी रीतीनें करण्याची हरिभाऊंची शैली पाहिली म्हणजे शंका येते. डिकन्सचें मनुष्यस्वभावाचें निरीक्षण व ज्ञान शेक्सपिअरच्या खालोखाल आहे असें त्यांचें मत होतें. हरिभाऊंची " मी " ही कादंबरी मीं प्रथम वाचली तेव्हां आरंभीं मला त्या कादंबरींत व डिकन्सच्या David Copperfield मध्यें बरेंच साम्य आढळलें. तेव्हां " मी " ची कल्पना सदरहू इंग्रजी कादंबरीवरून तर सुचली नाहीं ना, अशी मला शंका आली. कारण " मी " मधील शाळेचें वर्णन, सुंदरीमुळें नायकाच्या स्वभावावर झालेले परिणाम वगैरेचें डेव्हिड कॉपरफील्डशीं

बरेंच साम्य आहे. परंतु माझी शंका चुकीची असल्याबद्दल खुद्द ग्रंथकर्त्याकडून मीं पुढें खात्री करून घेतली. स्कॉटच्या कादंबऱ्याही फार सुंदर आहेत; पण ज्याला सामाजिक कादंबऱ्या लिहावयाच्या असतील त्यानें डिकन्सचेंच अध्ययन केलें पाहिजे असें हरिभाऊ म्हणत; परंतु स्वत: त्यांच्यामध्यें स्कॉट व डिकन्स या दोघांच्याही लेखनकौशल्याचा सुन्दर मिलाफ झालेला आहे, असें म्हटलें तर फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. कारण स्कॉटप्रमाणें ऐतिहासिक तर डिकन्सप्रमाणें सामाजिक अशा दोन्ही प्रकारच्या उत्कृष्ट कादंबऱ्या हरिभाऊंच्या ओजस्वी लेखणींतून बाहेर पडल्या आहेत. आधुनिक कादंबरीकारांपैकीं विल्कि कोलीन्स, विलियम लीको वगैरे कादंबरीकार त्यांना साधारण आवडत. पण मेरी कॉरेलीच्या कादंबऱ्यांविषयीं मात्र त्यांचें मत फार वाईट असे; तिच्याविषयीं लेखक या दृष्टीनें सुद्धां त्यांचें मत चांगलें असलेलें कधीं दिसलें नाहीं. Realistic व Idealistic या दोन वर्गांपैकीं मेरी कॉरेलीच्या कादंबऱ्या कोणत्या वर्गांत मोडतील असें मीं एकदां त्यांना विचारिलें. तेव्हां ते तुच्छतापूर्वक हंसून म्हणाले, " She belongs to neither School. She has her own School which 1 would call the " Hysteric School " of novelists."

आधुनिक इंग्लिश नाटककारांमध्यें ओस्कार वाईल्ड याचीं नाटकें त्यांना फार आवडत. आटोपशीर कथानक, रचनाकौशल्य, मार्मिक आणि विनोदी संभाषण, एकच नैतिक तत्त्व घेऊन तें कथानकांत उत्क्रांत करून दाखविण्याचें चातुर्य यांजमध्यें ओस्कार वाईल्डचा हात धरणारा दुसरा एकही नाटककार नाहीं, असें त्यांचें मत होतें. इबसेन् आणि बर्नार्ड शॉ यांच्या सामाजिक नाटकांबद्दल त्यांचें मत इतकें उत्तम झालेलें दिसलें नाहीं.

हरिभाऊंचा स्वभाव फार विनयी असे, त्यामुळें त्यांची विद्वत्ता

आणि गुण त्यांच्या स्नेह्यांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाला फारसे कळून येत नसत. या त्यांच्या स्वभावामुळें त्यांच्या कादंबऱ्यांची त्यांच्या तोंडावर कोणीं स्तुति केली, अगर त्याबद्दल कांहीं बोललें कीं, ते लागलींच विषय बदलीत; यामुळें त्यांनीं आपल्या सर्वोत्कृष्ट कादंबऱ्या लिहिल्या तरी कशा हें त्यांच्या स्वतःकडून समजण्यास मार्ग नसे. कारण स्वतःबद्दलच्या प्रत्येक बाबींत ते अगदीं मुग्ध असत. तथापि श्रोता तसा असला, आणि ते स्वतः खुषींत असले म्हणजे कादंबऱ्यांबद्दल कांहीं गोष्टी त्यांच्या मुखांतून बाहेर पडत. अशाच एका प्रसंगीं "पण लक्ष्यांत कोण घेतो?" या अप्रतिम कादंबरीचें कथानक सुचलें तो प्रसंग त्यांनीं सांगितला. तो सांगण्याच्या आधीं एक गोष्ट येथें सांगितली पाहिजे कीं, हरिभाऊंच्या सर्व सामाजिक कादंबऱ्या काल्पनिक प्रसंगावर उभारलेल्या नसून खऱ्याखुऱ्या घडलेल्या गोष्टींवरूनच त्या सुचलेल्या आहेत; इतकेंच नव्हे, तर त्यांचीं सर्व पात्रेंही खरींखुरीं अशींच आहेत. कारण एकदां त्यांनीं स्पष्ट बोलून दाखविलें कीं, "माझ्या कादंबऱ्यांत एकही पात्र असें नाहीं कीं, जें व्यवहारांत मीं प्रत्यक्ष पाहिलें नाहीं." "भयंकर दिव्यां"तील राजाराम हें पात्र मात्र पूर्णपणें काल्पनिक आहे असें त्यांनीं सांगितलें. "जग हें असें आहे" यामधील सर्व पात्रें–फेअरब्रेन, बुळस्नीक, सिस्टर चॅरिटी, बाबू महाशय वगैरे सर्व खरीं आहेत. त्याचप्रमाणें या कादंबरींत सीतारामाच्या भावाला रेसकोर्सच्या मैदानावर घडलेला अपघात, पुढें इस्पितळांतील मृत्यूचा प्रसंग इत्यादि गोष्टींचीं सुद्धां ग्रंथकारानें स्वतः पाहिलेल्या प्रसंगांचीं वर्णनें आहेत, असें त्या प्रसंगीं हरिभाऊंजवळ हजर असलेल्या त्यांच्या एका स्नेह्यानें मला सांगितलें आहे. असो.

"पण लक्ष्यांत कोण घेतो" या कादंबरीची उत्पत्ति अशी आहेः–

हरिभाऊ लहान म्हणजे पंधरासोळा वर्षांचे असतां पुण्याला

आपल्या वडिलांबरोबर एका वाड्यांत राहात असत. त्याच वाड्यांत दुसरें एक बिऱ्हाड होतें. या कुटुंबांत हरिभाऊंच्याच वयाची एक मुलगी होती, तिच्या चरित्रावरून "पण लक्ष्यांत कोण घेतो" या अत्युत्कृष्ट कादंबरीचें कथानक हरिभाऊंना सुचलें. ही मुलगीच जवळजवळ ह्या कादंबरींतील नायिका यमू आहे, असें म्हटलें तरी चालेल. या मुलीचा तिच्या सासरीं फार जाच होत असे; तिचा नवरा कॉलेजांत यमूच्या नवऱ्याप्रमाणेंच शिकत असून त्याचें कुटुंब तसेंच मोठें होतें; एकाच वाड्यांत राहून या बिऱ्हाडकरूंच्या अनेक गोष्टी, व त्या बिचाऱ्या मुलीचा जाच हीं पाहून "पण लक्ष्यांत कोण घेतो" च्या कथानकाची हरिभाऊंना स्फूर्ति झाली. ह्या मुलीवरही पुढें यमूप्रमाणेंच पतिनिधनाचा आणि केशवपनाचा प्रसंग आला. एका पहाटेस ह्या मुलीला फसवून तिच्या सासरच्या मंडळींनें ओंकारेश्वरावर नेऊन तिचें केशभूषण बलात्कारानें हिरावून घेतलें. "पण लक्ष्यांत कोण घेतो" या कादंबरींत नायिकेवर केशवपनाचा प्रसंग तिच्या सकेशत्वामुळें शंकरमामंजीच्या गर्भाधानाला ब्राह्मण मिळेनात म्हणून येतो. अशा रीतीनें एका पन्नाशीच्या जवळ आलेल्या थेरड्याच्या विषयसुखाच्या तृप्तीसाठीं, यमूसारख्या दुःखानें पोळलेल्या असहाय बालिकेवर केशवपनाचा दुर्धर प्रसंग आणण्यांत ग्रंथकर्त्यानें कमालीचें चातुर्य दाखविलें आहे, यांत संशय नाहीं; कारण तेथपर्यंत सर्व कथानकाची जुळणी अशा विलक्षण रीतीनें होत आली आहे कीं, बिचाऱ्या यमूवर अत्यंत दुर्धर असा हा एक शेवटचा आघातच व्हावयाचा उरला होता; आणि तोही अशा नीच कारणास्तव व नीच रीतीनें झालेला पाहून यमूबद्दलची वाचकांच्या सहानुभूतीची व कथानकाच्या करुणरसाची परमावधि होते.

वरील प्रसंग आपणाला कसा सुचला हेंही हरिभाऊंनीं एकदां

सांगितलें. या प्रसंगापर्यंतचीं प्रकरणें लिहिल्यानंतर नायिकेच्या केशवपनासाठीं कोणचें कारण दाखवावें, कीं ज्यामुळें नायिकेबद्दल वाटणारी दया अत्यंत तीव्र होऊन शंकरमामंजीसारख्या ढोंगी मनुष्याचा नीचपणा तितकाच उठावदार दिसेल अशा विचारांत ते पडले. बराच विचार केला, पण तसें कांहीं कारण त्यांना सुचेना. येथपर्यंतचीं सर्व प्रकरणें तशींच लिहून पडलीं असतां डेक्कन कॉलेजची टर्म संपून ( या वेळीं ते पी. ई. च्या वर्गांत होते ) हरिभाऊ बेळगांवास त्यांचे वडील पोस्टाकडील अंमलदार होते त्यांच्याकडे सुट्टींत गेले. तेथें त्यांच्या वडिलांचे एक स्नेही पन्नाशीच्या जवळ असून त्यांनीं नुकताच एका द्वादशवर्षीय बालिकेशीं विवाह केला होता. त्याच घरांत त्यांची एक अल्पवयी गतभर्तृका सून होती. नित्याप्रमाणें हरिभाऊ संध्याकाळीं फिरावयास निघाले असतां त्यांच्या वडिलांनीं त्यांना हाक मारून सांगितलें कीं, "सदरहू गृहस्थांचा आज गर्भाधान सोहळा असून त्यांच्या घरचें संध्याकाळचें फराळाचें बोलावणें आहे. तरी तुम्हीं सायंकाळीं फिरून परत घरीं येतांना त्या गृहस्थांच्या घरीं परस्पर जाऊन फराळ करून यावें." आपल्या वयाच्या पन्नासाव्या वर्षीं आपल्या तिसऱ्या अगर चौथ्या लग्नाचा गर्भाधान सोहळा, गतभर्तृका व अल्पवयी सुनेसमोर करणाऱ्या त्या गृहस्थाच्या निर्लज्जपणाचा हरिभाऊंस अत्यंत संताप आला, व असे प्रकार नित्य घडत असून समाजाला त्याचें कांहींच वाटूं नये याचा त्यांना फार खेद वाटला. अशा प्रकारच्या मनःस्थितींत ते फिरावयास निघाले असतां या गोष्टीबद्दल त्यांचा विचार चालूच होता, तों त्या वेळीं आपण लिहीत असलेल्या कादंबरींतील पात्रांकडे त्यांचें सहजच लक्ष्य गेलें, आणि या प्रस्तुत प्रसंगावरून त्यांना हवें होतें तें कारण सांपडलें; व "पण लक्ष्यांत कोण घेतो" यांतील नायिकेचें केशवपन, तिच्या सासऱ्याच्या गर्भाधानाला ब्राह्मण मिळेनात म्हणून करण्यांत आलें,

अशा प्रकारची त्यांनीं सांखळी जुळविली. ही स्फूर्ति त्यांनीं वायां जाऊं दिली नाहीं. या अप्रतिम कादंबरींतला हा शेवटचा अत्यंत हृदयद्रावक भाग त्यांनीं त्या रात्रींच जागून लिहिला. हें शेवटचें प्रकरण किती परिणामकारक वठलें आहे हें, " पण लक्ष्यांत कोण घेतो"च्या वाचकांना सांगावयाला नकोच !

"मी" या कादंबरीचें कथानक अशाच कांहीं प्रसंगावरून सुचलें कीं काय, हें जाणण्याची मला फार उत्कंठा झाली, पण या बाबतींत हरिभाऊंचा विशेष मुग्धपणा दिसून आला. तथापि "मी" हें पुस्तक वाचीत असतां आलेल्या कांहीं शंकांचें निराकरण करून घेण्यासाठीं एकदां मी त्यांना मुद्दाम भेटावयास गेलों. त्या प्रसंगीं माझ्या शंकांबद्दल थोडेसें बोलणें आणि वादविवाद झाल्यावर मीं त्यांना विचारलें, "प्रत्यक्ष व्यवहारांत आढळलेलींच पात्रें रेखाटण्याचा व व्यवहारांतील प्रसंगांवरच कथानकें रचण्याचा आपला नियम असतां 'मी'प्रमाणें कल्पनामय कथानक आपल्या कसें मनांत आलें ? " यावर त्यांनीं सांगितलें, 'मी'मध्यें काल्पनिक भाग असा फारच थोडा, शेवटचा मठस्थापनेचा आहे. बाकीच्या बहुतेक कथानकाला वस्तुस्थितीचा आधार आहे. 'मी'मधील नायक भाऊ, शिवरामपंत, ताई, सुंदरी, भाऊचे ज्योतिर्षी, वडील रावजी हीं सर्व पात्रें खरीं आहेत. भावानंदाच्या मतांची व देशसेवेच्या कल्पनेची जी पुढें उत्क्रांति झालेली दाखविली आहे, ती मात्र आपले एक मृत स्नेही विष्णु बळवंत पंडित (ज्यांना सदरहू 'मी' ही कादंबरी अर्पण केली आहे) यांच्याशीं झालेल्या अनेक वादविवादांचें फळ आहे." ते पुढें आणखी असें म्हणाले कीं, "आम्हांला रोज जशीं माणसें जशा परिस्थितींत भेटतात, तीं तशाच परिस्थितींत आम्ही कादंबरींत लिहितों, असा तुमचा समज असेल तर तो चुकीचा आहे. कारण तसें केलें तर ताबडतोब त्या मनुष्याची

ओळख पटून गोष्टीचें स्वारस्य व नाविन्य जाईल. कादंबरीकाराचें कौशल्य हें आहे कीं, अनेक प्रकारचे मनुष्यस्वभाव व प्रसंग पाहून, त्यांचा आपल्या हेतूला पोषक व वाचकांना मनोरंजक अशा रीतीनें उपयोग करणें. कादंबरीकाराचें काम म्हणजे जवळजवळ जवाहिऱ्याचें किंवा स्वयंपाक्याचें आहे. आपल्याला उपयोगीं पडतील ते हिरे निवडून जवाहिऱ्या त्यांची अशा सुंदर रीतीनें रचना करितो कीं, तो दागिना पाहून पहाणाराचें मन मोहून जावें. आपल्याला इष्ट अशी रचना करतांना आपल्या सोईला येईल त्याप्रमाणें त्या सृष्टिनिर्मित हिऱ्यांचे आकार जवाहिऱ्याला बदलावे लागतात. उत्कृष्ट आचारीसुद्धां सृष्टीनेंच उत्पन्न केलेले पदार्थ घेऊन त्यांत योग्य तो फेरफार करून व मसाला घालून त्याचें रुचकर पक्वान्न बनवितो. त्याचप्रमाणें कादंबरीकारालासुद्धां करावें लागतें. प्रसंग रोज व्यवहारांत नित्य घडणाराच घ्यावयाचा; पण त्याला जरासें किंचित् वळण द्यावयाचें, कीं, लागलीच त्यांत चमत्कृति व नाविन्य उत्पन्न झालें." 'मी'मध्यें आलेल्या शाळेचें व मास्तरांचें वर्णन, हें —जें डेव्हिड कॉपरफील्डवरून घेतलें असावें अशी मला शंका आली होती—आपण स्वतः लहानपणीं मुंबईस जात असलेल्या शाळेचें वर्णन असल्याबद्दल हरिभाऊंनीं सांगितलें. आपला स्वभाव लहानपणीं फार लाडावलेला व खोडकर असे, असें ते पुष्कळदां सांगत. त्यांनीं स्वतःबद्दल सांगितलेली एक गोष्ट फार मजेची आहे. हरिभाऊ लहानपणीं आपले चुलते महादेव चिमणाजी यांच्याजवळ असतांना माधवरावजींनीं त्यांना संस्कृत शिकविण्यासाठीं एक शास्त्री ठेविले होते. या शास्त्रीबुवांच्या सर्व डोक्याला मोठें टक्कल असून डोक्यावर एकही केंस नव्हता. त्यांच्या त्या गुळगुळीत डोक्यावरून हात फिरविण्याची हरिभाऊंना लहानपणीं फार मौज वाटे. त्या वेळीं त्यांनीं संस्कृताचा अभ्यास एकाच अटीवर चांगला करावा; ती अट

ही कीं, शिकणें संपल्यानंतर शास्त्रीबुवांच्या गुळगुळीत डोक्यावरून एकदां हात फिरविण्यास मिळावा! स्वतःच्या खोडकरपणाच्या अशाच आणखीही पुष्कळ गोष्टी हरिभाऊ सांगत असत. त्यावरून मला कित्येक वेळां अशी शंका येते कीं, 'मी'मधील नायकाचें लहानपण जें सर्व वर्णिलें आहे त्यापैकीं पुष्कळसा स्वानुभव तर नसेलना? तसेंच सदरहू नायकाची पुढील मनःस्थिति जी वर्णिली आहे तीही अशीच विचार करण्यासारखी आहे. वाढत्या शिक्षणानें, समाजाच्या आणि राष्ट्राच्या हीन स्थितीची जाणीव होऊन मनाला होणारा संताप, या स्थितींतून बाहेर पडण्यास उपाय शोधण्यासाठीं मनाची चाललेली धडपड, आयुष्याची दिशा ठरवितांना मनाची होणारी अस्थिरता वगैरे सर्व मनःस्थिति इतकी हुबेहूब व तादात्म्यानें वर्णिली आहे कीं, अशा प्रकारच्या मनःस्थितींतून स्वतः ग्रंथकार तर गेला नसेलना; अशी शंका आल्यावांचून राहात नाहीं; परंतु हल्लींच्या स्थितींत प्रत्येक सुशिक्षित तरुणाची अशी मनःस्थिति होते. आपल्या आयुष्याची कार्यदिशा ठरवितांना आपल्या मनाचा स्वतःशीं फार झगडा झाला, आणि अनेक भिन्नभिन्न मतांच्या ग्रंथकारांच्या वाचनानें व वडील मंडळीच्या प्रेमळ परंतु ऐहिक उपदेशानें आपलें मन किती अस्थिर व अनिश्चित झालें, याचें एकदां बोलण्याच्या ओघांत हरिभाऊंनीं वर्णन केलें. त्यावरून भावानंदाच्या स्वभावाच्या आणि मताच्या उत्क्रांतीचें जें चित्र रेखाटलें आहे, त्यांत स्वानुभवाची बरीचशी छटा असावी, असा माझा समज आहे.

'मी' या कादंबरींत कित्येक गोष्टी तशाच मुग्ध राहिल्या आहेत. उदाहरणार्थ, नायकाला सांपडलेला लखोटा, नायकाच्या वडिलांचें पुढें काय झालें, भावानंदाच्या श्रीमंत मित्राची हकीगत वगैरे, या गोष्टी स्पष्ट कां केल्या नाहींत अशी माझी शंका होती.

याचें उत्तर हरिभाऊंनीं असें दिलें कीं, ती कादंबरी खरोखरीच्या आत्मचरित्राप्रमाणें दिसावी म्हणून. कारण आपल्या आयुष्यांत पुष्कळ गोष्टी तशाच राहून जातात व पुढें त्यांजविषयींची आपली जिज्ञासा अपुरीच राहते. शिवाय आपल्याला ज्या गोष्टींची माहिती असेल त्याच आपण आत्मचरित्रांत लिहूं; त्याप्रमाणें भावानंदालाच जर वरील गोष्टींचा त्याच्या आयुष्यांत उलगडा झाला नाहीं, तर तो आत्मचरित्रांत तरी काय लिहिणार? आत्मचरित्राचें खरें स्वरूप येण्यासाठीं "पण लक्ष्यांत कोण घेतो" या कादंबरींतसुद्धां आपण कांहीं गोष्टी अशाच मुग्ध सोडल्या असल्याचें त्यांनीं सांगितलें.

माझा दुसरा प्रश्न सदरहू कादंबरीबद्दल असा होता, कीं भावानंदाचें व सुंदरीचें लग्न लाविलें असतें तर कादंबरीचा शेवट व परिणाम अधिक गोड झाला असता. शिवाय भावानंदाच्या दृष्टीनें पाहतां सुद्धां सुंदरीसारखी सुशिक्षित, उदात्त विचाराची, त्याच्यावर बालपणापासून प्रेम करणारी, व त्याला प्रत्येक कार्यांत साहाय्य करणारी अशी पत्नी मिळाल्यानें भावानंदाच्या हातून अधिक देशसेवा झाली असती. तसेंच कुटुंबशील मनुष्यावर आमच्या समाजाचा जसा विश्वास सामाजिक कार्यांत बसेल तसा अविवाहित माणसावर बसणार नाहीं. त्याचप्रमाणें भावानंदाचें लग्न होतें तर अतिश्रमनें व जिवापाड मेहनत केल्यानें त्याचा जो अकाल मृत्यु झाला तोही कदाचित् होता ना. अशा रीतीनें प्रत्येक बाजूनें विचार केला तरी भावानंद व सुंदरी यांचा विवाह होणें रास्त होतें. या माझ्या शंकेचें हरिभाऊंनीं असें समाधान केलें कीं, त्यांनीं 'मी' या कादंबरीचा ज्या रीतीनें शेवट केला, तसा करण्यांत त्यांचा मुख्य हेतु असा होता, कीं मनुष्याचा देह गेला तरी त्याचे विचार मागें राहून आत्म्याला पुढील उन्नतीप्रत नेतात, हें तत्त्व भावानंदाच्या द्वारें वाचकांच्या मनावर ठसवावयाचें. विवाह वगैरे हीं दैहिक सुखें

असून ज्याच्या आत्म्याला अतींद्रिय सुखाची व उन्नतीची आवड लागली आहे, आणि ज्यानें आपल्यापुढें अत्यंत उच्च व निरपेक्ष देशसेवेचें ध्येय ठेविलें आहे तो या मोहांत पडणार नाहीं. या आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ हरिभाऊंनीं लाँगफेलोची "Excelsior" म्हणून एक सुंदर कविता आहे, ती फार परिणामकारक रीतीनें म्हणून दाखविली. या कवितेचा भावार्थ थोडक्यांत असा आहे कीं, एक तरुण आत्मोन्नतीसाठीं सर्व ऐहिक सुखाचा त्याग करून झगडत आहे. त्याच्या मार्गांत त्याला या काल्पनिक ध्येयाच्या मागें न लागण्याचा पुष्कळांनीं कळकळीचा उपदेश केला. तरुण वयांत तोडण्यास अत्यंत कठीण असा प्रेम-पाशही त्याच्या मार्गांत आला, पण तोही त्यानें दूर सारला. या सर्व प्रसंगीं त्याला यातना झाल्या नाहींत असें नाहीं. * तथापि दैहिक यातना किंवा निराशा क्षणिक असून आत्मसुख हेंच खरें व शाश्वत आहे, या भावनेनें तो तरुण ते सर्व मोह बाजूला सारून तसाच पुढें गेला. शेवटीं त्याचें देहपतन झालें तरी त्यानंतर आत्मा देहमुक्त होऊन तोच प्रवास पुढें सुरू राहिला; आणि शेवटीं परिणाम असा झाला कीं, तें त्याचें ध्येय त्याच्या आत्म्याबरोबर सर्व विश्वांत मिळून गेलें.

There in the twilight cold and grey
Lifeless and beautiful he lay;
And from the sky, serene and far
A voice fell, like a falling star,

Excelsior.

---

* "O stay" the maiden said "and rest,
Thy weary head upon this breast"
A tear stood in his bright blue eye,
But still he answered with a sigh, —Excelsior.

ही सर्व स्थिति भावानंदाचीही झाली. ऐहिक पाशांत तो चांगलाच सांपडला. सुंदरीच्या आशेनें त्याचें मन अस्थिर, अनिश्चित झालें; परंतु आत्म्याच्या अमरत्वावर आणि उदात्त विचारांच्या शाश्वततेवर भरंवसा ठेवून तो त्यांतून मोठ्या कष्टानें पार पडला. या सर्व मानसिक झगड्याचें वर्णन 'मी'च्या पांसष्टाव्या प्रकरणांत फारच हुबेहूब केलें असून त्या सर्वांचा शेवट ग्रंथकारानें एकाच वाक्यानें केला आहे; तें वाक्य शिवरामपंतांच्या तोंडीं आहे. तें असें:—

"आम्ही म्हणत होतों तो मार्ग (विवाहाचा) **सुखकर** खरा, पण **शाश्वत हिताचा** नव्हे. तुला यांत (तुझ्या मार्गांत) यश येवो न येवो—येणार नाहीं हाच संभव—तूं आपला मार्ग सोडूं नको. **मृत्यु येऊन व्यक्तीचें शरीर पतन पावतें. त्याचा आत्मा आणि त्या आत्म्याचे उन्नत विचार वरवरच जातील. कधीं त्यापासून अवनति होणार नाहीं.**"

पुस्तकांत हें जें वाक्य आपण लिहिलें आहे, त्यावर आपला पूर्ण विश्वास आहे, असें हरिभाऊ म्हणाले. याप्रमाणें आपले उन्नत विचार आपल्यामागें राहतात, इतकेंच नव्हे, तर आपल्यामागें त्यांचा समाजावर परिणामही होतो; पण असें व्हावयाला त्या विचारांमध्यें पुरेशी शक्ति असली पाहिजे; आणि कायावाचामनाचें या विचारांवर एकाग्रतेनें केंद्रीकरण केल्याशिवाय त्यांत ही शक्ति उत्पन्न होत नाहीं. केवळ स्वार्थत्यागानेंच हा परिणाम होतो. शाश्वत तत्त्वापुढें अशाश्वत देहाचा विचार करणें रास्त नाहीं; संसारांत पडल्यानें थोडीबहुत तरी मागें उपाधि लागणारच; तेव्हां जें एकदां ठरलें तेंच खरें. "तुझी भावी बायको तुझी खरी मदतनीस होण्याचा

संभव आहे; परंतु ज्या कित्येक तरुणांना तूं उपदेश करून, त्यांचीं मनें आपल्या मार्गाकडे वळवूं पाहणार, **त्या सर्वांनीं** लग्नें केल्यास त्यांच्या सहचारिणी तुझ्यासारख्या मिळणें शक्य आहे काय? जो उपदेश करणार, जो उदाहरण घालून देणार, त्यानें उदाहरण **पूर्णपणें** घालून दिलें पाहिजे." हा सर्व विचार करून ग्रंथकारानें भावानंदाला संन्यास दिला. वरील बोलणें झाल्यावर मीं तो सर्व भाग मूळ कादंबरींतून वाचून पाहिला; व सुंदरीबद्दल कितीही सहानुभूति वाटली तरी शेवट झाला तोच योग्य झाला, असें मलाही वाटूं लागलें.

संन्यास घेऊन मठस्थापना केल्यानंतर भावानंदाचें चरित्र फारच अल्प झालें आहे. याचें कारण त्याचा अकालमृत्यु होय. असा मृत्यु होण्यास पुष्कळ अंशीं भावानंदच स्वतः कारण झाला, असें म्हटलें असतां हरकत नाहीं; कारण त्यानें सतत जीवापाड श्रम करून स्वतःची प्रकृति खराब करून घेतली; आणि अशक्त स्थितींत पुनः श्रम करून अकालीं अंत करून घेतला. यावरून मला अशी शंका आली, कीं, कदाचित् भावानंदानें हें सर्व सहेतुक केलें असावें. कारण त्यानें निश्चयाच्या जोरावर सुंदरीचा जरी त्याग केला, तरी सुंदरीच्या आयुष्यांतील अत्यंत तीव्र निराशेला आपण कारणीभूत झालों, ही गोष्ट भावानंदाच्या कोमल व सुंदरीविषयीं अनुरागपूर्ण अंतःकरणाला नेहमीं टोंचीत असली पाहिजे. त्याचप्रमाणें सुंदरीविषयीं वाटणारें शुद्ध, पवित्र आणि गाढ प्रेम, मनःसंयमानें कितीही दाबलें तरी पुनः पुनः हृदयांत डोकें वर काढीत असलें पाहिजे. या सर्वांतून मुक्त व्हावयाला उपाय, एकसारखें काम करीत राहणें, इतकें कीं, मनाला स्वतःबद्दल विचारसुद्धां करावयाला सवड न मिळावी, हाच होय. अशा काम करण्यानें प्रकृति बिघडली; पण आयुष्यांत एक

मोठी निराशा झाली असतां मग जगून तरी मनाची ती टोंचणी आणखी वाढणारच, त्यापेक्षां आपलें पूर्वींचेंच देशसेवेचें व्रत अखंड चालवून आयुष्याचा होईल तितक्या लवकर अंत करावा, या हेतूनें कदाचित् भावानंद आपल्या प्रकृतीविषयीं उदासीन असावा. सुंदरीबद्दलचा विचार मनाला एकसारखा टोंचीत नसता तर तो आपल्या शरीरप्रकृतीविषयीं इतका उदासीन नसता; कारण देशसेवा हातून घडावी यासाठीं तरी आपल्या शरीरप्रकृतीची काळजी घेणें त्याला अवश्य होतें. ही माझी शंका मीं हरिभाऊंपुढें सविस्तर मांडली, तेव्हां ते हंसून म्हणाले, " टीकाकार आपल्या कल्पनेनें ग्रन्थकाराच्या माथीं नसते अर्थ कसे लादतात त्याचें हें उदाहरण आहे. भावानंदाच्या संन्यास घेतल्यानंतरच्या वर्तनाचें स्पष्टीकरण या रीतीनें केलें असतां तें अद्भुत होईल खरें; पण भावानंदाचा शेवट अशा रीतीनें करण्यांत माझा स्वतःचा हा हेतु नव्हता. आपल्याकडील सर्व कार्यकर्तीं माणसें, वामन शिवराम आपटे, गोळे, आगरकर, तेलंग इत्यादि सर्व अल्पायुषी झालीं; याचें कारण काय हें या पात्राच्या द्वारें दाखवावयाचें. आपण काम करतों, पण त्यांत पद्धत (Method) आणि नियमितपणा नाहीं; त्यामुळें होतात तेव्हां अतिश्रम होतात, प्रकृतीवर फार ताण पडतो, आपण याची काळजी घेत नाहीं; आणि अशा Unmethodical काम करण्यानें, स्वतःचें आयुष्य गमावून राष्ट्रालाही आपल्या सेवेला मुकवितो; हें कसें होतें हें दाखवावें, हाच भावानंदाचा असा अकालीं शेवट करण्यांत माझा हेतु होता." या ठिकाणीं हरिभाऊंनीं आपले स्नेही ना. गोखले यांचें उदाहरण देऊन, त्यांनीं अतिश्रमांनीं आपली प्रकृति कशी बिघडवून घेतली, व त्यानंतरसुद्धां डाक्तर नको नको म्हणत असतां काम आणि श्रम करून आपल्या आयुष्याचा कसा अंत करून घेतला, हें सांगितलें. मनाला वाईट वाटणारी व

दैवमाहात्म्याची गोष्ट अशी, कीं, हें सर्व समजून उमजून स्वतः हरिभाऊंनींसुद्धां गोखले वगैरे मंडळीप्रमाणेंच अतिश्रमाला बळी पडून आणि स्वतःच्या प्रकृतीची हेळसांड करून राष्ट्राला व वाङ्मयाला आपल्या सेवेला कायमचें अंतरविलें.

'मी' या कादंबरीच्या शेवटीं ज्या मठाची उत्पत्ति झालेली आहे, त्या मठाचा उल्लेख 'भयंकर दिव्यां'त शेवटीं आलेला आहे; पण त्याची स्थिति आणि लय या दोहींचें वर्णन आतां अपुऱ्या राहिलेल्या 'कर्मयोग' या कादंबरींत देण्याचा हरिभाऊंचा विचार होता. त्यामध्यें या मठाची पुढें कशी भरभराट झाली, त्यांतील लोकांनीं काय लोककार्य केलें, त्यांत कोणत्या चुका झाल्या व शेवटीं त्या संस्थेचा लय कसा झाला, हें सर्व वर्णन 'कर्मयोगां'त यावयाचें होतें; पण तें वाचण्याचा आमचा 'कर्मयोग' नव्हता, त्याला उपाय नाहीं! सदरहू कादंबरीचा नायक चंद्रशेखर याच्या हातूनच या मठाचा नाश व्हावयाचा असून तो केवळ सृष्टिक्रमानेंच होणार होता. "म्हणजे ज्या शक्तीनें व प्रेरणेनें फळ लहानाचें मोठें होऊन पक्वदशेला येतें, त्या शक्तीनेंच तें ज्याप्रमाणें पुढें नासून नाश पावून, त्यांतून बीं बाहेर पडून त्यांपासून पुनः अनेक वृक्ष व फळें उत्पन्न होतात, त्याप्रमाणेंच या संस्थेचा इतिहास होईल." असें हरिभाऊंच्या बोलण्यांत आलें. या नव्या कादंबरींत सामाजिक सुधारणेची दुसरी एक दिशा दाखविण्याचा हरिभाऊंचा विचार होता. ती दिशा म्हणजे पतित स्त्रियांच्या उद्धाराची होय. हें काम भावानंदाच्या मठानें आधींच हातीं घेतलें असल्याचा उल्लेख "कर्मयोगांत" एके ठिकाणीं आलेलाच आहे; पण याला अधिक स्पष्ट रूप पुढें नायकाच्या—चंद्रशेखराच्या—हातूनच येणार होतें; कारण 'कर्मयोगां'त नर्मदा म्हणून एका गरीब व तरुण गतभर्तृकेचें पात्र आलें आहे. या मुलीचा पुढें तिच्या केवळ इच्छेविरुद्ध व परिस्थितीमुळें

एकदा अधःपात झालेला असून, ती पश्चात्तापानें शुद्ध झाल्यानंतर तिचा पुनर्विवाह होऊन तिला पुनः सन्मार्गावर आणून सोडण्याला पुष्कळ अंशीं चंद्रशेखरच कारणीभूत होणार होता. या कादंबरींत इतरही अनेक सामाजिक व राजकीय प्रश्नांचा विचार करण्याची हरिभाऊंची इच्छा असून 'मी' चा उत्तरार्ध सर्व या कादंबरींत व्हावयाचा होता. ही कादंबरी अपुरी राहिल्यामुळें आणखी एक नुकसान असें झालें आहे कीं, भावानंदानें मृत्यूपूर्वीं सुंदरीच्या नांवाचें जें एक मोठें पत्र लिहून ठेविल्याचा 'मी' या कादंबरीच्या शेवटीं उल्लेख केला आहे, तें सर्व पत्र 'कर्मयोगांत' येणार होतें; तें पत्र आतां जगाला तसेंच अज्ञात राहणार. भावानंद आणि सुंदरी यांचें लहानपणापासूनचें चरित्र पाहातां या शेवटच्या पत्रांत काय मजकूर असावा, आणि हें पत्र किती महत्त्वाचें व हृदयद्रावक असावें याची आपणांस कांहींशी कल्पना करतां येईल. सुंदरीच्या गुणांमुळें आपल्या आयुष्याला निराळें वळण कसें लागलें; आपण तिच्यावर लहानपणापासून कसें अंतःकरणपूर्वक प्रेम केलें; तिच्याबद्दल आपल्याला एकाद्या देवतेप्रमाणें किती आदर वाटत होता; पुढें त्याच प्रेमाचा—ज्याचा लहानपणापासून इतक्या काळजीनें परिपोष केला—त्याग कां करावा लागला, या सर्वांची हकीगत प्रांजळपणें त्या पत्रांत लिहिलेली असावी; व आपल्या प्रतिज्ञेमुळें सुंदरीला आयुष्यभर जी तीव्र निराशा भोगावी लागली तीबद्दल त्यानें कदाचित् तिची क्षमाही मागितली असेल. भावानंद जिवंत असेपर्यंत त्याला सुंदरीशीं आपलें अंतःकरण मोकळें करून बोलतां आलें नाहीं. परस्परांच्या गाढ प्रेमाची साक्ष मूक हृदयानेंच एकमेकांना पटविली. पण तें हृदय या पत्रांत सुंदरीपुढें सर्व प्रथमच उघडें झालें असेल. लहानपणच्या आठवणी, वाढत्या प्रेमाचा इतिहास, देशसेवेविषयींच्या मतांची उत्क्रांति, प्रतिज्ञेचीं कारणें, सुंदरीच्या पाणिग्रहणाचा योग

येऊन आयुष्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्याची आलेली संधि दूर सारून प्रतिज्ञापालन करतांना मनाला झालेले क्लेश आणि यातना, या सर्वांचा त्या पत्रांत समावेश असेल. पण या सर्व केवळ माझ्या कल्पनाच आहेत. त्या पत्रांत काय होतें व काय नाहीं, हें ग्रंथकाराबरोबरच कालाच्या अफाट उदरांत लुप्त झालें आहे. हें पत्र प्रसिद्ध झालें असतें तर तें अत्यंत शुद्ध, पवित्र, आणि कोमल मनोविकार, मृदु, प्रेमळ व करुणरसपूर्ण भाषेंत हरिभाऊंसारख्या कसलेल्या लेखकाला कसे प्रगट करतां येतात, याचा उत्तम मासला होऊन मराठी भाषेंतील एक अत्युत्कृष्ट नमुना होऊन राहिलें असतें, असें मला वाटतें.

हरिभाऊंचा एक नियम असा असे, कीं, एक पुस्तक वाचावयास घेतलें असतांना तें संपल्याशिवाय दुसरें पुस्तक हातांत धरावयाचें नाहीं. हा नियम आपलें कादंबरीलेखन करतांना त्यांनीं पाळला असता, तर आज त्यांच्यामागें त्यांच्या सुंदर व मनाला चटका लावून सोडणाऱ्या इतक्या कादंबऱ्या अपुऱ्या राहून मराठी वाङ्मयाचें इतकें नुकसान झालें नसतें. हा त्यांच्यामध्यें एक मोठाच दोष होता, असें म्हणावें लागतें. आणखी मौज ही कीं, कांहीं थोड्या प्रकरणांसाठींच वर्षेंच्या वर्षें कादंबरी अपुरीच लिहून व तितकीच छापूनही पडावयाची. ऐतिहासिक कादंबऱ्यांपैकीं 'सूर्योदय' व 'केवळ स्वराज्यासाठीं' या कादंबऱ्याही अशाच रीतीनें नुकत्याच प्रसिद्ध झाल्या; आणि त्यामागें आतां, 'मध्यान्ह,' 'सूर्यग्रहण' अशा तीनचार ऐतिहासिक कादंबऱ्या अपुऱ्या पडल्या आहेत. सामाजिक कादंबऱ्या व गोष्टी तर किती अपूर्ण राहिल्या आहेत कोण जाणे! 'कर्मयोगा'ची गोष्ट वर सांगितलीच. 'यशवंतराव खरे' याचा उत्तरार्ध 'आजच' या नांवाखालीं प्रसिद्ध होणार होता, तोही अपूर्णच आहे. 'गणपतराव' ही कादंबरी मागें 'मनोरंजन व

निबंधचंद्रिका' नांवाच्या मासिकांत खंडशः प्रसिद्ध होत असे, ती कांहीं प्रकरणें लिहून पडली आहे ती तशीच आहे. यांतील बहुतेक पात्रें वाचकांच्या परिचयाचीं असल्यामुळें मनाला फारच चटका लागण्याचा संभव आहे. कारण "पण लक्ष्यांत कोण घेतो" यामधील विष्णुपंत व नानासाहेब या पात्रांचा पूर्ववृत्तांत या कादंबरींत असून, नानासाहेबांची बहीण गोदावरी हिची करुणरसपूर्ण कहाणी त्यांत आहे. गोदावरीचा तिच्या मांगहृदयी सासूसासऱ्यांनीं व नवऱ्यानें केलेला छळ वाचून दगडालाही पाझर फुटल्याशिवाय राहाणार नाहीं. पुढें ही गोदावरी गतधवा होऊन तिचा गणपतरावाशीं पुनर्विवाह होतो, अशा प्रकारें कथानकाचा शेवट करण्याचा हरिभाऊंचा बेत होता. या कादंबरीचा नायक गणपतराव म्हणजे कर्मयोगांतील नायक चंद्रशेखर याचा बाप हें वाचकांच्या लक्ष्यांत असेलच. या कादंबऱ्या अपुऱ्या राहिल्यामुळें महाराष्ट्राची जी हानि झाली आहे, ती पुढेंमागें हरिभाऊंइतका प्रतिभाशाली कादंबरीकार उत्पन्न झाला तरी भरून येणार नाहीं.

हरिभाऊंच्या अकालिक निधनानें कांहीं कादंबऱ्या ज्याप्रमाणें अपूर्ण राहून गेल्या आहेत, त्याप्रमाणें, इतरही कांहीं ग्रंथ लिहिण्याबद्दलचे त्यांचे बेत जागच्याजागींच राहिले. या ग्रंथांपैकीं 'कविता व तिचें स्वरूप' या ग्रंथाबद्दल वर लिहिलेंच आहे. दुसरा ग्रंथ म्हणजे शेक्सपिअरच्या सॉनेटस्‌चें भाषांतर होय. शिवाजीमहाराजांचें चरित्र लिहिण्याचा त्यांचा हेतु सर्वांना ठाऊक आहेच. याशिवाय आणखी दोन ग्रंथ लिहावयाचा आपला हेतु त्यांनीं मजजवळ बोलून दाखविला होता. त्यांपैकीं पहिला ग्रंथ म्हणजे स्वतःचें आत्मचरित्र. हा ग्रंथ जर सुदैवानें लिहिला गेला असता, तर त्यामुळें आपल्या वाङ्मयांत एका विलक्षण ग्रंथाची भर पडली असती, यांत तिळप्राय शंका नाहीं. दुसरा ग्रंथ इतिहासवजा असून त्याचें नांव "स्वातंत्र्या-

साठीं झगडा" किंवा असलेंच कांहीं तरी ठेवण्याचा त्यांचा हेतु होता. या ग्रंथाचे चार खंड करून त्यांत इंग्लंड, फ्रान्स, इटली व अमेरिका या चार देशांचा इतिहास देऊन त्यांतील लोकांनीं आपले हक्क मिळविण्यासाठीं काय केलें याचें साग्र वर्णन, आणि या प्रत्येक देशाची हल्लींची 'कॉन्स्टिटच्यूशन' कशी तयार झाली याचें शेवटीं विवेचन, अशा प्रकारची या ग्रंथाची रूपरेखा होती. अमेरिकेच्या इतिहासाचें अध्ययन त्यांनीं ब्राईसच्या "अमेरिकन कॉमनवेल्थ" या ग्रंथावरून केलें असून, इटली देशाच्या इतिहासाच्या अध्ययनाला आपल्यास ना० गोखल्यांची फार मदत झाली, असें ते एकदा म्हणाले होते. सदरहू ग्रंथ आपल्या आयुष्यांतील शेवटचा व अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ व्हावा अशी आपली इच्छा आहे असेंही त्यांनीं एकदा बोलून दाखविलें. कारण, या चारी देशांच्या इतिहासाच्या अध्ययनानें आपल्या देशाचे राजकीय प्रश्न सोडविण्याला बरीच मदत होईल, असें त्यांचें मत होतें. लायोनेल कर्टिसच्या 'कॉमनूवेल्थ ऑफ नेशन्स' या पुस्तकाच्या वाचनानें त्यांची ही इच्छा अधिक दृढ झाली असावी असा माझा समज आहे.

आतां एकंदर कादंबरी—लेखनाबद्दल हरिभाऊंचे काय विचार होते आणि कादंबऱ्या लिहितांना स्वतःपुढें त्यांनीं काय ध्येय ठेविलें होतें हें थोडक्यांत सांगून हा बराच लांबलेला लेख पुरा करूं. या विषयावरील त्यांचीं सविस्तर मतें ऐकण्याचा योग १९१८ च्या मे महिन्यांत महाबळेश्वरास एका गुजराती गृहस्थांमुळें आला. सदरहू गृहस्थ स्वतः लेखक असून, हरिभाऊंची कीर्ति ऐकून मुद्दाम त्यांची गांठ घेण्यासाठीं आले होते. प्रथम इतर औपचारिक बोलणें होऊन प्रचलित राजकीय विषयांवर व पुण्यांतील संस्थांबद्दल कांहीं वेळ बोलणें

झाल्यावर, सदर गृहस्थांनीं हरिभाऊंना प्रश्न केला कीं, कादंबरी एकादा विशिष्ट हेतु पुढें ठेवूनच लिहिणें अवश्य आहे, कीं काय? या प्रश्नाला हरिभाऊंनीं 'होय' म्हणून उत्तर दिलें. "कारण" ते म्हणाले, "हेतूशिवाय तुम्ही काय लिहूं शकणार? लोकांना कांहीं तरी शिकविण्याच्या हेतूनेंच अगर एकादें ध्येय त्यांच्यापुढें ठेवण्याच्या हेतूनेंच कादंबरी लिहिणें शक्य आहे. पण हें एकदां मान्य केलें म्हणजे अनेक महत्त्वाचे प्रश्न आपल्यापुढें उभे राहतात; अशा प्रसंगीं पहिली गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती ही कीं, अशा कादंबरीमध्यें Realism 'वस्तुस्थितिचित्र' असलें पाहिजे. कारण तुम्ही जें नवीन ध्येय वाचकांपुढें ठेवितां तें प्रस्तुत परिस्थितीला सोडून अगदींच भलतें कांहीं तरी नसून, आहे या समाजस्थितींतून उत्क्रांत झालेलें अगर होणारें आहे, अशी वाचकांची खात्री पटली पाहिजे; तरच तुमच्या पुस्तकाचा त्यांच्या मनावर परिणाम होईल. तसेंच वाचकांपुढें ध्येय ठेवावयाचें तें बहुजनसमाजाला झेंपेल असेंच ठेविलें पाहिजे; मग जसजसें तें समाजाच्या पचनीं पडत जाईल तसतसें क्रमाक्रमानें पुढें जाण्याला हरकत नाहीं. I believe in evolution; not in revolution." असें सांगून हें तत्त्व आपल्या कादंबऱ्यांतून आपण कसें पाळलें आहे हें हरिभाऊंनीं त्यांना स्पष्ट करून दाखविलें; "माझ्या कादंबरींत एकही पात्र असें नाहीं कीं, जें तुम्हांला आमच्या समाजांत आढळणार नाहीं; आणि एकही प्रसंग असा नाहीं, कीं जो तुमच्या आमच्या बहुजनसमाजाच्या चालीरीतींशीं विसंगत वाटेल. माझ्या अगदीं आरंभींच्या कादंबऱ्यांतून आज अगदीं क्षुल्लक वाटणारे, पण त्या वेळीं अतिशय महत्त्वाचे असे सामाजिक प्रश्न मीं घेतले आहेत; व समाजांत जशा त्या चालीरीती हळुहळू रूढ झाल्या, तसा मी अधिक उच्च व महत्त्वाच्या गोष्टींकडे वळलों. आपण कादंबरी वाचीत आहों तें आपल्या समाजाचें

खरेंखुरें चित्र आहे, अशी वाचकांची भावना कायम राहाण्याबद्दल कादंबरीकारानें प्रथम काळजी घेतली पाहिजे. कारण अशी जोंपर्यंत वाचकाची भावना आहे तोंपर्यंतच कादंबरीकाराच्या मतांचा त्यांच्यावर परिणाम होण्याचा संभव असतो."

" यावरून आपण Realistic School चे कट्टे भोक्ते आहां असें म्हणावयास हरकत नाहीं."

" तसें नाहीं. कादंबऱ्यांमध्यें Realism असला पाहिजे असें जरी माझें मत आहे, तरी Realistic School चे अत्याचार मात्र मला बिलकुल पसंत नाहींत; कारण Realism वर Idealism चीही थोडीशी छटा अवश्य असली पाहिजे असें मला वाटतें. आपण वाचीत आहों, तें खरोखरीचें चित्र आहे अशी वाचकांची खात्री व्हावी येथपर्यंतच वस्तुस्थितीचा आधार घेतला पाहिजे. पण आपलें ध्येय वाचकांच्या मनावर ठसवावयाचें असल्यास त्याला मात्र Idealism चीच मदत घेतली पाहिजे. Realism च्या नांवाखालीं समाजांतील हवी तशी घाणेरडी परिस्थिति वाचकांपुढें मांडणें कितपत युक्त आहे, याची मला शंका आहे. पुस्तक वाचून झाल्यावर वाचकांच्या मनावर जर त्याचा किळसवाणा (morbid) अगर वाईट परिणाम झाला तर त्या Realism चा उपयोग काय !" असल्या प्रकारच्या कादंबऱ्यांपैकीं एमिल झोला व रेनाल्डस् यांच्या कादंबऱ्यांचें हरिभाऊंनीं उदाहरण दिलें. समाजाची प्रगति व्हावी अशी इच्छा असेल तर समाजाचे दोष उघडपणें मांडणें अवश्य आहे. पण प्रेत-विदारण ( dissection ) वैद्यकीला अवश्य आहे, म्हणून ज्याप्रमाणें तें कोणी चव्हाट्यावर आणणार नाहीं, त्याप्रमाणें समाजदोषांचें इतकें उघड आविष्करण करणें रास्त नाहीं; कारण अशा प्रकारच्या कादंबऱ्या हव्यातशा सामान्य वाचकांच्या हातीं जाऊन त्याचा

त्यांच्या मनावर वाईट परिणाम होण्याचाच संभव असतो, व असें झालें म्हणजे Realism चा पवित्रपणा निघून जातो."

"मग कादंबरीचा आरंभ Realism मध्यें होऊन, शेवट Idealism मध्यें व्हावा असेंच आपलें म्हणणें आहे तर?"

"होय; जवळजवळ तसेंच. कादंबरीकारांमध्यें दोन वर्ग आहेत. कांहीं कादंबरीकार असें म्हणतात कीं, समाजाचे दोष दाखविणें एवढेंच काय तें आमचें काम. ते दूर करण्याला काय उपाय योजावयाचे याचा विचार समाजांतील शहाण्या लोकांनीं करावा. एमिल झोला व नाटककार इबसेन् हे या वर्गांतील लोक होत. पण कादंबरीकारांचा दुसरा वर्ग असा आहे कीं, समाजाचे दोष दाखविणें हें आपलें जसें कर्तव्य आहे असें ते मानतात; तितकेंच त्यावर उपाय व योजना सुचविणें हेंहि आपलें तसेंच कर्तव्य आहे, असें त्यांना वाटतें, व असें दोषाविष्करण करतांना कादंबरीकार Realism ची मदत घेऊन, उपाययोजना सुचवितांना Idealism चें साहाय्य घेतात; आणि अशाच कादंबऱ्यांपासून कांहींतरी विधायक कार्य होतें. पण अशा कादंबरीकारांच्या Realism मध्यें, व एमिल झोलासारख्यांच्या Realism मध्येंही एक फरक असा आहे कीं, झोलाचा Realism अगदीं उघड ( Naked ) असून त्यापासून मनाला आल्हाद होत नाहीं; परंतु या दुसऱ्या कादंबरीकारांच्या Realism वर सदभिरुचीचें पातळ कां होईना, पण आवरण असल्यामुळें त्याचा मनावर अधिक परिणाम होतो." व्हिक्टर ह्यूगोचें Realistic School आपणास फारसें पटलें नाहीं असेंही त्यांनीं सांगितलें. स्वतः हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्या त्यांच्या मनाप्रमाणें कशा बरोबर उतरल्या आहेत हें त्यांच्या वाचकांना ठाऊक आहेच.

श्रीयुत हरिभाऊ आपटे हे केवळ वाङ्मयसेवक होते एवढेंच नव्हे तर ते एक चांगल्यापैकीं सामाजिक व राजकीय पुढारीही होते. त्यांची सार्वजनिक कामगिरी एकाच शाखेपुरती मर्यादित नसून सामाजिक, राजकीय, विद्याविषयक, औद्योगिक, धार्मिक वगैरे सर्व बाबतींत ते सारख्याच उत्साहानें पडत.

हरिभाऊंच्या निधनानें एक खरा विद्याव्यासंगी, देशभक्त व विचारी पुरुष नाहींसा झाला असून त्याची जागा पुनः लवकर भरून निघणें कठीण आहे.

---

# सामाजिक कादंबऱ्या.

" हें विदग्धवाङ्मय फार सामर्थ्यवान् असतें. त्यानें न कळत परंतु फार प्रभाववान् असा श्रोते, वाचक व प्रेक्षक यांच्या मनावर परिणाम होतो. कवि, कथाकार व नट हे समर्थ असले तर मनुष्यांचीं मनें आपल्या ताब्यांत ठेवूं शकतात. त्यांच्या मनावर आपल्या कृतींच्या द्वारें अप्रत्यक्ष परंतु विलक्षण परिणाम घडवून आणतात. लोकांचे हातून विवक्षित कृति होतील असें सामर्थ्यसुद्धां कांहीं कांहीं कवि, कथाकार व नाटककारांत असतें."

" आतां कवीच्या दृग्पथाबाहेर असा कोणताही विषय राहिल नाहीं. सामान्यांतल्या सामान्य व्यक्तींपासून तों असामान्यांतल्या असामान्य व्यक्तीपर्यंत त्यांची दृष्टि सारखी होऊन गेली आहे. वीरांनीं मारलेल्या लढायांनींच काय तो इतिहास बनतो हें तत्त्व जसें आतां गेलें; तसें असामान्य पुरुषांच्या कथा त्याच कथा, आणि त्यांवर रचलेलीं काव्यें हींच काव्यें हेंही तत्त्व आतां गेलें. मनुष्यांची समता ही आतां कवींच्या कल्पनासृष्टींतही मान्य झाली आहे........जें काय कवीच्या मनास स्फूर्ति उत्पन्न करील, व त्या स्फूर्तीनें उद्गार काढवील तें सामान्य दृष्टीनें कितीही क्षुद्र असो, तें सर्व आतां कविविषयाच्या कक्षेंत अंतर्गत झालें आहे. एखाद्या क्षुद्र ओढ्याच्या कांठीं असलेल्या झोपडींत असणाऱ्या माणसापासून तों तहत राजधानींतील चक्रवर्ती महाराजापर्यंत सर्वांचें महत्त्व कवीस सारखेंच. या सर्व विषयांस सजविण्यास समर्थ व त्यावरून कांहींतरी जगास शिकविण्यास उत्कण्ठित, अशी त्याची प्रतिभा मात्र पाहिजे. याप्रमाणें विदग्धवाङ्मयाचें साम्राज्य आतां

वाढलें आहे....सर्व उच्चनीच, उत्तम–अधम वस्तुजाताविषयीं अणूहून अणु व महताहून महत् अशा जड व जीवसृष्टीविषयीं व **विशेषतः मनुष्यजातीविषयीं प्रेम व आदर अर्थात् भक्तिमत्ता** हाही आतां त्यांचा विषय झाला; सर्व उच्चनीच मनोविकार त्यांच्या चक्षुर्मर्यादेंत आले आहेत."

"या वाढलेल्या विदग्धवाङ्मयसाम्राज्याचा फायदा, पुढल्या ग्रंथकारांनीं–विदग्धवाङ्मयाच्या उपवनांत आपल्या हातून चार वृक्ष लागावे अशी लालसा धारण करणारांनीं–अवश्य घ्यावा. जें काय त्यांनीं लक्षांत नेहमीं बाळगावयाचें तें हें कीं, आपल्या या वृक्षास **सत्य** आणि **सत्** हीं दोन फळें अवश्य लागलीं पाहिजेत. त्यास असत्याचें, व असताचें खत मात्र पाहिजे. असत्याच्या भासांतून, परंतु सत्य आपणांस पुढें करावयाचें आहे. असताच्या निषेधानें सताची प्रगति करावयाची आहे."

ह. ना. आपटे, "विदग्धवाङ्मय."

रा. हरिभाऊ आपट्यांच्या सामाजिक कादंबऱ्यांतील खरें मर्म कळावयास या लेखाच्या शिरोभागीं त्यांच्याच एका निबंधांतील जो मोठा उतारा उद्धृत केला आहे, त्याचें चांगलें मनन केलें पाहिजे. वर दिलेल्या उताऱ्यांत हरिभाऊंनीं विदग्धवाङ्मयाबद्दल विशेष महत्त्वाच्या ज्या तीन गोष्टी सांगितल्या आहेत, त्यांपैकीं प्रत्येक गोष्ट त्यांच्या स्वतःच्या सामाजिक कादंबऱ्यांस अगदीं पूर्णपणें लागू पडते; किंबहुना, स्वतःच्या कार्याचा विचार मनांत येऊनच त्यांनीं वरील ओळी लिहिल्या कीं काय, असें वाटल्यावांचून राहात नाहीं. विदग्ध-वाङ्मयाच्या अंगीं लोकमताला इष्ट वळण लावण्याची जी शक्ति आहे म्हणून हरिभाऊंनीं वर म्हटलें आहे, तें त्यांच्या स्वतःच्या संबंधांत किती सत्य आहे; तसेंच प्राचीन व अर्वाचीन विदग्ध-वाङ्मयाच्या कार्यक्षेत्रांत जो फरक झाल्याबद्दल त्यांनीं वर सांगितलें

आहे, त्याचा फायदा त्यांनीं स्वतः करून घेतला आहे कीं नाहीं; व विदग्धवाङ्मयाच्या उपवनांत आपल्या हातून चार वृक्ष लागावे अशी लालसा धारण करणारांस "असत्याच्या भासांतून सत्य" पुढें करण्याबद्दल आणि "असताच्या निषेधानें सताची प्रगति" करण्याबद्दल त्यांनीं जी विनंति केली आहे, त्याप्रमाणें त्यांच्या स्वतःच्या हातून कार्य झालें आहे कीं नाहीं; या तीन गोष्टींचा या लेखांत विचार करावयाचा आहे. "असत्याच्या भासांतून सत्य पुढें करावयाचें" म्हणजे ग्रंथ लिहिण्यांत कांहींतरी हेतु आलाच. अशा रीतीचा कोणता हेतु हरिभाऊंनीं आपणापुढें आपल्या सामाजिक कादंबऱ्या लिहितांना ठेविला होता हें आपणांस प्रथम पाहिलें पाहिजे; आणि हा हेतु सिद्धीस कसा नेला याचा विचार करितांना, विदग्धवाङ्मयाच्या विस्तृत झालेल्या साम्राज्यमर्यादेचा फायदा त्यांनीं कसा घेतला हें आपल्या सहजच निदर्शनास येईल. या दोन गोष्टींचा विचार केल्यावर, त्यांच्या कार्याचा लोकमतावर व महाराष्ट्र-वाङ्मयावर परिणाम झाला कीं नाहीं, याचा विचार करणें आपाततःच प्राप्त होतें. म्हणून, विदग्धवाङ्मयाचें सामर्थ्य, त्याची वाढलेली कक्षा व त्याचें कार्य किंवा हेतु या तीन गोष्टी ज्या क्रमानें हरिभाऊंनीं प्रथित केल्या आहेत, त्याच्या उलट क्रमानें त्या गोष्टींचा त्यांच्या सामाजिक कादंबऱ्यांच्या बाबतींत आपण विचार केला पाहिजे.

## हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचे चार समूह.

कवीची किंवा लेखकाची प्रतिभा नुसती ओजस्वीच असून उपयोगी नाहीं; तर " जगास कांहीं तरी शिकविण्यास उत्कंठित" अशीही ती असली पाहिजे असें हरिभाऊंनीं सांगितलें आहे. त्यांची स्वतःची प्रतिभा निःसंशय तशी होती हें त्यांच्या लेखांचें, गोष्टींचें व कादंबऱ्यांचें अगदीं वरवर अवलोकन करणारांस सुद्धां दिसून येईल. हरिभाऊंनीं आपल्या लेखणीचा उपयोग समाजाचें कसें तरी

दोन घटका मनोरंजन करण्याकडे खचित केला नाहीं. गोष्टी व कादंबऱ्या वाचण्याकडे मनुष्याच्या मनाची जी साहजिक प्रवृत्ति पुष्कळांस अनिष्ट वाटते, ती वास्तविक तशी नसून तिचा योग्य उपयोग करून घेण्याची लेखकाच्या अंगांत कल्पकता व चातुर्य पाहिजे असें त्यांनीं आपल्या एका लेखांत म्हटलें आहे, तें त्यांनीं स्वतःच्या बाबतींत पूर्णपणें खरें करून दाखविलें आहे. या दृष्टीनें त्यांच्या सामाजिक कादंबऱ्यांकडे पाहिलें असतां, त्यांच्या कादंबऱ्या म्हणजे, प्रत्येक वेगळी गोष्ट, एकमेकींपासून भिन्न अशी नसून त्या सर्वांमध्यें एक हेतु आहे, एक संगति आहे, सर्व कादंबऱ्यांची एक मालिका करणारें सूत्रीभूत असें एक तत्त्व त्यांमध्यें ग्रथित केलें आहे, असें आपल्या ध्यानांत येईल. किंबहुना त्यांच्या दहा सामाजिक कादंबऱ्या मिळून एक संपूर्ण घटक असून, त्यांपैकीं एक एक कादंबरी, ही त्याचा अवयव आहे असें आपल्या दृष्टीस पडेल. आपल्या अगदीं पहिल्या सामाजिक कादंबरीचा—"मधल्या स्थिती"चा उपोद्घात लिहितांना आपल्या सर्व सामाजिक कादंबऱ्यांतून परस्परसंबद्ध अशी एक कल्पना आहे अशी हरिभाऊंनीं स्वतः कबुली दिली असून हें दर्शविण्यासाठीं त्यांनीं आपल्या सर्व सामाजिक कादंबऱ्यांस सर्वसाधारण नांवही एकच म्हणजे "आजकालच्या गोष्टी" असें दिलें आहे. "मधल्या स्थिती"च्या उपोद्घातांत ते म्हणतात, 'आजकालच्या गोष्टी' या मालिकेंत एकंदर पांच किंवा सहा गोष्टी येतील असा अंदाज आहे. तितक्यांत महाराष्ट्रांतील सध्यांच्या सामाजिक स्थितीचें चित्र दाखवावें हा उद्देश........हा समाजाचा इतिहास" हें त्यांच्या स्वतःच्याच शब्दांत त्यांच्या कादंबऱ्यांचें वर्णन झालें. यावरून हें स्पष्ट होतें कीं, हरिभाऊंच्या दहा सामाजिक कादंबऱ्यांमिळून महाराष्ट्राच्या समाजाचा गेल्या दोन तीन पिढ्यांचा इतिहास असून, त्यांपैकीं प्रत्येक कादंबरी या

समाजाच्या प्रगतीचें एकेक पाऊल दर्शविते. अशा दृष्टीनें त्यांच्या कादंबरीसमूहाचें निरीक्षण केलें असतां त्यांचे आपल्यास पुढीलप्रमाणें चार विभाग किंवा समूह करितां येतील.

समूह पहिला–१ मधली स्थिति.
" दुसरा–२ गणपतराव. ३ पण लक्षांत कोण घेतो! ४ यशवंतराव खरे. ५ मी. ६ जग हें असें आहे.
" तिसरा–७ भयंकर दिव्य. ८ मायेचा बाजार.
" चौथा–९ आजच. १० कर्मयोग.

## समाजाचीं चार स्थित्यंतरें आणि हरिभाऊंच्या कादंबऱ्या.

पाश्चात्य विद्येशीं व संस्कृतीशीं आमचा संबंध आल्यापासून, आणि त्याचे आमच्या समाजावर झालेले चांगले वाईट परिणाम दृग्गोचर होऊं लागल्यापासून आज काळापर्यंत आमच्या समाजाचीं जीं स्थित्यंतरें झालीं, त्यांचेही आपणांस सामान्यत: चार विभाग करितां येतील. पाश्चात्य विद्येनें दिपून जाऊन, पाश्चात्यांच्या गुणां-ऐवजीं त्यांच्या दुर्गुणांचें अंध अनुकरण करण्याची लाट एकोणीसाव्या शतकाच्या चतुर्थपादाच्या आरंभींच्या वर्षांत आली होती, तें समाजाचें पहिलें स्थित्यंतर; त्यानंतर पाश्चात्य विद्येशीं व संस्कृतीशीं आमचा अधिक परिचय झाल्यामुळें प्रथम झालेली दिशाभूल नाहींशी होऊन स्वतःच्या स्थितीची जाणीव उत्पन्न झाली व स्वोन्नतीसाठीं व्यक्तिश: विचार व प्रयत्न सुरू झाले हें दुसरें स्थित्यंतर; पाश्चात्य विद्येशीं आमचा संबंध त्याहूनही अधिक वाढत गेल्यानें, व एकंदर सर्व-साधारण परिस्थिति बदलल्यानें, समाजाच्या आचारविचारांत, इच्छेनें आणि अनिच्छेनें फरक पडला, व जुन्यानव्याची भेसळ सुरू झाली हें तिसरें स्थित्यंतर; आणि काळाच्या प्रगतीबरोबर पाश्चात्य संस्कृतीशीं आमची लगट अधिकाधिक होत चालली; त्यामुळें दृष्टि

अधिक व्यापक झाली; समाजसुधारणेच्या व राष्ट्रोन्नतीच्या कल्पना आरंभीं ज्या आकुंचित, अनुदार व अंधुक होत्या, त्या बदलून त्यांचे ठिकाणीं व्यापकता, औदार्य व निश्चितपणा आला, हें चौथें स्थित्यंतर—म्हणजे हल्लींचा काळ. गेल्या ४०।४५ वर्षांचा आपल्या समाजाचा इतिहास पाहिला तर स्थूलमानानें त्याचे असे चार भाग पाडण्यास कांहीं हरकत नाहीं. हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांचे वर जे चार समूह अगर विभाग केले आहेत, ते याच तत्त्वावर केले आहेत. कारण या दोहोंची परस्पर तुलना केली असतां आपणांस असें आढळून येईल कीं, समाजाच्या पहिल्या स्थित्यंतराचा इतिहास, हरिभाऊंनीं आपल्या पहिल्या समूहांतल्या कादंबरींत वर्णन केला असून त्या स्थित्यंतरांतून दुसऱ्या स्थित्यंतराची उत्क्रांति कशी झाली हें दाखविलें आहे. त्याचप्रमाणें या दुसऱ्या स्थित्यंतराचा–हेंच स्थित्यंतर आपल्या देशाच्या इतिहासांत विशेष महत्त्वाचें आहे–सांगोपांग इतिहास त्यांच्या दुसऱ्या समूहांतील कादंबऱ्यांत असून त्यांत तिसऱ्या व चौथ्या स्थित्यंतरांचीं पूर्वचिन्हें दर्शविलीं आहेत. या संधिकालांत सामाजिक चालीरीतींमध्यें ज्या सुधारणा सुचविण्यांत आल्या; व ज्या या कालांत कांहीं व्यक्तींनीं महत्प्रयासानें थोड्याशा व्यक्तिशः अमलांतही आणल्या, त्या सुधारणा समाजाच्या तिसऱ्या स्थित्यंतरांत अधिक विस्तृत प्रमाणानें समाजांत थोड्या बहुत मान्यता पावल्या; निदान त्यांच्याबद्दल आरंभीं जो दुराग्रह होता, तो तरी तितका राहिला नाहीं. तथापि नवीन मतांचा अंगिकार करणारांना समाजाकडून हेतुपुरस्सर, आणि रूढीमुळें व पूर्वग्रहांमुळें आपोआप जो त्रास झाला, त्याचें वर्णन हरिभाऊंच्या तिसऱ्या संघांतील कादंबऱ्यांत आहे. त्यानंतर आजची स्थिति अशा झाली आहे कीं, कांहीं वर्षांपूर्वीं ज्यांबद्दल मोठीं रणें माजत असत असे बहुतेक सामाजिक प्रश्न आज परिस्थितीमुळें, बरेच अमलांत

आल्यानें त्यांकडे समाजाचें सहिष्णुतापूर्वक दुर्लक्ष झालें असून राष्ट्र-सुधारणेच्या कार्यक्रमांत सामाजिक सुधारणेशिवाय इतर अनेक गोष्टींचा समावेश झाला आहे; आणि राष्ट्रोन्नतीसाठीं चोहोंबाजूंनीं नेटानें चाललेल्या प्रयत्नांमुळें, राष्ट्र उद्योन्मुख झालें असून, प्रगतीच्या शिडीच्या पहिल्या पायरीवर आज आपलें पाऊल पडलें आहे. या स्थितीचें चित्र हरिभाऊंच्या अगदीं अलीकडल्या–म्हणजे वर वर्गीकरण केलेल्यापैकीं चौथ्या समूहांतील–कादंबऱ्यांत पाहावयास सांपडतें.

तथापि हरिभाऊंचा खरा मोठेपणा व त्यांच्या कादंबऱ्यांचें महत्त्व, केवळ त्यांमध्यें समाजाच्या प्रत्येक स्थित्यंतराचें खरेंखुरें चित्र काढलें आहे या एकाच गोष्टीवर अवलंबून नाहीं; कारण डोळ्यांसमोर घडणारी गोष्ट नुसती आहे तशी चित्रित केल्यानें, वस्तुस्थिति उत्तम रीतीनें रेखाटणारा कादंबरीकार एवढेंच त्यांस महत्त्व आलें असतें. पण त्यांच्या कादंबऱ्यांचा जो विशेष आहे, तो यापेक्षां वेगळाच आहे. प्रत्येक स्थित्यंतरांतील वस्तुस्थितीचें खरें चित्र तर हरिभाऊंनीं काढलेंच आहे; पण त्यांत जें विशेष आहे तें हें कीं, त्या स्थित्यंतराची पुढें होणारी उत्क्रांति त्यांनीं आधींच भविष्यदृष्टीनें पाहून, त्याची पूर्व तयारी त्यांनीं करून ठेविली; म्हणजे त्यांनीं एका प्रकारें द्रष्ट्याचें ( Seer ) काम केलें असें म्हणण्यांत फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. प्रस्तुत कालाचें चित्र समाजापुढें मांडून त्यांतील गुणदोषांकडे जसें लोकांचें लक्ष वेधिलें, त्याप्रमाणें, त्या स्थितींतून उत्क्रांत होण्यास काय केलें पाहिजे हें सुचवून, पुढें आपण कोणत्या स्थितींत जाऊं; व आपलें तारूं कोणच्या ध्येयाकडे आपण हांकारलें पाहिजे हेंही त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांचे द्वारें समाजास दाखविलें; आणि म्हणूनच त्यांची प्रत्येक कादंबरी जितकी Realistic, तितकीच Idealistic ही आहे.

## पहिला समूह–'मधली स्थिति.'

या 'आजकालच्या गोष्टीं'स आरंभ "मधल्या स्थिती"पासून झाला. या आजकालच्या गोष्टींची जी पुढें परिणति झाली; व त्यांतल्या पुढील कादंबऱ्या ज्या दिशेनें लिहिण्यांत आल्या ती दिशा लक्षांत घेतां पहिल्या कादंबरीचें "मधली स्थिति" हें नांव हरिभाऊंनीं प्रथम ज्या अर्थानें दिलें, त्या अर्थानें जरी नाहीं, तरी दुसऱ्या अर्थानें अगदीं अन्वर्थक आहे. आजकालच्या गोष्टी म्हणजे पाश्चात्य विद्येशीं आमचा संबंध आल्यापासून, व पाश्चात्य विचारांचा परिणाम आमच्या समाजावर होऊं लागल्यापासून, आमच्या समाजाचीं स्थित्यंतरें झालीं तो इतिहास. असें स्वतः हरिभाऊंनींच सांगितलें आहे; या दृष्टीनेंच आजकालच्या गोष्टींच्या मालिकेंतील दहा कादंबऱ्यांची चांगल्या प्रकारें संगति लागते. या इतिहासाला आरंभ 'मधल्या स्थिती'पासून झाला. म्हणून 'आजकालच्या गोष्टी' हें नांव कालवाचक असल्यामुळें "मधली स्थिति" हें नांवही कालवाचक ठरलें पाहिजे.

## मधली स्थिति याचा अर्थ.

'मधली स्थिति' या शब्दाच्या अर्थाबद्दल बराच घोंटाळा आहे ही गोष्ट प्रथम कबूल केली पाहिजे. आमच्या मतें "मधली स्थिति" म्हणजे इंग्रजी शिक्षणाशीं आमचा संबंध येण्या-पूर्वीची स्थिति; व त्या शिक्षणानें आमचीं मनें सुसंस्कृत होऊन आमच्या स्थितीची जाणीव होऊन स्वोन्नतीचे विचार सुशिक्षितांच्या डोक्यांत येऊं लागले ही आजची स्थिति, या दोहोंच्या 'मधली स्थिति' ( period of transition ). मधल्या स्थितीचें कथानक, त्यांतील कांहीं पात्रांची पुढें झालेली परिणति; व तदनंतर लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्या या सर्वांचा विचार करितां 'मधली स्थिति' या नांवाचा हाच अर्थ खरा आहे हें आपल्या लक्ष्यांत येईल. "प्रस्तुत

पुस्तक मधल्या स्थितींतील लोकांची गोष्ट आहे; आणि म्हणूनच या पुस्तकाला 'मधली स्थिति' हें नांव दिलें आहे" असें जरी हरिभाऊंनीं या पुस्तकाच्या उपोद्घातांत स्वतः सांगितलें आहे, तरी तें कारण व तो अर्थ "आजकालच्या गोष्टीं"ची पुढील परिणति पाहतां, या ठिकाणीं जमत नाहीं. पुढील कादंबऱ्या जन्मास येण्याचे आधीं, व 'मधली स्थिति' कादंबरी लिहिली गेली तेव्हां, पुढें वरिष्ठ स्थितींतील व कनिष्ठ स्थितींतील लोकांचीं चित्रें काढण्याचा हरिभाऊंचा हेतु होता; व असें त्यांनीं सदरहू उपोद्घातांत सांगितलें आहे. तो भाग जरा महत्त्वाचा असल्यामुळें येथें उतरून घेतला पाहिजे. या 'आजकालच्या गोष्टीं'विषयीं लिहितांना हरिभाऊ लिहितात; "यापुढील 'गणपतराव' या नांवाची गोष्ट आजकालच्या गोष्टींपैकीं दुसरी गोष्ट होय. त्यांत शिक्षणानें जे श्रेष्ठ स्थितीला गेले आहेत, व ज्यांच्या डोक्यांत स्वसमाजाची सुधारणा करण्याचे विचार रात्रंदिवस घोळत असतात, त्यांच्या स्थितीचें वर्णन मी करणार आहें, हें तें पुस्तक वाचणाऱ्यांस सहज दिसून येईल. या पहिल्या गोष्टींतील दोन पात्रें 'विष्णु व यमुना' हीं त्या गोष्टींत ग्रथित केलीं आहेत. कारण सुशिक्षणाच्या योगानें तीं मधल्या स्थितींतून निघून गेलीं आहेत, व त्यांचे विचार श्रेष्ठ होत चालले आहेत. एवढेंच यांत दर्शित केलें आहे.........याच्यानंतर माझ्या मनांतून कनिष्ठ लोकांची वस्तुस्थिति दाखविणारी अशी एक तिसरी गोष्ट लिहावी असें आहे. तींत प्रस्तुत गोष्टींतील दोन पात्रें नेऊन त्यांचें पुढील चरित्र दाखवावें अशी इच्छा आहे. तीं पात्रें गण्या व नान्या हीं होत. ज्याप्रमाणें विष्णु व यमुना हीं पात्रें मधल्या स्थितींतून श्रेष्ठ स्थितींत गेलीं; त्याप्रमाणें गण्या व नान्या हीं दोन पात्रें मधल्या स्थितींतून दुःशिक्षणानें कनिष्ठ स्थितींत गेलीं. कनिष्ठ स्थिति म्हणजे हलक्या प्रतीचे लोक. असा एकंदर विचार आहे."

'आजकालच्या गोष्टी' या मालिकेस आरंभ करितांना पुढील मार्ग आपण कसा आंखला आहे, याचें दिग्दर्शन वाचकांपुढें रा० हरिभाऊंनीं वरीलप्रमाणें केलें आहे; व त्या बेताप्रमाणें 'मधली स्थिति' याचा त्यांनीं त्या वेळीं अर्थ केला तो बरोबर होता. पण पुढील कादंबऱ्यांतील पात्रें पाहिलीं तर त्यांनीं तीं सर्व नेहमीं समजल्या जाणाऱ्या अर्थानें, मधल्या स्थितींतील म्हणजे मध्यम-वर्गांतीलच ( middle class )रेखाटलेलीं आहेत. विष्णु व यमुना, अगर गणपतराव; शिवरामपंत आणि भावानंद, श्रीधरपंत व यशवंतराव खरे, हीं पात्रें बौद्धिक दृष्ट्या, किंवा विचारानें जरी श्रेष्ठ स्थितीला गेलीं असलीं, तरी वास्तविक तीं मध्यम वर्गांतील आहेत; आणि मधली स्थिति, म्हणजे मधला वर्ग हीच कल्पना हरिभाऊंची असावी असें त्यांनीं पुढें "कनिष्ठ स्थिति म्हणजे हलक्या प्रतीचे लोक" असा अर्थ केला आहे त्यावरून दिसतें. शिवाय विष्णु व यमुना हीं पात्रें मधल्या स्थितींतून श्रेष्ठ स्थितीला गेलीं असें हरिभाऊंनीं म्हटलें आहे; ती श्रेष्ठ स्थिति कोणती? या ठिकाणीं 'श्रेष्ठ स्थिति' म्हणजे विचारांची श्रेष्ठ स्थिति असा हरिभाऊंचा अर्थ आहे. याप्रमाणें 'स्थिति' या शब्दाचा एकदां ऐहिकदृष्ट्या, व एकदां बौद्धिकदृष्ट्या उपयोग करण्यांत आल्यामुळें हा घोंटाळा झाला आहे. स्थिति हा शब्द साधारणतः आपण ऐहिक अर्थानें किंवा कालदर्शक अर्थानें उपयोगांत आणतों. तेव्हां, या गोष्टींचा विचार करितां, व पुढील कादंबऱ्यांतून समाजाची जी क्रमाक्रमानें झालेली प्रगति चित्रित केली आहे ती पाहतां, किंवा समाजाच्या विचाराच्या उत्क्रांतीचा जो इतिहास या सर्व कादंबऱ्यांतून यथाक्रम वर्णिला आहे तो लक्षांत घेतां, "मधली स्थिति" याचा, इंग्रजी शिक्षणाला आरंभ होण्याच्या पूर्वींची स्थिति, आणि इंग्रजी शिक्षणाचा बराच निकट परिचय होऊन स्वोन्नतीचे विचार सुशिक्षितांच्या डोक्यांत येऊं लागला ती

स्थिति, या दोहोंच्या "मधली स्थिति" म्हणजे ज्या वेळीं पाश्चात्य विद्येनें अल्पकाळपर्यंत डोळे दिपून जाऊन त्यांच्या दोषांचें अनुकरण करण्याची लाट आरंभीं आली होती ती स्थिति; हाच कालवाचक अर्थ अधिक युक्त आहे असें आम्हांस वाटतें.

## "मधल्या स्थिती"चें वर्णन.

'मधली स्थिति' या कादंबरींतील मुख्य पात्रें विनायकराव व सरस्वती, अनंतराव व अंबूबाई, विष्णु व यमुना, हीं होत. या पात्रांचें जें वर्णन केलें आहे; आणि त्या वेळची समाजस्थिति दाखविण्यास ज्या इतर पात्रांची योजना ग्रंथकारानें केली आहे त्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, इंग्रजी शिक्षणाचा समाजांत नुकताच प्रसार होऊं लागला असून बी. ए., एल्‌एल्. बी. इत्यादि पदवीधरांस त्या वेळेस बरेंच महत्त्व होतें. कारण गोपाळराव महाशब्दे, फरडे, वगैरे मंडळींचें तत्कालीन समाजांत विशेष महत्त्व एवढेंच कीं, ते पदवीधर होते; व पदवी संपादन करून आपण कांहींतरी विशेष पैदा केलें आहे अशी आढ्यताही या उभयतांस नेहमीं वाटत होती असें वर्णन केलें आहे; हल्लींच्या काळीं अशी आढ्यता कोणा पदवीधरास क्वचितच वाटत असेल. या उभयतांचीं पात्रें विश्वविद्यालयीन शिक्षणाचा परिणाम प्रथम कसा झाला हें दाखविण्यासाठींच या कादंबरींत घातलीं आहेत असें स्पष्ट दिसतें. गोपाळराव महाशब्दे यांचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे. "यांची मतें अत्यंत सुधारक पक्षाकडील. प्रत्येक गोष्टींत पाश्चिमात्य गोष्ट चांगली. आपल्या चालीरीती कुचकामाच्या, ह्यांत कांहीं अर्थ नाहीं आपण प्रत्येक कामांत त्यांचें अनुकरण केलें पाहिजे; त्याच्यावांचून आपणांस कांहीं उपयोग नाहीं. सर्वतोपरी आपण नीचावस्थेंत. अशीं एकंदर यांचीं मतें. गोपाळराव महाशब्दे यांचीं मतें व

फरद्यांचीं मतें हीं एकमेकांचा प्रतिध्वनीच होतीं." * जनार्दनपंत म्हणून आणखी एक पात्र आरंभीं वर्णिलें आहे त्याबद्दलही असें म्हटलें आहे कीं, "इंग्रजी विद्यारूप विद्युल्लता प्रथम चमकण्याबरोबर पदरीं बांधतांच परीस होईल, असें समजून सुधारणापक्षरूप खडा ज्यांनीं पदरीं बांधला, व तो परीसच आहे असें समजून होईल तितक्या नेटानें समाजरूप लोहाला जे घासूं लागले त्यांच्यापैकीं हे गृहस्थ होते. यांस सावकाशपणा म्हणजे काय हें ठाऊकच नव्हतें. त्यांच्या शाळेंत तो धडा शिकविलेलाच नव्हता. जें पाहिजे तें एकदम निमिषार्धांत, आणि हटकून झालें पाहिजे हें यांचें मत. तसेंच या कादंबरींतील ५ व्या प्रकरणांत क्लबाचें व त्यांतील सभासदांचें जें वर्णन केलें आहे तें त्या वेळीं इंग्रजी विद्येचा प्रथम परिणाम सुशिक्षित (?) लोकांवर कसा झालेला होता हें दाखविण्यासाठींच केलें आहे. शिकलेल्या लोकांत सर्वच सुधारणावादी होते असें नाहीं त्यांत कांहीं जुन्याला चिकटणारेही असून त्यांचीं आणि सुधारणावाद्यांचीं मतांच्या कामांत जोराचीं भांडणेंही होत असत. पण ज्या कांहीं वाईट गोष्टींत पाश्चात्यांचें अनुकरण करण्यांत आलें त्यांत मात्र या दोघांचेंही ऐक्य होत असे. वर वर्णन केलेल्या क्लबांत दामोदरपंत म्हणून एक सुधारणाद्वेष्टे गृहस्थ असून एका प्रसंगीं कांहीं सामाजिक सुधारणांबद्दल मोठा कडाक्याचा वाद दामोदरपंत व गोपाळराव यांमध्यें चालू असतां, पेय पदार्थांच्या बाटल्या येण्याबरोबर दामोदरपंत एक बाटली हातांत घेऊन बूच काढीत म्हणतात, "जाऊं द्या हो! आपल्याला काय करायचं आहे समाजाशीं न् सुधारणेशीं! जनार्दनपंत, आपण या सुधारणेच्या न् समाजाच्या कामीं जरी दोन आहोंत तरी या ठिकाणीं एकच आहोंत. तर आतां तरी हा आपला सर्व वादविवाद यांत बुडवूं या कसा!"

* मधली स्थिति प्र. ५ पृ. ३४.

सुधारणाद्वेष्ट्यांचें याप्रमाणें भाषण ऐकून सुधारणावादी गोपाळराव महाशब्दे म्हणतात, "योग्य गोष्ट बोललांत. इतर गोष्टींत जरी आपण निरानेराळ्या टोंकाला जातों, आणखी वर्तमानपत्रांतून म्हणा, सभांतून म्हणा, हवे तसे भांडतों, तरी या योगानें त्या दोनही टोकांचा संयोगच करितों."‡

या संधिकालांतील, अगर 'मधल्या स्थितींतील' मंडळींनीं मदिरापानाचा दुर्गुण पाश्चात्यांपासून उचलून जसा राजरोसपणानें अतिरेकाला नेला, तसाच दुसराही एक दुर्गुण जो त्यांच्या आचरणांत उघडपणें आला तो वेश्यागमनाचा. हा दुर्गुण त्यांनीं पाश्चात्यांपासून उचलला असें नाहीं. अगदीं जुन्या काळीं वेश्यागमन जरी निंद्य मानिलें होतें तरी, उच्च प्रतीच्या लोकांत व सुखवस्तु मध्यम वर्गांत या दुर्गुणाचा चांगलाच प्रचार होता; व पुढें तर या दुर्गुणाला प्रतिष्ठितपणाचें आणि मोठेपणाचें एक चिन्ह अशा प्रकारचें स्वरूप आलें. जुन्या लोकांत हा दुर्गुण प्रचलित असला तरी नवीन शिकलेल्या लोकांनींही तो दुर्गुण कसा चालू ठेविला याचें वर्णन या कादंबरींत चांगल्या प्रकारें केलें आहे. वेश्यागमन म्हणजे पुरुषाच्या हातून साहजिकपणें होणारें व सभ्य असें एक पातक अशी कल्पना त्या वेळीं होती, असें त्या वेळच्या परिस्थितीवरून दिसतें. त्या वेळच्या इंग्रजी शिकलेल्या गृहस्थवर्गांत मदिरापान व वेश्यागमन हे दोन्हीही दुर्गुण फार मोठ्या प्रमाणावर व उघडपणें चालू होते, ही गोष्ट तत्कालीन वाङ्मयावरूनही स्पष्ट दिसते. परंतु हल्लीं मात्र तसा प्रकार नसून नैतिक बाबतींत पुढील पिढी मागल्या पिढीपेक्षां बऱ्याच वरच्या दर्जाला पोंचली आहे ही अभिमान वाटण्यासारखी गोष्ट आहे. हें जें नैतिक स्थित्यंतर झालें त्याला बहुतांशीं शिक्षणाचा प्रसार हेंच कारण होय; वैवाहिक पावित्र्य पाळण्याची सर्व जबाबदारी

‡ मधली स्थिति, प्र. ५ पृ. ४१.

केवळ स्त्रियांवरच नसून पुरुषांच्यावरही ती तितकीच आहे, हें तत्त्व शिक्षणामुळें पुढल्या पिढीस अधिक चांगलें कळूं लागलें. स्त्रीपुरुषांच्या समान हक्काचें तत्त्व पटूं लागतांच, पत्नीकडून वैवाहिक पावित्र्याचा भंग होणें हा जसा पतीचा अपराध होय, त्याप्रमाणें तसें वर्तन पतीचे हातून झालें असतां तो तसाच पत्नीचाही अपराध आहे, असें सुशिक्षितांस वाटूं लागलें. याप्रमाणें या स्थित्यंतराच्या मुळाशीं दोन गोष्टी आहेत. त्यांपैकीं पहिली, शिक्षणामुळें विवाहसंस्थेचें पावित्र्य व त्यांतील जबाबदारी यांची पटलेली जाणीव, आणि दुसरी स्त्रीवर्गाबद्दल वाढलेला आदर. हे दोन्ही शिक्षणाचे परिणाम आहेत; व ते व्हावयास अर्थातच बराच काळ लागला; पण आरंभीं जें घडलें तें हें कीं, इंग्रजी विद्येच्या प्रथम दर्शनानें दिपून जाऊन त्या वेळच्या मंडळींनीं पहिलीं सामाजिक बंधनें तटातट तोडून टाकलीं; आणि त्यामुळें पाश्चात्य दुर्गुणांबरोबरच, आपले जुने दुर्गुणही अगदीं उघड रीतीनें अंगिकारण्याचें धैर्य अगर निर्लज्जपणा त्या लोकांत आला. समाजाच्या रोजच्या परिस्थितींत आणि व्यवहारांत स्त्रियांबद्दल विशेष आदर कधींच व्यक्त होत नसल्यामुळें अशा अनीतिमान् लोकांस, आपल्या सुखोपभोगाच्या आड येणाऱ्या नीतिमान् व सालस पत्नीचा छळ करण्यास अर्थातच किमपिही दिक्कत वाटली नाहीं. जुन्या लोकांत हा तरी एक गुण होता कीं, या व्यसनाच्या पूर्णपणें आधीन होऊन त्यांनीं धर्मपत्नीचा छळ व घरादाराची नासाडी कधीं केली नाहीं. ही स्थिति सुदैवानें पुढें लवकरच पालटली; पण सन १८६० पासून १८९०।९५ पर्यंत तरी मध्यमवर्गांतील उच्चप्रतीच्या ब्राह्मण कुटुंबांतून असले प्रकार नित्य घडत, असें त्या वेळचे लोक सांगतात. या स्थितीचें उत्तम व हृदयद्रावक चित्र "मधली स्थिति" या कादंबरींत पाहावयास सांपडतें. अनंतराव व विनायकराव म्हणून जीं दोन अशा प्रकारचीं मुख्य पात्रें दाखविलीं आहेत, तीं दोन्ही

बाहेरख्यालीच पण जरा वेगळ्या प्रकारचे नमुने ( Types ) आहेत. अनंतराव हा सुशिक्षित असून इंग्रजीच्या अव्वल अमदानींत शिकलेल्या लोकांस जो कीर्तिसंपत्तीचा सुलभ लाभ झाला, त्याच्या मदानें बिघडलेला असून, विनायकराव हा केवळ या मोठ्या व तत्कालीन समाजांत सुशिक्षित म्हणून पुढें आलेल्या लोकांच्या अनुकरणानें व संगतीनें बिघडलेला आहे; हे दोघेही आपल्या वेश्यांच्या नादानें स्वतःच्या सुशील धर्मपत्नींचा इतका अमानुष छळ करितात, तरी पण त्याबद्दल विशेष असें आसपासच्या लोकांस कांहीं वाटलें आहे असें दिसत नाहीं. परंतु पुष्कळदा असें होतें कीं, जी गोष्ट नित्य डोळ्यापुढें घडत असून ती आपल्या विशेष लक्षांत येत नाहीं, तीच ती सभोंवतालच्या परिस्थितींतून वेगळी निवडून काढून, एकटी ' विरळगत ' अशी करून स्वतंत्र रीतीनें पुढें मांडिली असतां, तिच्याकडे समाजाचें अधिक लक्ष वेधतें. कारण रोजच्या व्यवहारांत चोहोंकडे सारखी प्रसृत झालेली आपली दृष्टि अशा रीतीनें एकच प्रसंग पुढें मांडिला म्हणजे त्या एका गोष्टीवर केंद्रीभूत होऊन त्या गोष्टीचें महत्त्व आपल्या लक्षांत येतें. विदग्धवाङ्मयाचें खरें कार्य हेंच आहे. विनायकराव व अनंतराव यांसारखे शेंकडों नराधम आपल्या सुशील पत्नींचा त्याग करून हलकट व नीच स्त्रियांच्या मागें समाजांत लागत असतील; अशा नीच पुरुषांशीं आपला व्यवहारांत कदाचित् नित्य संबंधही येत असेल; त्यांनीं क्रूरपणें आपल्या गृहिणींचा छळ केल्याच्याही गोष्टी एकादे वेळीं आपल्या कानावर येतील; पण संसाराच्या दगदगींत चित्त सदा व्यापृत असल्यामुळें, असल्या गोष्टींचा मनावर परिणाम होण्यास वेळ मिळत नाहीं. परंतु असें चित्र एकाद्या कादंबरींत पुढें मांडलें म्हणजे, चित्त आश्चर्यचकित होऊन, खरोखरच असें होत असेल काय ?—असा प्रश्न मनांत उभा राहतो. या कादंबरीचा असा

परिणाम तत्कालीन समाजावर निःसंशय झाला. त्या वेळची ही समाजस्थिति हरिभाऊंनीं या कादंबरींत इतकी कळकळीनें व परिणामकारक रीतीनें मांडली आहे कीं, ही कादंबरी प्रसिद्ध होतांच समाजांत चोहोंकडे मोठी खळबळ उडाली; व हा इतका प्रभाववान् लेखक तरी कोण, हें जाणण्याची प्रत्येकास उत्कंठा लागली. अनंतराव आपल्या वेश्येचीं आर्जवें व मनधरणी करीत आहे, ती त्याला झिडकारीत आहे असा प्रसंग वर्णन करून हरिभाऊंनीं शेवटीं जे उद्गार काढले आहेत, ते इतके हृदयद्रावक आहेत व त्यांमध्यें तत्कालीन समाजस्थितीचें इतकें हुबेहुब चित्र आहे कीं, तो सबंध भाग येथें उतरून घेतल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं.

“ अहा रे निर्लज्जा, धन्य आहे तुझी ! पहा, हिरकणीला टाकून खापरखुंटाला आलिंगन देण्याचा प्रकार........पहा ही घरची चांगली सोन्यासारखी बायको टाकून या दीड दमडीच्या कैकाडणीच्या लाथा खाण्यासाठीं कसा धडपडतो आहे. या ठिकाणीं हा गरीब, मनमिळाऊ व प्रेमळ दिसणारा गृहस्थ आपल्या घरीं म्हणजे अगदीं नुसता ‘ रावणराज महाराज ’ असे, व या बटकीच्या पायींच त्यानें तिची धूळधाण उडवून दिली होती........या अवदसेच्या पायां पडणारा या गृहस्थ आपल्या अतिशय सुस्वरूप अशा, अग्नीला साक्षी ठेवून सर्व लोकांसमक्ष ठरलेल्या बायकोला नाना तऱ्हेचे शब्द बोलून मारहाणही करीत असे. आणि ही तर जगांतली अगदीं नेहमींची एक रीतच पडली आहे कीं, खऱ्या बायकोनें एक शब्द काढला तरी तो विषाप्रमाणें झोंबतो, परंतु अशा बटकींनीं लत्ताप्रहार केला तरी तो सोसावासा वाटतो. खऱ्या बायकोनें एक पैसा मागितला, तरी तो देणें अगदीं जिवावर येतें. परंतु अशा वेश्यांनीं घरादाराचा अपहार केला तरी कांहीं वाटत नाहीं. शिव ! शिव ! नारायणा, तूं पुरुषांच्या मनांत अशी प्रेरणा तरी कशी

करितोस? ज्या वेळीं पुरुष आपल्या खऱ्या पत्नीला सोडून दुसरीकडे पाहणार नाहीं, अशी कधींही या जगावर वेळ येणार नाहीं काय? पुरुष आपल्या बायकोला योग्य मान व स्वातंत्र्य देईल, तिच्यावर खरी खरी भक्ति ठेवील, तिच्या सेवेंत नेहमीं दक्ष असेल, तिला दास्यांतून तो मोकळी करील, अशी वेळ या जगावर येऊन जिकडे तिकडे समता व नीति यांचा पगडा व्हावा असा तुझ्या घरचा नेमानेमच नाहीं काय? घरीं एक कवडीहि इकडे तिकडे गेली तर अकांडतांडव करणारा गृहस्थ वेश्यांच्या पायीं लाखों रुपये उधळतो, पण घरची दादही घेत नाहीं, अशा गोष्टी आपण थोड्या ऐकतों काय? बायकोचें ऐकिलें तर आपणांस बाईल-बुद्ध्या म्हणतील, अशी ज्याला भीति वाटते, तोच वेश्येच्या घरीं जाऊन तिचे सांगण्याप्रमाणें ऐकून आपल्या घरादाराची माती करून टाकतो........वर सांगितलेल्या गृहस्थाची पत्नी म्हणजे स्वरूपानें काय, किंवा गुणानें काय पांच हजारांत सांपडावयाची नाहीं अशी होती. अहाहा! तिची आपल्या पतीवरची जी काय निस्सीम भक्ति होती तिला तर तोडच नव्हती. या अवदसेचें मन वळविण्याकरितां जी हा खटपट करीत होता, व जितकी प्रीति दाखवीत होता, त्याच्या एकशतांश जरी त्यानें आपल्या धर्मपत्नीस दाखविली असती, तरी तिनें अतिशय आनंद मानला असता. हा नेहमीं सुरापान करीत असे, व त्याच्या धुंदींत तिच्या अंगावर हात टाकीत असे, तरी देखील तिनें, "ह्यांत तें मेलं काय जास्ती आहे!" किंवा "हें काय हें असं! उगीच मारायला मीं तें काय केलं आहे?" एवढेंच म्हणावें; परंतु एवढ्यावरूनच संतापून जाऊन हे तिरशिंगराव तिला आणखी मारीत असत. एखाद्या दिवशीं यानें जर कुठें हंसत-मुखानें तिच्याकडे पाहिलें तर तिला किती बरें धन्य होत असे!.... वाचक हो, आम्ही सांगतों ही एकच गोष्ट असेल असें तुम्ही समजूं

नका. अशा गोष्टी आज आमच्या या पुण्यांत काय, किंवा कुठेंही काय शेंकडों सांपडतील; व तुमच्याही दृष्टीस पडल्या असतील; आम्ही म्हणजे जास्त सांगावयास पाहिजे असें नाहीं. आणखी देखील मजा ही कीं, अशा गोष्टी म्हणजे अशिक्षित लोकांच्या हातून होतात असें नाहीं; चांगल्या सुशिक्षित लोकांत देखील होतात."*

इंग्रजी शिक्षण संपादन केलेले लोक प्रथम कसे बहकले होते याचें चित्र आपण पाहिलें. या त्यांच्या वर्तनाचा परिणाम समाजांतील इतर लोकांवर अर्थातच झाला पाहिजे, व तो झालाही; हें विनायकरावांवरून आपणांस दिसतें. त्या काळीं इंग्रजी वाङ्मयाचें वाचनसुद्धां रेनाल्ड्सच्या कादंबऱ्यांपलीकडे गेलें नव्हतें असें अनंतराव वगैरे मंडळींच्या क्लबांतील लायब्ररीचें वर्णन केलें आहे त्यावरून दिसतें, व हें साहजिकच आहे. पण पुढें इंग्रजी शिक्षणाचा प्रसार जसा अधिक झाला, इंग्रजी वाङ्मयाशीं परिचय अधिक वाढला तसा उच्च दर्जाच्या इंग्रजी ग्रंथकारांच्या ग्रंथांचा सहवास होऊन त्यांच्या विचारांचा व तत्त्वज्ञानाचा परिणाम पुढील पिढीवर होऊं लागला; ही 'पुढली स्थिति' पुढील कादंबऱ्यांतून यथाक्रमानें वर्णिली आहे. याप्रमाणें इंग्रजी शिकलेल्या लोकांची स्थिति या काळांत असतांना, इंग्रजी न शिकलेले लोक कसे होते याचें चित्र, वामनराव, नारोपंत या पात्रांचीं चित्रें काढून हरिभाऊंनीं आपणांस दाखविलें आहे. ही मंडळी पापभीरु व पूर्वपरंपरागत अशा दिनक्रमानें आपला आयुष्यक्रम कंठणारी अशी होती. इंग्रजी शिकलेल्या तरुण मंडळींचे अत्याचार पाहून त्यांना अत्यंत खेद होई; पुष्कळदां त्यापासून त्यांना स्वतःला त्रासही होई; परंतु सात्त्विकवृत्तीनें ते आपला काळ कंठीत होते; या जुन्या लोकांच्यामध्यें गतानुगतिकत्वामुळें जी एक निष्क्रियता उत्पन्न झालेली दिसते ती पाहून मनाला जरी खेद

* मधली स्थिति, प्र. १८ पृ. १३६.

वाटला, तरी त्यांच्या पापभीरुत्वाबद्दल व धर्मनिष्ठेबद्दल आदर वाटल्यावांचून राहत नाहीं.

## स्त्रियांची स्थिति.

सरस्वती, अंबूताई व दुर्गा या तीन स्त्रीपात्रांवरून या संधिकालांत स्त्रियांची स्थिति कशी असावी याचा आपणांस अंदाज करतां येईल. पति सुष्टदुष्ट कसाही असला तरी त्याला दैवत मानून त्याची मनोभावानें सेवा करण्याची हिंदु स्त्रियांची जी सर्वसाधारण प्रवृत्ति आहे तिचें उत्तम चित्र या ठिकाणीं आपणांस पाहावयास सांपडतें; अतुल पतिनिष्ठा, धर्मनिष्ठा व सहनशीलता या तिन्ही गुणांचा आमच्या स्त्रियांच्या मनोरचनेंत कसा मिलाफ झाला आहे हें आपल्यास येथें दिसतें. या कादंबरींतील स्त्रिया शिकलेल्या नाहींत. कारण त्या काळीं पुरुषांच्या शिक्षणाचा जेथें आरंभ होता तेथें स्त्रीशिक्षणाची गोष्ट कोठली ! तथापि या तीन स्त्रियांच्या चित्रांवरून जी एक गोष्ट हरिभाऊंनीं वाचकांच्या निदर्शनास आणून दिली आहे ती ही कीं, शिक्षण मिळालें असतां उत्कृष्ट माता व गृहिणी तयार होतील अशा स्त्रिया आमच्या समाजांत आहेत. आपल्या स्त्रियांची नैसर्गिक संस्कृति स्वभावतःच उच्च आहे; पण ती शिक्षणाभावामुळें आकुंचित व पूर्वपरंपरेमुळें निष्क्रिय झाली असून, त्यामुळें स्त्रियांबद्दलचा आदर व त्यांचा समाजांतील दर्जा कमी झाला आहे; मुलांचें शिक्षण व पतीचें किंबहुना संसाराचें कर्णधारित्व, हीं दोन महत्त्वाचीं कामें स्त्रियांकडे वास्तविक असावयाचीं; पण त्यांऐवजीं आज त्यांची स्थिति शिक्षणाभावानें किती शोचनीय झाली आहे, त्यांचें जीवित पतीवर किती अवलंबून असतें आणि पति वाईट निघाला असतां त्याच्या सर्व गुणांची कशी माती होते, व त्यांच्या कचाट्यांतून आपली सुटका करून घेऊन स्वतंत्र रीतीनें आपली उन्नति करून घेण्यास त्यांना समाजानें कसें

असमर्थ करून टाकलें आहे या सर्वांचें उत्कृष्ट चित्र सरस्वती व अंबूताई या दोन पात्रांच्या द्वारें वाचकांपुढें मांडण्यांत आलें आहे. दुर्गीच्या पात्रावरून शिक्षणाभावानें स्त्रिया कशा देवभोळ्या होतात, व नकळत कशा फसल्या जातात, हें दाखविलें आहे. ही स्थिति सुधारण्यास उपाय काय, हें या कादंबरींत हरिभाऊंनीं स्पष्टपणें कोठेंच सांगितलें नाहीं. कारण स्त्रियांची स्थिति अशी शोचनीय आहे ही जाणीवच त्या काळीं कोणास झाली नव्हती, ती झाल्याविना उपाययोजना सांगून तरी काय उपयोग? म्हणून ही जाणीव व्हावी, व त्यावर उपाययोजना करण्याची समाजाला इच्छा व्हावी म्हणूनच ही कादंबरी लिहून आज स्थिति आहे ती अशी; एवढेंच हरिभाऊंनीं समाजापुढें मांडलें. त्याचप्रमाणें श्रीमंत तरुण विधवा अजाणपणें कशा फसल्या जातात याचेंहि चित्र त्यांनीं सगुणाबाईचें पात्र रंगवून दाखविलें आहे.

याप्रमाणें इंग्रजी विद्येच्या पहिल्या धक्क्यानें समाजांत अल्पकाळपर्यंत मोठी क्रांति झाली असतां, त्याच वेळेस त्याची चांगली बाजूही हळू हळू कशी तयार होत होती हें विष्णु व यमुना या दोन पात्रांच्याद्वारें ग्रंथकारानें सूचित केलें आहे. प्रत्येक विषाबरोबर त्याचा उताराही असतो, अशी इंग्रजींत म्हण आहे, त्याप्रमाणें येथें झालें. ज्या इंग्रजी शिक्षणानें कांहीं लोक याप्रमाणें प्रथम बेताल व उच्छृंखल बनले, त्या शिक्षणानेंच पुढील पिढी विचारी व देशाभिमानी निपजून देशाच्या उन्नतीच्या काळास कसा प्रारंभ झाला हें हरिभाऊंनीं आपल्या पुढील कादंबऱ्यांतून दाखविलें आहे. 'मधली स्थिति' ह्या कादंबरीची गणना सामान्यतः हरिभाऊंच्या उत्कृष्ट कादंबऱ्यांत केली जात नाहीं. तिचें कथानक व्यवस्थित नाहीं, पात्रांचा परस्पर फार गोंधळ झाला आहे, समाजांतील हिडिस गोष्टींचें वर्णन फार उत्तान रीतीनें झालें आहे, असे अनेक आरोप या कादंबरीवर आहेत.

यांपैकीं कांहीं आरोप खरे असतील; व स्वतः हरिभाऊंनीं उपोद्घातांत कबूल केल्याप्रमाणें–पण आमच्यामतें त्यांत मर्यादेचाच अंश अधिक आहे–कथानकांत तितकी व्यवस्थितताही नसेल; पण त्यांच्या सर्व कादंबऱ्यांत सदरहू कादंबरीस एक विशेष प्रकारचें महत्त्व आहे, तें हें कीं, समाजसुधारणेची व राष्ट्रोन्नतीची जी एक सुसंगत कल्पना हरिभाऊंनीं आपल्या सर्व कादंबऱ्यांमधून क्रमाक्रमानें वाचकांपुढें मांडिली, तिचा आरंभ या कादंबरीपासून झाला आहे. कथानकांत दोष असले तरी, किंवा कादंबरी वाजवीपेक्षां जास्ती Realistic असली तरी, त्यामुळें तत्कालीन समाजस्थितीचें चित्र त्यांत यथार्थ नाहीं असें होत नाहीं. असो. समाजसुधारणेचे उपाय सुचविण्यापूर्वी आपली 'आजची स्थिति' कशी आहे, त्यांत आशाजनक आणि निराशाजनक गोष्टी कोणत्या आहेत, याचा याप्रमाणें आढावा घेऊन हरिभाऊ आपल्या पुढील कार्यक्रमाकडे वळले आहेत.

## दुसरा समूह.

आपण आतां हरिभाऊंच्या कादंबऱ्यांच्या दुसऱ्या समूहाकडे वळलों आहों. या समूहांत आपण त्यांच्या पांच कादंबऱ्यांचा समावेश केला असून त्यांपैकीं **'गणपतराव', 'पण लक्षांत कोण घेतो', 'यशवंतराव खरे,'** व **'मी,'** या चार फार महत्त्वाच्या आहेत. या चारही कादंबऱ्या सूक्ष्मरीतीनें वाचल्या म्हणजे सामाजिक व राजकीय प्रश्नांचा हरिभाऊंनीं किती दूरवर आणि सर्व बाजूंनीं विचार केला होता, व त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांच्याद्वारें सुचविलेले समाजाच्या व राष्ट्राच्या उन्नतीचे उपाय किती विधायक व दूरदर्शी आहेत, हें वाचकांच्या लक्षांत येईल; त्यांनीं सुचविलेले हे उपाय कोणते आहेत, आणि या चार कादंबऱ्यांचा परस्पर संबंध काय आहे हें लक्षांत येण्यासाठीं प्रथम या चारही कादंबऱ्यांचीं कथानकें थोडक्यांत सांगितलीं पाहिजेत. परंतु त्यापूर्वी हें येथें सांगितलें

पाहिजे कीं, या कथानकांचा गोषवारा प्रस्तुत विषयास आवश्यक तितकाच येथें दिला आहे. प्रत्येक कथानकांत ओघानें जीं इतर पुष्कळ पात्रें आलीं आहेत, व त्यांच्याद्वारें हरिभाऊंनीं ज्या इतर अनेक गोष्टी सुचविल्या आहेत, त्यांचा येथें उल्लेख केला नाहीं. या कादंबऱ्यांचा परस्पर संबंध व प्रस्तुत विषय चट्‌दिशीं वाचकांच्या लक्षांत येईल इतकाच कथानकाचा भाग थोडक्यांत दिला आहे.

## 'गणपतराव.'

'मधली स्थिति' या कादंबरीच्या पुढली "आजकालच्या गोष्टी" या मालिकेंतील दुसरी गोष्ट "गणपतराव" ही होय, हें हरिभाऊंनीं स्वतःच "मधली स्थिति" या कादंबरीच्या उपोद्घातांत सांगितलें आहे. ही कादंबरी १८८० सालीं लिहावयास घेतली असून, व त्यावेळच्या एका मासिकांत क्रमशः प्रसिद्ध व्हावयास लागली असूनही शेवटीं आजपर्यंत अपुरीच राहिली आहे, ही खरोखरीच मोठ्या खेदाची गोष्ट आहे. तथापि तिचा जो अपूर्ण भाग आज प्रसिद्ध झाला आहे, तो आमचा विषय वाचकांचे पुढें मांडण्यास पुरेसा आहे. 'गणपतराव' या कादंबरीचें कथानक थोडक्यांत असें आहेः—"गणपतराव व नाना या नांवाचे दोन जीवश्चकण्ठश्च स्नेही पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत एकत्र अभ्यास करीत आहेत. गणपतराव हा सुखवस्तु आईबापांचा एकुलता एक मुलगा असून, नानाची स्थिति त्याच्यापेक्षां फारच वेगळी आहे. नानाचा बाप त्याच्या लहानपणींच वारला असून, त्याचें, त्याच्या आईचें व धाकट्या बहिणीचें पालनपोषण त्याच्या चुलत्यानें लोक-लज्जेस्तव कसें तरी केलें आहे. नानाच्या बहिणीचें- गोदावरीचें—लग्न तिच्या चुलत्यानें व चुलतीनें एक अगदीं गरीब, हीन व दुष्ट असें कुटुंब पाहून त्यांत करून दिलें असून, नानाच्याही गळ्यांत केवळ हुंड्याच्या लोभानें कसलीतरी एक शूर्पणखा बांधून देण्याचा

त्यांचा विचार चालू आहे. नानाच्या शिक्षणाची इतिश्री वास्तविक त्याच्या पहिल्या परीक्षेबरोबरच व्हावयाची, पण तो हुशार असल्यामुळें व गणपतरावांच्या वडिलांच्या भिडेमुळें, त्याच्या चुलत्यानें त्याला केवळ नाइलाज म्हणून कॉलेजांत पाठविलें आहे. 'मधल्या स्थितीं'तील विष्णु व यमुना ( आतां लक्ष्मी ) यांचा विवाह झाला असून, विष्णुपंत कॉलेजमध्यें गणपतराव व नाना यांचे सहाध्यायी आहेत. लक्ष्मीबाईचें अध्ययन आपल्या पतीच्या साहाय्यानें बरेंच वाढलें असून, आपल्या पतीस त्याच्या आचारविचारांत साहाय्य करण्याइतकी ती सुबुद्ध व सुशिक्षित झाली आहे. लक्ष्मीबाईची गोष्ट तिच्या लहानपणापासून सर्वसाधारण मुलींपेक्षां वेगळी असल्यामुळें त्यावेळच्या परिस्थितींत तिचें उदाहरण केवळ अपवादात्मक आहे; विष्णुपंत केवळ विशेष दैवशाली म्हणून अशी सुशिक्षित व त्याच्या विचारांचें मर्म जाणणारी, व त्यास साहाय्य करणारी बायको त्याला मिळाली, असे उद्गार एके ठिकाणीं गणपतरावाच्या तोंडीं आहेत. गणपतरावाचें लग्न झालें असून त्याची बायको त्या वेळच्या समाजस्थितीप्रमाणें अगदीं अशिक्षित आहे. गणपतरावाचे विचार मोठमोठ्या इंग्रजी ग्रंथकारांच्या वाचनानें फार प्रगल्भ झाले असून आपल्या समाजस्थितीची खरी जाणीव त्याला व त्याच्या उभयतां मित्रांस झाली होती. यामुळें साहजिकच आपली पत्नी सुशिक्षित व्हावी, तिच्याकडून आपल्यास आपल्या कार्यांत साहाय्य व्हावें, अशी त्यास एकसारखी तळमळ लागलेली आहे. त्याच्या परमप्रिय मित्राच्या—नानाच्या—बहिणीचा तिच्या सासरीं तिच्या नवऱ्याकडून व सासूकडून चाललेला अमानुष छळ पाहून व स्त्रियांची समाजांतील सर्वसाधारण परिस्थिति पाहून स्त्रियांच्या हतबल व करुणास्पद स्थितीविषयीं त्याचें अंतःकरण अगदीं तुटत असून स्त्रियांविषयीं समाज इतका उदासीन

असलेला पाहून त्याला स्त्रियांविषयीं अत्यादर व समाजाविषयीं तिरस्कार उत्पन्न झालेला दाखविला आहे. पुढें पुढें तर त्याचें मत असें होतें कीं, स्त्रियांची स्थिति सुधारल्याखेरीज आणि त्या सुशिक्षित झाल्याखेरीज समाजाची उन्नति होणार नाहीं. कारण समाजाचा पाया कुटुंब व कुटुंबाचा पाया पतिपत्नी. तेव्हां समाजाची खरी सुधारणा व्हावयास पतिपत्नींचा परस्पर संबंध अधिक प्रेमळ, समान व बौद्धिक झाला पाहिजे; ज्या ठिकाणीं केवळ धनी व नोकर असें नातें नवराबायकोंत आहे; नवऱ्याची–तो सुष्टदुष्ट कसाही असला तरी–एकनिष्ठ गुलामाप्रमाणें सेवा करणें हेंच ज्या समाजांत स्त्रियांपुढें ध्येय ठेविलें गेलें आहे, त्या समाजाची कधींही उन्नति होणार नाहीं, असें गणपतरावाचें मत आहे. त्याचें वाचन व विचार जसजसे वाढत जातात, तों तों त्याचें हें मत दृढच होत जातें; आणि त्याचा स्वभाव पहिल्यापासून जात्या विकारवश व तापट असल्यामुळें त्याचीं मतें पुढें या बाबतींत अगदीं जहाल बनलीं आहेत असें दाखविलें आहे. आपल्याला एक अशिक्षित बायको मिळाली, तिला सुशिक्षित करितां येईल तेव्हां करूंच, पण नानाचें लग्न व्हावयाचें आहे तर त्याला तरी विष्णुपंतांप्रमाणें सुशिक्षित पत्नी मिळावी, अशी गणपतरावाची इच्छा आहे. गणपतरावाचे सर्व विचार नानाला पटतात; पण सर्व प्रकारच्या बऱ्यावाईट स्थितीचा त्याला अल्प-वयांतच अनुभव आलेला असल्यामुळें, रूढीविरुद्ध जाणें व समाजाच्या अज्ञानाचा नाश करणें म्हणजे किती बिकट काम आहे हें तो पूर्णपणें जाणून आहे. यामुळें सर्व सुधारणा सावकाश कराव्यात, असें त्याचें मत असून तो या बाबतींत इतका नेमस्त आहे कीं, आपल्या चुलत्यानें कसल्या प्रकारच्या वधूशीं आपला विवाह निश्चित केला आहे हें त्यास ठाऊक असूनही तो त्या विवाहास आपली संमति द्यावयास तयार होतो. पण गणपतराव त्याला तसें करूं

देत नाहीं. त्यामुळें नानाच्या काकाचा त्याजवर रोष होऊन त्याच्या आश्रयास त्यास मुकावें लागतें. तरी पण त्याला अनुरूप अशी पत्नी मिळून त्याचा सर्व शिक्षणक्रम पुरा होतो. गणपतरावाच्या समाजसुधारणेच्या एकदेशीय मतांची यथाक्रम परिणति झाली आहे व तो शक्य तितकें आपल्या पत्नीस शिक्षणही देत आहे; परंतु त्याजवर पुढें विधुर होण्याचा प्रसंग येतो. याच प्रसंगीं नानाच्या बहिणीवर—सुदैवानेंच म्हटलें पाहिजे—वैधव्याचा प्रसंग येऊन तिची **विनोबा**-रूपी–तिच्या नवऱ्याचें नांव–नरपशूपासून मुक्तता होते. गणपतरावास तिच्या एकंदर स्थितीविषयीं पहिल्यापासून तळमळ वाटत होतीच; त्यांत आपल्या परममित्राची बहीण म्हणून, आणि तिचे अनन्वित हाल पाहून त्याच्या मनांत तिच्याविषयीं प्रेम व अनुकंपा होतीच; या सर्व परिस्थितीचा योग्य तो परिणाम होऊन गोदावरी व गणपतराव यांचा पुनर्विवाह होतो." असें गणपतराव या कादंबरीचें थोडक्यांत कथानक आहे.

## 'पण लक्षांत कोण घेतो?'

याच्यापुढील कादंबरी, म्हणजे महाराष्ट्रांत आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस चटका लावणारी व जिनें एके काळीं समाजांत चांगलीच खळबळ उडवून दिली होती, ती "पण लक्षांत कोण घेतो?" ही होय. ही कादंबरी एका स्त्रीचें आत्मचरित्र असून, त्याद्वारें हरिभाऊंनीं अप्रतिम कौशल्यानें मध्यम स्थितींतील एका सर्वसाधारण अविभक्त हिंदु कुटुंबाचें चित्र काढलें आहे. यांतील नायिकेनें, लहानपणापासून लग्न होईपर्यंत आपणांस आईबापांकडून कसें शिक्षण मिळालें व प्रस्तुत समाजपरिस्थितींत प्रत्येक मुलीपुढें कोणतें ध्येय ठेविलें जातें, वगैरे गोष्टी अनेक प्रसंगांच्याद्वारें वाचकांपुढें मांडिल्या आहेत. पुढें यमूचें (नायिकेचें) लग्न होतें. ईश्वरकृपेनें तिला नवरा विद्वान् व सद्गुणी मिळून त्याच्या साहाय्यानें तिच्या

शिक्षणास आरंभ होतो. अविभक्तकुटुंबपद्धति; नवराबायकोच्या मर्यादेच्या विचित्र कल्पना, स्त्रियांवर समाजानें, धर्मानें व रूढीनें घातलेलीं बंधनें; त्यामुळें स्त्रीशिक्षणाच्या मार्गांत असलेल्या मोठ्या अडचणी व स्त्रियांना अशा त्यांच्या हल्लींच्या परिस्थितींतून स्वतःच्या उन्नतीचा मार्ग काढणें किती दुष्कर आहे;- या सर्वांची फारच यथार्थ कल्पना नायिकेनें आपल्या आयुष्यांतील या भागाचें वर्णन करून वाचकांस आणून दिली आहे. नायिकेच्या नवऱ्यास नंतर नोकरीनिमित्त मुंबईस जावें लागतें; तेथें वेगळें बिऱ्हाड केल्यावर मात्र तिचें शिक्षण योग्य रीतीनें जोरांत चालतें. "गणपतराव" कादंबरींतील विष्णुपंत, लक्ष्मीबाई व नाना—आतां नानासाहेब आणि त्यांची बायको यशोदाबाई—हीं चौघेंहीं मुंबईसच आहेत. या मंडळींच्या सहवासांत यमूचा व तिच्या नवऱ्याचा काळ फारच सुखांत जातो. पण ईश्वराला हें सुख पाहावत नाहीं. यमूच्या नवऱ्याचें अकालीं व अकस्मात् निधन होऊन बिचाऱ्या यमूवर आकाशाची कुऱ्हाड पडते. तिला आपल्या पतीकडून चांगल्या प्रकारचें शिक्षण मिळालें असतांही, आणि तिच्या पोटापाण्याची चांगली व्यवस्था तिच्या पतीनें केली असतांही, समाजाच्या एकंदर परिस्थितीमुळें, व तिच्या सारख्या हतभागी स्त्रियांस समाजाच्या भूतदयेचा व अनुकंपेचा फारच अल्प वांटा मिळत असल्यामुळें, यमूची स्थिति पतिनिधनानंतर फारच हृदयद्रावक होते. तिच्या सासरच्या मंडळीकडून फसवून व बळजबरीनें तिचें केशभूषण हिरावून घेतलें जातें. तिच्या भावाचें तिच्यावर अत्यंत प्रेम असल्यामुळें तिचा पुढला काळ भावाजवळ जातो. पण तेथेंही या बहीणभावांच्या निर्मल व उत्कट प्रेमाचा भावजयीस मत्सर वाटून तीही तिचा छळ करते, आणि शेवटीं पतिनिधनाच्या व वैधव्याच्या आगींत होरपळून जाऊन नायिकेचा फार दुःखद रीतीनें अंत होतो.

## "मी"

'पण लक्षांत कोण घेतो' हें ज्याप्रमाणें स्त्रीचें आत्मचरित्र आहे, त्याप्रमाणें 'मी' हें एका पुरुषाचें आत्मचरित्र असून, हेंही पहिल्या आत्मचरित्राइतकेंच चित्तवेधक आहे. यांतील नायक भाऊ हा लहानपणीं फार हूड असून अतिशय विलक्षण अशा परिस्थितींत वाढलेला आहे. याचा बाप परागंदा झालेला असून, याच्या आईच्या, बहिणीच्या व याच्या पालनपोषणाचा सर्व भार याच्या मामानें उचललेला आहे. आई आधींच तापट व हेकेखोर असून, आपल्या नवऱ्याच्या छांदिष्ट वर्तनानें वैतागलेली, आपल्याला कोठेंच सुख नाहीं या कल्पनेनें जिवाला कंटाळलेली अशी आहे. भाऊ जात्या हूड, आई अशी रागीट व वैतागलेली, आणि स्थिति तर अशी परावलंबी; अशा स्थितींत भाऊचें शिक्षण कसें चाललें असेल हें कल्पनेनेंच जाणलें पाहिजे. पण भाऊच्या सुदैवानें त्याला एक गुरु भेटला, आणि त्याच्या आयुष्याला वेगळें वळण लागलें. शिवरामपंत म्हणून एक गृहस्थ त्यांच्या शेजाराला आले, त्यांच्या लहान मुलीशीं –सुंदरीशीं–भाऊचा व त्याच्या बहिणीचा अत्यंत स्नेह जमला. शिवरामपंत फार विद्याव्यासंगी व विचारी गृहस्थ असून, समाजस्थितीचा स्वतःशीं पूर्ण विचार करून, समाजाच्या व राष्ट्राच्या उन्नतीला काय उपाय योजावे याचें निदान आपल्या मनाशीं त्यांनीं करून ठेविलें होतें. आपल्या अवनत राष्ट्राची चांगल्या प्रकारें पुनर्घटना होण्यास स्त्रीशिक्षणाची किती आवश्यकता आहे हें जाणून, आपल्या एकुलत्या एक मुलीला प्रौढवयापर्यंत अविवाहित ठेवण्याचा निश्चय करून तिला उत्तम शिक्षण देण्यास त्यांनीं आरंभ केला होता. शिवरामपंत व त्यांच्या घरची मंडळी यांच्या सुशील चारित्र्याचा भाऊच्या मनावर परिणाम होऊन, त्यांच्या घरीं नित्य जावयास सांपडावें म्हणून त्याला आपलें वर्तन सुधारून अभ्यासा-

कडे चांगलें लक्ष देणें भाग पडलें. शिवरामपंतांनींही भाऊची कुशाग्रबुद्धि व ग्राहकशक्ति पाहून त्याच्या शिक्षणाकडे आपलें लक्ष घातलें आणि आपण योजिलेल्या कार्यास हा मुलगा चांगला उपयोगी पडेल, असें जाणून त्याच्या मनोभूमिकेवर आपल्या विचारांचें बीं पेरण्यास आरंभ केला. भाऊचें सुंदरीवर प्रेम बसलें; आणि तिच्या प्रेमास आपण पात्र व्हावें म्हणून तिच्या वडिलांच्या नेतृत्वाखालीं त्यानें आपली मानसिक उन्नति करण्याचें काम झपाट्यानें चालविलें. भाऊच्या बहिणीचें लग्न त्याच्या आईनें केवळ हेकेखोरपणानें एका हलकट व उतारवयाच्या गृहस्थाशीं लावून दिलें. पण तत्कालीन समाजस्थितींत गृहस्थास साहजिक असे जांवयाचे गुण लवकरच कळून आल्यामुळें तिला आपल्या मुलीला पुढें माहेरींच ठेवावें लागलें. यामुळें आपल्या हेकेखोरपणाचा तिला पश्चात्ताप होऊन ती त्या दुःखानें मरते; आणि ताईच्या–भाऊच्या बहिणीच्या–शिक्षणास, तिला आपल्या नवऱ्याजवळ राहणें शक्य नसल्यामुळें, शिवरामपंतांचे घरीं राहून सुंदरीबरोबरच आरंभ होतो. तिला तिच्या नवऱ्याकडून, इतर आप्तांकडून व समाजांतील कित्येक टवाळांकडूनही या कामीं बरेच अडथळे आले; पण त्यांना न जुमानतां आपल्या भावाच्या आणि शिवरामपंतांच्या मदतीनें तिनें आपलें शिक्षण सुंदरीबरोबर उत्तम प्रकारें चालविलें; व पुढें तिचा वृद्ध नवरा मरण पावल्यानंतर तिचा शिक्षणाचा मार्ग मोकळाच झाला. शिवरामपंतांसारखा मार्गदर्शक मिळाल्यामुळें भाऊचेंही शिक्षण फार चांगल्या रीतीनें चालू झालें. शिवरामपंत त्याजकडून चांगलीं पुस्तकें वाचवून घेत व समाजाच्या आणि देशाच्या परिस्थितीवर नेहमीं त्याच्याशीं वादविवाद करून ही स्थिति सुधारण्यास आपण काय केलें पाहिजे याबद्दल विवेचन करीत. विद्यासंपादनानंतर केवळ पैसा मिळविणें हेंच आपलें ध्येय

न ठेवतां समाजासाठीं व देशासाठीं काहींतरी केलें पाहिजे अशी जाणीव त्यांनीं भाऊच्या मनांत उत्पन्न करून दिली. आपल्या आईची व बहिणीची स्थिति भाऊच्या डोळ्यांपुढें होतीच, यामुळें स्त्रियांच्या उन्नतीकडे त्याचें लक्ष वेधलें; पण त्याबरोबर त्याहीपेक्षां मोठा प्रश्न, म्हणजे सर्व देशाच्या उन्नतीचा, त्याच्यापुढें आला; आणि त्यासाठींही आपण कांहींतरी केलें पाहिजे अशी तळमळ त्याच्या मनाला लागली. योग्य काळीं त्याचा शिक्षणक्रम पुरा होऊन तो एल्एल्. बी. झाला; वकिली करूं लागला. परंतु समाजाची व राष्ट्राची हीन स्थिति त्याच्या डोळ्यांपुढून जाईना. त्यानें लोकांस सुधारण्यासाठीं जे जे प्रयत्न करावे ते सर्व लोकांनींच अज्ञानानें हाणून पाडावे अशी स्थिति होऊं लागली. त्यामुळें शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होणें ही पहिली आवश्यक गोष्ट आहे हें त्याला समजलें, व देशोन्नतीचें कार्य किती दुष्कर व मोठें आहे हेंही त्याला कळून आलें. आपला चरितार्थाचा धंदा संभाळून फावल्या वेळांत काम करण्यानें देशोन्नति होणार नसून सर्वथैव त्याकरितां काम करणारीं, सर्व आयुष्य त्यासाठीं वेंचणारीं माणसें मिळालीं पाहिजेत असें त्याला दिसून आलें. अशीं माणसें अविवाहित असून त्यांचेमागें कोणताही पाश असतां उपयोगीं नाहीं, त्यांनीं संन्यास घेऊनच तन मन धन देशाला वाहिलें पाहिजे, आणि देशाची हरएक बाजूनें—सामाजिक, औद्योगिक, आर्थिक सर्व अंगांनीं—उन्नति केली पाहिजे, असे विचार त्याच्या डोक्यांत येऊं लागले. रात्रंदिवस आपण देशासाठीं काय करावें, अशी तळमळ त्याला लागली. अविवाहित राहून देशकार्यासाठीं अहोरात्र झटणारीं माणसें जर पाहिजेत, तर आपणच तसें कां करूं नये? आपणच अशा तऱ्हेचा पंथ कां काढूं नये? अशा दिशेनें विचार करितां करितां त्याच्या मनाचा निश्चय झाला. सुंदरीवर त्याचें अत्यंत प्रेम होतें,

पण देशासाठीं स्वार्थत्याग करून आपण संन्यास घ्यावयाचा व आपल्याप्रमाणें देशाला जन्म वाहणाऱ्या तरुण मंडळीचा मठ स्थापावयाचा असा त्यानें निश्चय केला. हा निश्चय त्यानें केला नाहीं तोंच शिवरामपंतांनीं सुंदरीशीं विवाह करण्याबद्दल त्याजजवळ गोष्ट काढली. पण त्यानें आपण नुकताच केलेला नियम शिवरामपंतास कळवून आयुष्यांत आपण कोणतें कार्य करण्याचें ठरविलें आहे, तेंही सांगितलें. सुंदरीशीं भाऊचा विवाह होणें शक्य नाहीं हें पाहून शिवरामपंतांची जरी निराशा झाली तरी आपण ज्या वृक्षाचें बीजारोपण केलें तो योग्य रीतीनें वाढून त्याला फळें आल्याबद्दल त्यांना समाधान वाटल्यावांचून राहिलें नाहीं. त्याच्या कार्याबद्दल त्यांनीं पूर्ण सहानुभूति दर्शविली व त्यांत यश येण्याचा त्यांनीं आशीर्वाद दिला; येथें नायकाचें पूर्वचरित्र संपलें.

या पुढील भाऊचें—आतां भावानंदाचें— चरित्र फारच अल्प आहे. कारण त्याच्या मनाची व विचारांची वाढ कशी झाली हीच विशेष महत्त्वाची गोष्ट असल्यामुळें साहजिकच कादंबरीचा तीन चतुर्थांश भाग त्यांत खर्च झाला आहे. पुढें भावानंदानें संन्यास घेऊन देशकार्यासाठीं मठ स्थापला. त्याला पांच सहा अनुयायी मिळून त्यानें लोकशिक्षणाचें कार्य सुरू केलें. लोकांना शिक्षण देणें त्यांच्या गरजा व हक्क त्यांना समजावून देणें, त्यांच्या गरजा सरकारी अधिकाऱ्यांपुढें मांडणें, हीं कामें मुख्यतः त्यानें आपल्यापुढें ठेविलीं. स्त्रियांच्या उन्नतीचें व शिक्षणाचें काम त्यानें सुंदरी व ताई यांजकडे सोंपविलें. अशा रीतीनें आपली मठस्थापना करून पुढें अविश्रांत श्रम केल्यानें भावानंदाचा अकालीं शेवट होऊन कथानकाची परिसमाप्ति होते.

## ‘ यशवंतराव खरे.’

‘ यशवंतराव खरे ’ या कादंबरीचा नायक यशवंतराव हा अगदीं

अल्पवयांत एका श्रीमंत गृहस्थाच्या आश्रयास राहिलेला दाखविला आहे. त्याचा बाप तो अगदीं लहान असतांच वारला असून, घरीं दारिद्र्य असल्यामुळें त्याच्या आईला मोलमजुरी करून स्वतःचें व आपल्या तीन मुलांचें पोट भरावें लागत आहे. पण ती माउली फार गरीब, प्रेमळ, सच्छील व पापभीरु असल्यामुळें तिनें आपल्या सर्व मुलांस चांगल्या प्रकारचें शिक्षण लाविलें आहे. यशवंतराव ज्या श्रीमंत गृहस्थांच्या आश्रयास आहे ते गृहस्थ व त्यांच्या घरची सर्व मंडळी, स्त्रीपुरुष व मुलें सुद्धां, फार उद्दाम व श्रीमंतीच्या तोऱ्यांत असून बिचाऱ्या यशवंतास फार छळतात. यामुळें यशवंतास सर्व श्रीमंतांचा व रावबहादूर रावसाहेबांचा–कारण ते गृहस्थ स्वतः रावबहादूर होते–एक प्रकारचा तिरस्कार येतो. पुढें पुढें तर यशवंतास रावबहादूर आडमुठ्यांच्या घरीं इतका त्रास होतो कीं, त्याला त्यांचा आश्रय सोडणें भागच पडतें. हा आश्रय सुटल्याबरोबर लागलींच त्याला श्रीधरपंत नांवाच्या एका गृहस्थाचा आश्रय मिळतो. हे गृहस्थ "मी" मधील शिवरामपंतांप्रमाणेंच मोठे विद्याव्यासंगी व विचारी आहेत; पण शिवरामपंतांप्रमाणें यांचे विचार सर्वांगी नसून एकदेशी आहेत. यांची बायको म्हणजे जवळ जवळ साक्रेटिसाची झांथिपीच असल्यामुळें यांनीं गृहसौख्याची सर्व आशा सोडून दिली होती; आणि त्याचा साहाजिक परिणाम सामाजिक सुधारणेबद्दल औदासिन्य उत्पन्न होण्यांत झाला. निरनिराळ्या पाश्चात्य देशांचे इतिहास वाचून व आपल्या देशाची त्या देशांशीं तुलना करून श्रीधरपंताचें मत असें झालें होतें कीं, आपल्या देशाची उन्नति होण्यास एकच उपाय आहे; व तो राजकीय सुधारणा हा होय. सामाजिक सुधारणा वगैरे बाबी त्यापुढें कमी महत्वाच्या किंबहुना अगदीं क्षुल्लक अशा होत. जे लोक राजकीय सुधारणेविषयीं विचार न करितां सामाजिक सुधारणेच्या मागें लागतात ते महामूर्ख असून

त्यांपैकीं पुष्कळ तर साहेबलोकांस खूष करून त्यांची मर्जी संपादन करण्यासाठीं, आपल्या समाजांतील नसते दोष बाहेर काढून ते सुधारण्याचा आव घालतात. या कारणास्तव ते आपल्या मित्र-मंडळींत रावसाहेब रावबहादुरांच्या नेहमीं टवाळ्या करीत. अशा गृहस्थाच्या शिक्षणाखालीं यशवंतरावाचीं मतें कशीं बनलीं असतील याचें अनुमान करणें अवघड नाहीं. रावबहादूर आडमुठे यांच्या घरच्या स्त्रिया व श्रीधरपंताची बायको यांचे स्वभाव पाहून स्त्रीजातीबद्दलचा त्याचा आदर कधींच निघून गेला होता व एकदां मन असें झाल्या-मुळें स्वतःच्या आईचे आणि माईसाहेबांसारख्या प्रेमळ व परोपकारी स्त्रीचे गुणही त्याला दिसेनासे झाले. त्याची आई त्याला प्रेमामुळें वारंवार बोले, त्यामुळें आपल्यावर आईचें प्रेमच नाहीं असा त्याचा ग्रह झाला. त्याच्या गरिबीमुळें त्याला पुष्कळ ठिकाणीं पदोपदीं अपमान सोसावा लागे त्यामुळें श्रीमंत लोकांबद्दलचा तिरस्कार वाढून स्वतःचें नांव काढून उच्चपदाला चढण्याची महत्त्वाकांक्षा त्याच्या स्वाभिमानी मनांत तीव्र होऊन त्या हेतूनें तो झटून अभ्यास करितो बड्या लोकांबद्दल आधींच तिटकारा, त्यांत श्रीधरपंत अशा लोकांची नेहमीं कुचाळी करीत ती कानीं पडून—कारण त्याकाळीं सामाजिक सुधारणेची चळवळ बहुतेक अशा मोठ्या लोकांच्याच हातांत होती—तो द्वेष अधिकच दुणावला; व त्याबरोबर सामाजिक सुधारणेबद्दलचा तिटकाराही वाढला. श्रीधरपंतांच्या अनुकरणानें इकडे राजकीय सुधारणेबद्दलची कळकळ—बोलण्यांत तरी—अधिक वाढली. श्रीधर-पंतांच्या अनुकरणानें व नेतृत्वानें त्याचें वाचन खूप झालें; पण आपल्या गुरूचें उदाहरण पुढें असल्यामुळें, या वाचनाचा उपयोग एकदेशी विचार. अधिक एकदेशी होण्याकडे मात्र झाला. "या सुधारकांचें कांहीं चालूं द्यावयाचें नाहीं. राष्ट्राची राजकीय सुधारणा आधीं झाली पाहिजे. दुसऱ्या सुधारणा—त्या सुधारणा म्हटल्या तर—

होतील मागून सावकाश, नाहींतर नाहींहि होणार! बायकांची सुधारणा म्हणे! कसली आली सुधारणान् काय! आमच्या श्रीधरपंताची बायको बघा! करा सुधारणा तिची!"* अशीं त्याचीं मतें झालीं. स्वतःच्या परिस्थितीमुळें त्याचें मनही जरा चमत्कारिक झालें. "त्याला दर दिवशीं जगांत जो अनुभव येत होता, हा जगांतील निरनिराळ्या व्यक्तींच्या वाईटपणाबद्दल येत होता, यामुळें त्याचें मन दिवसानुदिवस जगांतील लोकांविषयीं अधिकाधिक वाईट होत चाललें होतें; त्यांतही पुरुषांपेक्षां स्त्रीवर्गाविषयीं विशेषच. तो स्वतः अत्यंत सरळपणें आजपर्यंत वागत आला, परंतु त्याच्याशीं सरळपणानें व दयाळूपणानें वागणारे लोक फार विरळा, त्यांतही स्त्रिया फारच विरळ, अशी कांहीं अंशीं खरी स्थिति होती, व कांहीं अंशीं त्याच्या वाईट होत चाललेल्या मनास वाजवीपेक्षां फाजील वाईट वाटत चाललें होतें."ऽ तें कसेंही असलें तरी ही गोष्ट खरी कीं, देशाची अवनत स्थिति सुधारण्यासाठीं कांहींतरी आपण केलें पाहिजे असें त्याला वाटूं लागलें होतें. तें काय करावें हें त्याच्याच शब्दांनीं सांगणें अधिक बरें. "माझ्या मनांतून फार वाटतें कीं, आपला अभ्यास वगैरे सोडून अशाच कांहींतरी उद्योगाला लागावें, त्यांतच खरं देशहित आहे. पण नाहीं. आजकाल युनिव्हर्सिटीच्या चार परीक्षांचा छाप बसल्याखेरीज कांहीं उपयोग नाहीं, तोंड उघडण्याची देखील सोय नाहीं........एवढ्या करितांच या भानगडींत राहून एकदां चार परीक्षा देऊन बी. ए. या अक्षरांचें शेंपूट लावून घेणार; आणखी मग दुसरं कांहीं नाहीं, या रावसाहेब रावबहादुरादि सुधारकांचा चांगलाच समाचार घेतों. यांच्या सगळ्या सुधारणा, यांच्या मंडळ्या, यांचे समाज,—फार कशाल जें जें म्हणून यांचं त्याचा त्याचा नुसता धुव्वा उडवून देतों.

---

* यशवंतराव खरे, प्र.-४१, पृ. ३२४. ऽयशवंतराव खरे, प्र. ३०, पृ. २४९.

राजकीय—राजकीय, आधीं आपल्याला राजकीय सुधारणाच घडवून आणल्या पाहिजेत. लोकांना राज्यकारभारांत पुष्कळसा अधिकार मिळाला पाहिजे. त्यांचं म्हणणं काय तें सरकारनं जमेंत धरलंच पाहिजे. असा राज्यकर्त्यांना धाक वाटून त्यांनीं लोकमतानंच राज्य-व्यवस्था चालविली पाहिजे, इतकी सध्यांच्या कायदेकानूंत सुधारणा झाली पाहिजे. ती सुधारणा आपण घडवून आणून मग समाज-सुधारणेकडे लक्ष द्यावं. आमच्या समाजव्यवस्थेंत असतील कांहीं गोष्टी वाईट; पण त्या सरकाराच्या मदतीनें लोकांच्या मनाविरुद्ध काढून टाकण्यापेक्षां सरकारांत लोकमताचा पुष्कळ प्रवेश करून घेण्यासाठीं सर्व सुशिक्षितांनीं एकतानतेनं आधीं प्रयत्न केले पाहिजेत. कांहीं नाहीं; तें कांहीं नाहीं. या सुधारकांची पण नुसती साऱ्या देशभर टर उडविली पाहिजे. त्याच्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं. मी त्याच्याकरितां आपलं आयुष्य वाहणार. राजकीय सुधारणा आधीं घडवून आणली पाहिजे."*

अशा प्रकारचीं यशवंतरावाचीं मतें बनून, त्यानें आपली कार्यदिशा ठरविली. पुढें तो मॅट्रिक पास होऊन कॉलेजमध्यें गेला; तेथें त्यानें हींच मतें जोरानें प्रतिपादून आपला एक वेगळा पंथच काढला. पुढें तर त्याची असेंही मानण्यापर्यंत मजल गेली कीं, राजकीय सुधारणेची जागृति लोकांत उत्पन्न करावयाची म्हणजे लोकांत स्वाभिमान उत्पन्न केला पाहिजे; आणखी "स्वाभिमान दाखवावयाचा म्हणजे त्याच्याबरोबर आपल्या ज्या काय वाईट बऱ्या जुन्या समजुती असतील त्याही धरून ठेवून चाललें पाहिजे. नाहींतर आपण ज्या पक्षाचें समर्थन करणार तो चांगल्या तऱ्हेनें वळवणार नाहीं."* पुढें जनरूढीप्रमाणें विवाह करावा किंवा नाहीं हा प्रश्न त्याच्यापुढें आला. अविवाहित राहून देशकार्य करावें असें तो

---

* यशवंतराव खरे, प्र. ४१, पृ. ३२९. * यशवंतराव खरे, प्र.४८,पृ.३७३.

पुष्कळदां म्हणे. पण आपल्या हातून ब्रह्मचर्य निभेलच अशी खात्री न वाटल्यामुळें म्हणा किंवा त्याच्या गुरूंनीं कांहीं व्यावहारिक अडचणी दाखविल्यामुळें म्हणा, त्यानें लग्न केलें. अशा रीतीनें आपल्या गुरूच्या सहवासांत त्यांच्या मतांचें व वाचनाचें अनुकरण करीत यशवंतराव बी. ए. झाले. पुढें त्यांनीं देशकार्य कोणत्या प्रकारें केलें हा अधिक मनोरंजक वृत्तांत हरिभाऊंनीं दुसऱ्या कादंबरीकरितां राखून ठेविला होता. या कादंबरीचें कार्य जें होतें तें येथें संपलें. ज्या इंग्रजी शिक्षणाचा परिणाम गणपतराव अगर भावानंद याच्या मनावर एका दिशेनें झाला, त्याच्या अगदीं उलट दिशेनें त्याच शिक्षणाचा परिणाम त्याचवेळीं दुसऱ्या कित्येक तरुणांवर कसा झाला हें मुख्यतः दाखविण्याचा हरिभाऊंचा उद्देश होता. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकांत दोन पक्ष निर्माण होऊन जे तीव्र मतभेद झाले, त्यांच्या उत्पत्तीची मीमांसा व पुढील मतभेदाचें भविष्य या कादंबरींत आहे. या गोष्टीचीं चिन्हें ज्यावेळीं हरिभाऊंनीं ही कादंबरी लिहिली त्यावेळींच दिसूं लागलीं होतीं; पण पुढें त्यांचें पर्यवसान काय होणार व कसें होणार हें त्यांनीं आपल्या कल्पनाशक्तीनें ओळखून त्याची सूचना त्यांनीं समाजास आगाऊ देऊन ठेविली. इंग्रजी विद्येचा पहिल्या मोहिनीचा अंमल उतरल्यावर, तिनें पुष्कळ तरुणांस आपल्या समाजाच्या व राष्ट्राच्या स्थितीबद्दल विचार करावयास लाविलें आणि त्यामुळें समाजांत मोठी विचारक्रांति झाली, हें जें आपल्या समाजाचें दुसरें स्थित्यंतर म्हणून वर सांगितलें त्या स्थित्यंतराचा साग्र व सांगोपांग इतिहास हरिभाऊंनीं या चार कादंबऱ्यांतून कसा चित्रित केला आहे. हें यावरून वाचकांच्या लक्षांत येईल.

## वरील चार कादंबऱ्यांचा परस्पर संबंध.

'गणपतराव,' 'पण लक्षांत कोण घेतो,' 'मी' आणि

'यशवंतराव' या चार कादंबऱ्यांचीं कथानकें थोडक्यांत वर दिलीं आहेत, त्यांवरून प्रथमदर्शनींच जी गोष्ट लक्षांत येईल ती ही कीं, पहिल्या दोन कादंबऱ्यांचे नायक विवाहित असून, पुढील दोन कादंबऱ्यांतील नायक अविवाहित आहेत. यावरून समाजसुधारणेचा प्रश्न विवाहित सुशिक्षितांनीं कोणच्या दृष्टीनें, व अविवाहित सुशिक्षितांनीं कोणच्या दृष्टीनें सोडविला असेल अशा दोन्ही गोष्टी वाचकांपुढें मांडण्याचा हरिभाऊंचा विचार असावा कीं काय अशी शंका येते. दुसरी गोष्ट, जी आपल्या लक्षांत येईल ती ही कीं, पहिल्या दोन कादंबऱ्यांत मुख्यतः सामाजिक सुधारणेवर भर असून पुढील दोहोंत राजकीय सुधारणेची आवश्यकता दाखविली आहे. त्यामुळें त्यावेळीं विवाहितांस सामाजिक सुधारणेची जरूरी अधिक भासली व अविवाहितांस राजकीय सुधारणेची आवश्यकता अधिक भासली असावी असें दिसतें. विवाहितांच्या व अविवाहितांच्या दृष्टींत हा जो फरक या कादंबऱ्यांत दाखविला आहे तो तसा खरोखरीच असेल, तर तो अगदीं साहजिक होता, यांत शंका नाहीं. राजकीय पारतंत्र्याकडे विवाहितांचें लक्ष्य गेलें नाहीं असें नाहीं. राजकीय सुधारणेचा प्रश्न त्यांच्या पुढेंही होता, हें हरिभाऊंनीं ठिकठिकाणीं दर्शित केलें आहे. (उदाहरणार्थ, 'मी' मधील ५१ प्रकरणामधील शिवरामपंतांचें भाषण पाहावें.)

## सामाजिक सुधारणेच्या चळवळीची उपपत्ति

राजकीय सुधारणांची चळवळ विवाहितांनीं हातीं घ्यावयाची; पण या कार्यांत त्यांच्यापुढें प्रथमच जी अडचण येऊन पडली ती ही कीं, नवऱ्यांच्या विचारांत नवीन शिक्षणानें मोठी क्रांति झाली, त्यांची दृष्टि व्यापक होऊन त्यांचें कार्यक्षेत्र विस्तृत झालें; पण त्यांच्या विचारांचें व कार्याचें महत्त्व घरच्या स्त्रियांच्या लक्षांत न आल्यामुळें, व त्यांना न समजल्यामुळें, विवाहितांस आपलें कार्य

करणें अवघड होऊं लागलें. घरच्या बायकांकडून त्यांना पदोपदीं अडथळे येऊं लागले. यामुळें अशा कुटुंबी पुरुषांना स्त्रीशिक्षणाची आवश्यकता भासूं लागली. पाश्चात्य विद्येशीं आमचा संबंध येण्यापूर्वीं समाजांतील स्त्रीपुरुषांची संस्कृति एक होती; दोघांचे आचारविचार एक होते, दोघांचें शिक्षण समान होतें, पुरुषांत अधिक कांहीं असलें तर ती साक्षरताच होती; यामुळें स्त्रीपुरुषांचीं ध्येयें भिन्न नसून उभयतांमध्यें बरीच सहकारिता असे. पण पाश्चात्य शिक्षणाचा पुरुषांत पसार झाल्याबरोबर स्त्री-पुरुषांमधील हा बौद्धिक समतोलपणा बिघडला. पुरुषवर्ग आचारविचारानें पहिल्या जुन्या संस्कृतींतून निघून एकदम अगदीं वेगळ्या दिशेला गेला. परंतु स्त्रीवर्गाच्या आचारविचारांचा गाडा पहिल्या पूर्वपरंपरागत चाकरींतूनच फिरत राहिला. या असमानतेचा परिणाम विवाहित पुरुषांस फार भासला. कारण त्यामुळें कुटुंबांत असमाधान उत्पन्न झालें; कुटुंबाची पहिली घडी विसकटली. ही नवी उत्पन्न झालेली अडचण दूर करण्यास एकच उपाय होता; व तो पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांना शिक्षण देऊन, त्यांचे आचारविचार पुरुषांप्रमाणें होतील, पुरुषांच्या कार्याचें महत्त्व त्यांना समजूं लागेल, स्त्रीपुरुषांत पुनः पूर्वींप्रमाणें सहकारिता होईल, अशी स्थिति आणणें हा होय. राजकीय उन्नतीची आवश्यकता, व त्यासाठीं लागणाऱ्या प्रयत्नांचें महत्त्व समजण्याइतकी पात्रता, समाजांत आल्याशिवाय राजकीय उन्नतीच्या मागें लागण्यांत अर्थ नाहीं, असें स्वतःच्या गृहस्थितीवरून व कौटुंबिक अडचणींवरून विवाहितांस वाटूं लागलें; त्यामुळें गणपतराव, रघुनाथराव यांसारख्या विवाहित मंडळींच्या प्रयत्नांचा ओघ साहजिकरीत्या सामाजिक सुधारणेकडे—विशेषतः स्त्रीशिक्षणाकडे—प्रथम वळला. हें कसें झालें याची साग्र उपपत्ति या पहिल्या दोन कादंबऱ्यांतून आपणांस पाहावयास सांपडते. 'मी'मध्यें ५० व्या प्रकरणाच्या शेवटीं शिवरामपंतांच्या तोंडीं याबद्दलचे विचार

हरिभाऊंनीं घातले आहेत. शिवरामपंत म्हणतात, "कोणचीही गोष्ट सुधारावयाची म्हटली म्हणजे ती अगदीं अंतर्भागापासून सुधारली पाहिजे. कोठें कीड लागली असली, तर तिचें मूळ शोधून काढून तेथें उपाय करण्यास सुरुवात केली पाहिजे; नाहींतर, कांहींच फायदा होणार नाहीं..........." (हा आपला विचार पुढल्या प्रकरणांत शिवरामपंतांनीं अधिक स्पष्ट करून दाखविला आहे) "आपल्या व्यवस्थेंत जर कांहीं सुधारणा व्हावी असें वाटत असेल, तर पहिल्या प्रथम मूळ सुधारलें पाहिजे. समाजाची व्यवस्था बरी नाहीं असा विचार मनांत आला कीं, घरच्या व्यवस्थेंत बिघाड झाला आहे असें समजावें, आणखी तिकडे लक्ष देऊन कुठें काय बिघाड झाला आहे तो पहावा....नाहींतर वरून उपचार कितीही केले तरी ते व्यर्थ. त्यांच्यापासून कांहींसुद्धां निष्पन्न होणें नाहीं."* याप्रमाणें अंतर्निरीक्षणाला आरंभ करितांच या विवाहित लोकांच्या नजरेस जी गोष्ट प्रथम आली ती ही कीं, कुटुंबव्यवस्था हल्लीं बिघडलेली आहे. पतिपत्नींचा केवळ शारीरिक विवाह होत असून त्यामध्यें समान शिक्षणाच्या अभावामुळें बौद्धिक असमानता उत्पन्न होऊन खऱ्या सहकारितेचा लोप झाला आहे. ही प्रगतीच्या मार्गांत मोठीच अडचण उत्पन्न झाली आहे. तेव्हां प्रथम स्त्रियांस शिक्षण देऊन, त्यांना पुरुषांच्या खऱ्या सहचारिणी बनविल्या पाहिजेत. कुटुंब हा समाजाचा पाया असल्यामुळें कुटुंबाची सुधारणा झाल्याशिवाय समाजाची सुधारणा करणें व्यर्थ आहे; आणि समाजाची सुधारणा झाल्याशिवाय, राजकीय जबाबदाऱ्या शिरावर घेण्याची पात्रता त्याच्या अंगांत येणार नाहीं. कारण जे लोक समाजांतील निम्याहून अधिक व्यक्तींना शिक्षणापासून पराङ्मुख करितात, आपल्या सुखासाठीं दास्यांत ठेवितात,

* मी. प्र. ५०, पृ. ३८१.

व आपल्या चैनींत व अरेरावींत खंड पडेल म्हणून त्यांना स्वातंत्र्य देऊं इच्छीत नाहींत, ते लोक राजकीय समतेसाठीं कोणत्या तोंडानें भांडणार ? अशा प्रकारची विचारसरणी बर्क, मिल्ल, स्पेन्सर अशा तत्त्वज्ञान्यांच्या ग्रंथांच्या वाचनानें बऱ्याच लोकांची होऊन त्यांत जे विवाहित होते त्यांना या सर्वांचें मूळ आपल्या हल्लींच्या कुटुंब-पद्धतींत आहे असें वाटूं लागलें; व स्त्रीशिक्षणाचा प्रसार झाल्या-शिवाय ही स्थिति सुधारणार नाहीं, अशी त्यांची खात्री झाली. हे त्यांचे विचार एकदेशीय असतील; पण त्या परिस्थितींत ते अयोग्य अगर अगदींच चुकीचे होते असें मात्र म्हणतां येणार नाहीं. शिवराम-पंतासारख्या विचारी गृहस्थानें स्त्रीशिक्षणाबरोबर इतर राजकीय गोष्टींची आवश्यकता कधींही नाकबूल केली नाहीं.* पण गणपत-रावांसारखे जे विकारशील व मिल्सारख्यांचे कट्टे भक्त होते ते पूर्ण समाजसुधारणावादी झाले. ही क्रिया कशी झाली, याचें उत्तम चित्र 'गणपतराव' या कादंबरींत रेखाटलें आहे. समाजसुधारकांच्या मतांत हा जो एकदेशीपणा आला तो चांगला होता कीं वाईट होता हें ठरविणें लोकांचें काम आहे; कादंबरीकाराचें नाहीं. इंग्रजी शिक्षणानें सुशिक्षित लोकांची—व विशेषतः त्यांत जे विवाहित होते त्यांची—विचारक्रांति कशी झाली याचें चित्र काढलें आहे तें खरें आहे कीं नाहीं, हें आपणांस पाहावयाचें व तें अगदीं खरें असून

---

* शिवरामपंत भाऊला सांगतात. "तूं सर्व बाजूंनीं उद्योगाला लाग. आधीं राजकीय कीं सामाजिक हा प्रश्न ज्यांना कांहीं करावयास नको त्यांचा... माझ्या मनावर जो धडा बिंबला आहे तो हा कीं, आधीं तें, मग हें, आधीं अमुक सुधारा, आणखी मग तमुक सुधारा, असं म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सगळ्या शरीराला अशक्तता आली असतां एक हात लठ्ठ करून घ्या, मग बाकीच्या शरीराचं, असं म्हणण्यापैकीं, 'आधीं अमुक, मग तमुक' असें म्हणणाऱ्यांचं म्हणणं असतं. तर तसें कांहीं नाहीं." मी पृ. ३८७.

मोठ्या कुशलतेनें काढलें आहे असेंच आपणांस म्हणावें लागतें. त्याकाळीं गणपतरावासारख्या विकारशील मनुष्यावर नवीन विचारांचा परिणाम किती जोराचा झाला व त्यामुळें आपल्या समाज-स्थितीविषयीं व स्वतःच्या कुटुंबस्थितीविषयीं असे लोक किती उदासीन व असंतुष्ट झाले, याचें उत्तम चित्र पुढील दोन तीन उताऱ्यांत आपणांस पाहावयास सांपडेल.

## गणपतरावांची मनःस्थिति.

" गणपतरावांच्या मनांत नेहमीं समाजसुधारणेचे विचार चालत व त्या विचारांनीं त्यांचें डोकें केव्हां केव्हां अगदीं भणाणून जाई. या विचारांमुळें तो केव्हां केव्हां आकाशांत भराऱ्या मारी. जें चांगलें आहे तें लोकांनीं पटकन् कां घेऊं नये? आपल्याला जे विचार चांगले वाटतात ते लोकांना कां चांगले वाटूं नयेत? उदाहरणार्थ, पुनर्विवाहाची चाल. ही आपल्यांत मागें होती, चांगली आहे, ती पडल्यापासून पुष्कळ अनर्थ टळतील; असें असून ती कां प्रचारांत येऊं नये? तसाच बालविवाह कां बंद होऊं नये? तसेंच स्त्रीशिक्षण कां वाढूं नये? जातिभेद कां मोडला जाऊं नये? एक कीं दोन! सर्व गोष्टी एकदम व्हाव्या तशा होऊन आपला देश सुधारलेल्या देशासारखा सुखी व्हावा असें त्यास वाटे. 'हळू हळू' हें त्यास मुळींच आवडत नसे. कोणतीही गोष्ट एकदम झाली पाहिजे.... त्याला असें वाटे कीं, आपल्या बायकोनें एकदम आपल्या इतकें सुशिक्षित व्हावें. वास्तविक तिला शिक्षणाचा गंधही नव्हता. परंतु याला वाटे, तिनें आपण सांगूं तसा अभ्यास करून एकदम मोठी विदुषी व्हावें; पण तें कसें व्हावें? तसें होत नाहीं म्हणून हा केव्हां केव्हां फार असंतुष्ट असे........त्यानें प्लेटोच्या लोकसत्ताक राज्याप्रमाणें कल्पनेनें आपल्याला जशी हवी तशी सृष्टि बनविली होती. त्याच्या सृष्टीचें आद्यतत्त्व समता हें होय. तो असें म्हणे

कीं, जगांतील सर्व अनर्थ टाळावयाचे असल्यास आज जें जगांत असमतेचें तत्त्व नांदतें आहे त्याला पूर्ण फांटा दिला पाहिजे.... त्याचप्रमाणें त्यानें आपल्या मतें समाजव्यवस्थेंत अगदीं ठीक अशा सुधारणा करून ठेविल्या होत्या. त्याच्या जगांत स्त्री व पुरुष यांच्यांत भेद मुळींच नव्हता. किंबहुना हे शब्ददेखील नसावेत असें त्याचें मत.''*

## गणपतरावाचे विवाहाबद्दलचे विचार.

इंग्रजी ग्रंथांच्या वाचनानें गणपतरावाचे लग्नाबद्दलचे विचार असेच फार बदलले होते. या त्याच्या दृष्टीनें आपल्या समाजांत हल्लीं होणारीं लग्नें त्याला अगदीं त्याज्य व टाकाऊ वाटलीं तर आश्चर्य नाहीं. याबद्दलचीं आपलीं मतें त्यानें आपल्या मित्रास-नानास एक पत्र लिहिलें आहे त्यांत फार चांगल्या रीतीनें मांडिलीं आहेत. इंग्रजी शिक्षणाचा परिणाम त्या वेळच्या तरुण पिढीवर होऊन आपल्या चालीरीतींचें संशोधन नव्या दृष्टीनें करण्याची प्रवृत्ति त्यांच्यामध्यें कशी झाली हें त्यावरून चांगलें समजून येतें. गणपतराव नानास लिहितो, " लग्न म्हणजे आपल्या आयुष्यांत ज्या कित्येक गोष्टी घडून येतात त्यांच्यापैकीं अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे हें तूं जाणतोसच आहेस. ' सब्जेक्शन् ऑफ् वुइमेन् 'मध्यें लग्न म्हणजे काय, हें सांगितलें आहे तें लक्षांत आण. पाहा बरें, 'लग्न' या शब्दांत काय काय गोष्टी भरल्या आहेत ! वधूवरांचे मनांत परस्परांविषयीं प्रेम, मैत्री, आदर, एक कीं दोन ! जगांतील ज्या ज्या कांहीं उत्कृष्ट गोष्टी आहेत, त्या सर्वांचें सार म्हणजे विवाह होय. सर्व सुखाचें भाण्डार चांगल्या विवाहांत आहे. दोन प्राण्यांच्या आयुष्यक्रमाचा मेळ त्या यःकश्चित् पिवळ्या दोऱ्यानें व हळकुंडानें बांधला जातो, तो असा कीं, मरणावांचून त्यांची ताटातूट नाहीं; तेव्हां ही जी विवाहाची

---

* गणपतराव, प्र. ७ पा. ५७.

थोरवी आहे, त्या थोरवीच्या मानानेंच त्याविषयीं फार खोल विचार केला पाहिजे, असें सुशिक्षित मनुष्य कधींही म्हटल्यावांचून राहणार नाहीं. आपल्या मनाप्रमाणें आपल्या सर्व सुखदुःखांचा वांटा घेणारा प्राणी असावा, असें कोणास वाटणार नाहीं ?....नाना, तूंच पहा; तुझी आमची मैत्री आहे यामुळें आपणां दोघांस किती सुख होतें आहे बरें ? मग आपल्या जिवापेक्षांही ज्याच्यावर आपण जास्त प्रीति करितों, असा एक प्राणी नेहमीं आपल्या सन्निध आहे असें आपल्यास वाटत असलें, तर किती बरें आपल्यास सुख होणार आहे ? आपणांस आनंद होवो, दुःख होवो, त्याचा सारखा वांटा मोठ्या आनंदानें उचलणारी अशी आपली अर्धांगी आहे, अशी खात्री असल्यावर सुख म्हणजे काय हें विचारावयाला पाहिजे काय ? कोणताही विचार येवो व तो कसलाही असो; आपल्या अंतःकरणांतून त्या दुसऱ्या अंतःकरणांत गेला कीं पुरे, दुःख हलकें झालेंच. सुख मात्र त्या वांट्यानें अधिक होतें, असें ज्याच्याविषयीं आपल्या मनांत सतत वागत आहे असा प्राणी आपल्यास मिळाल्यावर आणखी काय पाहिजे ? सर्व जगानें जरी आपल्यावर हव्या त्या गोष्टींचें काहूर माजविलें, तरी आपली अर्धांगी आपणांस एका उत्तरानें काय, परंतु क्षणिक विचारानेंही दुखविणार नाहीं; आपणांकरितां आपलें सर्वस्व गेलें तरी जाऊं देईल, व आपणही तिच्याकरितां त्याच तऱ्हेनें वागूं. दिवस असो, रात्र असो, वियोगाचा विचार कधींही आपल्या मनांत येणार नाहीं; आपणांस सुख झालें असतां तिला त्या सुखाखेरीज कांहीं दिसणार नाहीं; त्याचप्रमाणें तिचें सुख पाहून आपल्यासही सुखाशिवाय कांहीं ध्यानांत येणार नाहीं; तिच्या दुःखानें आपण व आपल्या दुःखानें ती दुःखी होईल; इत्यादि गोष्टींची जेव्हां नवराबायकोच्या मनांत खात्री असेल तेव्हांच त्याला विवाह, आणि अशी ज्यांना एकमेकांविषयीं खात्री आहे त्यांनाच

नवराबायको म्हणावें....नाहीं तर घरोघर विवाह व घरोघर नवराबायको आहेत." "गुणांनीं, विद्येनें व ग्राहकशक्तीनें दोघेंही सारखींच; त्याचप्रमाणें एका गोष्टींत एक कुशल, तर दुसऱ्या गोष्टींत दुसरा; एका गोष्टींत याचें मत उपयोगी, तर दुसऱ्या गोष्टींत दुसऱ्याच्या मतावांचून व्हावयाचें नाहीं; अशा स्त्रीपुरुषांचा जर विवाह झाला, तर त्यांत किती सुख आहे हें मी सांगत नाहीं. कारण ज्याला या सुखाची कल्पना करतां येईल त्यांना हें सांगण्याची आवश्यकता नाहीं; व ज्यांना ती कल्पना करतां येणार नाहीं, त्यांना कितीही सांगितलें तरी तें मृगजलवत् भासणार आहे." असें मिल्नें विवाहाविषयीं म्हटलें आहे. पण काय रे! असा विवाह आमच्यामध्यें एक तरी आहे का?"*

याप्रमाणें विचार असून समाजाच्या सद्यःस्थितीबद्दल असंतुष्ट झालेले लोक त्या काळीं पुष्कळ होते. गणपतराव हा त्यांपैकीं एक नमुना आहे. नव्या विद्येचा विद्युद्दीप झळकल्याबरोबर, समाजाकडून स्त्रियांवर होत असलेला जुलूम दृष्टीस पडून, व त्यामुळें विवाहसंस्थेची होत असलेली थट्टा पाहून, गणपतरावासारख्या लोकांचें चित्त पिळवटून गेलें; आणि ही स्थिति सुधारण्यास त्यांस स्त्रीशिक्षण हा एकच उपाय दिसला. 'गणपतराव' या कादंबरींत १२ व्या प्रकरणांत असा एक प्रसंग फारच मजेनें वर्णिला आहे. स्त्रियांच्या हीन व परावलंबी स्थितीचा विचार करतां करतां, गणपतरावाचें मन फार उद्विग्न होतें; व सुधारकांच्या सद्हेतूचा विपर्यास करून त्यांच्या कार्यांत विघ्नें आणणाऱ्या लोकांचा विचार मनांत येतांच त्यास संताप येतो. त्याची चित्तवृत्ति, अशा परिस्थितींत आपण काय करावें या विचारानें किंकर्तव्यतामूढ होऊन जाते. तो आपल्याशींच मोठा सुस्कारा सोडून म्हणतो, "छे; ! आशा नको, सुशिक्षित

* गणपतराव, प्र. ९, पृ. ६९.

लोक जेव्हां 'होईल तसं होऊं द्या; आपण कांहीं करूं नये' असं म्हणून कोणीं सुधारणेची कांहीं युक्ति काढली तर त्याचा अज्ञ लोकांत उपहास करून व त्याला हाणून पाडून, निवळ खोटा लौकिक मिळविण्याची हांव धरूं लागले, तेव्हां आतां कसली आम्हांला आमच्या सुधारणेची आशा आली आहे ? कोणीकडे तरी जाऊं आम्हीं पांचजन्य वाजवीत झालं ! असंच तें ! देशाचं नष्टचर्यंच ओढवलें."........यानंतर पुनः बराच वेळ विचार करून तो पुढें स्वतःशीं म्हणतो, "आपण तरी कां करूं नये कांहीं ? लोकांना जर आपण हंसतों, तर आपण स्वस्थ कां बसावं ? येऊन जाऊन लोक निंदा करतील, उपहास करतील, आपल्या गोष्टी मोडून काढायला पाहतील, हरकत नाहीं. पण त्या सगळ्यांना पुरून उरण्याइतकी हिंमत आपण कां धरूं नये ? स्वस्थ कां बसावं ? आपल्या मनाला जें एवढं वाटतं आहे त्याचा उपयोग काय तर मग ? कांहींना कांहीं तरी केलं पाहिजे. शेण पडल्यावर माती घेऊनच उठणार. उगीच उठायचं नाहीं. किती जरी या प्रतिस्पर्ध्यांनीं हाडाचीं काडं केलीं तरी एवढं तेवढं तरी आपल्या हातून होईल ! त्याचा एक लक्षांश, पराधांश तरी परिणाम होईलना ? पुरे झाला. आणखी काय पाहिजे आपणांला ? पण करावं काय ? आणखी कोणत्या मार्गानें करावें ? यानंतर आपल्यास समाजाच्या उन्नतीसाठीं काय एकट्यानें करतां येईल याबद्दल त्याच्या मनाचा फारच गोंधळ झाला. इकडे तिकडे पाहतां सहज समोरच्या टेबलाकडे त्याची दृष्टि गेली; तेथें दोन पुस्तकें, एक मिल्चें 'सब्जेक्शन् ऑफ वुइमेन' व दुसरें स्पेन्सरचा 'शिक्षणावरचा निबंध,' हीं त्याच्या दृष्टीस पडलीं. त्याबरोबर त्याच्या मनांत एकदम एक विचार आला, व तो आपल्याशीं मोठ्यानें म्हणाला, "आपल्या हातून कांहीं झालें तर याच संबंधांत होईल. आणखी तें आपण करणारही." ही

कल्पना मनांत येतांच एक मोठा प्रश्न सुटल्यासारखें त्याला वाटलें. व त्याला फार आनंद झाला. 'जर आपल्या हातून कांहीं होईल तर स्त्रीपुरुषशिक्षणमार्गाची सुधारणा असें त्यास स्पष्ट दिसूं लागलें. ही शिक्षणाची गोष्ट पक्की मनांत धरून ती सुंदर तऱ्हेनें साध्य होईल ते ते उपाय आपणांस साध्य केले पाहिजेत. हा विचार मनांत येण्या-बरोबर त्याच्या चेहऱ्यावर आनंदाची टवटवी दिसूं लागली. तो एकदम वेड्यासारखा उठला, त्या शेल्फजवळ गेला; त्यानें तीं दोन्ही पुस्तकें काढलीं, व त्यांजकडे पाहूं लागला. त्यांपैकीं पहिलें हातांत घेऊन तो इंग्रजींत म्हणाला, " मिलसाहेब, आपण माझ्या मनाला जितकें उदात्तत्व दिलें, तितकें दुसरे कोणींही दिलें नाहीं. तर मी आजपासून स्त्रियांच्या उन्नत्यर्थ झटेन. अगदीं शपथपुरःसर झटेन."*

## स्त्रीशिक्षणाच्या व समाजसुधारणेच्या मार्गांतील अडचणी.

वर वर्णन केलेला–मिलचें पुस्तक हातांत धरून शपथ घेण्याचा–प्रसंग आज एकाद्यास जरा हंसूं येण्यासारखा वाटेल ही गोष्ट खरी. तथापि त्यावरून त्या वेळीं गणपतरावासारख्या मंडळीच्या मनांत सामाजिक सुधारणेविषयीं किती खरी कळकळ वसत होती व इंग्रजी विद्येचा त्यांच्या मनावर किती जोराचा परिणाम झाला होता हें स्पष्टपणें दिसून येणार आहे. 'मधल्या स्थिती'तील इंग्रजी शिकलेले अनंतराव, अगर महाशब्दे, यांच्याशीं गणपतरावाची तुलना करा, म्हणजे तेव्हांपासून गणपतरावाच्या काळापर्यंत अल्पावधींत किती प्रगति झाली आहे तें दिसून येईल. असो. याप्रमाणें इंग्रजी शिक्षणाचा 'मधल्या स्थिती' नंतरच्या पिढीवर किती चांगला परिणाम झाला, सामाजिक सुधारणेबद्दल कशी आस्था उत्पन्न झाली व गृहस्थिति सुधारण्यास स्त्रीशिक्षणाची सुशिक्षित विवाहित मंडळीस कशी आवश्यकता वाटूं लागली, आणि

* गणपतराव, प्र. १२, पृ. १००–२.

स्त्रीशिक्षणाच्या कल्पनेचा उदय कसा झाला, हें 'गणपतराव' या कादंबरींत दाखविल्यावर, त्याच्या पुढील पायरी, म्हणजे स्त्रीशिक्षणाची. कल्पना व्यवहारांत अमलांत आणतांना, अविभक्त कुटुंबपद्धति, नवराबायकोच्या मर्यादेच्या फाजील कल्पना, बालविवाह व परंपरागत अनेक रूढि यांमुळें स्त्रियांना शिक्षण देण्याच्या कामीं पुरुषांना किती अडचणी येतात हें दाखविण्यासाठीं, हें समाजाच्या मनावर ठसविण्यासाठीं "पण लक्षांत कोण घेतो?" या कादंबरीचा जन्म झाला. समाजस्थितीचें इतकें हुबेहुब चित्र आजपर्यंत कोणाही कादंबरीकाराच्या लेखणींतून उतरलें नसेल; व त्यांत मौज अशी आहे कीं, स्त्रीशिक्षणाच्या मार्गांतील या सर्व अडचणी एका स्त्रीनें स्वानुभवानें वर्णन केल्या आहेत असें दाखविल्यामुळें त्याचा परिणाम वाचकांच्या मनावर फारच तीव्रतेनें व जलद होतो. मुलीचें बाल्य कशा रीतीनें जातें, तिचा विवाह करून टाकण्याबद्दल तिच्या आईबापांस व आप्तांस किती आतुरता असते, विवाहापूर्वी मुलगी पाहाणें म्हणजे किती हास्यास्पद प्रकार होऊन बसला असून त्यावरून स्त्रियांबद्दल आमची कल्पना किती क्षुद्र आहे हें कसें दिसून येतें,* बालविवाहामुळें स्त्रीशिक्षणाच्या मार्गांत एकदम कसा मोठा खो येऊन बसतो; अविभक्त कुटुंबपद्धतीमुळें स्त्रियांवर घरकामाचा बोजा येऊन त्यांना आपल्या स्वतःच्या मानसिक उन्नतीकडे लक्ष द्यावयास अल्पही वेळ कसा मिळत नाहीं, नवरा वाईट निघाला तर बायकोच्या सर्व जन्माचें कसें मातेरें होतें, पति जिवंत असतांना स्त्रियांची स्थिति ठीक असली तरी तो मरतांच त्यांची कशी दैना व अवहेलना होते, या सर्व गोष्टींचें चित्र इतक्या अप्रतिम कौशल्यानें

* पाहायला येण्याच्या या चालीवर, 'पण लक्षांत कोण घेतो!' या कादंबरींत पृ. ८१ वर नायिकेनें जे उद्गार काढून स्त्रियांची व गुरांची तुलना या बाबतींत केली आहे ती खरी नाहीं, असें कोण म्हणेल!

काढण्यांत आलें आहे कीं, हें खरोखरीच्या अशा एका हतभाग्य स्त्रीचें आत्मचरित्र नसेल, ही गोष्ट कोणास सांगूनसुद्धां खरी वाटणार नाहीं. आणखी त्यांत खेद वाटण्यासारखी गोष्ट अशी कीं, रूढीचा व धर्मभोळेपणाचा आमच्या स्त्रियांच्या मनावर इतका दृढ परिणाम झाला आहे कीं, आपली स्थिति निकृष्ट झाली आहे, आपणांस पुरुषांकडून मान मिळत नाहीं, आपला जन्म केवळ प्रपंचाचा भार वाहण्यासाठींच नसून सुशिक्षण संपादन करून लोकहित करण्याचा पुरुषांइतकाच आपल्याला अधिकार आहे, या गोष्टी त्यांना सांगूनही खऱ्या वाटत नाहींत. पिंजऱ्यांतून सोडून देण्यासाठीं दार उघडें ठेवून पिंजरा हलविला, तरी आंतला पक्षी जसा पडण्याच्या भयानें आंतल्या दांडीसच घट्ट आंवळून धरतो, व तीच स्थिति त्याला बरी वाटते, तद्वत् आमच्या स्त्रियांची स्थिति झाली आहे. स्त्रियांना शिक्षण दिलें म्हणजे सर्व सुधारणा एकदम होईल, हें म्हणणें अगदीं सोपें आहे; पण तसें काम प्रत्यक्ष करणें किती अवघड आहे, त्याच्या मार्गांत रूढीच्या अज्ञानजन्य व शंकरमामंजी-सारख्या नीच लोकांकडून बुद्धिपुरस्सर येणाऱ्या अशा किती अडचणी आहेत व हें कार्य या सर्व अडचणींस टक्कर देऊनच आणि किती धिमेपणानें होणारें आहे, हें सर्व 'पण लक्षांत कोण घेतो?' या कादंबरींत हरिभाऊंनीं फार उत्कृष्टपणें दाखविलें आहे. किंबहुना 'गणपतरावा'सारख्या उतावळ्या लोकांना हा एक चांगला धडाच आहे. तसेंच सुधारकांच्या उतावळेपणानें समाजाचा गाडा भलत्या दिशेला जाऊन त्याचा चक्काचूर होईल अशी पुष्कळांना जी भीति वाटते, त्यांनाही या कादंबरीनें चांगलें उत्तर मिळणार आहे. कारण या कादंबरींत हरिभाऊंनीं स्पष्ट दाखविलें आहे कीं, समाजरूपी गाड्याचें चाक रूढीच्या फार खोल अशा चाकोरींत फिरत असून तें वर उचलून काढून दुसऱ्या मार्गाला लावण्याचें

काम थोड्याशा सुधारकांच्या दीर्घ प्रयत्नानें सुद्धां सहज व अल्पकाळांत होणारें नाहीं. ही गोष्ट हळुहळू व परिस्थिति बदलेल त्या मानानेंच होणारी आहे. असें आहे तरी त्याला सुधारकांचे अविश्रांत व दीर्घ प्रयत्नांची आवश्यकता आहेच. कारण त्यांच्या ओरडीमुळें या गोष्टीकडे समाजाचें लक्ष जाऊन दोष दूर करण्याची थोडीबहुत तरी बहुजनसमाजाला इच्छा होते. सर्व सुधारणा हळुहळू होत आहेतच, मग त्या आतांच लादून लोकांवर जुलूम कां? असा जो या मुद्दयावर आक्षेप येईल त्याला हरिभाऊंनीं 'गणपतराव' या कादंबरींत गणपतरावाच्या तोंडून चांगलें उत्तर दिलें आहे. तो म्हणतो, "हळुहळू सारं होतं आहे, मग तुम्ही काय करणार? होतं आहे तें होतंच आहे! त्यांत तुमची प्रतिष्ठा काय राहिली? तुम्ही काय करतां आहां तें सांगा. इंग्रजलोक आहेतच उरावर. त्यांचें वजनच जास्त तेव्हां ते तुम्हांला दडपणारच. मरायचं नसलं तर थोडीबहुत चळवळ केलीच पाहिजे! त्याप्रमाणें करतां आहां, यांत नवल तें काय? नाहीं केलंत तर नायनाट होईल. उद्यां तुम्ही म्हणाल, 'पहा, आम्ही आगगाडींत बसल्यावर महारापोरांचा देखील विटाळ मानीत नाहीं.' लेको, मानून करतां काय? तेव्हां या अशा गोष्टी कांहीं उपयोगाच्या नाहींत. तुम्ही स्वतः आपल्या इच्छेनं काय गोष्टी करतां आहां, त्या सांगा. तें पाणीच नाहीं. आणखी, तें पाणी नाहीं, सगळा नेभळेपणा भरला आहे, तेव्हां मग म्हणायचं आम्हांला हें नको आहे, आणखी तें नको आहे. लोकांवर असा जुलूम नको, आणखी तसा नको. छट्! या असल्या बोलण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं!"+ तेव्हां केवळ परिस्थितीचे दास बनून ती ढकलील तिकडे समाजानें यदृच्छया जाणें हें जिवंतपणाचें लक्षण नव्हे. असें न व्हावें. आपण परिस्थितीकडून वळविले जाण्यापेक्षां,

+ गणपतराव, प्र. १३, पृ. १०८.

आपण परिस्थितीला वळविलें पाहिजे, एतदर्थ सुधारकांची चळवळ चालू राहाणें अवश्य आहे. स्थळें लवकर मिळण्यास अडचण पडते म्हणून मुलींचीं लग्नें आपोआपच उशिरां होतात; तेव्हां त्या नुसत्या घरीं बसावयाच्या त्या शाळेंत अडकलेल्या बऱ्या, म्हणून त्यांना यदृच्छया शिक्षण मिळण्यापेक्षां, त्यांना शिक्षण देणें हें मुलांइतकेंच अवश्य आहे व सुशिक्षित स्त्रियांपासून समाजोन्नतीला व राष्ट्रोन्नतीला फार मोठी मदत होणार आहे, म्हणून त्याचें महत्त्व जाणून मुलींना शिक्षण देणें अधिक चांगलें नाहीं काय ? शिवाय असें झाल्यानें स्त्रियांच्या हल्लींच्या निकृष्ट व परावलंबी स्थितीची आपल्यास जाणीव आहे व त्यांच्या उन्नत्यर्थ आपण प्रयत्न करीत आहों असेंही दिसून येणार नाहीं काय ? सुधारकांच्या मार्गांतल्या या सर्व अडचणी, ज्या तात्त्विक विचार करितांना दिसून येत नाहींत, पण प्रत्यक्ष काम करूं लागल्यावर मात्र दिसतात त्या, 'पण लक्षांत कोण घेतो ?' या कादंबरींत फार चांगल्या रीतीनें समाजापुढें मांडिल्या आहेत. या कथानकांतील नायिकेनें स्त्रियांच्या स्थितीबद्दल शेवटीं जे उद्गार काढले आहेत, त्यांची सत्यता ते उद्गार वाचूनच पटणार आहे. ती म्हणते, "आज दादा म्हणत होता कीं, अशा दुःस्थितींत असणाऱ्या स्त्रियांना लिहितां वाचतां येऊन त्यांनीं स्वतः, किंवा लिहितां वाचतां येणाऱ्या दुसऱ्या स्त्रियांना सांगून, जर आपलीं समग्र चरित्रें लिहिलीं; तर त्यांची स्थिति सुधारण्याचा एक मार्ग होणार आहे नाहीं ? हा दादाचा केवढा भ्रम आहे ! आम्हां दीन गाईंची खरोखर काय स्थिति असते, आमच्यावर नेहमीं ज्या त्या बाबतींत किती जुलूम होत असतो, अज्ञान अतोनात माजल्यानें आमच्या आम्हीच आपलें किती नुकसान करून घेतों, आम्हांला आमचें मन गुंतविण्यास श्रेष्ठ श्रेष्ठ विषय नसल्यानें आमचीं मनें नेहमीं दागदागिने, लुगडींचोळ्या, निंदा, कुटाळक्या इत्यादिकांतच किती

गुरफटून गेलेलीं असतात, एक ज्ञान नसल्यानें आमच्या मनावर दुराग्रहाचें पटल केवढें जबर असतें, व तें निघण्याची कोण मारामार पडते; त्याचप्रमाणें धर्म ! धर्म !! नीति ! नीति !! म्हणून ओरडणाऱ्या लोकांपैकीं शेंकडा ८०–९० लोक केवळ आमचा चेंदा किती करीत असतात; या गोष्टी कुणाला दिसत नाहींत असें का आहे ? डोळे उघडून पाहील त्याला सर्व दिसेल. लक्षांत घेईल त्याच्या लक्षांत सारें येईल. पण डोळे कोण उघडतो, आणखी लक्षांत कोण घेतो ? "*

## राजकीय चळवळीची उत्पत्ति.

राष्ट्राच्या अवनत स्थितीची जाणीव झाल्यावर आपल्या उन्नतीच्या उपायांचा विचार करितांना, सुशिक्षितांपैकीं ज्यांचें सामाजिक बाबीं-कडे लक्ष वेधलें त्यांनीं काय केलें, हें याप्रमाणें 'गणपतराव' व 'पण लक्षांत कोण घेतो ?' या दोन कादंबऱ्यांत दर्शविल्यावर, ज्यांचें राजकीय बाबीकडे अधिक लक्ष वेधलें त्यांनीं काय केलें, हें 'मी' व 'यशवंतराव खरे' या दोन कादंबऱ्यांत दाखविलें आहे. या दोन्ही कादंबऱ्यांतील नायक अविवाहित दाखविण्यांत राजकीय कार्यासाठीं अविवाहितांचा अधिक उपयोग होईल असें दाखविण्याचा हरिभाऊंचा हेतु असावा कीं काय, अशी एक शंका येते; कारण विवाहित आणि अविवाहित यांच्या स्थितींत फार मोठा फरक आहे. विवाहित पुरुषावर ज्या जबाबदाऱ्या असतात त्या अविवाहित पुरुषावर नसल्यामुळें, व अविवाहितावर विवाहित पुरुषा-प्रमाणें कोणा व्यक्तींचें अगर व्यक्तीचें जीवित अवलंबून नसल्यामुळें अविवाहित पुरुषांचे विचार अधिक व्यापक आणि त्याचें कार्यक्षेत्र अधिक विस्तृत असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. विवाहितांस कोणतेंही कार्य अंगावर घेण्यापूर्वीं कितीतरी गोष्टींचा विचार करावा

* 'पण लक्षांत कोण घेतो ?' पृ. ३९६.

लागतो; त्याला त्याच्या अंगीकृत कार्यांत घरांतल्या बायकांची अनुकूलता असेल, तर त्याच्या हातून पुष्कळ कार्य होईल; पण हेंच त्यांना त्याच्या कार्याचें महत्त्व न कळलें, आणि त्यांची त्याला अनुकूलता नसली, तर त्याच्या मार्गांत पुष्कळ अडचणी येऊन त्याची सर्व उमेद खचून जाईल. पण अविवाहिताची गोष्ट तशी नाहीं. गाडीला जुंपलेल्या जोडीपैकीं एका घोड्याची जी स्थिति, ती संसारी मनुष्याची होते. त्या घोड्याला आपला वेग दुसऱ्या घोड्यास झेंपेल इतका ठेवावा लागतो; दुसरा घोडा मठ्ठ असेल, खोडकर असेल, तर हा घोडा कितीही चपळ व चलाख असून उपयोग नाहीं; उलट तो गुण त्याच्या स्वतःच्या त्रासाला मात्र कारणीभूत होतो. पण हाच घोडा एकटा गाडी ओढीत असेल तर, त्याचा वेग तोच गाडीचा वेग. ही उपमा इकडेही चांगल्या प्रकारें लागते. ही गोष्ट लक्षांत आणली म्हणजे प्रथम सामाजिक सुधारणेचीच चळवळ इतकी जोरांत कां सुरू झाली असावी, हें समजेल. कारण आपल्या स्थितीची जाणीव होऊन त्यासाठीं प्रयत्न करण्याची प्रेरणा प्रथम ज्या सुशिक्षितांस झाली ते सर्व बहुतेक विवाहित होते, व त्यांना आपल्या कार्यांत पहिली अडचण त्यांच्या घरांतील अशिक्षित स्त्रियांकडून आली. म्हणून स्त्रीशिक्षणाचा प्रसार होऊन समाजसुधारणा अशक्य आहे असें त्यांस साहजिकच वाटलें असावें. परंतु सामाजिक सुधारणेच्या जोडीनें, किंबहुना त्यापेक्षां अधिक जोरानें, राजकीय चळवळ चालावी असें म्हणणारा दुसरा पक्ष त्या वेळींही अस्तित्वांत होता. त्यांत दोन प्रकारचे लोक होते. पहिल्या प्रकारच्या लोकांचें म्हणणें असें होतें कीं, “ सामाजिक सुधारणा झाली पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे; ती होण्यासाठीं कसून प्रयत्न होणेंही अवश्य आहे; पण नुसतें स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, विधवाविवाह, आणि जातिभेदशैथिल्य या चतुःसूत्रीवरच

राष्ट्राचा अभ्युदय अवलंबून नसून, त्याला इतर प्रयत्नांचीही तितकीच आवश्यकता आहे. शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार करणें, लोकांना त्यांचे राजकीय हक्क समजावून देणें, राज्यकारभारांत हिंदी लोकमताचा प्रवेश होईल अशाबद्दल खटपट करणें, वगैरे गोष्टीही तितक्याच किंबहुना अधिक अवश्य आहेत. यामुळें आपल्या प्रयत्नांचा सर्व केन्द्र सामाजिक सुधारणांवरच न रोखतां आपल्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप दिलें पाहिजे." दुसऱ्या प्रकारचे लोक होते, त्यांना कसलीच समाजसुधारणा नको होती. ते असें म्हणत कीं, "आमचा समाज आज ज्या स्थितींत आहे ती स्थिति उत्तमच आहे, त्यांत कांहींच फरक करण्याची जरुरी नाहीं; उलट पाश्चात्य वळणावर समाजाच्या चालीरीती गेल्या तर आर्यसंस्कृतीचा नाश होऊन, स्वाभिमान नष्ट होऊन समाज अधोगतीला जाईल. म्हणून समाज-सुधारणेची आज आम्हांस आवश्यकता नसून राजकीय सुधारणेची मात्र खरी आवश्यकता आहे" बहुजनसमाजास अर्थात् हेंच मत पसंत पडलें; कारण जुन्या रूढीचा त्याग करून नवीन चालीरीती स्वीकारणें हें मनुष्यस्वभावास साधारणतः आवडत नाहीं. त्यांत इंग्रजी शिकलेल्या पहिल्या लोकांचे अत्याचार पाहून समाजसुधारणेबद्दल बहुजन-समाजाचीं मनें साहजिकच साशंक होऊन त्यामुळें सामाजिक सुधारणेस समाजाकडून कसून विरोध होऊं लागला. या अनेक कारणांमुळें समाजसुधारणेची आम्हांस मुळींच जरूर नाहीं, राजकीय सुधारणा पाहिजे, असें म्हणणाऱ्या लोकांकडे साहजिकरीत्या या बहुजनसमाजाचें नेतृत्व आलें; आणि कित्येक लोक तर असें नेतृत्व यावें म्हणून मुद्दाम अशीं मतें लोकसंग्रहाच्या नांवाखालीं प्रतिपादन करूं लागले. या दोन्ही प्रकारच्या लोकांच्या मतांची उत्क्रांति 'मी' व 'यशवंतराव खरे' या कादंबऱ्यांत दाखविली आहे.

## व्यापक दृष्टीची राजकीय चळवळ.

भावानंदाचा गुरु शिवरामपंत हा पहिल्या मताचा असून, यशवंतरावाचा गुरु श्रीधरपंत हा दुसऱ्या मताचा गृहस्थ आहे. सामाजिक सुधारणेचा हा जोर पहिल्या पिढीपुरताच राहिला; दुसऱ्या पिढीला इतका राहिला नाहीं; तो कां, हें या दोन कादंबऱ्यांत दाखविलें आहे. पुढील पिढींतील अविवाहित तरुण मंडळींस मागल्या पिढींतील गणपतराव, रघुनाथराव या विवाहित मंडळींप्रमाणें, स्त्री-शिक्षणाची जरुरी अर्थातच इतक्या तीव्रतेनें भासली नाहीं. पहिल्या पिढींतील विवाहित सुशिक्षितांस कौटुंबिक अडचणी आल्या, त्या पुढील पिढींतील अविवाहित तरुण मंडळींस तितक्या आल्या नाहींत, त्यामुळें त्यांची व्यापक दृष्टि राजकीय व इतर बाबींकडे वळली; व सामाजिक सुधारणेबद्दल पहिल्या पिढींतच जे दोन पक्ष झाले होते त्या पक्षांच्या लोकांनीं या तरुण मंडळींचा फायदा करून घेतला. 'मी'मधील शिवरामपंतांस समाजसुधारणा हवी होती; व त्यप्रमाणें मोठें मनोधैर्य दाखवून त्यांनीं स्वतःच्या मुलीस अविवाहित ठेवून व शिक्षण देऊन आपलीं मतें अमलांतही आणलीं. पण त्या प्रसंगीं ते इतर सुधारणांची आवश्यकता विसरले नव्हते, याबद्दल त्यांनीं आपलें मत भावानंदास सांगितलें, त्याचा उल्लेख मागें केलाच आहे. पण भावानंद एल्‌एल्. बी.झाल्यावर त्याला पुढील आयुष्यक्रमाबद्दल त्यांनीं जो उपदेश केला आहे, त्यांत त्यांनीं आपलें मत अधिक स्पष्टपणें उच्चारून दाखविलें आहे. ते भाऊला सांगतात, " एकाच दिशेनेंही प्रयत्न उपयोगी नाहींत. आधीं अमुक कीं आधीं तमुक हा प्रश्नच नाहीं. नुसता हातच लठ्ठ करावयाचा कीं पाय, हा प्रश्न किती चमत्कारिक आहे ! सशक्तता आणावयाची ती सर्वांगाला सारखी पाहिजे ना ? त्याचप्रमाणें आपल्या या देशाचें आहे. आधीं राजकीय कीं आधीं सामाजिक हा प्रश्न कां ? अरे, दोन्ही एकदम. जें ज्याला रेटेल,

तें त्यानें पुढें रेटावें. राजकीय बाबतींत लोकांच्या गरजा विशेष जबर आहेत, त्यांचा आधीं विचार केला पाहिजे. त्या राजकीय गरजा त्यांना फार चांगल्या भासतात, कारण त्यांचा पोटाशीं संबंध आहे. त्या त्या गरजांचा तुम्हीं विचार केला पाहिजे. त्याचप्रमाणें दुसऱ्याही पुष्कळ गरजा आहेत. त्या लोकांना जरी प्रत्यक्ष भासत नाहींत, किंबहुना जरी त्या गरजा नाहींतच असें त्यांना वाटतें आहे, तरी पण आपण त्यांकडे लक्ष पुरविलें पाहिजे. या गोष्टी ध्यानांत धरून काय करणें तें केलें पाहिजे."§ या उताऱ्यावरून असें स्पष्ट दिसून येईल कीं, केवळ सामाजिक सुधारणेपुरतीच आपली दृष्टि आकुंचित न करितां, व्यापक दृष्टीनें आपल्या परिस्थितीचा विचार करणारे कांहीं लोक, इंग्रजी शिक्षणानंतरच्या पहिल्या पिढींत उत्पन्न झाले; पण त्यांच्या हातून फक्त विचार करून कार्यदिशा आंखण्यापलीकडे कांहीं झालें नाहीं. त्यांचे विचार आचारांत आणण्यासाठीं त्यांना अविवाहित तरुण पिढींतील लोकांचीच मदत घ्यावी लागली. याप्रमाणें आपलें कार्यक्षेत्र व्यापक करण्याला या तरुण पिढीस अवसर सांपडला, याचें कारण ती मंडळी आधींच्या पिढींतल्या लोकांपेक्षां अधिक काळपर्यंत अविवाहित राहिल्यामुळें, त्यांना आधींच्या लोकांइतक्या कौटुंबिक अडचणी आल्या नाहींत; आणि त्यामुळें व्यापक कार्य आपण हातीं घेऊन, सामाजिक सुधारणेचें कार्य दुसऱ्यावर सोंपविणें त्यांस शक्य झालें. इतकेंच नव्हे, तर विवाह केल्यानें नुसत्या जबाबदाऱ्या अंगावर पडून आपलें कार्यक्षेत्र आकुंचित होईल असें भय वाटून मुळींच विवाह न करणें बरें, असें पुष्कळ तरुणांस वाटूं लागलें. त्यांपैकीं किती तरुणांच्या अंगांत असें करण्याची हिंमत होती व दिसली, हा भाग वेगळा; पण पुष्कळांच्या डोक्यांत असे विचार

§ "मी", प्र. ५८, पृ. ४८६.

येऊं लागले ही गोष्ट खरी. या तरुणांचें लक्ष देशाच्या स्थितीकडे व्यापकदृष्टया कसें वेधलें हें वर सांगितलेंच आहे; भावानंदाचें मत या बाबतींत विचार करण्यासारखें आहे. तो म्हणतो, "माझ्या मनाची पक्की खात्री झाली आहे कीं, आतां यापुढें ज्याला लोकहित साधावयाचें असेल, त्यानें सर्वसंगपरित्याग करून लोकांत ज्ञानाचा प्रसार केला पाहिजे. एकटया-दुकटयाच्या वतीनें एखाददुसरी सुधारणेची गोष्ट प्रत्यक्ष करून दाखवून तादृश उपयोग नाहीं. साधारण लोकांची स्थितीच श्रेष्ठावली पाहिजे. सामाजिक बाबतींतच, राजकीय बाबतींतच, किंवा उद्योगधंद्यांतच काय ती सुधारणा होईल ती करावयाची, असा कोणताही नियमित बाणा धरावयाचा नाहीं. जी ज्ञानाची शाखा कोणाला लाधली असेल, जें ज्याला सत्य दिसलें असेल, तें त्यानें निरपेक्षबुद्धीनें सगळयांना सांगून त्यांचीं मनें त्यांच्या अंगीकाराकडे प्रवृत्त करावीं हाच काय तो क्रियामार्ग. जेथें सरकारी अंमलदारांकडून जुलूम होत असेल तेथें जाऊन त्याचा निरास करावा. लोकांना आपले हक्क समजावून द्यावे. जेथें कोणच्या एकाद्या चालीरीतीमुळें लोकांना कष्ट होत असतील, तेथें ती मोडून टाकण्याविषयीं लोकांना उपदेश करावा. सारांश, ज्याला जें सुलभ तें त्यानें करावें आणि तें करण्याची शपथ वाहून माझ्या नव्या पंथांत यावें."+ भावानंदाची ही इतकी व्यापक कार्यदिशा—ज्यांत सामाजिक व राजकीय दोन्ही सुधारणांचा समावेश केला होता ती—सरकार व जनता या दोहोंसही अप्रिय होणार, या कार्यदिशेनें प्रयत्न करण्यास दृढनिश्चय व धैर्य फार मोठें पाहिजे, ही गोष्ट भावानंद जाणून नव्हता असें नाहीं; कारण आपल्या कार्याच्या दुर्घटतेबद्दल एकाजवळ त्यानें पुढील महत्त्वाचे उद्गार काढिले आहेत: "लोकांना आणखी सरकारालाही केवळ स्तुति करून

+ मी, प्र. ६७, पृ. ५२१.

घेण्याचीच चटक लागली आहे. जुन्या चाली, मग त्या बऱ्या असोत वाईट असोत, त्यांची स्तुति केली, कीं लोक खूष होतात. सरकारी अधिकाऱ्यांचीं कृत्यें बरीं असोत, वाईट असोत तीं वाखाणलीं, इंग्रजी राज्याचे दोष न दाखवितां नुसते पोवाडे गाइले, कीं सरकार खूष..........इंग्रजी शिक्षणापासून जे आम्ही स्वतंत्र विचाराचे धडे शिकलों, ते एकाच बाजूच्या उन्नतीकरितां नाहींत सरकार आम्हांला सांगणार, तुम्ही आपली सामाजिक उन्नति करण्याच्या नादीं लागा; राजकीय बाबींत तुम्हांस मुळींच मन घालावयास नको. लोक आम्हांला सांगणार, आमची सामाजिक स्थिति फार उत्तम आहे तींत अणुमात्र फरक नको आहे. सगळं बिघडलं आहे तें राजकीय परिस्थिति नीट नसल्यामुळें; तेव्हां तिकडे तुम्ही आपलं तनमनधन वाहा. तेव्हां अशा दोन्हीकडून चमत्कारिक स्थिति झालेल्या नव्या मंडळींचे नवे विचार लोकांच्या आणि सरकारच्या पुढें स्पष्टपणानें मांडायचें अवघड काम करायला हात घालण्याचा आमचा विचार आहे." * हीं एका पक्षाचीं मतें झालीं; पण सामाजिक सुधारणेची कांहींच आवश्यकता नाहीं, असें प्रतिपादून केवळ राजकीय सुधारणेची कांस धरणारा पक्ष अस्तित्वांत याच वेळीं आला. त्या पक्षाची उत्पत्ति व उत्क्रांति 'यशवंतराव खरे' या कादंबरींत चित्रित केली आहे; ती कशी याचें विवेचन वर आलेंच आहे, म्हणून त्याबद्दल पुनः आतां लिहिण्याचें कारण नाहीं.

## 'जग हें असें आहे.'

या दुसऱ्या समूहापैकीं 'जग हें असें आहे' या एका कादंबरीचा विचार करावयाचा राहिला; परंतु इतर नऊ कादंबऱ्यांतून जी सामाजिक स्थित्यंतरांची क्रमवार उत्क्रांति दाखविली आहे, त्या दृष्टीनें ही कादंबरी लिहिली गेली नसल्यामुळें

* "मी," प्र. ५९, पृ. ४५५.

तिच्याबद्दल येथें विशेष विचार करण्याची जरूर नाहीं. वृद्धपणीं लग्न करण्यानें घरांत सावत्रपणा माजून घरादाराची कशी नासाडी होते, श्रीमंतांच्या घरांतून सर्व व्यवहार कारकुनांच्या हातीं असल्यामुळें त्यांचें घरांत कसें प्राबल्य वाढतें, वगैरे गोष्टीच या कादंबरींत दाखविल्या आहेत; व प्रसंगानुरोधानें, साहेब अधिकाऱ्यांचें साधारणतः अरेरावीचें वर्तन कसें असतें हें बुलीस्नीक साहेबांच्या द्वारें दाखवून, साहेबांस अशा रीतीनें एतद्देशीयांशीं वागण्यास आपणच आपल्या खुशामतीनें कसें शिकवितों हें चिंतोपंत व बाबू-महाशय या पात्रांच्याद्वारें दाखविलें आहे. तथापि, युरोपिअन अधिकारी लोकांशीं सौजन्यानें व प्रेमानें वागले तर त्यांना किती चांगलें कार्य करतां येण्यासारखें आहे, हें फेअरब्रेनसाहेबाचें पात्र वर्णून दाखविलें आहे. असो. याप्रमाणें या दुसऱ्या समूहांतील कादंबऱ्यांचा विचार येथपर्यंत केला. समाजाचें हें जें दुसरें स्थित्यंतर झालें, तें आपल्या इतिहासांत विशेष महत्त्वाचें आहे यांत संशय नाहीं. कारण, आज जी आपली थोडी फार प्रगति, सामाजिक व राजकीय अशा दोन्ही बाबतींत झालेली दिसत आहे. तिचें सर्व श्रेय व त्याचा सर्व उगम, या मागल्या पिढींत जी दांडगी विचारक्रांति झाली तिलाच आहे. आपल्या पुढील कार्याची दिशा व स्वरूप कसें ठेविलें पाहिजे हें ठरवावयास, ही जागृति कशी झाली त्याची उपपत्ति आपणांस पाहिली पाहिजे. या जागृतीचा सांगोपांग इतिहास हरिभाऊंनीं, गणपतराव, पण लक्षांत कोण घेतो?, मी आणि यशवंतराव खरे, या चार कादंबऱ्यांत, किती कौशल्यानें आणि विस्तृत रीतीनें चित्रित केला आहे हें वर केलेल्या विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येईल. या चार कादंबऱ्यांच्या विवेचनानेंच प्रस्तुत निबंधाची बरीच जागा अडविली ही गोष्ट खरी आहे; तथापि विषयाच्या महत्त्वामुळें तसें होणें अपरिहार्य होतें.

## बदललेली परिस्थिति

आतां आपण तिसऱ्या समूहाकडे वळूं. यांत " भयंकर दिव्य " व " मायेचा बाजार " या दोन कादंबऱ्यांचा समावेश केला आहे. या दोन कादंबऱ्यांत जी समाजस्थिति वर्णिली आहे, ती उपरिनिर्दिष्ट सहा कादंबऱ्यांत वर्णन केलेल्या समाजस्थितीपेक्षां वेगळी आहे, हें या कादंबऱ्या अगदीं वरवर वाचणाऱ्याच्याही लक्षांत येईल. या काळीं समाजाची सामाजिक सुधारणेच्या बाबतींत अधिक प्रगति झालेली आहे. या पूर्वींच्या कादंबऱ्यांतील नायिका आरंभीं अशिक्षित असून त्यांना त्यांच्या पतींकडून मागाहून शिक्षण देण्यांत येत आहे असें दाखविलें आहे. " मी " मधील सुंदरीला मात्र तिच्या बापाकडून शिक्षण मिळतें; पण तिची सर्वच स्थिति अपवादात्मक असून तत्कालीन समाजांतही तिचें उदाहरण अपवादात्मकच मानलें जात होतें. कारण तिला बापानें अविवाहित ठेवून शाळेंत पाठविलें, याबद्दल शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं फार टीका व कुचाळ्या केल्या असें वर्णन आहे. परंतु ' भयंकर दिव्य ' व ' मायेचा बाजार ' या दोहोंतील नायिका ( कमला व पद्मा ) यांचें शिक्षण त्यांच्या लग्नापूर्वींच थोडेंफार झालें आहे. त्यांच्या आईबापांना आपल्या मुलींस प्रथम शिक्षण देऊन मग त्यांचें लग्न करावें अशी जाणीव उत्पन्न झालेली आहे. तसेंच, पूर्वीं ज्या गोष्टींचें नुसतें नांव काढतांच समाज बुजत असे, त्या गोष्टी आतां कांहीं कुटुंबांतून दृष्टीस पडल्या, तरी त्यांना विशेष महत्त्व न देण्याची प्रवृत्ति समाजांत उत्पन्न झालेली या पुढील दोन कादंबऱ्यांत दिसते. दिगंबरपंत किंवा सदूनाना यांच्यासारखे ढोंगी व कुचाळ लोक मुद्दाम जुन्याच्या अभिमानाचा आव आणून नवीन मतें आचरणांत आणणाऱ्यांची टवाळी व छळ करण्याचा प्रयत्न करीत ही गोष्ट खरी; पण बारीक दृष्टीनें पाहणारास त्यांच्यावर सुद्धां नवीन काळाचा परिणाम झाला आहे हें दिसून येतें; शिवाय असे

लोक केव्हांही आणि कोणच्याही समाजांत असणारच. परंतु सर्वसाधारण समाजांत नवीन मतांबद्दल एक प्रकारची सहिष्णुता उत्पन्न झाली आहे हें स्पष्ट दिसतें. ' भयंकर दिव्यां'त बळवंतराव पुनर्विवाहित आहे म्हणून त्याच्याशीं समाजानें आपलें दळणवळण अगदींच तोडून टाकलें आहे असें नाहीं, ' मायेच्या बाजारां'त आबासाहेब व दादासाहेब यांनीं आपल्या मुली, पद्मा व मालती या चौदापंधरा वर्षांपर्यंत अविवाहित ठेवून, पुढें लग्नानंतरही त्यांचें शिक्षण चालू ठेविलें आहे, यामुळें समाजांत कोठें खळबळ उडालेली दिसत नाहीं. त्याच कादंबरींतील मथुरातांईसारखी गरीब आणि तरुण गतभर्तृका वैधव्याचा घाला पडतांच मास्तरणीची नोकरी करून आपल्या लहान भावंडांचें पोट भरूं शकते, ही गोष्टही समाजाचें जुन्या मतांतून नव्या मतांत हळुहळू उत्क्रमण होत चाललें याचें निदर्शक आहे. मथुराताई मास्तरणीची नोकरी करण्याइतकी शिकलेली होती, यावरून स्त्रीशिक्षणाचा प्रसार शहरांतील गरीब कुटुंबापर्यंत सुद्धां थोडाफार झाला आहे असें दिसतें. तसेंच मालतीचा नवरा विलायतेस गेल्यावर तिचा सासरा, आपला मुलगा परत आल्यावर त्याची बायको त्याच्या आचाराविचारांस साजेशी व्हावी म्हणून तिचें शिक्षण पुढें सुरू ठेवितो व वसंतरावाचा बाप वसंतरावासाठीं मुलगी पसंत करितांना ती शिकलेली असेल अशाविषयीं दक्षता बाळगितो; यावरून सुखाचा संसार होण्यास बायका सुशिक्षित असतील तितक्या चांगल्या, ही कल्पना मध्यमस्थितींतल्या सुशिक्षित कुटुंबांत आतां उत्पन्न झाली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. याच्या आधींच्या समाजांत सुनेला लिहितां वाचतां येत असण्याची आवश्यकता फारच थोड्या सासूसासऱ्यांस वाटत होती. शिक्षणाच्या प्रसारानें नवीन पिढींत

**स्त्रियांबद्दल आदर**

उत्पन्न होऊन वैवाहिक पावित्र्याची कल्पना अधिक उच्च झाली,

म्हणून वर सांगितलेंच आहे; व ही वाढ हरिभाऊंनीं आपल्या कादंबऱ्यांत कशी दाखविली आहे हेंही आपण पाहिलें. या दोन कल्पनांची वाढ त्यानंतरच्या पिढींत आणखी अधिक झाली आहे हें 'मायेच्या बाजारां'तील भगवंतराव व वसंतराव या दोन पात्रांवरून दिसून येतें. डॉ० भगवंतराव हे आपली प्रथम पत्नी निवर्तल्यावर विधुरच राहिले, आणि वसंतराव तर—त्याचें पद्मेवर प्रेम असल्यामुळें—शेवटपर्यंत अविवाहितच राहिला. कृष्णाजीपंतदादांच्या सहाव्या लग्नाचे वेळीं लोकांनीं त्यांची जी टर उडविली त्यावरून बालावृद्धविवाहाला लोकमत प्रतिकूल होत चाललें होतें हें स्पष्ट दिसतें. पद्माकाराचें मन मध्यंतरीं कमलेबद्दल संशयग्रस्त झालें होतें तरी, त्याच्यापूर्वीं व पुढें संशयनिवृत्तीनंतर, तो तिला फार आदरानें वागवीत होता, असें दाखविलें आहे. कमलेला मागणी घालतांना त्यानें बळवंतरावास पत्र लिहिलें त्यांत त्यानें तिच्या श्रेष्ठतेबद्दल व स्वतः तिला अयोग्य असल्याबद्दल उद्गार काढले आहेत, तसले उद्गार जुन्या काळच्या पुरुषाकडून सहसा निघावयाचे नाहींत. द्वारकाताईबद्दल तिच्या घरच्या मंडळीकडून व स्नेह्यांकडून जो आदर दाखविण्यांत येतो, व मालती, पद्मा, मथुराताई यांना भगवंतराव, वसंतराव, गंगाधर या तरुण मंडळीकडूनच नव्हे तर वसंतरावाच्या वृद्ध वडिलांकडून सुद्धां जो आदर दाखविण्यांत येतो, त्यावरून हा स्त्रीजातीविषयींचा आदर हल्लींच्या सुशिक्षित समाजांत फक्त स्वतःच्या पत्नीपुरताच नसून, बहीण आई वगैरे सर्व स्त्रियांबद्दल सारखाच उत्पन्न झाला आहे असें दिसतें.

## स्त्रीपुरुषांचा मिश्रसमाज.

समाजाच्या या तिसऱ्या स्थित्यंतरांत तिसरी एक गोष्ट आपल्या दृष्टीस पडते ती स्त्रीपुरुषांच्या मिश्रसमाजाची. अद्यापि हें संमिश्रण मोठ्या प्रमाणावर होत नाहीं ही गोष्ट खरी; व तशी स्थितिही

आपलेकडे अजून आली नाहीं. अगदीं प्रथम, स्त्रियांनीं माजघरच्या बाहेर दिसणें म्हणजे पाप अशी कल्पना होती, मग पतीच्या स्नेह्यांशीं बोलणेंचालणें कुठलें? * पुढल्या काळांत ही कल्पना नष्ट व्हावयास लागून ज्या कुटुंबांत चांगला स्नेह आहे अशा कुटुंबांतील स्त्रीपुरुषांत संमिश्रण व्हावें असें शिकलेल्या लोकांस वाटूं लागलें; या दृष्टीनें प्रथम प्रयत्न कसे करण्यांत आले याचें चित्र आपणांस "पण लक्षांत कोण घेतो?" यांत पाहावयास सांपडतें. त्यानंतर समाजाचें तिसरें स्थित्यंतर 'भयंकर दिव्य' व 'मायेचा बाजार' या दोन कादंबऱ्यांत दाखविलें आहे. त्यांत हें संमिश्रण कांहीं सुशिक्षित कुटुंबांतून चांगलें प्रचारांत आलें आहे, असें दृष्टीस पडतें. इतकेंच नव्हे, तर हें मिश्रण दोन स्नेही कुटुंबांतील वयस्क स्त्रीपुरुषांपुरतेंच नसून तरुण मुलांमुलींनासुद्धां ही मोकळीक देण्यापर्यंत कुटुंबांतील वडील मंडळींचीं मतें तयार झालीं आहेत असें दिसतें. प्रभाकर व पद्माकर यांचें बळवंतरावांच्या घरीं चांगलें येणेंजाणें असून प्रभाकर व कमला यांचा खरा स्नेह जडलेला आहे. 'मायेच्या बाजारां'त सुद्धां, पद्मा नुसत्या वसंतरावाशींच मोकळेपणानें बोलते चालते असें नसून वसंतरावाच्या स्नेह्यांत सुद्धां मिसळण्यास तिला आणि मालतीला संकोच वाटत नाहीं; व अशा प्रकारानें एकमेकांत मिसळण्याला घरांतल्या वडील मंडळीकडूनही हरकत आलेली नाहीं. तरुण स्त्री-पुरुषांस एकमेकांत मिसळण्याचे असे प्रसंग आले म्हणजे प्रीतिविवाहांत त्याचें पर्यवसान होण्याचा, किंवा परस्परांबदल प्रेम उत्पन्न होण्याचा संभव आहे, हें पद्माकर-कमलेच्या विवाहावरून व वसंतरावाचें पद्मेवर अकृत्रिम व दृढ प्रेम होतें असें दाखवून हरिभाऊंनीं सूचित केलें आहे. अशा प्रकारची परिस्थिति जसजशी अधिक प्रचारांत येईल तसतसे मुलांमुलींचे विवाह ठरविण्याचें काम आज जें सर्वस्वीं

* 'पण लक्षांत कोण घेतो?' प्र. ५५ पृ. २६५ पहा.

आईबापांच्याकडे आहे, तें जाऊन विवाहेच्छु व्यक्ति आपल्या स्वतःवर घेणार व अशा गोष्टींस आपण तयार झालें पाहिजे, हें आपोआपच निष्पन्न होतें, हेंही हरिभाऊंनीं सुचविलें आहे.

## वडीलधाकट्यांमधील परस्पर संबंध.

या काळीं चौथी एक गोष्ट दिसून येते ती, कुटुंबांतील वडील व धाकट्या मंडळींच्या परस्परसंबंधांत झालेला फरक. जुन्या पद्धतीच्या कुटुंबांतून वडिलांचा मान ठेवण्याच्या व मर्यादेच्या ज्या कल्पना आढळतात, त्या नवीन शिक्षणानें आणि समतेच्या तत्त्वाच्या प्रसारानें बऱ्याच बदललेल्या दिसतात. जुन्या कुटुंबपद्धतींत घरांतील वडील मनुष्य करील तीच पूर्व दिशा; घरांतील लहान मुलांमुलींच्या लग्नाचा प्रश्न सुद्धां त्यानें आपल्या मर्जीप्रमाणें, त्यांत संबंध येणाऱ्या व्यक्तींच्या इच्छेचा किंवा अनिच्छेचा विचार न करतां, सोडवावा; वडिलांच्या मताविरुद्ध लहान मंडळींनीं आपलें खरें मत केव्हांही सांगणें योग्य नाहीं; अशी स्थिति असे. पण उत्तरोत्तर ही स्थिति बदलून हा संबंध अधिक समतेचा व निव्वळ आज्ञाधारकतेच्या ऐवजीं प्रेमळ स्नेह्याच्या उपदेशाचा राहणार हें हरिभाऊंनीं आपल्या या दोन कादंबऱ्यांत दर्शविलें आहे; आणि ज्या ठिकाणीं आईबाप आपल्या मुलांस इतकें योग्य स्वातंत्र्य देण्यास तयार होणार नाहींत, त्या ठिकाणीं जुन्या व नव्या पिढींत कसा जोराचा खटका उडेल, हें 'भयंकर दिव्यां'त दादासाहेब व पद्माकर या पात्रांवरून दाखविलें आहे. 'मायेच्या बाजारां'त वसंतरावास लग्न करण्याबद्दल त्याचे वडील फार आग्रह करितात; त्याचा अविवाहित राहण्याचा दृढ निश्चय पाहून त्यांस फार वाईट वाटतें; पण आपल्या मुलावर जबरी करण्याचा विचार जुन्या पद्धतीच्या बापाप्रमाणें त्यांच्या मनांत येंत नाहीं. 'लग्न न करण्याचा निश्चय तरी तूं कां केला आहेस, तें तरी सांग' असें ते वसंतरावास आग्रहानें विचारतात; पण तेंही वसंतराव

सांगत नाहीं, असें पाहून त्यांस अधिकच वाईट वाटतें. तें कां? आपला मुलगा आपली आज्ञा–आज्ञा नव्हेच, इच्छा–पाळीत नाहीं म्हणून नव्हे, तर आपले खरे हेतु सांगून मोकळेपणानें आपल्याशीं वागण्याइतका मुलाचा आपल्यावर विश्वास नाहीं, असें वाटून ते त्याला मोठ्या काकुळतीनें म्हणतात, "इकडे बघ, तूं स्पष्ट काय तें बोलायला मुळीं सुद्धां संकोचूं नकोस. जें काय तुझ्या मनांत असेल तें स्पष्टपणें मला सांग. मला त्याबद्दल कांहींसुद्धां वाटायचें नाहीं. मी तुझा एक वृद्ध स्नेही आहें, तुझ्यापेक्षां मला जास्त अनुभव आहे, आणखी विचारही आहे असें मनांत समज; जुन्या चालीप्रमाणें वडिलांबद्दल भीति बाळगायची, तशी बाळगूं नकोस*"........"चार लोक जी गोष्ट करितात, आणखी जी गोष्ट तुम्हीं करावी असें आम्हांला वाटतें, ती करायची नाहीं असा निश्चय करायला तुम्हांला कारण काय हें आम्हांला नको कां समजावयाला? जगांत जर कोणी तुमच्या पूर्ण विश्वासाला पात्र अशा व्यक्ति असतील, तर त्या आम्ही दोघं, मी आणखी तुझी आई. पण त्या आम्हांला तुम्ही कांहीं सांगत नाहीं तेव्हां काय म्हणावं?" + वसंतराव एकाद्या महत्कार्यासाठीं अविवाहित राहात असावा असें त्याच्या वडिलांस वाटलें, म्हणून तसें कांहीं आहे का? व तसें असल्यास तें महत्कार्य कोणतें? असेंही त्यांनीं त्याला विचारलें. पण "तें काय तेंही आतांच मला सांगतां येत नाहीं." असें वसंतरावानें उत्तर दिलें. यावर दादासाहेब त्याला पुनः म्हणतात, "तें आतांच तुला आम्हांला सांगतां येत नाहीं; पण जेव्हां तूं तें आपल्या अंगावर घेशील तेव्हां आधीं आम्हांला सांगून आमचा विचार तर घेशीलना?" दादासाहेबांनीं यापुढें वसंतरावास लग्नाचा पुनः आग्रह केला नाहीं.

* मायेचा बाजार, प्र. १७, पृ. १०२.

+ हें दादासाहेबांचें सर्वच भाषण वाचण्यासारखें आहे. पृ. १०४

'भयंकर दिव्यां'तही बळवंतराव व त्यांचीं अपत्यें कमला व गोपाळ यांमध्यें असाच प्रेमळपणाचा व मोकळेपणाचा संबंध आहे. तेच पद्माकराचे जुन्या मताचे वडील दादासाहेब, किंवा 'पण लक्षांत कोण घेतो' मधील यमुनेचे वडील आणि तिच्या सासरचीं वडील माणसें, यांचें आपल्या अपत्यांशीं किंवा धाकट्या मंडळींशीं असलेलें वर्तन पाहिलें, म्हणजे पुढल्या पिढींत किती फरक झाला हें दिसून येतें. आतां यावर एक आक्षेप असा येतो कीं, पहिल्या पिढीच्या मंडळींत आपल्या वडील माणसांबद्दल व त्यांच्या मतांबद्दल जो आदर दिसून येत असे, तो या पुढल्या पिढींतील लोकांतून गेला असून, त्याच्याऐवजीं वडिलांची अवज्ञा करण्याची प्रवृत्ति अलीकडील तरुणांत दिसून येते; आणि कित्येक बाबतींत वडील मंडळींशीं आपला मतभेद झाला असतां, त्यांच्या अनुभवाकडे व वयाकडे लक्ष देऊन तो तरुण मंडळींनीं जितक्या सौम्यपणें व आदरपूर्वक दाखवावयास पाहिजे तसा न दाखवितां, वडील माणसें चुकत असून आम्हीच कायते शहाणे, अशा घमेंडीनें ते आपला मतभेद व्यक्त करितात. हा आक्षेप कांहीं अंशीं खरा आहे, ही गोष्ट नाकबूल करितां येणार नाहीं; पण याला उत्तर एवढेंच आहे कीं, आजपर्यंत न मिळालेलें विचारस्वातंत्र्य एकदम मिळालें म्हणजे आरंभीं कित्येक ठिकाणीं त्याचा दुरुपयोग झाला तर त्यांत आश्चर्य नाहीं. हा दोष चांगल्या व प्रेमळ गृहशिक्षणानें दूर होण्यासारखा आहे. येथें दाखवावयाचें तें एवढेंच कीं, समाजाच्या या तिसऱ्या स्थित्यंतरांत कुटुंबांतील शिस्तीच्या जुन्या कल्पना बदलल्या, व क्वचित् वडील मंडळींच्या इच्छेविरुद्ध जाऊन आपल्या मतांप्रमाणें उघडपणें आचरण करण्याची धमक अगर जोर नव्या पिढींत आला. पद्माकर व वसंतराव या दोन पात्रांवरून हरिभाऊंनीं हें दर्शविलें आहे.

## बहुजनसमाजाची सुधारणेबद्दल सहिष्णुता.

वर केलेल्या विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलें असेलच कीं, पहिल्या दोन समूहांतील कादंबऱ्यांतून ज्या समाजाचें चित्र हरिभाऊंनीं रेखाटलें आहे, त्यापेक्षां या दोन कादंबऱ्यांत चित्रित केलेला समाज अधिक पुढें गेलेला आहे. स्त्रीशिक्षणाची वाढ झाली असून मुलांमुलींच्या लग्नाचें वय पूर्वींपेक्षां वाढलेलें आहे; सामाजिक सुधारणेविरुद्ध बहुजनसमाजाचा प्रतिकारही पूर्वींइतका जोराचा राहिलेला नाहीं. तरुण पिढींत अधिक मानसिक धैर्य उत्पन्न झालें असून, वैवाहिक पावित्र्याच्या व एकनिष्ठतेच्या कल्पना अधिक दृढ झाल्या आहेत; मागल्या पिढीसही आपल्या मुलांच्या मतांबद्दल व आकांक्षांबद्दल आदर व सहानुभूति वाटूं लागली असून त्यांना मतस्वातंत्र्य देण्याची बुद्धि होऊं लागली आहे, आणि एकंदर स्थिति आशाजनक होत चाललेली आहे. तथापि कोणत्याही काळांत आणि कोठल्याही समाजांत जेव्हां एकादी नवीन विचारक्रांति होते व नवीन ध्येयें अस्तित्वांत येतात, तेव्हां ही सुधारणा प्रथम कांहीं थोड्या सुशिक्षितांपुरतीच मर्यादित असून बहुजनसमाज आरंभीं या सुधारणांविषयीं साशंक असून त्यांना विरुद्ध असतो. पुढें या जोराच्या विरोधाचें टवाळींत रूपांतर होतें; नंतर परिस्थिति बदलत जाईल तसें त्या टवाळीच्या जागीं सहिष्णुता किंवा ताटस्थ्य येतें; आणि शेवटीं या प्रगतीच्या ओघांत तो बहुजनसमाज सांपडून, त्या सुधारणेचा न कळत त्याच्याकडून स्वीकार होतो. या सर्व क्रिया हरिभाऊंनीं आपल्या या दोन कादंबऱ्यांत दाखविल्या आहेत. सदूभाऊ, दिगंबरपंत, कृष्णाजीपंतदादा, रावसाहेब गिरिधरपंत, इत्यादि पात्रें, या अशा बहुजनसमाजांतील नमुने असून, दिगंबरपंत आणि 'कर्मयोगा'तील भाऊसाहेब वगैरे मंडळी जरी बाह्यतः धर्माभिमानाचें ढोंग आणून नव्या मतांची टवाळी करितात, तरी त्यांच्या चरित्राचें

सूक्ष्म अवलोकन करणारांस त्यांच्यावर या नव्या गोष्टींचा परिणाम झाला असून त्यांचें बाह्य वर्तन केवळ लोकप्रियता मिळविण्यासाठींच आहे असें दिसून आल्याखेरीज राहणार नाहीं.

## नव्या परिस्थितींत येणारे नवे प्रश्न.

बदलत चाललेल्या नव्या परिस्थितींत समाजापुढें नवे प्रश्न कोणते हेंही हरिभाऊंनीं सुचविलें आहे. उदाहणार्थ, पूर्वींपेक्षां जीवनार्थ-कलह अधिक बिकट होत चालला आहे, हें पद्माकरास मुंबईस ५०।६० रुपयांची नोकरी मिळण्यास कसा त्रास पडतो हें दाखवून सूचित केलें आहे. या प्रसंगींचे उद्गार ( भयंकर दिव्य, प्र. ३२ ) वाचण्यासारखे आहेत. या जीवनार्थकलहांत स्त्रियांनाही भाग घ्यावा लागणार; व तसें झालें म्हणजे त्यांना कोणत्या अडचणींना तोंड द्यावें लागणार हें 'मायेच्या बाजारां'तील मथुराबाईच्या पात्रावरून दर्शित केलें आहे. तसेंच हिंदुधर्मानें व विशेषतः रूढीनें, स्त्रियांना समाजांत व कुटुंबांत आज जो दर्जा प्राप्त झाला आहे, तो जाऊन त्या वरच्या व पुरुषांच्या बरोबरीच्या स्थितीला येण्यास केवळ स्त्रीशिक्षण व प्रौढविवाह अमलांत आणून भागणार नाहीं, हें कमला व पद्मा या दोन पात्रांवरून दाखविलें आहे. स्त्रीपुरुषांचा समान दर्जा होण्यास काय उपाय योजला पाहिजे हें स्पष्टपणें हरिभाऊंनीं कोठेंच सांगितलें नाहीं हें खरें; कारण कदाचित् तो उपाय त्यांनाही सांपडला नसेल; अगर सांपडला असून, तो समाजास हल्लींच्या स्थितींत रुचणार नाहीं म्हणून, त्यांनीं तो सांगितला नसेल. परंतु स्त्रियांचें नष्टचर्य त्यांना केवळ शिक्षण दिल्यानें, व त्यांचीं प्रौढ वयांत लग्नें केल्यानेंच संपणार नाहीं, तर तसें होण्यास स्त्री ही जात्याच पुरुषापेक्षां कनिष्ठ असून तिच्या हितसंबंधांची (interests) वाढ पुरुषांच्या interests ला अनुलक्षूनच असली पाहिजे, ही जी एक कल्पना समाजांत अनेक वर्षांच्या रूढीनें दृढ होऊन बसली आहे, तीच

आमूलाग्र बदलली पाहिजे हें मात्र, कमला व पद्मा या दोन पात्रांवरून, हरिभाऊंनीं उत्कृष्ट रीतीनें वाचकांच्या मनावर ठसविलें आहे.ऽ

## चौथा समूह.

आतां आपण हरिभाऊंच्या कादंबऱ्यांच्या चौथ्या समूहाकडे वळलों आहों. यामध्यें त्यांच्या शेवटच्या 'आजच' व 'कर्मयोग' या दोन कादंबऱ्यांचा आपण समावेश केला आहे. या दोन्ही कादंबऱ्यांचा दुसऱ्या समूहांतील 'यशवंतराव खरे,' 'गणपतराव' व 'मी' या कादंबऱ्यांशीं निकट संबंध आहे; किंबहुना वरील तीन कादंबऱ्यांचा हा उत्तरार्धच आहे असें म्हटलें तरी हरकत नाहीं. दुसऱ्या समूहांतील कादंबऱ्यांत, सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणा या दोहोंचेंही बीं सुशिक्षितांकडून प्रथम पेरलें गेलें एवढेंच दाखविलें आहे. यांपैकीं सामाजिक सुधारणेचा प्रसार समाजांत परिस्थितीमुळें न कळत कसा झाला, हें तिसऱ्या समूहांतील 'भयंकर दिव्य' व 'मायेचा बाजार' या कादंबऱ्यांत समाजाची सुधारणेबद्दलची तटस्थ वृत्ति दाखवून वर्णिलें आहे आणि आतां या चौथ्या समूहांतील दोन कादंबऱ्यांत, राजकीय सुधारणेबद्दलच्या भिन्न मतांची उत्क्रांति कशी झाली हें दाखविलें आहे. त्यामुळें या दोन कादंबऱ्या फार मनोवेधक, आणि हल्लींच्या काळच्या तरुण विचारी मंडळींस फार उपयुक्त झाल्या आहेत. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, या दोन्ही कादंबऱ्या ऐन रंगाच्या वेळींच अपुऱ्या राहिल्या असून, 'कालोह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी' असतांही, आणि पुढें हरिभाऊंच्याशीं 'समानधर्मा' असा प्रतिभाशाली कादंबरीकार उत्पन्न झाला तरी, त्या चिरकाल तशाच अपुऱ्या राहणार. तथापि या कादंबऱ्यांचा आज जितका भाग लिहून झाला आहे त्यावरून, राजकीय सुधारणेची

ऽ मासिक मनोरंजनाच्या एप्रिल १९१९ च्या अंकांत प्रसिद्ध झालेला "हरिभाऊंशीं दोन घटका" हा रा. रेंदाळकरांचा लेख पाहा.

कोणती दिशा हरिभाऊंनीं निश्चित करून समाजापुढें मांडली असती, हें समजणें अवघड नाहीं.

## ‘ आजच.’

‘ आजच ’ या कादंबरीचीं अवघीं ३७ प्रकरणें लिहून झालीं असून यांतील बहुतेक पात्रें वाचकांच्या पूर्वपरिचयाचीं आहेत. ‘ भयंकर दिव्यां’तील पद्माकर व कमला आतां सुखानें संसार करीत असून, पद्माकर आपण आयुष्यांत काय करावें या विचारांत आहे. प्रभाकर व गोपाळ उभयतां, एक उद्योगधंदा शिकण्यासाठीं व दुसरा सिव्हिलसर्विससाठीं, विलायतेस गेले आहेत. गणपतराव हा मोठा समाजसुधारक झाला असून त्याच्या पक्षाचें त्याच्याकडे धुरीणत्व आलें आहे. यशवंतराव हाही आपल्या निवळ राजकीय सुधारणावादी पक्षाचा पुढारी झाला असून तरुण मंडळींत त्याला बरेच अनुयायी मिळाले आहेत. “ यशवंतराव खरे ” यामधील कृष्णाबापू आतां कृष्णराव होऊन यशवंतरावाच्या प्रभावळींतला एक मणी होऊन बसला असून औद्योगिक चळवळींत मोठ्या उत्साहानें पडलेला दाखविला आहे. ही सर्व मंडळी जुनीच असून कथानुरोधानें नारायणराव, अद्वैतानंद स्वामी, वगैरे नवीन पात्रें आलीं आहेत. ‘मी’ मधील भावानंदाच्या मठाची स्थिति अधिक कार्यक्षम झाली असल्याबद्दलही ‘ आजच ’ मध्यें वर्णन आलें आहे. या कादंबरीचा जो भाग लिहून प्रसिद्ध झाला आहे, त्यांत कथानकाची परिणति ( development of action ) फारशी झालेली दिसत नाहीं. भिन्न मतांच्या लोकांचे परस्परांशीं वाद, व अशा एकांगी मतांचें काय पर्यवसान होण्याचा संभव आहे, याचें एकदोन ठिकाणीं अल्प दिग्दर्शन इतकेंच काय तें या सदतीस प्रकरणांत आलें असून, कथानकाच्या action ला नुसता आरंभ झाला आहे. कित्येक पात्रें तर एकदांच वाचकापुढें येऊन गेलीं असून कित्येक तर अद्यापि

यावयाचीं आहेत. अशीच स्थिति "कर्मयोगा"चीही आहे. अशा परिस्थितींत, या दोन्ही कादंबऱ्यांवरून कोणतेंही निश्चित अनुमान काढणें जरा धोक्याचें आहे ही गोष्ट खरी. तथापि, आतांपर्यंतच्या कादंबऱ्यांतून ग्रंथकाराचीं जीं मतें दृष्टीस पडलीं आहेत, व या अपूर्ण कादंबऱ्यांतही ठिकठिकाणीं, वादविवादाच्या ओघानें, जे विचार हरिभाऊंनीं विशेष प्रामुख्यानें प्रगट केले आहेत, त्यांवरून देशोन्नतीचा कोणता मार्ग त्यांनीं निश्चित केला असावा याचें थोडेंसें तरी अनुमान करण्यास हरकत नाहीं.

## व्यापक दृष्टीचा नवा पक्ष.

आपल्या देशाची स्थिति कशी सुधारेल याबद्दल प्रत्येकानें आपला वेगळा मार्ग सुचविल्यामुळें कांहीं वर्षांपूर्वीं " नानामतांचा गलबला " होऊन, पुढाऱ्यांमध्यें फार तीव्र मतभेद झाले होते, ही गोष्ट सर्वांस ठाऊक आहेच. परंतु सुदैवानें हल्लीं ती स्थिति पालटली असून बऱ्याच गोष्टींत भिन्न मतांच्या पुढाऱ्यांचें व समाजाचें मतैक्य झालें आहे. ही स्थिति येण्यास मुख्यतः एक गोष्ट कारणीभूत झाली, ती ही कीं, देशाची अवनति सर्व बाजूंनीं झाली असल्यामुळें ती स्थिति सुधारण्यास प्रयत्नही सर्व बाजूंनीं सारखा झाला पाहिजे, या गोष्टीची सर्वांच्या मनांत जाणीव झाली. राजकीय परावलंबित्व पदोपदीं तीव्रतेनें भासूं लागल्यामुळें, निवळ समाजसुधारणेच्या मागें लागून उपयोग नाहीं, असें समाजसुधारकांस दिसून आलें; व समाजसुधारणेच्या तत्त्वांची हेटाळणी व विरोध केल्यानें राजकीय सुधारणेच्या मार्गांत अडचणी येतात हें अनुभवास आल्यानें, निवळ राजकीय सुधारणावाद्यांचा समाजसुधारणेशीं विरोध कमी झाला. जातिभेदाच्या कडक बंधनांचें मंडन आमच्या राजकीय पुढाऱ्यांपैकीं कांहींनीं एकसारखें केल्यानें कनिष्ठ वर्गांचा आपल्यावरील विश्वास उडून जाऊन आज ते आपल्या देशाच्या उन्नतीच्या मार्गांत कसा खो

घालीत आहेत हें लक्षांत आणलें असतां या विधानाची सत्यता दिसून येईल. या गेल्या वीस वर्षांतलीं हीं दोन्हीं स्थित्यंतरें 'आजच' व 'कर्मयोग' या कादंबऱ्यांत हरिभाऊंनीं दाखविलीं आहेत. प्रत्येकजण आपापल्या मताप्रमाणें सुधारणा करण्यास झटूं लागल्यामुळें सर्व प्रयत्न एकदेशी होऊन भिन्न मतांचा एकच गोंधळ कसा उडाला, याचें चित्र 'आजच' या कादंबरींत दृष्टीस पडतें; आणि या सर्व मतांचें एकीकरण होऊन अधिक व्यापक, समतोल व कार्यक्षम असा पक्ष लवकरच अस्तित्वांत येणार अशीं जीं चिन्हें आज दिसत आहेत; त्यांची उत्पत्ति 'कर्मयोगां'त पाहावयास सांपडते. 'कर्मयोगा'चा नायक चंद्रशेखर हा या नव्या आगामी पक्षाचा Type आहे. तो जितका समाजसुधारणावादी आहे, तितकाच राजकीय सुधारणावादी आहे; त्याची दृष्टि फार व्यापक असून त्यानें आपले देशोन्नतीचे प्रयत्न सर्व बाजूंनीं चालविले आहेत; परंतु हा पक्ष चंद्रशेखराबरोबर अगदीं नवाच उत्पन्न झाला असें नाहीं. 'मी' मध्यें भावानंदानें जो पक्ष स्थापन केला तो हाच होता. पण त्या वेळीं प्रत्येकजण आपल्याच एकदेशीय विचारांत गुरफटून जाऊन पक्षाभिमानानें अंध झाला असल्यामुळें देशोन्नतीचें हें व्यापक स्वरूप लोकांच्या आणि समाजाच्या ध्यानांत येणें शक्य नव्हतें. तसें व्हावयास लोकांना आपल्या एकमार्गी विचारांची चूक कळून येणेंच अवश्य होतें, तें त्याप्रमाणें झालें; आणि मग देशाची सर्व बाजूंनीं उन्नति करण्यास झटणारा भावानंदाचा पंथच खरा अशी लोकांची खात्री पटली. म्हणूनच भावानंदाच्या मठाला त्याच्या मृत्यूनंतर कांहीं काळपर्यंत खालावलेली स्थिति येऊन मग पुढल्या पिढींतील चंद्रशेखरासारखे तरुण लोक त्याला मिळाल्यावर त्या मठाला पुनः ऊर्जितदशा आली, असा त्या मठाचा इतिहास हरिभाऊंनीं दाखविला आहे. मध्यंतरीं तो मठ समाजसुधारक व राजकीय सुधारक या दोन्ही

पक्षांच्या लोकांना फार अप्रिय झाला असून, तो तसा होणार असें भाकितही भावानंदानें करून ठेविलें होतें; याचें कारण तरी हेंच कीं, त्याच्या उद्योगाचें व्यापक स्वरूप समजण्याइतकी तत्कालीन समाजाची स्थितिच नव्हती.

## दोन जुने पक्ष.

समाजसुधारणावादी पक्ष व राजकीय सुधारणावादी पक्ष यांमधील भेद, त्यांच्या भिन्नभिन्न आकांक्षा, यांच्या वेगवेगळया कार्यदिशा या सर्वांचें फारच योग्य चित्र हरिभाऊंनीं 'आजच' या कादंबरींत काढलें आहे. आपल्या आजच्या समाजव्यवस्थेंत फार दोष आहेत ते प्रथम दूर केल्याशिवाय आपल्या आटोक्याच्या बाहेर असलेले राजकीय हक्क मागणें रास्त नाहीं असें पहिल्या पक्षाचें मत होतें; त्याच्या राजकीय मागण्या नेमस्त म्हणून तो पक्ष 'नेमस्त' हें नामाभिधान पावला. दुसरा पक्ष म्हणे कीं, समाजव्यवस्थेंत काय किंवा औद्योगिक बाबतींत काय, कोठेंही जी हीन स्थिति आज दृष्टीस पडते तिच्या बुडाशीं राजकीय पारतंत्र्य आहे; त्यामुळें राजकीय स्थिति सुधारल्या-शिवाय इतर गोष्टी सुधारण्याची आशा कारणें व्यर्थ आहे. या पक्षाची राजकीय हक्क मिळविण्याची उडी फारच मोठी, यास्तव या पक्षास 'जहाल' हें नांव मिळालें. ज्या काळचें चित्र 'आजच' या कादंबरींत काढलें आहे, त्या काळीं जहालनेमस्तांचे मतभेद इतके तीव्र होते कीं, त्यांमध्यें कधींकाळीं एकी होईल ही आशा-सुद्धां वाटत नव्हती. नेमस्तांचा पुढारी गणपतराव, व जहालांचा पुढारी यशवंतराव, यांच्या वादविवादाच्या ज्या एकदोन चकमकी या कादंबरींत वर्णन केल्या आहेत त्या फारच मजेच्या आहेत. आज सुदैवानें या उभयपक्षांतील मतभेद कमी झाले आहेत; यामुळें पूर्वींच्या तीव्र मतभेदाची कल्पना पुढील पिढीस येणार नाहीं. ती यावयास ही कादंबरी चांगली उपयोगी पडेल. या कादंबरीचें

पहिलें प्रकरण तत्कालीन परिस्थितीचें चित्र या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे.-कलकत्त्याच्या कॉंग्रेसहून मंडळी परत येत आहेत असा प्रसंग कल्पून, चार प्रकारच्या मतांची चार मंडळी तेथें एकत्र आणून, त्यावेळच्या लोकांची एकंदर मनःस्थिति कशी होती हें फार उत्कृष्ट रीतीनें या प्रकरणांत दाखविलें होतें. कॉंग्रेस म्हणजे वर्षाकांठीं चार दिवस एकत्र जमून भाषणें करण्याचा व मजा मारण्याचा एक जलसा आहे, त्यापासून सरकारला सुशिक्षित लोकमत कळविण्यापलीकडे फारच थोडें विधायक कार्य होतें असें त्यावेळीं सर्वांस वाटूं लागलें होतें. कोणतीही गोष्ट होण्यापूर्वी विचार व उच्चार या दोन स्थितींतून ती जावी लागते; त्याप्रमाणें आपण त्या दोन्ही स्थितींतून गेलों असून 'आचाराच्या' स्थितीला आलों आहोंत असें प्रत्येकजण म्हणूं लागला होता. या पहिल्या प्रकरणांत जो वादविवाद चाललेला आहे त्यांत प्रामुख्यानें भाग घेणाऱ्या गणपतराव, यशवंतराव, कृष्णराव व नारायणराव अशा चार व्यक्ति आहेत. गणपतराव हा नेमस्त आणि यशवंतराव हा जहाल होता, हें वर सांगितलेंच आहे. कृष्णरावाचें मत असें होतें कीं, सामाजिक सुधारणा, राजकीय सुधारणा या सर्व औद्योगिक प्रगतीशिवाय व्यर्थ असून, सर्वांनीं प्रथम औद्योगिक उन्नतीच्या मार्गेच लागलें पाहिजे. सामाजिक व राजकीय या दोन्ही चळवळींच्या जोडीला तिसरी औद्योगिक चळवळ प्रथमच उत्पन्न झाल्याचें या कादंबरींत दाखविलें आहे.

## अराजक पक्षाची उत्पत्ति.

चौथा गृहस्थ नारायणराव हा एक वेगळयाच प्रकारच्या मनोवृत्तींचा मनुष्य दाखविलेला आहे. जहाल राजकीय मतांचे जे दुष्परिणाम कांहीं तरुण मंडळीवर झाले ते कसे झाले, व जहाल पक्षाचें पर्यवसान—त्या पक्षाच्या पुढाऱ्यांनीं योग्य काळजी न घेतली तर—पुढें कशांत होईल, हें दाखविण्यासाठींच नारायणरावाचें पात्र घातलें आहे.

राजकीय सुधारणा झाल्याशिवाय इतर कोणतीही सुधारणा करणें व्यर्थ आहे हें यशवंतरावाचें मत नारायणरावाच्या मनावर इतकें ठसतें कीं, त्याच्या मताची मजल यशवंतरावाच्याही पुढें जाऊन, राजकीय सुधारणेच्या ऐवजीं निर्भेळ स्वातंत्र्याचा तो चहाता बनतो. सामाजिक सुधारणेबद्दल यशवंतराव उदासीन आहे, तो कां हें न समजतां, त्याचें अनुकरण म्हणून नारायणराव केवळ सामाजिक सुधारणेची टवाळी करून थांबत नाहीं, तर आमची स्थिति सर्वतोपरी उत्तम असून आम्हांस कोणत्याही गोष्टींत परकीयांची मदत घेणें अवश्य नाहीं असें त्यांचें मत होतें. कृष्णरावाची औद्योगिक चळवळीची खटपट त्याला हास्यास्पद वाटते. नवीन कला शिकण्यासाठीं परदेशाला जाणें हें सुद्धां त्याला देशाभिमानशून्यतेचें द्योतक दिसतें. खरा देशाभिमान आपली प्रत्येक गोष्ट मग ती वाईट असली तरी तिची तळी उचलण्यांतच आहे; व राजकीय उन्नति देशांत सर्वत्र असंतोष माजवूनच होणार आहे, कारण भिक्षांदेहीनें कोणी हक्क देत नसतो, असें त्याचें ठाम मत झालें आहे. या सर्वांचा परिणाम असा होतो कीं, आपलें मत खरें, आपण काय ते खरे देशाभिमानी आणि शहाणे, बाकीचे, सर्व लोक मूर्ख देशबुडवे, असा अहंभाव मनांत उत्पन्न होऊन त्याची वृत्ति उद्धत होते; इतकी कीं, प्रसंगीं यशवंतरावासुद्धां त्यास वारंवार दाबावें लागतें. राज्यव्यवस्थेबद्दल समाजांत तीव्र अप्रीति उत्पन्न करण्याच्या प्रयत्नाचें पर्यवसान कशांत होण्याचा संभव आहे हें दाखविण्याचा हरिभाऊंचा विचार होता. आणि हा संभव किती खरा ठरला हें गेल्या १५ वर्षांच्या आपल्या देशाच्या राजकीय इतिहासाची माहिती असणारांस सांगावयास नकोच. एकंदरींत नारायणरावाचें पात्र मोठ्या खुबीनें निर्माण करण्यांत आलें असून त्यांत किती सत्यता आहे, हें गेल्या १५ वर्षांच्या राजकीय चळवळीची माहिती असणारे ओळखतीलच.

नारायणराव पुढें अराजकपंथांत शिरला असें सूचित केलें आहे. नारायणरावाचीं बेजबाबदार मतें व आचरण पाहतां त्याबद्दल आश्चर्य वाटत नाहीं. 'आजच' ही कादंबरी करमणूक पत्रांत प्रसिद्ध होण्यास १९०४ सालीं आरंभ झाला, आणि अराजकांचा पहिला अत्याचार १९०८ सालीं घडला. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे तरुणांच्या मनांत तीव्र असंतोष उत्पन्न करण्याचे परिणाम प्रसंगीं कोणत्या थराला जाऊन पोंचण्याचा संभव आहे, याचें अचूक निदान हरिभाऊंनीं केलें होतें असें वाटल्यावांचून राहत नाहीं. नारायणरावाचीं मतें पुढें इतकीं जहाल—नव्हे बेताल—झालीं व त्याची मनःस्थिति इतकी चमत्कारिक झाली कीं, यशवंतरावालासुद्धां त्याच्याबद्दल भय वाटूं लागलें; आणि त्यानें हें आपलें भय १९ व्या प्रकरणांत कृष्णरावाजवळ उच्चारून दाखविलें आहे. नारायणरावाची खरी स्थिति कृष्णरावास त्याचें एक गुप्त पत्र चोरून पाहावयास मिळाल्या-वरून समजली होती; म्हणून तो यशवंतरावास म्हणतो, "तुला नुसतें भय आहे, पण माझी खात्री आहे, कशी ती मी तुला सांगतों." असें म्हणून त्यानें इकडे तिकडे पाहून यशवंतरावाच्या कानांत कांहीं सांगितलें. तें ऐकून यशवंतरावाची चर्या चमत्कारिक झाली, आणि त्याच्या तोंडांतून "मूर्ख ! मूर्ख !! असें असेल तर नारायणराव केवळ मूर्ख आहे, यापेक्षां दुसरें कांहीं नाहीं" असे उद्गार निघाले. यापुढील कृष्णरावाचे उद्गार अधिक महत्त्वाचे आहेत. तो यशवंत-रावास म्हणतो, "मूर्ख म्हणजे काय ! मूर्खाला कांहीं शिंगें असतात? हे खरे पढतमूर्ख. वेळ, प्रसंग, आपली परिस्थिति, यांचा या लोकांना कांहींसुद्धां सुमार नसतो....परंतु त्यांचें डोकें असें बिघडून जाण्याला कोण कारण झालें असेल याचा तूंच विचार कर. केव्हां केव्हां आपल्या ताब्यांत राहील इतक्या वेगानें म्हणून आपण आग लावावी, आणि ती मग आपल्या हातांत न राहतां वेडीवांकडी भडकते, त्याचें हें

एक उदाहरण नव्हे का? चांगलें म्हणून करावयाला जावें तों भलतेंच होतें याचाच हा एक मासला नव्हे काय?" * पुढें यशवंतरावानें नारायणरावाला त्याच्या मूर्खपणाबद्दल व अविचाराबद्दल रागें भरून त्याच्या मार्गापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा परिणाम नारायणरावानें आपला मार्ग सोडण्याचे ऐवजीं उलट यशवंतरावाबद्दल त्याला आजपर्यंत वाटत असलेली पूज्यबुद्धि नाहींशी होण्यांत मात्र झाला. नारायणरावाचे यानंतरचे स्वगत विचार (प्र. २७) त्याच्या मनाची स्थिति बरोबर दर्शवितात. तो म्हणतो, "यशवंतरावाची संमति या गोष्टीला मिळणार नाहीं ही कल्पनासुद्धां माझ्या मनाला शिवली नसती, परंतु आजचा अनुभव अगदीं निराळा. आज अगदीं न भूतो न भविष्यति अशी गोष्ट झाली........आजपर्यंत या पुरुषाच्या धैर्याबद्दल आणि निश्चयाबद्दल जी आपली कल्पना होती ती सगळी चुकीची काय? आपण या गृहस्थाला विभूति समजून त्याच्या ठिकाणीं जी परम निष्ठा ठेविली ती अस्थानीं झाली काय?....आपलें काय म्हणणें, आपला बेत पार पाडण्याला कितींची अनुकूलता आज आहे, कितींची प्रतिकूलता आहे, हें आपण सांगतों म्हणत असतां त्यांनीं तें स्वस्थ चित्तानें ऐकून घेण्याइतकी सुद्धां माणुसकी किंवा शांति दाखविली नाहीं....इतके का आपले बेत क्षुद्र आहेत? ....आपण चुकत असूं म्हणून स्वस्थ बसावें, कीं आपण ज्याला फार विचारी, धैर्यवान् आणखी साहसी असें समजत आलों, तो तितका विचारी, धैर्यशील आणि साहसी नाहीं असें समजून त्याचा स्नेह सोडून द्यावा? त्याची भक्ति आपण आजपर्यंत केली ती व्यर्थ कीं काय? त्याचें धैर्य नुसतें भाषणांतच, त्याचें साहस जिभेपुरतेंच, त्याचा विचार तितक्यापुरताच, असें समजून आपण आपल्या मार्गास लागावें. दुसरा कोणी-जो शांतपणें आपले बेत ऐकेल, आपल्या-

* 'आजच.' प्र. २०.

सारखेंच धैर्य धरील, साहस करील—असा पुढारी कां पाहूं नये? पण पुढारी तरी कशाला? आपण आपलाच पुढाकार घेऊन उद्योग कां करूं नये?....आपणच आपला आतां जोर धरावा. ....आपण ज्याला पुढारी समजत होतों; तो जर कच्चा पडला, तर आपण तरी त्याच्या तंत्रानें राहण्यांत काय अर्थ आहे?....आपल्या मार्गाचा, आपल्या विचाराचा अवलंब करणारी मंडळी आतां दिवसानुदिवस कितीतरी निघतील!....ठिकठिकाणीं आज तसे आहेत; फक्त त्यांना एकत्र करणारा कोणीतरी पाहिजे. यशवंतराव तसें करील असें वाटत होतें; परंतु नाहीं, तो रंग दिसत नाहीं. त्याचेही विचार कातच, त्याचें धैर्य त्याहून कोतें; आणखी साहस तर विचारूंच नका. आतां आपणच पुढें सरकलें पाहिजे." असंतोषाची कोलीत तरुण आणि अविचारी लोकांच्या हातीं गेली म्हणजे आग कशी भडकेल, व "भुतें उठविणें सोपें आहे, पण उठविलेल्या भुतांना पुनः गाडणें अवघड आहे." या इंग्रजी म्हणीचा अनुभव आमच्या पुढाऱ्यांस कसा चांगला येईल, याचें हें हरिभाऊंनीं काढलेलें चित्र पुढील अनुभवानें खरें ठरलें नाहीं असें कोण म्हणेल? येथें दुसरी गोष्ट स्पष्ट केली पाहिजे, ती ही कीं, अशा अराजक पंथाला जाणारे लोक वाईट मनाचे व स्वभावतःच गुन्हे करण्याच्या प्रवृत्तीचे असतात, म्हणून तशी त्यांची प्रवृत्ति होते, असें हरिभाऊंनीं म्हटलें नाहीं. उलट नारायणरावाची " देशभक्ति फार उत्कट, स्वाभिमान फार प्रबळ, त्याचा साहसीपणाही तसाच " असेंच त्याचें त्यांनीं वर्णन केलें आहे. पण तो अत्यंत अविचारी असल्यामुळें, व " त्याच्या मनास शांति कशी ती ठाऊकच " नसल्यामुळें, अशा मंडळींच्या मनावर तीव्र असंतोषाचा परिणाम कसा होतो हें लक्षांत आणून प्रथमपासूनच पुढाऱ्यांनीं जपून वागलें पाहिजे, एवढेंच त्यांस दाखवावयाचें होतें.

## सार्वजनिक चळवळींचें आध्यात्मिक स्वरूप.

कै० ना० गोखले यांनीं आपल्या एका व्याख्यानांत म्हटलें आहे कीं, आपल्या राजकीय चळवळीस आध्यात्मिक स्वरूप आल्याशिवाय यश:प्राप्ति व्हावयाची नाहीं. आपण जें कार्य हातीं घेतों तें ईश्वरी योजनेनें हातीं घेतों असा त्यावर दृढ विश्वास असल्यावांचून, त्या कार्याच्या मागें एक प्रकारची धर्मश्रद्धा असल्यावांचून, त्यांत सिद्धि प्राप्त होण्याची आशा करणें व्यर्थ आहे. राजकीय चळवळीचें हें Spiritualization कसें करतां येतें, व त्यांत किती जोर असतो, हें महात्मा गांधींनीं राष्ट्राच्या प्रत्ययास आणून दिलें आहे. आजपर्यंतची सामाजिक आणि राजकीय चळवळ व्हावी तशी यशस्वी झाली नाहीं याचें एक कारण म्हणजे त्यांत तितका आध्यात्मिक जोर नव्हता. हरिभाऊंनीं ही गोष्ट ओळखली होती; आणि म्हणूनच 'मी'मध्यें भावानंदाकडून त्यांनीं संन्यास घेवविला आहे. कारण संन्यासाश्रम हा स्वभावत:च आध्यात्मिक स्वरूपाचा आहे. तथापि त्या ठिकाणीं ही गोष्ट त्यांनीं इतकी स्पष्ट केलेली नाहीं. पण पुढें 'आजच' आणि 'कर्मयोग' या दोन कादंबऱ्यांत मात्र तें त्यांनीं विशेष स्पष्टतेनें दाखविलें आहे. 'आजच' च्या तिसऱ्या प्रकरणांत, गणपतराव, यशवंतराव वगैरे मंडळीचा जोराचा वादविवाद संपल्यावर दोन संन्यासी त्या डब्यांत शिरतात; त्यांपैकीं एक अद्वैतानंद हा राष्ट्रकार्य करण्यासाठींच संन्यासी झालेला आहे; त्याच्या तोंडून हें तत्त्व फार सुंदर रीतीनें वदविलें आहे. चोहोंकडे नुसतें बोलणें चाललें असून कार्यास मात्र अद्यापि आरंभ कां होत नाहीं, असा प्रश्न यशवंतरावांनीं विचारला असतां स्वामी अद्वैतानंद म्हणतात, " सर्व कांहीं श्रद्धामूलक आहे. ती श्रद्धा तुमच्याजवळ नाहीं; आणि तुम्हीं कितीही कांहीं करण्याच्या खटपटी केल्यात तरी त्यांत तुम्हांला यश

येईल हें मनांत सुद्धां आणूं नका. जो परमेश्वराच्या ठिकाणीं श्रद्धा ठेवील तो आपल्या देशावरही ठेवील. नाहीं तो काय ठेवणार? आपली श्रद्धा गेली, तो काळ बदलला; आतां जुन्याच धर्माचा नीट अर्थ करून तो सध्यांच्या काळीं साजेल असा लावून सगळ्यांच्या मनांत श्रद्धेचें बीज पेरलें पाहिजे. सगळ्या देशभर एकीचा घोष चालला आहे; पण दुही मूर्तिमंत अवतरली आहे. अद्वैताचा जयजयकार चालला आहे, पण जेथें तेथें द्वैतानें व्यापून टाकलें आहे. ही स्थिति मोडून टाकली पाहिजे, तें एकीकडेच राहून जो तो आपल्याकडून कांहींतरी कल्पना काढून उपाययोजना करतो आहे....अद्वैतमतासारखा सुंदर धर्म आज कोठें सांपडणार नाहीं. जें काय तुम्हांला करावयाचें असेल, तें त्याच्या साहाय्यानें करितां येईल. परंतु त्याची सुद्धां तुम्हीं घाण करून टाकिली आहे....

" आपली मनःस्थिति सुधारली नाहीं, आपल्या विचारांत विस्तृतपणा जोंपर्यंत आला नाहीं, तोंपर्यंत काय उपयोग आहे? तोंपर्यंत आपल्या हातून काय उपयोग होणार आहे? तोंपर्यंत एक काय, पण पंचवीस कॉंग्रेसा आणि कान्फरन्सें भरविलीत, किंवा अमुक झालें पाहिजे, तमुक झालें पाहिजे, असें म्हणून काय उपयोग होणार आहे? जर कांहीं प्रथम झालें पाहिजे, तर आपले धर्मविचार सुधारले पाहिजेत, ते विस्तृत झाले पाहिजेत. आपण खरे अद्वैती, खरे योगी बनलें पाहिजे. सगळ्या देशांत द्वैत माजलें आहे तें घालवूं व अद्वैत करूं, तेव्हां आम्ही खरे अद्वैती. सगळ्या लोकांचा परस्परांपासून वियोग झाला आहे, तो नष्ट होऊन योग झाला तरच आपण खरे योगी. तसें होईपर्यंत —आमच्या धर्मकल्पना सुधारतपर्यंत— आपल्या हातून कांहीं होणार नाहीं. धर्मकल्पना सोडून द्या. कॉंग्रेसमध्यें उभें राहून 'देशबांधव हो' किंवा 'मित्रहो' अशीं विशेषणें योजून सर्वांचें आवाहन करितां

तें खरें होऊंद्या. अमक्याचा स्पर्श उपयोगी नाहीं, तमक्याची सावली उपयोगी नाहीं, अमक्यानें अन्नाकडे पाहिलें कीं गेलें अन्न वायां, हें कोठलें तुमचें अद्वैत? ही कोठली धर्माची कल्पना? हें सोडाल तरच तुमचा निभाव लागेल. कोणाच्या धर्माचा तिटकारा करूं नका. कोणाचा कोणच्याही संबंधानें तिटकारा करूं नका. तुमच्या धर्मकल्पना विस्तृत झाल्या तरच कांही जुळेल; नाहीं तर जुळणार नाहीं."*

"मूळ आपली धर्मश्रद्धा जागृत झाली पाहिजे. ही धर्मश्रद्धा जागृत नाहीं असें नाहीं; किंबहुना धर्मश्रद्धा हेंच तर आपणां हिंदूंचें विशेष लक्षण आहे. आपण आधीं धर्मश्रद्धाळू आणि मग दुसरे कांहीं. पण ती आमची धर्मश्रद्धा अकुंचित झाली आहे. तत्त्वज्ञान-दृष्टीनें ती अकुंचित नाहीं, फार विस्तृत आहे. इतकी विस्तृत आहे कीं, असली विस्तृत श्रद्धा जगांतल्या दुसऱ्या कोणत्याही लोकांत नाहीं. आमची एकी आपल्या कुटुंबापुरती नाहीं, शहरापुरती नाहीं, देशा-पुरतीच नाहीं, किंवा हिंदूपुरती नाहीं, तर सगळ्या विश्वाला व्यापून आहे. जीव आणि ब्रह्म हीं एक आहेत, नव्हे,—सर्व कांहीं ब्रह्ममय आहे, ब्रह्माव्यतिरिक्त कांहीं नाहीं, असें आम्ही प्रतिपादितों. परंतु तत्त्वसमीक्षा प्रतिपादितांना मात्र हें आहे. प्रत्यक्ष अनुभव अगदीं भिन्न. आमच्या कुटुंबांत एकी नाहीं, गांवांत नाहीं, कोठेंही नाहीं. तत्त्वसमीक्षेनें अत्यंत विस्तृत विचाराचे आम्ही व्यवहारांत अत्यंत आकुंचित बनलों आहोंत. जो तो आपल्यापुरता विचार पाहातो, फार तर, आपल्या कुटुंबापुरतेंच पहातो. पण त्याची दृष्टि विस्तृत होत नाहीं. याला काय उपाय? याला कांहींतरी उपाय काढला पाहिजे. तो कोण काढतो? याचा कधीं कोणी विचार केला आहे का? बोला, तुम्ही सगळे दक्षिणेचे लोक दिसतां, कांग्रेससाठीं इकडे

* भाजच, प्र. ३.

आलां आहां; पण यांत मनोभावानें कांग्रेसला अगदीं वाहिलेले असे किती आहेत?"...."आपणां हिंदूंसारखे प्रेमळ लोक कोणी नाहींत, पण आमचें प्रेम आमच्या कुटुंबापुरतें; जनकावर, जननीवर, बंधूवर, भगिनीवर, पत्नीवर, अपत्यांवर आमचें प्रेम अतोनात. त्यांच्याकरितां आम्ही वाटतील तीं दुःखें सोसूं, वाटतील त्या अडचणी काढूं. परंतु हें प्रेम विस्तार पावत नाहीं. आमची दृष्टि संकुचित झाली आहे. आमची कर्तृत्वशक्ति स्वतःपुरती आहे; देशापुरती नाहीं. ती अधिक विस्तृत झाली पाहिजे. देश आधीं, लोक आधीं, मग घर व मग कुटुंब; अशी मनाची स्थिति झाली पाहिजे. ती जर न झाली तर आपल्या हातून कांहीं सुद्धां होणार नाहीं."*

वरील उताऱ्यांवरून, प्रत्येक कार्याचे मागें धर्मश्रद्धा पाहिजे म्हणजे काय पाहिजे, व प्रत्येक चळवळीला आध्यात्मिक स्वरूप द्यावयाचें म्हणजे काय करावयाचें, याबद्दलच्या हरिभाऊंच्या कल्पना काय होत्या त्या स्पष्टपणें वाचकांच्या लक्षांत येतील. 'आजच'मध्यें नुसती धर्मश्रद्धेची आवश्यकताच दाखविली आहे, पण 'कर्मयोगां'त याच्याही पुढें हरिभाऊ गेले आहेत. 'कर्मयोगा'तील नायक चंद्रशेखर हा विद्वान् आहे, देशसेवा व्हावी अशी त्याला उत्कट इच्छा आहे, स्वार्थत्याग करण्याची त्याची पूर्ण तयारी आहे, पण तो मतानें कट्टा नास्तिक आहे. त्याची व स्वामी अद्वैतानंदाची गांठ पडते. त्याची देशकार्य करण्याची उत्सुकता व पात्रता स्वामींच्या दृष्टीस पडते; पण "तुझ्या मनांत धर्मश्रद्धा उत्पन्न झाल्याशिवाय नुसत्या कर्मश्रद्धेचा कांहीं उपयोग नाहीं" असें स्वामी त्याला सांगतात. काय करावें व कसें करावें अशा अनिश्चिततेंत त्याचा बराच काळ जातो. पण शेवटीं विचार करतां करतां, धर्मश्रद्धा म्हणजे काय व ती कां पाहिजे हें त्याला पटतें; आणि लागलींच

* आजच प्र. ३.

त्याच्या अनिश्चित मनास निश्चित दिशा लागून तो आपल्या उद्दिष्ट कार्याला लागतो. यावरून Spiritualization of public life या तत्त्वावर हरिभाऊंचा किती विश्वास होता, व त्या तत्त्वाचें किती उदात्त उदाहरण आपल्या कादंबरीच्या द्वारें त्यांनीं समाजाचे पुढें मांडलें आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईल. महात्मा गांधींच्या सार्वजनिक आयुष्यक्रमाचें अगदीं वरवर अवलोकन करणारास सुद्धां या तत्त्वाची आपल्या चळवळींत आपणांस आज किती आवश्यकता आहे हें समजून येईल. हें तत्त्व आजच आपल्याकडे नवीन उत्पन्न झालें नसून फार प्राचीन आहे; कारण श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं सुद्धां 'दासबोधां'त याची आवश्यकता प्रतिपादिली असून त्यांची पुढील ओवी सुप्रसिद्धच आहे. "सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील त्याचें। परंतु आधीं भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे."

आपल्या जुन्या संन्यासाश्रमाचें योग्य रीतीनें पुनरुज्जीवन झालें असतां, त्याचा या दृष्टीनें सार्वजनिक आयुष्यक्रमाला ( Public Life ) फार उपयोग होईल असें हरिभाऊंचें दृढ मत दिसतें; संन्याशांनीं घरोघर पुडी उकळण्यासाठीं न फिरतां देशसेवेला आपलें आयुष्य वाहावें; व या कार्याकरितां निरुपाधि सुशिक्षित देशभक्तांनीं संन्यास घ्यावा असें त्यांनीं अनेक ठिकाणीं सुचविलें आहे. या बाबतींत, 'मी'मध्यें भावानंदाचे संन्यासाश्रमाबद्दल विचार व अद्वैतानंदानें "आजच" मध्यें संन्यासाश्रमाला नवीन वळण देण्याबद्दल ठिकठिकाणीं काढलेले उद्गार वाचनीय व मननीय आहेत.

## सरकार व प्रजा यांचे परस्परविरुद्ध हितसंबंध.

औद्योगिक उन्नति झाली पाहिजे असें म्हणणें सोपें आहे; पण तदर्थ प्रयत्न करणारांना समाजाकडून कितपत मदत मिळते, हें कृष्णरावाच्या गिरणीच्या इतिहासावरून चांगलें दाखविलें आहे. तसेंच परदेशीं उद्योगधंदे शिकावयास जाणारांनाही किती अडचणी

येतात, हें प्रभाकर विलायतेस गेल्यावर त्याचें पद्माकरास पत्र आलें आहे त्यावरून दिसतें. राजकीय चळवळींत पडणारांना गुप्त-पोलिसांचा ससेमिरा कसा सोसावा लागतो हेंही स्वामी अद्वैतानंद व भावानंद यांच्या मठाच्या झडतीवरून दाखविलें आहे. तथापि या बाबतींत सरकारची बाजू हरिभाऊंनीं विनोदी रीतीनें पुढें मांडली आहे, तो भाग वाचण्यासारखा आहे. भावानंदाचा मठ हा लोकांना शिक्षण देण्याच्या सद्धेतूनें काढला असतां सरकारचा त्यावर कां डोळा असावा, असें विचारण्यासाठीं पद्माकर एका पोलीस अधिकाऱ्याकडे गेला, त्यावेळीं तो साहेब त्याला म्हणतो, "बाबारे, ती संस्था सद्धेतूनें काढली आहे याबद्दल शंका नाहीं; पण सद्धेतूसद्धेतूंत फरक असतात कीं नाहीं ? जो तुम्हांला सद्धेतु वाटतो, तो सरकारला वाटणार नाहीं. तुमचा सद्धेतु निराळा, आमच्या दृष्टीनें सद्धेतु असावा तो निराळा." यावर पद्माकर विचारतो, "पण तुमचा आमचा सद्धेतु एक असणारच नाहीं, असं कां तुम्ही धरून चालतां ?"

"आपण आतां राजकीय प्रश्नांत शिरूं लागलों, नाहीं?....तें कसंही असलं तरी तूं एवढं ध्यानांत ठेव कीं, दिवसानुदिवस तुमच्या-वरला आमचा ताबा आम्ही कमी करूं इच्छीत नाहीं, वाढवूं इच्छितों; आणखी तुमचा यत्न तो कमी व्हावा असा आहे. तुमचे प्रयत्न तो कमी व्हावा अशासाठीं आहेत. तुमच्या दृष्टीनं सद्धेतु तो, आमच्या दृष्टीनं सद्धेतु हा; तेव्हां आतां बोल, कशीही संस्था असली, तिला जर राजकीय स्वरूप असलं, किंवा तिचे सभासद राजकीय गोष्टींत जर खटाटोप करीत असले तर आम्हीं काय समजावं ? तुम्ही त्यांत पडत नाहीं तोंपर्यंत ठीक. तोंपर्यंत तुमच्या हेतूच्या आड आम्ही येत नाहीं. पण त्याच्या पलीकडे जाऊं पहा, कीं आमचा डोळा तुमच्यावर आलाच....तूंच सांग या संस्थेचा हेतु काय ? लोक अज्ञानी आहेत त्यांना सज्ञानी करावयाचें हाच कीं नाहीं ? पण

अज्ञानी आहेत त्यांना सज्ञानी करावयाचें याचा अर्थ काय ? त्यांना ज्या गोष्टी आज समजत नाहींत, किंवा समजत असल्या तरी त्यांचीं कारणें ते निराळीं समजतात, त्या गोष्टी तुम्ही त्यांना समजावून देणार. तुमच्या मतें जीं खरीं कारणें तीं त्यांच्या डोक्यांत तुम्ही घालणार; असेंच कीं नाहीं ?....या संस्थेंतील लोक गांवोगांव हिंडून लोकांना काय शिकवणार ? लोकांनीं आपले हक्क जाणावे, वेळच्या वेळीं तक्रारी कराव्या, आपल्याला अन्याय झाले असतील ते न्याय्य मार्गानें दुरुस्त करून घ्यावे, हेंच ना ? पण याच्याबरोबर ज्या गोष्टी तुम्हीं त्यांच्या मनांत उतरून दिल्या पाहिजेत त्या कुठें देऊं शकतां-?*...." ब्रिटिश राजनीतीचीं पुस्तकांतलीं तत्त्वें कितीही उदात्त असलीं, तरी हिंदुस्थानांतल्या सर्वसाधारण इंग्रज अधिकाऱ्यास हिंदी लोकांच्या राजकीय चळवळींबद्दल वरच्याप्रमाणेंच वाटत नाहीं काय? 'आजच' या कादंबरीच्या ३३ व्या प्रकरणांत भावानंदाच्या मठाची कार्यदिशा व हेतु दाखविले आहेत, त्यांवरून हरिभाऊंचे विचार किती व्यापक व दूरवर गेले होते हें स्पष्ट दिसून येतें; व त्या मठाचें चित्र पाहून 'सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी'ची आठवण होते. ना० गोखल्यांचा व हरिभाऊंचा निकट स्नेह असल्यामुळें ही कल्पना कोणीं कोणापासून घेतली हा प्रश्न सोडविणें फार अवघड आहे.

## सामाजिक सुधारणेचें श्रीमंती स्वरूप.

या कादंबरीबद्दल आणखी एक गोष्ट सांगून आपण 'कर्मयोगा'कडे वळूं. सामाजिक सुधारणेचा आतांपर्यंतचा इतिहास आपण पाहिला तर आपल्यास असें दिसून येईल कीं, प्रथम ही चळवळ ज्या सुशिक्षितांनीं सुरू केली. ते तत्कालीन परिस्थितींत सांपत्तिक दृष्ट्या सुस्थितीला लवकर चढल्यामुळें, ही चळवळ बहुतेक संपन्न अशा

* आजच. प्र. ३५

सुशिक्षितांपुरतीच मर्यादित राहिली; बहुजनसमाज सामाजिक सुधारणेस प्रतिकूल होता, तरी बहुतेक समाजसुधारकांना पैशाच्या जोरावर लोकांशीं फटकून वागतां आलें; व त्यांपैकीं पुष्कळांकडून तर खरी सुधारणा होण्याऐवजीं जवळ पैसा असल्यामुळें केवळ पाश्चात्य ऐषआराम व ऐट यांचेंच अनुकरण होऊं लागलें. त्यामुळें सामाजिक सुधारणेबद्दल पुष्कळदां असा गैरसमज झाला कीं, केवळ जे श्रीमंत असतील, व लोकांशीं फटकून वागण्याचें ज्यांना सामर्थ्य असेल, त्यांनींच या सुधारणेच्या फंदांत पडावें. ही गोष्ट हरिभाऊंनीं या कादंबरींत उत्तम रीतीनें दाखविली असून सामाजिक सुधारणेचीं तत्त्वें बहुजनसमाजास आचरण्यास सुलभ झालीं पाहिजेत असें त्यांनीं स्पष्टपणें सुचविलें आहे. हल्लींच्या पिढींत मोठ्या महत्त्वाकांक्षा आणि सामाजिक सुधारणेबद्दल इतकी कळकळ व जोर कां दिसत नाहीं, याबद्दल गणपतराव व त्यांचे स्नेही नाना यांमध्यें २. ऱ्या प्रकरणांत वाद चालला आहे. त्या वेळीं नानांनीं हेंच कारण पुढें आणलें आहे. नाना म्हणतात, "आमच्या वेळीं उपजीविकेची इतकी काळजी करण्याचें मुळींच कारण नव्हतें. साधारणतः इकडे तिकडे केलें कीं, लवकरच कोठेंतरी सरकारी चाकरी तरी मिळवयाची, किंवा संस्थानांत कोठें तरी कांहीं संधान बांधतां येई. आतां चाकऱ्या तितक्या सुलभ नाहींत, आणखी दुसरीकडे कोठें संधानही साधत नाहीं. ज्याला त्याला पहिली काळजी आपलें पोट भरण्याची. ती काळजी दूर झाल्याखेरीज महत्त्वाकांक्षा आणि सुधारणा सुचणार तरी कशा? तुमच्या आमच्या आतां सोई चांगल्या झाल्या; तेव्हां आम्हांला आतां काय वाटतील त्या सुधारणा सुचतात. तशा सुचायला आणखी अंमलांत आणायला चित्ताची स्वस्थता पाहिजे, त्याखेरीज कसें होणार? आज एका पसतीस रुपड्यांसाठीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत खर्डेघाशी करावी लागते. आमच्या वेळीं काय,

कोणी एल्एल्. बी. झाल्याबरोबर चार सहा महिन्यांतच मुन्सफ झाला; कोणी वकील होऊन नांवारूपास आला; कोणाला हेड-मास्तरीची जागा मिळाली; कोणी संस्थानांत नायब दिवाण, नाहीं तर न्यायाधीश झाला. अशा स्थितींतल्या माणसांना मनसोक्त आचरण करावयाला कांहीं हरकत नव्हती. कोणी त्यांना विचारण्याची सुद्धां छाती करायचें नाहीं. पण आताच्या माणसांनीं तसें केलें तर त्यांना कोणी वाटेल तो वाटेल तसें बोलतो. त्याला नानाप्रकारचीं विघ्नें आणतो. त्याला कोणत्याही खेड्यांत जावयाची पाळी आली, तर तेथें लोक त्रास देणार, मदत करणार नाहींत. मग त्यानें तरी कशाच्या जोरावर कांहीं करायचें मनांत आलें तर करावें?"

नानांनीं हा मुद्दा याप्रमाणें गंभीरपणानें पुढें मांडला असतां, तोच पुनः विनोदी रीतीनें वाचकांसमोर यावा म्हणूनच कीं काय, नानांचें हें बोलणें संपतें आहे तोंच बाहेर एक तरुण गृहस्थ गणपतरावांस भेटावयास आला; व त्यानें आपल्या येण्याचा हेतु असा सांगितला कीं, आपल्या मनांतून संसारांत न पडतां कांहीं देशसेवा, समाज-सुधारणा करण्याचें असून त्या बाबतींत गणपतरावांची सल्ला घेऊन त्यांची मदतही घ्यावी. गणपतरावांकडून काय मदत पाहिजे, असें नानांनीं विचारतांच तो गृहस्थ म्हणतो, "मदत काय? गणपतराव फार मोठे वजनदार गृहस्थ आहेत, त्यांनीं आपल्या वशिल्यानें कोठेंतरी मोठी नोकरी देववावी येवढीच." मोठी नोकरी मिळ-विण्याचा आणि समाजसुधारणा करून देशसेवा करण्याचा परस्पर संबंध जो त्यानें सांगितला तो फारच मजेचा आहे. "माझ्या मनांत बायकोला शाळेंत पाठवून शिकवायला लागायचें आहे. पण जोंपर्यंत आपली प्राप्ति शंभरांपर्यंत नाहीं, तोंपर्यंत तिला शाळेंत पाठवून काय करायचें?... आपली मिळकत नाहीं, आणखी बायको शाळेंत शिकते आहे, काय उपयोग? शिवाय तुम्ही असा

विचार करा कीं, घरांतल्या माणसांच्या मर्जीविरुद्ध जर वागायचें तर आपण आपल्या पोटापाण्याची नीट निराळी व्यवस्था करावी, तेव्हां तसें वागायला येईल कीं नाहीं? नाहीं तर तीं माणसें उद्यां आम्हांला घालवून देतील. मग आम्हीं उपाशीं पोटीं सुधारणा करा कसली! ... म्हणून गणपतरावांचा आश्रय मीं मागितला तो हाच कीं, कोठें तरी चांगली मोठी जागा मला देववावी. ती मिळाली, कीं मी ते सांगतील तें करायला तयार आहें. अहो, तुम्हीच सांगा कीं, पैसे नाहींत तर लोकांची परवा बाळगल्याखेरीज चालायचं नाहीं. जर परवा बाळगल्याखेरीज चालायचं नाहीं, तर अर्थातच लोकांच्या विरुद्ध चालून कसं भागणार? सांगा तुम्ही, मी म्हणतों तें खरं कीं नाहीं तें? अहो, नोकर मिळेनासा होतो. पैसे जर पुष्कळ नसले तर नोकर कुठले आणतां आणि काय करतां? सुधारकाच्या बायकोनं स्वतः कां पाणी आणायचं आहे? अहो महाराज! पैसे नाहींत तर सुधारणा व्यर्थ आहे. आपल्यावरूनच पहा आतां. आपल्याला जर इतका पैसा न मिळता तर आपण या सुधारणा करतां कसल्या? आधीं चांगली तुष्टिपुष्टि करून घ्यायची, आणि मग सुधारणा करायची, हेंच तत्त्व बरोबर आहे. ज्याला पोटाखालीं मरेमरेतों काबाडकष्ट करावयाचे आहेत त्याला सुधारणा कसली आणखी काय कसलं! माझं आपलं बोलणं सरळ आहे. मग तुम्ही कांहीं म्हणा."

त्या गृहस्थाचें हें बोलणें ऐकून नानांस फार मौज वाटली. त्याची आणखी गंमत पाहण्याचे हेतूनें ते त्यास म्हणतात, "अहो, तुम्ही म्हणतां तें सगळं खरं, परंतु एकदम तुम्हांला जागा द्या कशी?"

"मग आम्ही तरी तुमच्या मताप्रमाणें वागून सुधारणा करा कशी?"

"हो, ही अडचण आहे खरी बोआ." नाना उपरोधिकपणें

हंसून म्हणतो " जर तुमची मोठ्या जागेची सोय झाली नाहीं, तर सुधारणेची पंचाईत खरी."

"असं! आतां कसं बोललांत! मला तीच पंचाईत पडली आहे. बाकी मनाची तयारी लख्ख झाली आहे. मनाला यत्किंचित् दिक्कत वाटत नाहीं. लोकमताला मी मुळींच भीत नाहीं."

"मग भितां कशाला?" नानांनीं उपरोधिक स्वरानें त्यास विचारलें.

"भितों अडचणींना. सुधारक म्हणवून घ्यावयाचें, तर कपडे उत्तम पाहिजेत. मला दोन चार तरी सूट पाहिजेत. बायकोला बूट नाहीं, तरी उत्तम गादीचा जोडा पाहिजे. एक शाल पाहिजे. एक गुलाबाचें फूल सोन्याचें पाहिजे. लुगडीं साधारण मोठीं पाहिजेत. राहायची जागा चांगली प्रशस्त पाहिजे. दोन, निदान एक तरी नोकर पाहिजे. घरीं गाडी पाहिजे. निदान महिन्यांतून पांच चार वेळां बाहेर जाण्यायेण्याच्या प्रसंगीं भाड्याची तरी गाडी पाहिजे. आणखी असे किती खर्च तुम्हांला सांगू? चहाकाफीचा खर्च, आणखी माझ्या सीगारेट्सचा खर्च काय लागेल असा अदमास आहे तुमचा सांगा? या सगळ्या गोष्टी ध्यानांत घेतल्यात, म्हणजे मग सहज तुमच्या लक्षांत येईल मोठा पगार कशाला लागतो तो. आणखी असे कितीक खर्च आहेत. ते मी सगळे यादवार सांगायला कशाला पाहिजेत? आपल्याला त्याची माहिती आहेच. बाकी मी सेल्फ सॅक्रिफाइस करायला तयार आहें. मी बहिष्कृत झालों तरी मला परवा नाहीं. सुधारक व्हायचें, इतरांना उदाहरण घालून द्यायचें, तर आपलें नुकसान करून घेतलें पाहिजे. कोणीं छळ केला तरी तो सहन करून उलट त्याचा छळ करणाराला पश्चात्ताप होईल, वाईट वाटेल असें आपलें वर्तन चोख ठेवलें पाहिजे, हें मी जाणून आहें; आणखी तशा बाण्यानें राहणार." हें भाषण वाचून

'हिंदुधर्म आणि सुधारणा' यामधील दगूशास्त्र्यानें सुधारणेची कारणमीमांसा केली आहे त्याची आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं. सुधारकांची एक बाजू अशा रीतीनें वाचकांच्या पुढें ठेवून, खरे सुधारक कसे असतात, व सुधारणा ही केवळ श्रीमंतांनाच साध्य अशी पाश्चात्य अनुकरणेच्छा नसून आचारविचारांची खरी सुधारणा आहे, हें हरिभाऊंनीं शिवरामपंत, बळवंतराव, विष्णुपंत इत्यादि अनेक मध्यमस्थितींतील पात्रें रंगवून उत्कृष्ट रीतीनें दाखविलें आहे.

## कर्मयोग.

'कर्मयोग' ही हरिभाऊंची शेवटली कादंबरी असून ती पुरी झाली असती, तर त्यांच्या दहा कादंबऱ्यांत मेरुमणीप्रमाणें शोभली असती यांत संशय नाहीं. कारण त्यांनीं आतांपर्यंतच्या कादंबऱ्यांत देशोन्नतीच्या कल्पनेची दर पिढीला होत चाललेली उत्क्रांति दाखवीत आणली; त्या सर्व स्थितींचें पर्यवसान या कादंबरींत होऊन, त्या सर्वांच्या संस्कारांनीं युक्त अशी नवी पिढी कशी उत्पन्न होणार, त्या पिढींतील तरुण मंडळीपुढें कोणते नवे प्रश्न येणार, आणि कोणत्या दिशेनें प्रयत्न केल्यास या पिढीचें कार्य आपल्या देशाच्या सद्यःस्थितींत यशस्वी होईल, याबद्दलचे हरिभाऊंचे परिणत विचार वाचकांस पाहावयास मिळाले असते. पण अत्यंत खेदाची गोष्ट ही कीं, ही कादंबरी ४७ प्रकरणें लिहून ऐन रंगांत अपुरी राहिली आहे. या ४७ प्रकरणांत कादंबरीचा पूर्वरंग सुद्धां निम्मा अधिक झाला नाहीं! या कादंबरीच्या कथानकाची पुढील रूपरेखा कशी आंखली गेली होती हें सुद्धां आतांपर्यंत लिहून झालेल्या भागावरून समजण्यासारखें नाहीं. तथापि या कथानकाचा शेवट अमुक रीतीनें होणार आहे, एवढें मात्र हरिभाऊ एकदोघांजवळ सहजगत्या बोलले होते.,* त्यावरूनच काय तें या कादंबरीचें

* मनोरंजनचा एप्रिल १९१९ चा अंक पहा.

स्वरूप अमुक प्रकारचें झालें असतें असें अनुमान थोडेंबहुत बांधतां येतें. तथापि या कादंबरीतील जो खरा महत्त्वाचा भाग, तो आतां जगाला चिरकाल अज्ञातच राहणार. यामुळें तरुण पिढीचें फार मोठें नुकसान झालें आहे; कारण हल्लींच्या काळच्या पुष्कळ लोकसेवेच्छु तरुणांस ही कादंबरी चांगलीच मार्गदर्शक झाली असती, असें आम्हांस वाटतें.

'गणपतराव' व 'यशवंतराव खरे' या दोन कादंबऱ्यांत अनुक्रमें, एक निवळ समाजसुधारणावादी व दुसरा केवळ राजकीय सुधारणावादी, अशा दोन पक्षांची उत्पत्ति व वाढ वर्णिली आहे. या दोन्ही पक्षांच्या मधला 'सुवर्णमध्य'साधून काम करणारा तिसरा पक्ष कसा असावा याचें चित्र 'मी'मध्यें दाखविलें आहे; पण आपण आपल्या मताभिमानाच्या भरांत एका टोंकाला जात असून आपली चूक होत आहे, व सत्य नेहमीं दोन टोकांच्या मध्यभागीं असतें, हें तत्त्व दोन्ही पक्षांच्या लोकांच्या लक्षांत आल्याशिवाय, हा मधला तिसरा पक्ष यशस्वी होणें शक्य नव्हतें; उलट दोन्ही पक्षांचे लोक आपली होत असलेली चूक उमजेपर्यंत या तिसऱ्या पक्षाची दोघांकडून हेटाळणीच व्हावयाची; व त्याप्रमाणें भावानंदाच्या पंथाची स्थिति झालीही. दोन्ही पक्षांची झटापट होऊन त्यांत प्रत्येकास थोडेंसें अपयश आल्याशिवाय प्रत्येकाच्या लक्षांत आपल्या एक-देशी विचारांची चूक यावयाची नाहीं. ही दोन्ही पक्षांची झटापट 'आजच'मध्यें दाखविली आहे. आणि या झटापटींतून अधिक कार्यक्षम व व्यापक अशा तिसऱ्या पक्षाची उत्पत्ति झाली ती 'कर्मयोगां'त दाखविली आहे. पण वास्तविक पाहतां या तिसऱ्या पक्षाची उत्पत्ति झाली असें म्हणणें चुकीचें आहे. हा पक्ष आधींच अस्तित्वांत होता; पण त्याचें व्यापक व कार्यक्षम स्वरूप लोकांच्या लक्षांत यावयास निवळ समाजसुधारणावादी व निवळ

राजकीयसुधारणावादी यांचे एकदेशी प्रयत्न अपुरे आहेत हें समाजाच्या लक्षांत येणें अवश्य होतें. तें या उभय पक्षांच्या झटापटीनें झाल्यावर हा तिसरा पक्ष पुढें आला; आणि हें दाखविण्यासाठींच, 'कर्मयोगा'चा नायक चंद्रशेखर याजकडून शेवटीं भावानंदाच्या मठाची दीक्षा घेवविण्याचा हरिभाऊंचा बेत होता.

कर्मयोगाचा नायक चंद्रशेखर हा 'पहिल्या'प्रकरणांत, एम्. ए. होऊन विद्यामंदिराचें पवित्र व गोड वातावरण सोडून जगाच्या खडतर आखाड्यांत उडी टाकण्याकरितां भोंवतालीं जीवनार्थ चाललेल्या झगड्यांत व ईश्वरानें नेमून दिलेला आपला कार्यभाग उचलण्यासाठीं, आपल्या कॉलेजचा शेवटचा निरोप घेऊन जात आहे, असें वर्णन आहे. त्याच्या महत्त्वाकांक्षा आधींच उच्च, विचार फार व्यापक, देशसेवेची इच्छा अत्यंत उत्कट; आणि अशा स्थितींत शेवटचा निरोप घेतेवेळीं त्याच्या प्रिन्सिपालनीं त्याला, आपलें शिक्षण, ज्ञान व सामर्थ्य, तिन्ही देशाच्या उन्नतीसाठीं वाहण्याबद्दल मनःपूर्वक केलेला उपदेश. अशा तरुणाची दानत व कार्यक्षमता किती उत्तम असली पाहिजे ! आणि चंद्रशेखराची ती तशी होतीही. पण जोंपर्यंत कॉलेजच्या चार भिंतींच्या आंत बाह्य जगाला अगदीं अनभिज्ञ अशा परिस्थितींत तो होता, तोंपर्यंत सर्व ठीक होतें. कॉलेजचें तें वातावरण सुटलें, व खऱ्या जगाशीं संबंध येऊन ज्याला कार्य करावयाचें आहे त्याच्यापुढें किती भिन्न मार्ग आहेत व क्षेत्र किती व्यापक आहे हें त्याच्या दृष्टीस पडलें, तेव्हां त्याचें मन गोंधळलें आणि आपण काय करावें अशाबद्दल त्याला दृढ मोह पडला. अशी स्थिति आज कितीतरी तरुणांची होत असेल बरें? यशवंतराव, किंवा त्याचे स्वतःचे वडील गणपतराव, यांच्याप्रमाणें त्याचे विचार एकांगी झाले नव्हते. त्याला चोहोंबाजूंनीं कार्याची सारखी आवश्यकता दिसत होती. त्यांपैकीं आपण काय हातीं घ्यावें, हा निश्चय होईना;

म्हणूनच त्याच्या चित्ताचा गोंधळ झाला होता. या आपल्या स्थितीची कबुली त्यानें १९ व्या प्रकरणांत आपल्या मामाजवळ दिली आहे. मनाच्या अनिश्चयानें चंद्रशेखर फार उदासीन झाला हें पाहून, "तूं पुढें काय करावें याबद्दल विचार केला असशीलच?" असें त्याच्या मामानें त्याला विचारलें. तेव्हां तो म्हणाला कीं, "नाहीं. अजून कांहीं झाला नाहीं. कांहीं विचार होतच नाहीं. काय करावें कांहींच उमजत नाहीं. एखाद्याला पुष्कळ दिवस डोळे बांधून कुठेंतरी कोंडून ठेवावं, आणि मग एकदम अशा जागीं आणून सोडावं कीं, तेथें त्याचे डोळे सोडल्यानंतर त्याला वाट म्हणून समजूं नये, तशी माझी स्थिति झाली आहे. चोहोंकडे क्षितिजापर्यंत अफाट मैदान, आणि सर्व देखावा सारखाच, त्या माणसासारखी माझी स्थिति झाली आहे. काय करावं, कांहीं सुचत नाहीं. एकदां वाटतं आपण शिकलों तें किती आहे! समुद्रांतल्या एका बिंदूइतकंही नाहीं. एकदां वाटतं कीं जगांत शिरून आपला मार्ग काढण्याला पुरे इतकी ज्ञानसामग्री आपल्याला लाभली आहे. तर दुसरा कांहीं उद्योग करितां करितां आपली पुंजी आपल्याला वाढवितां येईल." विद्यामय, पवित्र व रमणीय अशी विद्यार्थीदशा संपवून जगांत प्रथम प्रवेश करणाऱ्या तरुणाच्या भांबावलेल्या मनःस्थितीचें हें किती यथार्थ वर्णन आहे! अशी किंकर्तव्यतामूढ स्थिति 'मी'मध्यें भावानंदाचीही झाली होती, हें वाचकांच्या लक्षांत असेलच. परंतु, यशवंतराव व गणपतराव या दोघांची अशी स्थिति झाली नाहीं. कारण त्या दोघांचे विचार पहिल्यापासूनच एकदेशी बनले असून त्यांनीं आपली कार्यदिशा शिक्षण पुरें होण्याच्या आधींच आंखून ठेविली होती. पण भावानंद व त्याप्रमाणें चंद्रशेखर यांची स्थिति वेगळी होती. तथापि भावानंद व चंद्रशेखर या दोघांतही हा फरक होता कीं, भावानंदाला या गोंधळलेल्या स्थितींत फार वेळ राहावें

लागलें नाहीं. त्याला एक लहानपणींच गुरु भेटला होता. त्या गुरूचे ठिकाणीं त्याची अपरिमित श्रद्धा होती; त्याचा ईश्वरावर दृढ विश्वास होता; त्याच्या कर्मश्रद्धेला धर्मश्रद्धेचें पाठबळ होतें. आणि चंद्रशेखर—पण हें अंतर नीटपणें समजण्यासाठीं चंद्रशेखराचे धर्मविचार काय होते हें आपणांस प्रथम पाहिलें पाहिजे.*

## चंद्रशेखराचे धर्मविचार.

चंद्रशेखर हा आपल्या बापाप्रमाणेंच अट्टल नास्तिक होता. या सृष्टीचा नियंता ईश्वर म्हणून कोणी आहे, हें तत्त्वच त्यास मान्य नव्हतें. सृष्टीचे व समाजाचे व्यवहार ईश्वरी नियमनाप्रमाणें चालले नसून 'बहुजनहित' या तत्त्वावर चालले आहेत; किंबहुना हेंच तत्त्व नीतिशास्त्राचा पाया आहे असें त्याचें मत होतें. "धर्म हा एक विकार आहे, विचार नाहीं. तो श्रद्धामूळ आहे." असें त्याला वाटत होतें; व त्यामुळें धर्माबद्दल विचार करण्यासारखें कांहीं नाहींच असें तो म्हणे. कारण धर्माचें कार्य ईश्वराचें ज्ञान करून देण्याचें आहे; व त्या ईश्वराचें ज्ञान तर अद्यापि कोणास होत नाहीं. म्हणून धर्माचा विचार करण्यांत अर्थ नाहीं; व ईश्वराबद्दल विचार करण्यांत तर सुतराम् नाहीं. "आज हजारों वर्षें ज्याचा शोध चालला आहे, मोठ्या प्रचंड व ऐकांतिक जिज्ञासेनें चालला आहे, तरीही जें अज्ञात, अनिर्वाच्य, अगाध अशाच शब्दांनीं वर्णन करावें लागतें, त्याचा आणखी शोध करावाच कशाला? किंबहुना असा शोध करणें म्हणजे वेळ वांया घालविणें आहे–" असें त्यास वाटे. पण अशीं त्याचीं मतें होतीं तरी, आपल्यास कर्म केलें पाहिजे, कर्माशिवाय उन्नति होणार नाहीं, ही मात्र त्याच्या मनाची खात्री होती. अर्थातच तें कर्म सत् पाहिजे; व असें कर्म केल्यानेंच देशाची उन्नति होईल; आणि देशोन्नति हें तर त्याच्या आयुष्याचें मुख्य ध्येय होतें. पण तें कर्म कोणतें याचा

---

* कर्मयोग. प्र. ४ पहा.

मात्र निश्चय होईना. धर्मविचार म्हणजे एक खूळ असून तें मोडल्याशिवाय कर्मविचार होणार नाहीं; पण कर्म करावयाचें तें तरी कोणतें ? त्या कर्माचा परिणाम आपल्याला इष्ट असाच होईल असें कशावरून ? व कर्माचा परिणाम चांगला झाला नाहीं तर, तें कर्म मग सत् होईल का असत् होईल ? अशा शंका त्याच्या मनांत नेहमीं येत. असे प्रश्न प्रत्येक विचारी माणसाच्या मनांत येऊन प्रत्येकाला हा कर्माकर्माचा मोह उत्पन्न होतो. पण अशा वेळीं, "कर्मण्येऽवाधिकारस्ते मा फलेषु कदा च न" अशी खात्री पटून कर्माचें सदसत्त्व ठरविण्याचें, केवळ ऐहिक व दृश्य फल हें मुळींच प्रमाण नसून, या दृश्य व नश्वर वस्तूंपलीकडे असणारी एक अदृश्य व शाश्वत शक्ति आहे अशी मनाची खात्री व दृढ विश्वास लागतो. अर्जुनाला असाच कर्माकर्माचा मोह उत्पन्न झाला, त्या वेळीं भगवंतांनीं उपदेश करून शेवटीं, "मामनुस्मर युद्धयच" माझें स्मरण कर व लढ, मग त्याच्या फलाकडे पाहूं नकोस, असेंच सांगितलें. हीच धर्मश्रद्धा ही चंद्रशेखराजवळ नसल्यामुळें त्याला असा मोह झाला. आपली स्थिति अशी अनिश्चित आहे हें चंद्रशेखराला समजत होतें; कारण तो एम्. ए. झाल्यावर, 'तूं पुढें काय करणार ? आम्ही देशसेवेसाठीं अमुक एक प्रकारची संस्था काढणार आहोंत, तिला येऊन तूं मिळशील का ?' असें त्याच्या कांहीं स्नेह्यांनीं त्याला विचारलें असतां, माझा अद्यापि कांहींच निश्चय झाला नाहीं, असें त्यानें त्यांस कळविलें; पण या अनिश्चित स्थितीची खरी जाणीव व तिचें कारण मात्र त्याला समजलें नव्हतें.

## चंद्रशेखर व स्वामी.

अशा मनःस्थितींत असतां त्याच्या स्नेह्याच्या घरीं अद्वैतानंद स्वामींची व त्याची गांठ पडली. चंद्रशेखराचीं धर्मविषयक मतें कशीं आहेत, व तो स्वामी–संन्याशी यांच्याविरुद्ध आहे, हें त्या

स्वामींस आधींच कळलें होतें. तेव्हां आरंभींच त्यांनीं त्याबद्दल उल्लेख करून, तुमच्या या प्रतिकूलतेस आजच्या स्थितींत योग्य कारण आहे अशी कबुलीही दिली. त्यामुळें चंद्रशेखराचा वादाचा निम्मा जोर प्रथमच गेला. पुढें स्वामींनीं त्यास, "तुम्ही पुढें काय करणार ?" असें विचारलें. तेव्हां तो म्हणाला कीं, "तेंच माझें अद्यापि ठरलें नाहीं. नुकताच मी कॉलेजांतून सुटलों आहें, तेव्हां कांहीं दिवस स्वस्थ बसणार व मग काय तें ठरविणार."

"काय! स्वस्थ बसणार? मला वाटतें, स्वस्थ बसावयाचे हे दिवस नव्हेत. स्वस्थ बसायला काळ अनंत आहे, काम करायला मात्र नाहीं. ज्यानें आपल्यास जगांत आणून घातलें, त्यानें स्वस्थ बसण्याकरितां घातलें का? क्षणभर तरी स्वस्थ बसणें शक्य आहे का ? हे प्रश्न आपण कधीं स्वतःला विचारले असतील हें तर खरेंच; पण आपल्याला या जगांत कोणीं आणून घातलें हें कोठें आधीं आपल्याला मान्य आहे ? नसूं द्या. कोणीं आणून घातलें असें मानूं नका. आपोआप आलां, कीं कोणीं आणून घातलें कसेंही असलें तरी, आपण या जगांत आहोंत हें तर नाहीं म्हणतां येत नाहीं ? आणि येथें क्षणभरसुद्धां स्वस्थ बसणें शक्य नाहीं, हेंही पण आपल्याला नाकबूल करितां येणार नाहीं. कधीं स्वस्थ बसलां आहां, अगदीं सत्य दृष्टीनें स्वस्थ बसलां आहां, असें कधीं आपल्याला आठवतें ? बोला, ही कांहीं मताची गोष्ट नाहीं; अनुभवाची गोष्ट आहे."*

आपल्या अगदीं साध्या बोलण्याचा स्वामींनीं कोठल्या कोठें अर्थ नेऊन लावला हें पाहून चंद्रशेखर अगदीं चकित झाला. पण स्वामींनीं त्याच्यावर प्रश्नांचा व उलटतपासणीचा अगदीं मारा चालविला. "तुमचा अद्यापि निश्चय कां होत नाहीं ? जे विचार तुम्हांस

* कर्मयोग प्र. ७.

ग्राह्य वाटतात त्यांचाच प्रसार करण्यासाठीं तुम्ही कां झटत नाहीं ? आपल्या मताप्रमाणें अगदीं Free Thinkers Hall कां स्थापीत नाहीं ? विचार–नुसता विचार किती दिवस करणार ?" असे एकसारखे प्रश्न त्यांनीं चालविले. चंद्रशेखर अगदीं भांबावून गेला, आणि आपल्या मनाची अनिश्चित स्थिति त्याच्यापुढें स्पष्ट उभी राहिली. शेवटीं स्वामींनीं पुनः विचारिलें, "कां, तुम्ही बोलत कां नाहीं ? विचाराला कृतीचें दृश्य स्वरूप देण्याची वेळ नाहीं का अजून आली?"

चंद्रशेखर चाचपडत हलकेच म्हणाला, "आली आहे. परंतु मी अद्यापि त्याला योग्य आहे कीं नाहीं कोणास ठाऊक! माझ्या-पेक्षां थोडा जास्त विचार केलेला, आणि जगाचा अनुभव घेतलेला कोणी तयार होईल—"

पण स्वामीजींनीं त्यास तें वाक्य पुरतें बोलूं दिलें नाहीं. ते एकदम मोठ्यानें हंसून म्हणतात, "तर मग तुमचा तुम्हांलाच विश्वास उरलेला नाहीं, असें स्पष्ट म्हणाना? ...... तुमच्या झाल्या विचारानेंच तुमची तृप्ति नाहीं. (असें आहे तर) तुम्ही नुसता विचार तरी कोठें करीत बसतां आहां? तो अजून परिपक्व नाहीं असें तुमचें तुम्हांलाच वाटतें. (तरी) तो तुमच्यासारख्याच अपरिपक्व बुद्धीच्या मंडळीपुढें मांडून त्यांवर छाप ठेवूं पाहतां. आपल्या विचाराला अजून परिपक्वता आली नाहीं तर आपले विचार बाभळीच्या कांट्यासारखे इतस्ततः फेंकूं नयेत, त्या-पासून लोकांना त्रास होईल, असेंही तुमच्या मनाला वाटत नाहीं. जे तुमच्या मताप्रमाणें मतें प्रतिपादीत नाहींत अशांचा तुम्ही उपहास करितां, तो कशाच्या जोरावर ? तुमच्या स्वतःच्या मतांच्या जोरावर म्हणावें, तर तीं ठाम झालीं आहेत असें तुमचें तुम्हांलाच वाटत नाहीं म्हणतां. तुमचा तुमच्या मतदार्ढ्यावर विश्वास नाहीं असें तुमच्याच बोलण्यावरून झालें. तुमचें वय लहान एवढ्यामुळें

तुम्ही कचरत असाल, तर तेंही ठीक नाहीं. अंगीं तेज असलें तर त्याला प्रकाशावयाला वयाची चाड मुळींच नाहीं. हीं असलीं वाक्यें तुमच्या वाचनांत कितीतरी आलीं असतील मीं तुम्हांला सांगायला पाहिजे असें नाहीं."

स्वामींनीं कांहीं मोठा गहन विषय काढला होता, असें नाहीं. स्वामींनीं नुसतें, तुम्हांला जें वाटतें तें प्रतिपादन करण्याच्या आपल्या इष्ट कार्याला कां लागत नाहीं, एवढेंच विचारलें होतें; पण तेवढ्यानें आपल्या मनाच्या अनिश्चित स्थितीची व आत्मविश्वासाच्या अभावाची तीव्र जाणीव होऊन चंद्रशेखर अगदीं निरुत्तर झाला. यानंतर आणखीही कांहीं बोलणें झाल्यावर स्वामींनीं त्याला निरोप देऊन, आणखी कांहीं बोलण्याची इच्छा असली तर पुन: उद्यां या असें सांगितलें; ते आणखी पुढें म्हणाले, "पण आपण पुढें काय करावयाचें याचा विचार ठरवूनच या ना ? हा विचार कांहीं कमी महत्त्वाचा आहे असें नाहीं. मला वाटतें, आपल्या दृष्टीनें तर तो फारच महत्त्वाचा असला पाहिजे. आपल्यासारख्या तरुणांनीं करण्यासारख्या कितीतरी गोष्टी हिंदुस्थानांत करावयाच्या शिल्लक आहेत. आमचे गुरु आम्हांला नेहमीं म्हणत, "या हिंदुस्थान देशांत मला परमेश्वरानें जन्माला घातलें याबद्दल मला किती आनंद होतो. या भूमीच्या उद्धाराकरितां हा देह तर काय, पण आणखी पांचपन्नास देह पतनपावेतों झिजविण्याचें सद्भाग्य आपल्याला लाधलें तर हवें आहे. माझ्या मृत्युसमयीं जर मला शुद्धि राहिली तर, परमेश्वराचें नामस्मरण करीत मी अशी प्रार्थना करीन कीं, जगदीशा! मला स्वर्ग नको, मोक्ष नको, वैकुंठ नको, मला पुन: पुन: देह देऊन या हिंदुस्थानांत जन्माला घाल, आणि त्याच्या उद्धारार्थ श्रम करण्याची बुद्धि दे."*

* कर्मयोग; प्र. ८.

## धर्मश्रद्धा आणि कर्मश्रद्धा.

स्वामींच्या या भाषणाचा चंद्रशेखराच्या मनावर फारच विलक्षण परिणाम झाला; त्यांचे शब्द तर त्याच्या कानांत एकसारखे घुमूं लागले. आपल्या अंगीं आत्मविश्वास व निश्चितता कशी येईल, अशी त्याला तळमळ लागली. त्यानें स्वामींची पुनः गांठ घेतली; त्यांना भेटण्यासाठीं तो मुंबईलाही जाऊन आला. स्वामी म्हणाले कीं, तुझ्यामध्यें धर्मश्रद्धा उत्पन्न झाली कीं, तुझी कर्मश्रद्धा स्थिर होईल, व तिला निश्चित दिशा लागेल. पण स्वामींचें धर्मश्रद्धेचें तत्त्व त्याला चट्‌दिशीं पटेना. धर्मश्रद्धा म्हणजे काय, म्हणून त्यानें स्वामींना विचारलें, तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, "धर्मश्रद्धा म्हणजे सर्वशक्तिमान्, सर्वज्ञानवान् आणि सच्चिदानंद असा कोणी सृष्टिनियंता आहे; व तो जें घडवितो तें सर्व या सृष्टीच्या बऱ्याकरितांच घडवितो;"—या दोन प्रमेयांवर दृढ विश्वास—अत्यंत दृढ, कधींही, केव्हांही न ढळणारा विश्वास. आपण जें काय कर्म करूं तें खात्रीनें सृष्टीच्या बऱ्याकरितांच तो आपल्या हातून घडविणार, त्यापासून बरंच होणार; असं आपणांस वाटलं तरच ती कर्मश्रद्धा आणि तें तसं वाटण्याला मनांत आधीं धर्मश्रद्धा पाहिजे तरच तें तसं वाटेल. नाहींतर कधींही वाटणार नाहीं!" पण ही धर्मश्रद्धा त्याच्या युक्तिवादाला पटेना; आणि त्यावांचून त्याचा निश्चयही होईना. "मला कर्म करावयाला पाहिजे, त्या कर्मानं आमचा हा देश—माझी दृष्टि माझ्या देशापलीकडे आज नाहीं—एक केसभर तरी उन्नत झाला पाहिजे; असं कर्म कोणतं हें शिकविणारा मला कोणीतरी पाहिजे स्वामी मला तें शिकवितील काय?" अशी त्याची स्थिति झाली.† त्याचे वडील गणपतराव म्हणत, "तुला जर कांहीं कार्य करावयाचें आहे तर त्याला हे ईश्वराच्या अस्तित्वाचे नसते प्रश्न कशाला सोडवीत बसला आहेस? यांवांचून आपलें

† कर्मयोग प्र. २२.

कार्य कोठें अडून राहतें ? हे गूढ प्रश्न सुटले तरच आपल्या हातून कार्य होणार, नाहींतर नाहीं, ही स्थिति तरी कां ?....आपल्या मनाला जाचणाऱ्या प्रश्नावर रोजचें जेवण जसें अवलंबून नाहीं, तसेंच आपण आपल्या आयुष्यांतील कर्तव्याबद्दल कां करूं नये ? अमुक एक गोष्ट आपल्याला करावीशी वाटते ना ? घे ती हातांत आणि लाग करायला. वाट कसली पाहतोस?....बाबारे,आपल्याला कर्मश्रद्धा पाहिजे धर्मश्रद्धा करावयाची काय ? अमुक कर्म करावं, त्याच्यापासून आपलं आणखी आपल्या समाजाचं हित आहे, एवढं मनाला भासलं कीं पुरे, त्या कर्माला आरंभ करावा. मार्गांत विघ्नं आलीं, कीं त्यांना धैर्यानें तोंड देऊन तीं दूर सारावीं, आणखी पुढं पाऊल टाकावं. आपलं व्यक्तीचं नुकसान झालं तरी हरकत नाहीं. समाजाचं हित होत आहेना ? ठीक आहे, आपण स्वतः म्हणजे कःपदार्थ ! बहु-संख्येचं जें आत्यंतिक सुख, तें आपलं साध्य, तें साधण्याचा प्रयत्न करणं आपलं कर्तव्य."

गणपतरावांची ही फिलॉसफी चंद्रशेखराच्या युक्तीला पटे. पण त्याला पुनः शंका येई कीं, "आपलं कर्तव्य काय, हें तरी ठरवायचं कसं ? व त्यापासून समाजाचं हित होईल हे तरी कशावरून ? आपल्या कर्मापासून अपेक्षित हित न होतां भलतंच कांहींतरी झालं तर त्याबद्दल जबाबदार कोण?" याही त्याच्या शंकेला गणपतरावांनीं उत्तर दिलें; पण त्याच्या मनाचें समाधान होईना. स्वामींच्या भाषणांत त्याला कांहींतरी विशेष प्रत्यय असा आला होता कीं, त्याच्या योगानें त्याचें चित्त त्यांच्याकडे आकृष्ट झालें. त्यांच्या सहवासांत राहून ते धर्मश्रद्धेचा प्रत्यय काय आणून देतात तो पहावा, व त्यामुळें आपली तळमळ शांत होते कीं काय हें तरी पहावें, असें त्याच्या मनांत वारंवार येऊं लागलें. "स्वामींच्या मनांत कर्मश्रद्धा नव्हती असें नाहीं. पण ते म्हणाले, नुसत्या कर्मश्रद्धेची

इमारत कधींच टिकावयाची नाहीं. ती कोण्यावेळीं लहान मुलांनीं बांधलेल्या पत्त्यांच्या घराप्रमाणें ढांसळेल याचा नेम नाहीं. ती कर्मश्रद्धा धर्मश्रद्धेच्या भक्कम पायावर आधारलेली असली तरच ती कायम होईल. आणि मग जीं कर्मे होतील तीं नीट होतील; त्यांचे परिणाम चिरस्थायी होतील. हें त्यांचें म्हणणें आपल्याला प्रत्ययाला आणून देण्यास जर ते तयार आहेत, तर आपण तरी त्यांच्या सहवासांत चार दिवस कां काढूं नयेत?"* असे परस्परविरोधी विचार मनांत येऊन त्याचें चित्त अधिकच अस्वस्थ झालें. अशा स्थितींत तो आपल्या मामाकडे गेला. तेथें भावानंदाच्या बहिणीची—ताईची—गांठ पडून, भावानंदाचा मठ पाहण्याचा त्याला योग आला. ताईचा, त्या मठाचा आणि त्यांतील मंडळींनीं केलेल्या कार्याचा त्याच्या मनावर फार परिणाम झाला. कार्य करावें तर असें करावें असें त्याला वाटूं लागलें; भावानंदाचें चरित्र त्यानें वाचलें, त्यामुळें त्याच्या मनाला उत्साह व शांति आली; आणि आतां आपण या मठालाच मिळावें असा त्यानें निश्चय केला. हा निश्चय करितांच त्याचें चित्त शांत व स्थिर होऊन एक मोठा प्रश्न सुटला, असें समाधान त्यास वाटलें. मठाला मिळण्याचा निश्चय आपल्या मामे-बहिणीजवळ त्यानें बोलूनही दाखविला; पण इतक्यांत स्वामींचें पत्र आल्यानें चित्त पुनः डळमळलें—आणि तेथेंच ऐन रंगांत ही अप्रतिम कादंबरी चिरकाल अपुरी राहिली आहे!

यापुढें चंद्रशेखराच्या विचारांचीं काय परिवर्तनें झालीं हें कळण्यास कांहींच मार्ग नाहीं. पुढें तो स्वामींच्याकडे गेला कीं नाहीं, त्याच्या मनाचा निश्चय कसा झाला, हें समजणें आतां शक्य नाहीं. तें समजतें तर हा पुढला इतिहासही फार मनोरंजक आणि तितकाच बोधप्रद झाला असता, हें आतांपर्यंतच्या वर्णनावरून वाचकांच्या

* कर्मयोग, प्र. २३.

लक्षांत येईल. पण एवढें मात्र आम्हांस सांगतां येईल कीं, चंद्रशेखराच्या मनांत खरी धर्मश्रद्धा उत्पन्न होऊन तो पुढें त्या मठासच मिळाला असून त्या मठाचें दुसऱ्या संस्थेंत रूपांतर होण्यास तो कारणीभूत झाला, असें पुढें दाखविण्याचा हरिभाऊंचा बेत होता.*

## दुसरीं दोन महत्त्वाचीं पात्रें.

या कादंबरींतील दुसऱ्या दोन महत्त्वाच्या पात्रांबद्दलही थोडेंसें लिहिणें अवश्य आहे. चंद्रशेखराची मामेबहीण लिली हें एक पात्र हरिभाऊंनीं आतांपर्यंत रेखाटलेल्या स्त्रीपात्रांत विशेष विचार करण्यासारखें आहे. हिचा स्वभाव फार विनोदी व आनंदी; 'भयंकर दिव्यां'तील कमलेचा भाऊ गोपाळ याच्याशीं हिचा वाङ्निश्चय झालेला असून ('आजच'-प्र. ५), गोपाळ सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेसाठीं विलायतेस गेला असतां त्यानें तिकडे एका आंग्ल तरुणीशीं लग्न केलें. या बातमीनें लिलीस फार दुःख होऊन ती आपलें पुढील सर्व आयुष्य भावानंदाच्या मठास वाहते, असें हरिभाऊ दाखविणार होते. लिलीला कांहींतरी दुःखकारक बातमी समजली आहे आणि ती फार शोकग्रस्त झाली आहे, इतकाच आतांपर्यंत कथाभाग आला आहे. ४७ व्या प्रकरणांत लिली पुढें पत्र ठेवून दुःखाकुल होऊन बसली असतां, तिच्या तोंडून उद्गार बाहेर पडतात, "आतांपर्यंत सुरळीत चाललेल्या गोष्टीला एकदम धक्का कां बसावा? मग आधीं तरी तशा गोष्टी कशाला व्हाव्या? तशा झाल्या नसत्या म्हणजे कांहींसुद्धां मनाला वाटलं नसतं. मी कोण, आणखी ते कोण? चारचौघांपेक्षां अधिक स्नेह म्हणून थोडंसं वाईट वाटलं असतं; अशा गोष्टी आतां आपल्याकडे व्हायच्या असं म्हणून स्वस्थ

* मासिक मनोरंजनाच्या एप्रिल १९१९ च्या अंकांतील रा• रेंदाळकर यांचा "हरीभाऊंशीं दोन घटका," व प्रस्तुत लेखकाचा "हरिभाऊंच्या आठवणी" हे दोन लेख पाहावे.

बसलें असतें; परंतु....." या उद्गारांचा व तिच्या शोकाचा अर्थ वरील कथाभाग समजला म्हणजे नीट लागतो. दुसरें महत्त्वाचें पात्र नर्मदा म्हणून एका तरुण गतभर्तृका मुलीचें आहे. ही एक सच्छील आणि निराश्रित मुलगी आपल्या मावशीजवळ राहात असतां त्रिविक्रम अथवा विक्रमशील नांवाच्या नाटकी व लुच्च्या तरुण मनुष्याच्या जाळ्यांत सांपडून फशीं पडते. परंतु तशा स्थितींतही, तिचें अधः-पतन केवळ अज्ञानानें झालें असून ती आतां खऱ्या पश्चात्तापानें शुद्ध झाली आहे हें पाहून, आणि तिच्या अंगच्या गुणांकडे लक्ष देऊन, चंद्रशेखर तिच्याशीं विवाह करितो, व तिला पुनः सन्मार्गाला लावतो, असा कथाभाग पुढें येणार होता. अशा रीतीनें पतित स्त्रियांच्या उद्धाराचा एक मोठा सामाजिक प्रश्न, आजपर्यंत आपल्या कादंबऱ्यांत न आणलेला असा हरिभाऊ समाजापुढें ठेवणार होते. भावानंदाच्या मठानें अशा पतित स्त्रियांच्या उद्धारासाठीं एक स्वतंत्र शाखा उघडली असून त्या दिशेनें प्रयत्न चालविले असल्याचा उल्लेख 'कर्मयोगा'च्या ४२ व्या प्रकरणांत आला आहे. विक्रमशील ज्या खुबीनें व युक्तीनें नर्मदेस आपल्या जाळ्यांत पकडून शेवटीं फसवितो, त्याचें वर्णनही हरिभाऊंनीं फार कौशल्यानें केलें आहे. नर्मदा प्रथम त्याच्याशीं अगदीं तुटकपणानें वागते. त्याचा लघळपणा आपल्यास आवडत नाहीं, असें त्याला स्पष्टपणें दाखविते; पण तिच्या मावशीच्या घरची स्थिति तिला अगदींच प्रतिकूळ असल्यामुळें व कोठेंतरी स्नेहाचा ओलावा मिळण्याची आवश्यकता असल्यामुळें, विक्रमशीलानें देऊं केलेल्या बंधु–(?) प्रेमाचा ती स्वीकार करिते. तिचा पुढें त्याच्यावर विश्वास बसतो, व ती त्याला आपला खरा स्नेही समजते. विक्रमशीलानें याचा फायदा घेऊन आपलें नाटकी प्रेम दाखवून तिचें प्रेम संपादन केलें. नर्मदेचें मन हळू हळू त्या लुच्च्याच्या थापांनीं कसें बदलत गेलें, आणि शेवटीं ती पूर्ण विश्रब्ध कशी झाली, या सर्व मानसिक

क्रियेचें (Psychological action) वर्णन फारच कुशलतेनें झालें आहे. असो. नर्मदेला शेवटीं भावानंदाच्या मठानें पतित स्त्रियांच्या उद्धारासाठीं काढलेल्या संस्थेची मदत घ्यावी लागते. तेथें तिची व चंद्रशेखराची गांठ पडून त्यांचा विवाह होतो. अशा दीन व नकळत फसलेल्या स्त्रियांच्या उद्धाराचा हा प्रश्न—जो बहुजनसमाजाला साहजिकपणें फार अप्रिय आहे—अशा धैर्यानें हरिभाऊंनीं हातीं घेतला, यावरून त्यांचे सामाजिक विचार किती व्यापक, भूतदयापूरित आणि पुढें गेलेले होते हें स्पष्ट दिसतें.

## 'कर्मयोगा'चा मुख्य हेतु.

तथापि 'कर्मयोगां'त त्यांचा मुख्य हेतु, हल्लींच्या काळीं आपणांस यशःप्राप्ति हवी असल्यास आपल्या कर्मश्रद्धेला धर्मश्रद्धेची जोड दिली पाहिजे, हें तत्त्व तरुण पिढीवर ठसविण्याचाच असावा असें वाटतें; आणि खरोखरीच हें तत्त्व आमच्या मनावर उत्तम रीतीनें ठसलें जाण्याची आज फार आवश्यकता आहे. सार्वजनिक चारित्र्याला ( Public Life ) आध्यात्मिक स्वरूप कां व कसें दिलें पाहिजे हें हरिभाऊंनीं 'आजच'मध्यें दाखविलें आहे. पण तसें व्हावयाला धर्मश्रद्धा पाहिजे ती कां व कशी हें 'कर्मयोगां'त दाखविलें आहे. या तत्त्वाचें इतकें उत्कृष्ट व सर्वांगसुंदर विवेचन इतरत्र कोठेंही आढळणार नाहीं.

## आमच्या पुढाऱ्यांची धर्मश्रद्धा.

सार्वजनिक कामांत धर्मश्रद्धेची आवश्यकता व महत्त्व किती आहे या गोष्टीची कल्पना आजपर्यंत फार थोड्यांना आली असेल; परंतु यामुळें आमच्या कोणाच पुढाऱ्यांच्या अंगीं ही आजपर्यंत नव्हती असें मात्र नाहीं. किंबहुना ती नसती तर आज जें थोडें-बहुत यश प्राप्त झालें आहे तें होतेंना; तथापि या यशाचा बराचसा वांटा त्या धर्मश्रद्धेकडे आहे, ही गोष्ट मात्र फारच थोड्यांच्या लक्षांत

आली असेल. १८९६ सालीं सरकारची माफी मागितल्याबद्दल कै० ना० गोखल्यांवर त्यांच्या देशबांधवांकडून जो प्रचंड गहजब उडाला तो सर्वांस ठाऊक आहेच. त्यामुळें ना० गोखले कांहीं काल-पर्यंत आपल्या देशबांधवांत इतके अप्रिय झाले होते कीं, उमरा-वतीच्या कॉंग्रेसमध्यें ते भाषण करावयास पुढें आले, तेव्हां लोकांनीं गोंगाट करून "तुम्ही देशसेवा सोडून द्या" असें त्यांना ओरडून सांगितलें, व त्यांचें भाषणही कोणी ऐकून घेईनात. अशा वेळीं कच्च्या दिलाचा माणूस असता तर तो भिऊन व निराश होऊन आपलें कार्य केव्हांच सोडून देता; पण गोखल्यांची देशसेवा करण्याची प्रेरणा ईश्वरी होती. त्यांनीं त्या वेळीं लोकांना स्पष्ट सांगितलें कीं, "At no one's bidding have I taken up my country's service, and at no one's bidding shall I give it up!" हा आत्मविश्वास धर्मश्रद्धेशिवाय येणें शक्य आहे काय? या धर्मश्रद्धेचें फळ त्यांच्या पुढील आयुष्यांत त्यांनीं केलेल्या कार्यावरून दिसून आलेंच. विद्वन्मान्य टिळकांना १९०८ सालीं शिक्षा झाली त्या वेळचा प्रसंग तर याहीपेक्षां अद्भुत आहे. आठ दिवस आपल्यातर्फे सारखे २१ तास भाषण करून, ता. २२ जुलई रोजीं रात्रीं ११ वाजतां त्यांना शिक्षा—आणि तीही ६ वर्षे काळ्यापाण्याची—सुनावण्यांत आली. दुसरा एखादा पुरुष अशा प्रसंगीं खचून गेला असता; पण रा० टिळकांनीं त्या वेळेचा जे उद्गार काढिले ते हिंदुस्थानच्या इतिहासांत चिरकालिक होऊन राहण्यायोग्य आहेत ते म्हणाले, "There are higher Powers that rule the destiny of things; and it may be the will of Providence that the cause which I represent may prosper more by my sufferring than by my remaining free." संकट-काळीं परमेश्वरावर असा दृढ विश्वास धर्मश्रद्धेशिवाय असूं

शकेल काय? "धर्मश्रद्धा म्हणजे सर्वशक्तिमान्, सर्वज्ञानवान् आणि सच्चिदानंद असा कोणी सृष्टिनियंता आहे व तो जें घडवितो तें सर्व या सृष्टीच्या बऱ्याकरितांच घडवितो, या दोन प्रमेयांवर विश्वास; अत्यंत दृढ—कधींही कोऱ्हांही न ढळणारा विश्वास" अशी जी व्याख्या स्वामींनीं 'कर्मयोगां'त केली आहे, त्यांत आणि विद्वन्मान्य टिळकांच्या वरील उद्गारांत काय फरक आहे? तसेंच प०पू० दादाभाई नौरोजी यांनीं कलकत्त्याच्या कॉंग्रेसच्या अध्यक्षपीठावरून भाषण करतांना आपल्या ५० वर्षांच्या अविश्रांत देशसेवेचें पर्यालोचन करून सांगितलें कीं, "माझ्या कार्यांत इतक्या निराशा माझ्या वांट्याला आल्या आहेत कीं, त्यामुळें कोणाचेंही हृदय फुटून तो बंडखोर झाला असता." पण लागलीच यापुढील उद्गार त्यांनीं असे काढले कीं, "But I have not despaired. Not only that I have not despaired, but at this moment, you may think it strange, I stand before you with hopefulness." असे धीराचे व आत्मविश्वासानें पूर्णपणें भरलेले उद्गार कर्मश्रद्धेला धर्मश्रद्धेचा भक्कम पाठिंबा असल्याशिवाय कधींही निघणार नाहींत. परंतु तें कसेंही असलें तरी ही गोष्ट खरी कीं, धर्मश्रद्धेचा आणि कर्मश्रद्धेचा हा निकट संबंध समाजांतील फारच थोड्या लोकांच्या लक्षांत आला आहे. महात्मा गांधींनीं मात्र अलीकडे हें तत्त्व प्रामुख्यानें राष्ट्राच्या नजरेस आणून, आमच्या राजकीय व सामाजिक चळवळींचें सर्वच स्वरूप आमूलाग्र बदलून टाकलें आहे. त्यांची एकनिष्ठ कर्मश्रद्धा पवित्र धर्मश्रद्धेच्या किती भक्कम पायावर उभारली गेली आहे, व त्यामुळें आज त्यांच्या हातून केवढी लोकोत्तर कामगिरी होत आहे हें प्रत्येकास दिसत आहे. तेव्हां ही कादंबरी लिहिण्यांत हें महत्त्वाचें तत्त्व आपल्या कादंबरीच्या द्वारें समाजाच्या पुढें आणून तें तरुण पिढीवर ठसवावें हाच हरिभाऊंचा मुख्य हेतु असावा,

असें स्पष्ट दिसतें. आणि त्यांतहि चंद्रशेखरासारख्या अट्टल नास्तिकाकडून हें तत्व मान्य करविल्यामुळें, सर्व कथानक फारच मनोरंजक झालें असून त्याचा वाचकांच्या मनावर दृढ परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं.

## हरिभाऊंची प्रतिभा.

हरिभाऊंच्या दहा सामाजिक कादंबऱ्यांचें आमच्या अल्पमतीप्रमाणें अल्प समालोचन करून, प्रस्तुत निबंधाच्या शिरोभागीं अवतरणादाखल घेतलेल्या त्यांच्याच एका निबंधांत त्यांनीं चांगल्या विदग्ध वाङ्मयाच्या ज्या तीन कसोट्या दिल्या आहेत, त्यांपैकीं दोन हरिभाऊंच्या ग्रंथसमूहास किती उत्तम प्रकारें लागतात हें दाखविलें. विदग्ध—वाङ्मयाच्या वाढलेल्या साम्राज्याचा फायदा हरिभाऊंनीं स्वतः कसा मुबलक घेतला हें आपण पाहिलें. आपल्या डोळ्यांपुढें एक ध्येय ठेवून, व त्या ध्येयाला पोंचण्याची सोपानपरंपरा आंखून ती क्रमाक्रमानें आपल्या कादंबऱ्यांत मोठ्या कुशलतेनें चित्रित करून, महाराष्ट्रांत गेल्या चाळीस वर्षांत देशोन्नतीचे जे प्रयत्न झाले, त्यांचा संगतवार चित्रपट आपल्यापुढें हरिभाऊंनीं आपल्या दहा कादंबऱ्या मिळून कसा मांडला आहे हेंही आपण पाहिलें. त्यांच्या या दहा कादंबऱ्यांचें आपण थोडक्यांत जें पर्यालोचन केलें, त्यावरून हेंही आपल्या लक्षांत येईल कीं, "एकाद्या क्षुद्र ओढ्याच्या कांठीं असलेल्या झोंपडींत असणाऱ्या माणसापासून तों तहत राजधानींतील चक्रवर्ति महाराजापर्यंत........सर्व विषयांस सजविण्यास समर्थ व त्यावरून कांहींतरी जगास शिकविण्यास उत्कंठित अशी प्रतिभा" त्यांची स्वतःची निःसंशय होती; आणि त्याचप्रमाणें "सर्व उच्च—नीच, उत्तम—अधम वस्तुजाताविषयीं, अणूहून अणू व महताहून महत्, अशा जड व जीव सृष्टीविषयीं व विशेषतः मनुष्यजातीविषयीं प्रेम व आदर, अर्थात् भक्तिमत्ता"

हींही त्यांच्या प्रतिभेचा विषय झालीं असून, सर्व उच्चनीच मनोविकार त्यांच्या चक्षुर्मर्यादेंत आले आहेत. तसेंच "असत्याच्या भासांतून सत्य पुढें करून असताच्या निषेधानें सताची प्रगति" त्यांनीं कशी केली आहे, हेंही आतांपर्यंतच्या सर्व विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत येईल.

## त्यांच्या कादंबऱ्यांचा लोकमतावर परिणाम.

आतां शेवटीं एकच मुद्दा राहिला, तो हा कीं, विदग्धवाङ्मयाचें हरिभाऊंनीं वर्णन केलेलें प्रचंड सामर्थ्य स्वतः हरिभाऊंच्या कादंबऱ्यांत आहे कीं नाहीं, व त्यांचा लोकमतावर परिणाम झाला कीं नाहीं? या प्रश्नाचें उत्तर निश्चयात्मक व प्रत्यक्ष प्रमाणानें दाखवून देणें फार अवघड आहे. कादंबरी हें काव्य आहे, आणि काव्याचा उद्देश मम्मटानें सांगितल्याप्रमाणें "कांतासंमिततयोपदेशयुजे" असा असल्यामुळें, त्याचा लोकांच्या मनावर अमुक वेळीं व अमक्या रीतीनें परिणाम झाला असें निश्चयात्मक अजमावणें पुष्कळदां अवघड असतें. कारण अशा कादंबऱ्यांचा परिणाम हळू हळू व वाचकांना नकळत असा त्यांच्या मनावर होत असतो. विदग्धवाङ्मयाचा लोकमतावर परिणाम नेहमीं अप्रत्यक्षच होत असतो, असें वरील उताऱ्यांतही म्हटलें आहे. तो त्याप्रमाणें झाला आणि होत आहे याची साक्ष हरिभाऊंच्या कादंबऱ्यांची विलक्षण लोकप्रियता, व त्यांच्या सामाजिक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्यापासून चांगल्या वाईट सामाजिक कादंबऱ्यांचा आमच्या वाङ्मयांत हल्लीं जो सुळसुळाट झाला आहे त्यावरून चांगली पटते. समाजस्थिति चाळीस वर्षांपूर्वीं जी होती, त्यापेक्षां आज पुष्कळ पालटली आहे. हा बहुतांशीं जरी झपाट्यानें बदलत चाललेल्या परिस्थितीचा परिणाम आहे, तरी हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचा आबालवृद्ध स्त्रीपुरुषांत—खेड्यापाड्यांतून सुद्धां—झालेला प्रसार पाहतां, या कादंबऱ्यांचा लोकमतावर मुळींच

परिणाम झाला नसेल असें म्हणणें धाडसाचें आहे. परिस्थिति आणि लोकमत हीं नेहमीं अन्योन्याश्रित असतात. परिस्थितीप्रमाणें जसें लोकमत बदलतें, तशी लोकमताप्रमाणें परिस्थितिही बदलते. म्हणून बदललेल्या परिस्थितीचा खुर्षानें फायदा घेण्यास हरिभाऊंच्या कादंबऱ्यांनीं लोकमत तयार होऊन, या बदललेल्या लोकमताचा पुनः परिस्थितीवर उलट परिणाम झाला असावा; पण अर्थातच हा परिणाम उघड अशा प्रत्यक्ष गोष्टींनीं दिसणारा नसून, केवळ कार्यावरूनच अनुमेय असणार, हें उघड आहे.

'मधली स्थिति' ही कादंबरी पुणेंवैभव पत्रांतून जेव्हां प्रथम क्रमशः प्रसिद्ध होऊं लागली, तेव्हां सर्व लोक अगदीं आश्चर्यचकित होऊन गेले, व तत्कालीन वस्तुस्थितीचें हुबेहुब चित्र काढून मराठी कादंबरीला एकदम नवें वळण देणारा हा प्रतिभाशाली लेखक तरी कोण, असें जो तो विचारूं लागला. 'पण लक्षांत कोण घेतो' यांतील नायिका यमू हिच्या दुःखानें दुःखित होऊन, सुधारकांप्रमाणें जुन्या मताच्या लोकांनींही आणि स्त्रियांप्रमाणें पुरुषांनींही अश्रु ढाळले आहेत; आणि 'मायेचा बाजार' ही कादंबरी करमणूक पत्रांतून क्रमशः येत असतां, पद्मेची दुःखकहाणी वाचून एका वाचकाच्या हृदयाला तर इतका द्रव आला कीं, त्यानें हरिभाऊंस एक खरमरीत पत्र लिहून, "इतके निर्दय तुम्ही कसे आहां, व पद्मेनें तुमचें काय घोडें मारलें आहे कीं, पहिल्यापासून शेवटपर्यंत बिचारीला एक लवभरही सुख तुम्हीं लागूं दिलें नाहीं?" असा स्पष्ट सवाल विचारला.

## उपसंहार.

येथें या निबंधाचें कार्य संपलें, ज्या एका दृष्टीनें हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचा विचार या लेखांत करण्याचें आम्हीं योजिलें होतें तें कार्य येथें झालें. या कादंबऱ्यांचा इतर अनेक दृष्टींनीं विचार व

परीक्षण करतां येण्यासारखें असून हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचें पूर्ण अध्ययन करावयाचें तर तें तसें अनेक बाजूंनीं होणें अवश्य आहे. परंतु तें कार्य वेगळ्या निबंधाचें—किंबहुना ग्रंथाचें—आहे. आपल्या कादंबऱ्यांत हरिभाऊंनीं दाखविलेलें मनुष्यस्वभावाच्या वर्णनाचें कौशल्य; त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांच्याद्वारें वाचकांपुढें मांडलेलीं सामाजिक व राजकीय मतें; त्यांचें संविधानक रचण्याचें चातुर्य; त्यांची सूक्ष्म व मार्मिक निरीक्षणशक्ति; भिन्न भिन्न मनोविकारांच्या चालनेचें व प्रगतीचें हुबेहूब चित्र उठविण्याची कुशलता; गंभीर आणि सूक्ष्म विनोद; उत्तान आणि अश्लील शृंगाराच्या अभावानें त्यांच्या कादंबऱ्यांना आलेला नितांत शुद्धपणा; त्यांनीं वर्णन केलेलीं भिन्न भिन्न स्त्रीपुरुष पात्रें; आपल्या कादंबऱ्यांतून त्यांनीं मुलांचीं पात्रें रेखाटलीं आहेत त्यांवरून त्यांचें दिसून येणारें मुलांच्या मनोविकासाचें सूक्ष्म निरीक्षण व अध्ययन; अशा एक कीं दोन, अनेक गोष्टींनीं मराठी वाङ्मयास चिरकाल भूषणभूत होणाऱ्या व अभिमान वाटणाऱ्या या कादंबऱ्यांचा विचार करणें, व त्यावरून हरिभाऊंचा प्रतिभाशाली कादंबरीकार या नात्यानें एकंदर वाङ्मयांत काय दर्जा लागतो हें ठरविणें अवश्य आहे. तसेंच त्यांच्या कादंबऱ्यांतील कांहीं दोष—या जगांत दोषरहित असें कांहींच नसतांना हरिभाऊंच्या कादंबऱ्या तरी त्याला अपवाद कशा होऊं शकतील?—दाखवून, त्यांच्या कादंबऱ्यांवर व त्यांतील त्यांच्या मतांवर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करणेंही जरूर आहे. पण तें कार्य एका लहानशा लेखांत होणें शक्य नसून तें येथें करण्याचा आमचा हेतुही नव्हता. हरिभाऊंनीं आपल्या कादंबऱ्या समाजाचें नुसतें मनोरंजन करण्यासाठीं लिहिलेल्या नसून, समाजाला शिक्षण देण्याच्या, लोकमताला वळण लावण्याच्या, समाजापुढें विशिष्ट ध्येय ठेवून त्या ध्येयाला प्राप्त होण्यासाठीं विधायक सूचना

समाजापुढें मांडण्याच्या पवित्र हेतूनें या सर्व कादंबऱ्या लिहिल्या गेल्या असून, तो हेतु प्रत्येक कादंबरींत क्रमाक्रमानें कसा उत्क्रांत केला आहे; व त्यामुळें त्यांची प्रत्येक कादंबरी एकमेकींपासून वेगळी, स्वतंत्र अशी नसून, सर्व कादंबऱ्या मिळून एक संपूर्ण माला कशी आहे हें दाखवावयाचें, एवढेंच या लेखाचें कार्य होतें. आतां हा लांबलचक निबंध संपवून वाचकांची रजा घेण्यापूर्वी एक महत्त्वाची गोष्ट येथें सांगणें अवश्य आहे. ती गोष्ट ही कीं, सिंहावलोकनन्यायानें गतकालांतील बारीकसारीक गोष्टी कालाच्या उदरांत लुप्त होऊन ठळक व मुख्य गोष्टी तेवढ्या यथादर्शन दृष्टीला (perspective) दिसतात. म्हणून प्रत्यक्ष त्या कालांत वावरणाऱ्यांना आपल्या सभोंवतालच्या परिस्थितीच्या प्रवाहा--( Forces ) मध्यें जी सुसंगता दिसली किंवा भासली नसेल, ती सुसंगता त्यांच्या पुढील पिढींतल्या मंडळींना गतकाळांत perspective च्या या नियमामुळें दिसणें शक्य आहे. या कारणास्तव आजच्या पिढींतील वाचकांना हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतून चित्रित केलेल्या राजकीय व सामाजिक चळवळींच्या इतिहासांत जी सुसंगतता व पौर्वापरसंबद्धता दिसेल, ती, हरिभाऊंच्याशीं समकालीन असणाऱ्या, त्यांच्या वातावरणांत वाढलेल्या आणि त्यांच्याशीं साहचर्यानें, अगर त्यांचा प्रतिपक्ष घेऊन त्यांनीं वर्णिलेल्या सार्वजनिक चळवळींतच काम केलेल्या वाचकांना कदाचित् वाटणार नाहीं. इतकेंच नव्हे तर, पुढें परिणत होणाऱ्या कांहीं क्रिया हरिभाऊंनीं भविष्यदृष्टीनें जाणल्या हें आमचें विधानही त्यांच्या खांद्याशीं खांदा लावून काम केलेल्या त्यांच्या सहकारी आणि प्रतिपक्षी स्नेह्यांना--ज्यांना हरिभाऊंचे गुणदोष, त्यांच्या साधनांची आणि गुणांची परिमितता, व त्यांच्या कालाची नियंत्रितता प्रत्यक्ष माहिती असण्याचा अधिक संभव आहे त्यांना--साहजिकपणें अतिशयोक्तीचें वाटेल. हरिभाऊंनीं आपल्या पहिल्या कादंबऱ्या ज्या

काळांत लिहिल्या तो काळ आज गेला; त्या वेळचे वादविवाद, त्या काळचे तीव्र मतभेदाचे प्रश्नही आज जाऊन त्या जागीं नवे प्रश्न आले; तेव्हां या नव्या काळांतल्या वाचकांस हरिभाऊंच्या कादंबऱ्या कशा भासतील, या दृष्टीनें या जुन्या काळांतल्या वाचकांनीं या निबंधाकडे पहावें अशी त्यांना विनंति आहे. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांची आम्हीं लाविलेली संगति चुकीची असूं शकेल; व या प्रश्नाला दुसरी बाजू असण्याचाही संभव आहे. म्हणून या आमच्या निबंधानें ती दुसरी बाजू किंवा दुसरीं भिन्न मतें पुढें येऊन आमचें मत चुकीचें ठरेल. पण तें तसें झालें तरी ती एक इष्टापत्तिच आहे. कारण, त्यामुळेंही आमच्या या निबंधाचें मुख्य कार्य होणार आहे, तें हें कीं, हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचें त्यामुळें अधिक पद्धतशीर वाचन व अध्ययन होऊन हरिभाऊंची खरी योग्यता समाजास अधिक चांगल्या रीतीनें समजून येईल. तें कांहीं असलें तरी ही मुख्य गोष्ट कोणासही नाकबूल करितां येणार नाहीं कीं, हरिभाऊंनीं मराठी वाङ्मयांत चिपळूणकर-आगरकरां-प्रमाणेंच मोठी क्रांति घडवून आणली असून, त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांच्या द्वारें वाङ्मयांत जी भर टाकली आहे ती चिरस्थायी व अनुकरणीय असून इतर कोणत्याही भाषेशीं तुलना करितांना अभिमानानें बोट दाखवितां येण्यासारखी आहे. आपल्या ग्रंथांच्या व लेखांच्या द्वारें हरिभाऊंनीं समाजाच्या लोकमतावर जो परिणाम घडवून आणला असेल तो क्षणभर बाजूला ठेविला तरी, आज तीस वर्षें सतत वाङ्मयाची सेवा करून जो मोठा ग्रंथसंग्रह त्यांनीं निर्माण केला आहे, त्याद्वारें त्यांनीं देशाची, समाजाची आणि मातृभाषेची मोठीच सेवा केली आहे यांत संशय नाहीं. म्हणून शेवटीं, भावानंदाचा शिष्य रामानंद याच्याच शब्दांत म्हणावयाचें तर, हरिभाऊ म्हणजे “ ज्यानें कांहीं करून दाखविलें व उदाहरण

घालून दिलें असा माणूस होता;'' आणि म्हणून त्यांच्या कार्याचें—कादंबऱ्यांचें—मर्म आमच्या अल्पमतीप्रमाणें वाचकांच्या पुढें ठेवून, एकवार

'Behold the Man!'

एवढेंच म्हणतों.

# " मी " या कादंबरीवर चार विचार.

( फर्गसन् कॉलेजांतील " साहित्यमंडळा"पुढें ता. ६-२-२२ रोजीं वाचलेला निबंध. )

हरिभाऊंच्या निधनानें महाराष्ट्राची आणि महाराष्ट्र वाङ्मयाची केवढी मोठी हानि झाली आहे, याची महाराष्ट्रांतील बऱ्याच जणांस अद्यापि योग्य कल्पना झाली नाहीं, असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें; कारण प्रतिभेनें आणि विद्वत्तेनें हरिभाऊंपेक्षां कमी अशा कित्येक कवींच्या आणि लेखकांच्या दरवर्षी पुण्यतिथीवर पुण्यतिथि होत असतां या चार वर्षांत बिचाऱ्या हरिभाऊंची, मराठी कादंबरीच्या आद्यजनकाची, ज्या लेखणींतून " पण लक्षांत कोण घेतो ? " यासारखी अप्रतिम कादंबरी उतरली त्या लेखणीची, ज्या दिव्य दृष्टीनें "मी" मधील उज्ज्वल व उदात्त ध्येयें वीस वर्षांपूर्वीपासून समाजास दाखविलीं त्या प्रतिभावान् दृष्टीची, या चार वर्षांत एकासही आठवण होऊं नये हें आश्चर्य नव्हे काय ? * हरिभाऊंनीं वाङ्मयांत करून ठेविलेली कामगिरी जर निःसंशय अमोल आणि चिर-स्थायी आहे, तर त्यांच्या स्मृतीविषयीं ही अनास्था कां दिसावी ? याचें कारण कित्येक असें म्हणतील कीं, त्यांच्या कार्याचें खरें महत्त्व आम्हांस अद्यापि समजलें नाहीं. त्यांच्या कादंबऱ्या पुष्कळ लोक वाचतात, पण त्यांत कांहीं महत्त्व आहे, विचार करण्यासारखें कांहीं आहे, या दृष्टीनें वाचण्याऐवजीं केवळ चार घटका कशा तरी घालविण्यासाठींच वाचतात. हें खरें असेल तर हरिभाऊंच्या कादंबऱ्या वरच्या परीक्षांना नेमून विश्वविद्यालयानें एका प्रकारें हरिभाऊंवर उपकारच करून ठेविले आहेत असें म्हटलें पाहिजे. कारण यामुळें तरी त्यांनीं

---

* १९२२ च्या मार्च महिन्यांत नूतन मराठी विद्यालयानें हरिभाऊंची पुण्यतिथि प्रथमच साजरी केली त्याच्या आधींचें हें विधान आहे.

निर्मिलेल्या वाङ्मयाचा अधिक अभ्यास होऊन समाजास त्यांची योग्यता समजून येईल.

परंतु समाजाच्या या औदासीन्याची मीमांसा मी वेगळ्या प्रकारें करितों. आपला गुरु मिल्ल याजबद्दल लिहितांना लॉर्ड मोर्ले यांनीं पुढील उद्गार काढले आहेत. ते म्हणतात, "लोकनायक दोन प्रकारचे असतात. कांहीं लोकनायक आपल्या भव्य व तेजःपुंज अधिकारसामर्थ्यानें लोकांवर आक्रमण करितात. हृत्पटलावर उमटलेला यांच्या उपदेशाचा ठसा पुसून टाकतां येत नाहीं. आकाशवाणीप्रमाणें यांचे शब्द एकसारखे कानांत घुमत असतात. आणि मंत्रद्रष्ट्या ऋषींप्रमाणें यांच्या म्हणण्याविरुद्ध तोंडावाटे ब्र काढण्याची छाती होत नाहीं. पण दुसरे कांहीं लोकनायक असे असतात कीं, त्यांची अधिकारयुक्त वाणी कधीं कानींहि पडत नाहीं. आपली व्यक्तिविषयक जाणीव यत्किंचितही न पटूं देतां हे न कळत आपल्या अंतरंगांत प्रवेश करितात, व तेथून आपलीं मनःसूत्रें हालवूं लागतात. गुरूविषयीं वाटणारी दृढ निष्ठा व अचल विश्वास, या सद्भावना उद्दीपित न करितां हे लोकनायक जनमतांत स्वयं अन्वेषण करून सत्यास आपलेंसें करून घेण्याच्या उच्चतर भावनेस जागृत करितात. मिल्लची गणना या दुसऱ्या वर्गांत करावी लागेल; आणि म्हणूनच आपल्या गुरूनें एकाद्या सार्वभौम राजाप्रमाणें वाजतगाजत आपल्या शासनाची घोषणा करावी असें वाटणाऱ्या लोकांस तो अगदीं तेजोहीन भासतो." हरिभाऊंच्या बाबतींत विचार करितांना मोर्लेच्या वरील उद्गारांची आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं. हरिभाऊंनीं आपलें कार्य आपल्या कादंबऱ्यांच्या द्वारें केलें असल्यामुळें, त्यांचा समाजावर जो परिणाम झाला तो समाजास न कळत व सावकाश झाला. यामुळें आपल्यांत असा फरक झाला असून त्याला बऱ्याच अंशीं हरिभाऊ कारण आहेत हें समाजाच्या लक्षांत आलें नाहीं.

हें खरें असेल तर हरिभाऊंची गणना मिलबरोबर दुसऱ्या प्रकारच्या लोकनायकांत केली पाहिजे. आगरकरांच्या स्पष्टोक्तिरूपी तोफेचा धडधडाट किंवा चिपळूणकरांच्या वक्रोक्तिरूपी तरवारीचा लखलखाट हरिभाऊंमध्यें नाहीं. त्यांच्या लेखनपद्धतीचें, आणि तद्द्वारें वाचकांचें मन आकर्षण करून घेण्याचें त्यांचें जें कौशल्य आहे, त्याचें मोर्लेच्या शब्दांत "A moderate and impersonal kind of persuasion" असें वर्णन करितां येईल. अथवा काव्यप्रकाशकार मम्मटाच्या शब्दांत असें म्हणतां येईल कीं, हरिभाऊंचे शब्द प्रभुसंमित अथवा सुहृत्संमित नसून कांतासंमित आहेत. हरिभाऊ आपल्या वाचकांच्या अंतरंगांत भावनेपेक्षां विचारांच्या मार्गानें हळूच शिरतात, आणि क्रमाक्रमानें त्याच्या विचाराला असें वळण लावतात कीं, या विचारांच्या उत्क्रमणांतून आपण हरिभाऊंच्या अगर दुसऱ्या कोणाच्या साहाय्यानें गेलों नसून, स्वतःच आपण आपल्या इच्छेनें गेलों आहोंत असें त्याला पुढें वाटूं लागतें. ज्या गुरूनें आपणाला नकळत सत्यतत्त्वापुढें आणून उभें केलें असतें त्या गुरूची आठवण आपण अशा वेळीं विसरतों; व आतांपर्यंतचा हा मार्ग आपण स्वतःच साहजिक उत्क्रांतीनें शोधून काढला आहे असें आपणांस वाटतें. समाजाची हरिभाऊंबद्दलची आजची अनास्था वर म्हटल्याप्रमाणें यामुळेंच असावी, आणि या अनास्थेचें अगर औदासीन्याचें हेंच कारण असलें, तर हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचें कार्य कल्पनेबाहेर यशस्वी झालें आहे असें म्हटलें पाहिजे. कारण, मोर्ले यांनीं म्हटल्याप्रमाणें, अशा प्रकारच्या लोकनायकांचा हेतु लोकांचें लक्ष आपल्या स्वतःच्या व्यक्तीकडे लागण्यापेक्षां आपण पुढें ठेविलेल्या ध्येयाकडे लागावें हाच असतो. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांच्या वाचनापासून होणाऱ्या आनंदापुढें जर हरिभाऊ या व्यक्तीची आठवण पुसून जात असेल तर हा उच्च व स्वार्थरहित हेतु साध्य झाल्याची

आणखी दुसरी साक्ष कोणती पाहिजे ? पण तें कसेंही असलें तरी, आजची सामाजिक व राजकीय विचारक्रांति होण्यास ज्या थोर पुरुषांचे श्रम कारणीभूत झाले असतील त्यांचे परिश्रम ओळखून त्यांचे ऋणी होणें अवश्य असतां, या आपल्या शिरावरील ऋणभारांत हरिभाऊंचा भाग किती महत्त्वाचा आहे इकडे आपण दुर्लक्ष करणें उचित नाहीं. माझ्या अल्प मतीनें आणि दृष्टीनें मला हरिभाऊंची या बाबतींतील सेवा फारच बहुमोल वाटते; आणि विचारक्रांतीच्या काळांत त्यांनीं समाजाला नकळत केलेली ही महत्त्वाची कामगिरी, त्यांचा भक्त म्हणून म्हणा किंवा शिष्य म्हणून म्हणा वाचकांसमोर मांडणें मी माझें आद्य कर्तव्य समजतों.

कोणत्याही कलेचा, आणि त्यांत विदग्ध वाङ्मयही आलेंच, हेतु केवळ आनंदोत्पादन नसून, सत्याचा आणि नीतीचा सानंद बोध हा प्रधान हेतु आहे, असें हरिभाऊंचें दृढ मत होतें. पण एवढेंच कीं, हें सत्य पुढें करावयाचें तें असत्याच्या आभासांतून; ही सताची प्रगति करावयाची, ती असताच्या निषेधानें. त्यांनीं आपल्या सर्व कादंबऱ्या लिहिल्या त्या एक विशिष्ट हेतु मनांत धरून लिहिल्या असून त्यांच्या दहा सामाजिक कादंबऱ्यांतून एक तत्त्व कसें सूत्रित झालें आहे, हें मीं एका वेगळ्या निबंधांत दाखविलें आहे. प्रस्तुत निबंधाचा विषय जी “ मी ” ही कादंबरी, तिचें खरें मर्म समजण्यास, तिचें ह्या दहा कादंबऱ्यांतील मालेंत कोणतें स्थान आहे तिकडे लक्ष देणें जरूर आहे. इंग्रजी शिक्षणाचे पहिले दुष्परिणाम निघून गेल्यावर शिक्षितांचे डोळे उघडून त्यांचें आपल्या देशाच्या हीन स्थितीकडे लक्ष लागलें, आणि ती स्थिति सुधारण्यासाठीं प्रत्येकजण आपापल्यापरी उपाय सुचवूं लागला. तत्कालीन दोन भिन्न दृष्टिकोनांप्रमाणें त्या वेळीं दोन भिन्न पंथ उत्पन्न झाले. एकाचें म्हणणें कीं, आपली समाजरचना बिघडल्यामुळें राजकीय

पारतंत्र्याचें जोखड आपल्या मानेवर बसलें, म्हणून समाजसुधारणा केल्याशिवाय राजकीय सुधारणा करणें व्यर्थ आहे. दुसरा पक्ष म्हणे कीं, ज्या वेळीं आम्ही राजकीयदृष्ट्या स्वतंत्र होतों, त्या वेळींही आज आहे हीच समाजरचना होती; म्हणून समाजरचनेचा देशाच्या अवनत स्थितीशीं कार्यकारणसंबंध लावणें युक्त नाहीं. राजकीय पारतंत्र्याचा स्वतंत्र रीतीनेंच विचार केला पाहिजे. तें दूर करण्याच्या उपायांचा सामाजिक सुधारणेशीं संबंध नाहीं. अशा रीतीनें दोन पक्ष त्या वेळीं उत्पन्न झाले. या दोन्ही पक्षांची उत्पत्ति हरिभाऊंनीं आपल्या 'गणपतराव' व 'यशवंतराव खरे' या दोन कादंबऱ्यांत वर्णिली आहे. या दोन पक्षांच्या परस्परांवरील आघातप्रत्याघातांत दोहोंच्या मधला मार्ग काढणारा नवीन पक्ष निर्माण झाला; किंवा पक्ष निर्माण झाला असें म्हणण्यापेक्षां, दोन्ही बाजूंस थोडें थोडें सत्य असून दोन्ही बंधनें—सामाजिक आणि राजकीय—शिथिल केल्याखेरीज देशोन्नति होणार नाहीं, अशा प्रकारची नवीन कल्पना उत्पन्न झाली. त्या संधीचें "मी" हें चित्र असून अशा प्रकारचें कार्य करणें किती दुर्घट आहे; कारण इकडून समाजाची व तिकडून सरकारची अप्रियता अशा दुहेरी पेंचांत हें कार्य करावयाचें; म्हणजे तें अत्यंत स्वार्थत्यागाशिवाय, आत्मत्यागाशिवाय होणार नाहीं; आणि तें कसें, हें हरिभाऊंनीं या कादंबरींत दाखविलें आहे; आणि म्हणूनच त्यांच्या सर्व कादंबऱ्यांत या कादंबरीचें महत्त्व विशेष आहे. आपण या कादंबरीकडे आजच्या दृष्टीनें पाहिलें तर त्यांत नवीन असें तत्त्व आपणास कदाचित् कांहीं वाटणार नाहीं. कारण "मी"मध्यें हरिभाऊंनीं ज्या कल्पना नवीन म्हणून प्रथमच दर्शविल्या आहेत, त्या आज इतक्या सर्वमान्य झाल्या आहेत कीं, त्यांत आज कांहीं नाविन्य उरलें नाहीं. ही गोष्ट स्वतः हरिभाऊंनींही पुढें वीस वर्षांनंतर

लिहिलेल्या " मी "च्या प्रस्तावनेंत मान्य केली आहे. पण ज्या काळीं " मी " ही कादंबरी लिहिली गेली, त्या काळांतील कल्पनांचें गोड फळ आजची स्थिति आहे हें लक्षांत ठेविलें म्हणजे या कादंबरीचें महत्त्व लक्षांत येईल. परंतु हा विचार सोडून दिला तरी आजच्या काळींसुद्धां " मी " या कादंबरीचें दुसरें एक महत्त्व आहे; व तें म्हणजे त्यांतील आत्मत्यागाची प्रखर तेजस्विता. आज जरी देशोन्नतीसाठीं निःस्वार्थीपणानें प्रयत्न करणाऱ्या कांहीं संस्था निघाल्या आहेत, तरी " मी "मध्यें हरिभाऊंनीं आत्मत्यागाचें जें ध्येय वाचकांपुढें ठेविलें आहे, तें हल्लींच्या काळींसुद्धां तितक्या पूर्णपणें आमच्या आचरणांत आलें नाहीं. ज्याला देशकार्य करावयाचें त्याला किती पूर्णपणें आत्मत्याग करणें जरूर आहे, हें हरिभाऊंनीं " मी " मध्यें दाखविलें आहे. हें पूर्ण आत्मत्यागाचें उदाहरण आज महात्मा गांधींनीं प्रत्यक्ष घालून दिल्यामुळें देशकार्याला आजच्या इतकी आत्मत्यागाची जरुरी पूर्वीं कधीं उत्पन्न झाली नव्हती; म्हणून केवळ यामुळेंच आजच्या पिढीला " मी " सारख्या उदात्त कादंबरीचें अध्ययन व चिंतन अत्यंत अवश्य आहे. असो.

आतां या कादंबरीचें परीक्षण आपल्यापुढें कोणत्या दृष्टीनें करावें, हा माझ्यापुढें मोठा प्रश्न आहे. कला या दृष्टीनें कादंबरीचा विचार केला तर कथानकरचनेचें चातुर्य, सुसंगतता, मानवी स्वभावाच्या वर्णनाचें कौशल्य, या सर्वांचा विचार करावा लागून, शेवटीं यथार्थवाद म्हणजे Realism आणि यथेप्सितवाद म्हणजे Idealism या वादांतही शिरणें भाग पडेल. पुढें अंतरंगाचें परीक्षण करितांना प्रसंगोपात्त ग्रंथकर्त्यानें जीं मतें प्रतिपादिलीं आहेत; व आपल्या मतें जी कार्यदिशा बरोबर व अनुकरणीय म्हणून वाचकांपुढें मांडली आहे, तिचेंही परीक्षण करावें लागेल; व त्यांत

अनेक वाद उपस्थित होतील. राजकीय व सामाजिक दृष्ट्या परीक्षण करावें म्हटलें तर हे वाद अधिकच वाढतील. तेव्हां या अडचणींतून सुटण्यास मला एकच मार्ग दिसतो तो हा कीं, टीकाकारांचीं to estimate म्हणजे निर्णय करणें, आणि to interpret म्हणजे समर्थन करणें, अशीं जीं दोन कर्तव्यें आहेत त्यांपैकीं दुसऱ्या कर्तव्याचा अवलंब करणें. कादंबरीचें estimate करावयाचें म्हटलें, तर कादंबरीलेखनाचे जे नियम आहेत ते प्रथम सांगून त्या कसाला ही कादंबरी कितपत उतरते; टीकाशास्त्राचे जे सर्वमान्य नियम आहेत ते हरिभाऊंनीं बरोबर पाळले आहेत कीं नाहींत या गोष्टींचा विचार केला पाहिजे. इतक्या खोल शास्त्रीय टीकेंत शिरण्यास मजपेक्षां आपले वाङ्मयाचे प्रोफेसर अधिक समर्थ आहेत. शिवाय हरिभाऊंविषयीं माझ्या मनांत जो नितांत आदर वसत आहे, त्यामुळें कदाचित् मी या निःपक्षपातीपणाच्या कामाला अयोग्य ठरेन. टीकाकाराचें दुसरें कर्तव्य जें interpret करण्याचें तें मात्र करावयास मी तयार आहें. आपल्याला एकादा ग्रंथ उत्कृष्ट कां वाटला; त्यांतील कोणता भाग आपल्या मनाला विशेष पटला; त्यांतील कोणत्या गुणाचें आपल्याला विशेष स्वारस्य वाटलें; हें वाचकांना सांगून त्यांना आपल्या आनंदाचे अंशभागी करणें हेंही टीकाकाराच्या कर्तव्यांतच मोडतें. हेंच Interpretation किंवा समर्थन होय. शिवाय एका लेखांत या सर्व बाजूंनीं विचार करणेंही शक्य नाहीं. तथापि मीं ज्या मार्गानें या कादंबरीचा विचार करण्याचें योजिलें आहे त्यांत प्रसंगानुरोधानें इतर अंगांचेंही दिग्दर्शन होईल अशी मला आशा आहे.

कवि किंवा कादंबरीकार जेव्हां एकादें ध्येय किंवा सत्य स्वतःशीं निश्चित करून तें जगापुढें मांडण्याचा निश्चय करितो, तेव्हां तें शक्य तितक्या मोहक स्वरूपांत मांडलें जावें असा त्याचा हेतु

असतो. म्हणून तो आपल्या स्वतःची नवीन सृष्टि कल्पून त्यांत आपल्याला हवीं तशीं माणसें निर्मून त्यांच्या द्वारें त्या कल्पना वाचकांच्या मनावर बिंबवितो. अर्थात् जें आज समाजांत नाहीं पण जें असावें असें त्यास वाटतें, तें जणूं कांहीं आज समाजांत आहेच, किंवा निदान तें रूढ करण्याबद्दल प्रयत्न तरी चालला आहे, अशा रीतीचा समाज तो रंगवितो. म्हणजे यावरून कादंबरी हा समाजाचा आरसा नव्हे हें अर्थातच सिद्ध झालें. समाज आहे तसा दाखविणें हें काम इतिहासाचें आहे; त्यासाठीं काव्याचा आणि कादंबरीचा अवतार नाहीं. काव्य आणि कादंबरी ही कला आहे; आणि या कलाप्रधान वाङ्मयाबद्दल ओस्कार वाईल्डनें म्हटलें आहे कीं, "Literature always anticipates Life. It does not copy it, but moulds it to its purpose." म्हणजे कवि संसाराचें वर्णन यथार्थ करीत नाहीं तर यथेप्सित करितो. हें वाक्य अगदीं सत्य आहे. जें सत्य समाजाला दिसलें नाहीं, पण जें त्यास दिसलें पाहिजे अगर ज्या सत्याकडे समाज वळत नाहीं पण त्यानें वळणें अवश्य आहे, तें सत्य कादंबरीकार दाखवितो, म्हणजे तितक्या प्रमाणानें तो संसारचित्र यथेप्सित रंगवितो. पण जें सत्य बिंबवावयाचें आहे तें आहे त्या साधनांतूनच उत्क्रांत करून दाखवावयाचें असतें, म्हणजे त्याला आपल्या हेतूसाठीं "वस्तुस्थिति"चाच पाया घ्यावा लागतो. पण ही वस्तुस्थिति तो अगदीं आहे तशीच घेत नाहीं. म्हणजे तिचें नुसतें यथार्थ वर्णन करीत नाहीं, तर आपल्याला इष्ट तितकेंच, थोडेंसें, वाचकांची सत्यत्वप्रतीति न जाईल इतकें तिला वळण देतो. म्हणजे तिला आपल्या हेतूपुरतें यथेप्सित करतो. यावरून कादंबरीला वस्तुस्थितीचा आधार असणें अगत्याचेंच आहे हें लक्षांत येईल; व हाच खरा 'यथार्थवाद' होय. इतिहासांत ज्याप्रमाणें सत्य, निव्वळ सत्यच (Truth, and

nothing but the truth) लागतें त्याप्रमाणें येथें नाहीं. येथें सत्य तर हवेंच, पण त्याला Selection आणि Idealization –निवड आणि यथेप्सित रचना–यांचें आस्तरण पाहिजे. इतिहासाला हें कधींही चालणार नाहीं. कादंबरींतील सत्याला जर निवड आणि कल्पकता यांचा जोड दिली नाहीं, तर तें सत्य उग्र होऊन, त्याचें सानंदत्व नाहींसें होईल व त्याचें काव्यत्वच उरणार नाहीं. Realism म्हणजे वस्तुस्थितित्व किंवा यथार्थत्व या दृष्टीनें केव्हांही त्याज्यच होय. Realism चा खरा अर्थ इतकाच कीं, सत्य ज्या पार्श्वभूमीवर रंगवावयाचें, ज्या साधनांनीं पुढें मांडावयाचें ती पार्श्वभूमी व तीं साधनें सामान्य वाचकांच्या रोजच्या आयुष्यक्रमांतील आचार-विचारांशीं साधारणतः विसंगत असूं नयेत. हाच अर्थ एका इंग्लिश टीकाकारानें पुढील अर्थपूर्ण शब्दांनीं व्यक्त केला आहेः—

"Again there is the truth which we require in creative literature; whether Fiction or Poetry, this is the truth of Art; for the characters and events of the poet and novelist are typical, not actual. The scenes which the poet or novelist describes, and the characters which he draws, have no existing originals. The originals are the creations of his mind, as well as the representations; and the proper truth which belongs to fiction is the truth of idea; that is to say, *the generalized experience of the individual author must correspond to the generalized experience of the community or of the race.*" या अवतरणांतील शेवटल्या वाक्यांत माझ्या मतें Realism ची खरी व्याख्या उत्कृष्टपणें करण्यांत आली असून ती लक्षांत ठेवून आपण हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांकडे पाहिलें, तर

त्यांचें खरें महत्त्व व हरिभाऊंचें खरें कौशल्य ओळखणें आपणास अवघड जाणार नाहीं.

रिआलिझम्–यथार्थवाद–म्हणजे काय, हें आतांपर्यंत सांगितलें. आतां याचा आनंददायक परिणाम होण्यास selection व idealisation म्हणजे निवड आणि यथेप्सित रचना हे दोन गुण लागतात म्हणून वर सांगितलें. हरिभाऊंनीं स्वतःच एकदां म्हटल्याप्रमाणें, " कादंबरीकाराचें कौशल्य हें आहे कीं, अनेक प्रकारचे मनुष्यस्वभाव व प्रसंग पाहून, त्यांचा आपल्या हेतूला पोषक व वाचकांना मनोरंजक अशा रीतीनें उपयोग करणें." या अनेक प्रसंगांपैकीं कोणते प्रसंग आपल्या हेतूला पोषक आहेत हें ओळखून त्याच प्रसंगांचा उपयोग करणें, ही निवड; आणि तो उपयोग वाचकांना मनोरंजक अशा रीतीनें करणें, ही रचना. कादंबरीकाराला हरिभाऊंनीं उत्कृष्ट आचाऱ्याची किंवा जवाहिऱ्याची उपमा दिली आहे. ते म्हणतात, " आपणांला उपयोगी पडतील ते हिरे निवडून जवाहिऱ्या त्यांची अशी सुंदर रचना करतो कीं, ते हिरे परस्परांच्या सान्निध्यानें उठून दिसून त्या दागिन्यानें पाहणाराचें मन मोहून गेलें पाहिजे." त्यांत निवड आणि रचना हीं दोन्ही आलींच; यावरून या दोन गुणांना कादंबरीलेखनाच्या कलेंत किती महत्त्वाचें स्थान आहे, हें लक्षांत येईल. या दोन गुणांविना जर रिआलिझम असेल तर त्याचें स्वारस्य सर्व निघून जाईल; इतकेंच नव्हे तर त्याचें स्वरूपही आपणांस घाणेरडें व किळसवाणें वाटेल; आणि असें होतांक्षणींच त्यांतील कलात्व संपतें. सौंदर्याचें आविष्करण ( Expression ) म्हणजे कला होय. आणि आनंद हा सौंदर्याचा आत्मा आहे. ज्या ठिकाणीं आनंद नाहीं तेथें कलाही नाहीं, अशी ही कारणपरंपरा आहे. असो. आतां हरिभाऊंच्या बहुतेक सर्वच सामाजिक कादंबऱ्यांप्रमाणें " मी "मध्यें सुद्धां यथार्थत्व, निवड

आणि रचना या तीन गुणांचा किती सुंदर मिलाफ झाला आहे, हें आपणांस पुढील विवेचनावरून दिसेलच.

देशोन्नति ही केवळ सामाजिक सुधारणा किंवा निव्वळ राजकीय सुधारणा यांवर अवलंबून नाहीं. ही अनेकांगी असून हें अनेकांगी कार्य करण्यास पूर्णपणें आत्मत्याग करणारीं माणसें पुढें आलीं पाहिजेत, या दोन गोष्टी वाचकांपुढें मांडण्यासाठीं "मी" ही कादंबरी आहे हें आपण पाहिलें. हीं तत्त्वें पुढें मांडण्यासाठीं हरिभाऊंनीं काय काय साधनें उपयोजिलीं आहेत हें आतां पाहूं. अमुक एक गोष्ट व्हावी किंवा असावी असें कादंबरीच्या द्वारें दाखवायाचें असलें तर ती गोष्ट करणारी किंवा असणारी एकादी व्यक्ति कल्पून तिच्या द्वारें त्या गोष्टीचे फायदे दाखविले पाहिजेत. त्याप्रमाणें येथेंही देशोन्नति ही एकांगी नसून अनेकांगी आहे हें तत्त्व ओळखून त्यासाठीं पूर्णपणें आत्मत्याग करणारी व्यक्ति दाखविली आहे; आणि तीच प्रस्तुत कादंबरीचा नायक होय. आतां एकाद्या खऱ्याखुऱ्या व्यक्तीच्या आयुष्याचा इतिहास म्हणजे ज्याप्रमाणें चरित्र होय, त्याप्रमाणें, एकाद्या कल्पित व्यक्तीचा इतिहास किंवा चरित्र म्हणजे कादंबरी होय. म्हणून "मी" हें या कल्पित व्यक्तीचें चरित्र आहे. यामध्यें ही व्यक्ति—भाऊ—यानें काय कार्य केलें व त्याची मतें काय होतीं, याचा इतिहास दिला आहे. चरित्र दोन प्रकारचें असतें. एक दुसऱ्यानें लिहिलेलें व दुसरें स्वतः त्या व्यक्तीनें लिहिलेलें. येथें हरिभाऊंनीं दुसरा प्रकार पसंत केला आहे व त्याचें कारण उघड आहे. भिन्न भिन्न मतांचे एकाद्याच्या मनावर परिणाम काय झाले, व त्याच्या स्वतःच्या मतांची व विचारांची उत्क्रांति कसकशी होत गेली; कोणत्या कोणत्या प्रसंगांमुळें त्याच्यावर काय काय परिणाम झाले; अमुक एका विशिष्ट रीतीनें वागण्यास त्यास कोठून प्रेरणा मिळाली; इत्यादि गोष्टी एकादा मनुष्य स्वतः जशा

विस्तारानें सांगूं शकेल तशा त्या दुसऱ्यास कधींही सांगतां येणार नाहींत. म्हणून अत्यंत कार्यकर्त्री व कार्यक्षम अशी व्यक्ति कल्पून तिच्याच मुखांतून आपल्या विचारांचीं व मतांचीं सर्व संक्रमणें वदविणें, हाच अशा बाबतींत खरा परिणामकारक मार्ग आहे. यामुळें वाचकांच्या सत्यत्वप्रतीतीला अधिक बळकटी येऊन तिचा मनावर परिणाम अधिक होतो. प्रख्यात टीकाकार श्री. कृ. कोल्हटकर यांनीं "रागिणी" वरील आपल्या उत्कृष्ट टीकेंत, सत्यत्वप्रतीति उत्पन्न करण्यासाठीं कादंबरीकार जे उपाय योजतात त्यांचें बहुमोल वर्गीकरण केलें आहे. त्यांत ते या आत्मचरित्रवजा कादंबऱ्यांबद्दल लिहितांना म्हणतात कीं, "आपले मनोविकार आपणा स्वतःस जसे कळतात, तसे इतरांस कळणें शक्य नसतें; यामुळें कादंबरीकारानें पात्राच्या मनोविकारांचें तपशीलवार वर्णन दिल्यास त्याजवर वाचकांचा भरंवसा बसणें कठीण जातें. सबब गोष्ट आत्मचरित्राच्या रूपानें देणें पुष्कळदां श्रेयस्कर असतें. 'पण लक्षांत कोण घेतो?' या अत्युत्तम कादंबरीचें अर्धें स्वारस्य ती आत्मचरित्रात्मक आहे या गोष्टींत आहे."

याप्रमाणें "मी" हें आत्मचरित्र कां केलें, हें आपण पाहिलें. त्यांतील नायक हा पुढें विलक्षण कर्तृत्ववान् व स्वार्थत्यागी निपजला. पण त्याची ही उत्क्रांति ज्या मार्गांनीं व ज्या परिस्थितींतून झालेली वर्णिली आहे त्यांतच हरिभाऊंचें कौशल्य—रचनाकौशल्य—दिसून येतें. कोणतीही गोष्ट विरोधानें, तुलनेनें अधिक उठून दिसते. म्हणून भाऊची परिस्थिति अशी कांहीं विचित्र दाखविली आहे कीं, कोणीही सामान्य मनुष्य अशा परिस्थितींतून पुढें एवढ्या मोठ्या पदाला चढेल असें सहसा वाटत नाहीं. भाऊची बाह्य परिस्थिति, व त्याची आंतरचित्तवृत्ति यांत पदोपदीं चमत्कृतिजनक विरोध दाखविला आहे. पण त्यांतही मौज ही कीं, ज्याप्रमाणें डोंगरांतून

खालीं पडणाऱ्या नदीला वाटेंत येणाऱ्या अडथळ्यांनींच अधिक वेग प्राप्त होतो, म्हणजे वाटेंत तिला अडवूं पाहणारे अडथळेच तिच्या पुढील दूरवर विस्ताराला कारणीभूत होतात, त्याप्रमाणें भाऊची बाह्य परिस्थितीच त्याच्या आंतर उत्क्रांतीला साह्यभूत होते. यामुळें हा वरवर वाटणारा विरोध नाहींसा होऊन उलट त्यामुळें त्याची आत्मिक प्रगति अधिक उठावदार होते. कादंबरीच्या शेवटींही अशीच मौज आहे. भाऊची प्रगति—अर्थात् विचारांची—क्रमाक्रमानें होत होत शेवटीं अशा टोंकाला जाऊन पोंचली आहे कीं, त्याचें पुढील स्थित्यंतर आत्मत्यागांतच झालें पाहिजे. याप्रमाणें साध्या रीतीनें त्यानें आत्मत्याग केला असता तर त्यांत कांहीं चमत्कृति नव्हती; पण येथें आतां हा आत्मत्याग करतो कीं नाहीं, अशी संदेहात्मक परिस्थिति मोठ्या चातुर्यानें निर्माण करण्यांत आली आहे. भाऊनें आपली उन्नति आतांपर्यंत केली, ती प्रथम कांहीं एक उच्च हेतु धरून केली नव्हती. आतांपर्यंत सुंदरीवरील प्रेम हा त्याचा मुख्य प्रेरक हेतु ( impelling force ) होता. पण पुढें होतां होतां देशसेवेची त्याच्या मनांत खरी आवड उत्पन्न झाली. आतां तो आत्मत्याग करणार इतक्यांत आजपर्यंतचें आयुष्यांतील ध्येय—सुंदरी—प्राप्त होण्याचा समय आला. तेथें कर्तव्याकर्तव्याचा मोह पडला. लो. टिळकांनीं गीतारहस्यांत म्हटलें आहे कीं, प्रत्येक व्यक्तीवर संसारांत असे मोहाचे प्रसंग येत असतात; आणि असे प्रसंग फार मनोवेधक असतात. म्हणून असले प्रसंग हुडकून काढून किंवा कल्पून त्यावरच मोठमोठे कवि सुरस काव्यें अगर उत्तम नाटकें रचतात. यास्तव भाऊच्यापुढें असा प्रसंग उभा करून त्याची कार्यनिष्ठा व स्वार्थत्यागतत्परता कसाला लावण्यांत आली आहे. शिवाय यामुळें वाचकांच्या सहानुभूतीचा सर्व ओघ नायकाकडे वळून त्याचा आत्मत्याग परिणामकारक झाला आहे. या आत्मत्यागाच्या मागें अशी

शोकरसाची पार्श्वभूमी रंगविल्यामुळें त्या भूमीवर हें आत्मत्यागाचें चित्र फारच खुलून व उठून दिसतें. अशा प्रकारचे प्रसंग आयत्या वेळीं आणून ते परिणामकारक होत नाहींत. त्यांची रचना पहिल्यापासून-कथानकाच्या आरंभापासून-करावी लागते. म्हणून शोकरसप्रधान काव्यांमध्यें-यांत कादंबरी व नाटक यांचाही अंतर्भाव होतो च-कथानकरचनेचें कौशल्य विशेष आहे.

"मी"च्या कथानकाचें आतां अधिक बारकाईनें परीक्षण करावयाचें म्हटलें, म्हणजे नायकाचें चरित्र आरंभापासून शेवटपर्यंत दिलें आहे, त्याचें परीक्षण होय. हें परीक्षण नीटपणें करितां येण्यासाठीं नायकाच्या या सबंध आयुष्यक्रमाचे विभाग केल्याशिवाय, त्याच्या प्रगतीची बरोबर व क्रमवार कल्पना आपणांस करतां येणार नाहीं. असे विभाग पाडले म्हणजे कथानकाची कालमर्यादाही आपणांस समजते. व कादंबरींत किंवा कथानकांत योग्य प्रमाण ( Symmetry ) साधलें आहे कीं नाहीं, हें समजण्यास कथानकाची कालमर्यादा समजणें जरूर आहे. या दृष्टीनें पाहिलें तर भाऊच्या चरित्राचे आठ विभाग पडतात. त्याचा आतां आपण क्रमानें विचार करूं; म्हणजे कथानकाचा विकास (Development of aotion) समजणें आपणांस सुलभ जाईल.

"मी" मधील १ पासून १२ प्रकरणांपर्यंत भाऊच्या आयुष्यांतील पहिला विभाग ( period ) धरितां येईल. यांमध्यें त्याची गृहस्थिति, त्याचें बाल्य, बाल्यांतील त्याचा स्वभाव, त्याचें बालपणांतील शिक्षण, इतका भाग आला असून, ज्या व्यक्तीमुळें त्याच्या पुढल्या सबंध आयुष्यक्रमास वळण लागलें आहे, त्या व्यक्तीचा व त्याचा प्रथम परिचय घडला आहे. येथें आपणास असें दिसतें कीं, भाऊची बालपणची परिस्थिति अगदींच करुणास्पद आहे. बाप परांगदा झालेला; मामाच्या जिवावर तो व त्याची आई

आणि बहीण वाढताहेत; आई मनस्वी रागीट आणि आपल्या जिवाला वैतागलेली; त्यामुळें भाऊला मायेनें वळण लावणारें कोणीच नाहीं, म्हणून त्याच्या शिक्षणाची आबाळ होत आहे; त्याचाही स्वभाव खोडकर व उनाड. अशा रीतीनें ही सर्वच परिस्थिति उदास अशी आहे. त्यांत मनाला विरंगुळा पाडणारें ( Relieving ) असें एकही अंग नाहीं. उलट त्याची आई त्याला पदोपदीं ज्या कठोरतेनें वागविते व त्याच्या बालपणास सहज अशा खोड्यांसही जें क्रूर शासन वारंवार मिळतें, तें पाहून वाईट वाटल्याशिवाय रहात नाहीं. भाऊचा नादीपणा, व ज्या एका गोष्टीच्या मागें लागेल त्याच्याच मागें लागण्याचा स्वभाव दाखविण्यासाठीं, दोन तीन प्रसंग ग्रंथकारानें घातले आहेत. त्यांपैकींच ४।५ प्रकरणांत मिळून जरा वाजवीपेक्षां जास्ती सविस्तरपणानें वर्णिलेला लखोट्याचा प्रसंग होय. हीं अंतिम हेतुफलाचीं ( End ) बीजें होत. या व पुढील भागांत भाऊचें व त्याच्या बहिणीचें जें वर्णन आहे तें वाचून " पण लक्षांत कोण घेतो ?" मधील यमू व तिचा दादा यांच्या बालपणाची आठवण होते. या दोन्ही बहीणभावांच्या बालपणांत बरेंच साम्य आहे. असो. कथानकाच्या सुरवातीला भाऊचें वय किती असावें हें ठरविणें जरूर आहे. कारण त्यावर पुढील सर्व कालमर्यादा अवलंबून आहे. आरंभीं भाऊ म्हणतो कीं, सुमारें आठ वर्षांपर्यंतचें आपलें बाळपण कसें गेलें हें आपणांस आठवत नाहीं. उगीच अंधुक अंधुक अशा गोष्टी आठवतात. पहिल्या प्रकरणापासून पुढील सर्व गोष्टी भाऊनें बऱ्याच बारकाईनें दिल्या आहेत. त्यावरून त्याचें वय पहिल्या प्रकरणाचे वेळीं सुमारें आठ वर्षांचें असावें असें प्रथम वाटतें. पण त्याची व सुंदरीची त्या वेळीं प्रथमच गांठ पडली, तेव्हां तिचें वय दोन अडीच असावें असें तिसऱ्या प्रकरणांत म्हटलें आहे. आणि पुढें १३ व्या प्रकरणांत भाऊंत व सुंदरींत दोन तीन

वर्षांचाच वयांत फरक असल्याबद्दल उल्लेख आहे. यावरून कथानकाच्या आरंभीं भाऊचें वय सुमारें ६ व सुंदरीचें ३ असें धरून चालण्यास हरकत नाहीं. भाऊचें वय आठ धरलें तर दुसरीही एक अडचण येते. त्याची मुंज कथानकाच्या सुरुवातीनंतर वर्ष सव्वा वर्षानें झालेली आहे. त्या काळीं मुंज इतके दिवस राहाणें अगदींच अशक्य. मुंज साधारणत: ७ व्या वर्षीं होते असें धरलें, तर पहिल्या प्रकरणाचे वेळीं भाऊचें वय ६ वर्षांचेंच होतें असें मानावें लागतें.

बाराव्या प्रकरणाचे शेवटीं भाऊची आणि सुंदरीची पुन: गांठ पडते आणि तेथून त्याच्या आयुष्यांतील दुसऱ्या विभागाला प्रारंभ झाला. आतांपर्यंतचें भाऊचें आयुष्य म्हणजे केवळ उनाडक्या कराव्या; घरीं हट्ट करावा; बहिणीशीं भांडावें; शाळेचा अभ्यास करावा न करावा; अशा प्रकारचें होतें. अभ्यास करून घेण्यास, चालरीत लावण्यास कोणीच घरांत नाहीं अशी स्थिति. पण आतां हें पालटलें. सुंदरी आपली मैत्रीण व्हावी या एका इच्छेनें त्याच्या आयुष्यक्रमांत बदल पडला; व तो कसकसा पडला हें हरिभाऊंनीं मोठ्या कुशलतेनें दाखविलें आहे. सुंदरी लहान असून आपल्यापेक्षां चांगलें वाचते हें पाहून त्याला लाज वाटते; व तो झटून अभ्यास करितो. सुंदरी खोडकर नाहीं, आज्ञाधारक आहे; म्हणून आपणही तसेंच झालें पाहिजे. वाईट मुलाचा सहवास मी आपल्या मुलीस लागूं देत नाहीं, असें शिवरामपंत म्हणाले. याचा परिणाम होऊन सुंदरीच्या सहवासाचें बक्षीस मिळविण्यासाठीं आपल्याला चांगला मुलगा झालें पाहिजे, अशा रीतीनें भाऊमध्यें हळू हळू एकेक बदल पडूं लागला. पण अद्यापि एक दोष त्याच्यांत आहे; तो हा कीं, तो आपल्या बहिणीला नीट रीतीनें वागवीत नाहीं. या आपल्या दोषाची जाणीव उत्पन्न होण्यास त्याचें स्वप्न कारण झालें. सुंदरीच्या लग्नाबद्दलचें एक स्वप्न पडून तें त्यानें सुंदरीसाठीं लिहून

काढलें. पुढें ते कागद त्याची बहीण चोरून वाचीत असतां तें पाहून भाऊस खूप राग आला आणि त्या भरांत त्यानें तिला मारलें. ताईनें तें सर्व सोसलें; आणि भाऊनें एका क्षुल्लक गोष्टीवरून आपल्याला इतकें वाईट वागवावें याचें तिला वाईट वाटून ती इतकेंच म्हणाली कीं, " कायरे, सुंदरी म्हणते कीं भाऊ चांगला, तो तूं असाच का चांगला ? " झालें; या जादूच्या वाक्यानें आपलें काम केलें. आपल्या बहिणीशीं आपलें आजपर्यंतचें वर्तन त्याच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें आणि आपली चूक त्याच्या लक्षांत आली. अशा प्रकारच्या लहान लहान प्रसंगांनीं सुंदरीच्या प्रेमाचा भाऊच्या आयुष्यावर केवढा मोठा परिणाम होत होता, हें मोठया कुशलतेनें दाखविण्यांत आलें आहे. असे प्रसंग पुष्कळच असल्यामुळें त्या सर्वांचा उल्लेख करणें शक्य नाहीं. पण विशेष महत्त्वाचा असा एक दिला आहे; कारण भाऊ आणि ताई यांचा आयुष्यप्रवाह एक मार्गानें वाहण्याला या प्रसंगापासून आरंभ झाला असून या त्यांच्या संयुक्त आयुष्यक्रमावरच पुढील कथानकाची उभारणी आहे.

भाऊच्या आयुष्यक्रमाशीं सुंदरी आणि शिवरामपंत यांचा संबंध येऊन त्याचा परिणाम त्याच्यावर झाला; आणि शेवटपर्यंत त्या सर्वांचा जीवनक्रम एकाच मार्गानें वाहात गेला. भाऊला स्वतःचें गृहसौख्य नव्हतें; त्याच्या घरीं निराशा, निष्प्रेम, आततायीपणा आणि औदासिन्य यांचेंच साम्राज्य होतें; व त्याच वातावरणांत तो वाढता तर त्याची काय स्थिति झाली असती, याचा मासला पहिल्या विभागांत आपणांस पाहावयास सांपडला आहे. पण शिवरामपंतांच्या सन्निध्यामुळें उत्तम गृहसौख्य कसें असतें याचा आदर्श त्यास दिसला; स्त्रीशिक्षणाची महती व उपयुक्तता त्यानें पाहिली; स्त्रियांना आदरानें कां वागविलें पाहिजे, हें तो तेथें शिकला. "इहलोकचा स्वर्ग " या प्रकरणांत जें गृहसौख्याचें चित्र रेखाटलें

आहे तें उदात्त नाहीं असें कोण म्हणेल? शिवरामपंतांचा हा सहवास न घडता, तर भाऊच्या कल्पना व मतें सर्व जुन्या काळचींच राहतीं. कारण सुंदरीची आई लिहिते, वाचते व नवऱ्याचे सद्रेसुद्धां शिवते हें पाहून प्रथम त्याला कितीतरी आश्चर्य वाटलें आहे!

भाऊच्या आयुष्यांतील हा दुसरा विभाग २१ व्या प्रकरणाचे अखेरीस संपतो. त्याच्या ताईच्या लग्नाची बाटाघाट चालू होते; व शेवटीं त्याची आई हट्टानें तिचें लग्न एका म्हाताऱ्या बिजवराशीं लावते. या कामांतच शिवरामपंताबद्दल भाऊच्या आईचा गैरसमज होऊन शिवरामपंतांस भाऊच्या वाड्यांतून बिऱ्हाड हलवावें लागतें. येथें भाऊचा व त्यांचा निकट सहवास संपतो. म्हणून येथपर्यंत दुसरा विभाग पाडला आहे. ताईच्या लग्नामुळें, स्त्रियांच्या असहाय स्थितीकडे भाऊचें लक्ष वेधतें; आणि तो एक त्याच्या मनाला चटकाच लागून राहतो. भाऊच्या मानसिक प्रगतीमध्यें हीही एक महत्त्वाची बाब विसरतां कामा नये. कारण यामुळें त्याच्या वयाच्या मानानें अधिक महत्त्वाचे विचार त्याच्यापुढें येऊन त्याला एक प्रकारचें अकालप्रौढत्व येतें. ताईच्या लग्नाचा असाच परिणाम सुंदरीवरही होतो. म्हणून कथानकाच्या आंतर उत्क्रांतीमध्यें (Psychological Action) ताईचें लग्न ही एक महत्त्वाची बबा (Incident) आहे.

२२ व्या प्रकरणापासून २८ व्या प्रकरणाचे अखेरपर्यंत भाऊच्या आयुष्यांतील तिसरा विभाग पडतो. दुसऱ्या विभागाची कालमर्यादा सुमारें चार वर्षांची पडते. कारण ताईचें लग्न होण्याचे सुमारास शिवरामपंत भाऊच्या वाड्यांतलें बिऱ्हाड सोडून जातात. लग्नांत ताई जुन्या समजुतीप्रमाणें बरीच मोठी झाली होती. इतकी कीं, मुलगी अगदीं गळ्याशीं आली असें वाटून तिच्या आईला ती कशी

तरी उजवून टाकावी लागते. म्हणजे या वेळीं तिचें वय सुमारें १३ वर्षांचें असावें. ती भाऊपेक्षां १॥ वर्षांनीं वडील आहे. म्हणजे भाऊचें वय त्यावेळेस ११ वर्षांचें असलें पाहिजे. दुसऱ्या विभागाच्या आरंभीं त्याचें वय सात वर्षांचें होतें. या तिसऱ्या विभागांत भाऊच्या आयुष्यांत तीन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या आहेत. त्यांपैकीं पहिली ताईचें लग्न झाल्यावरचा स्वतःचा मोठा आजार ही होय. यामुळें त्याच्या स्वभावाचा नादीपणा व एकछंदीपणा फारच स्पष्टपणें दिसतो. त्याचें सुंदरीवर पहिल्यापासून विलक्षण प्रेम बसलें आहे. त्याचा त्याच्या दानतीवर किती उत्कृष्ट परिणाम झाला आहे, याचें २३ व्या प्रकरणांत एक लहानसेंच पण हृदयंगम उदाहरण दिलें आहे. ताईनें त्याजवळ पत्र देऊन तें न वाचतां सुंदरीच्या घरीं पोंचतें करण्यासाठीं दिलें. तें पत्र वाचण्याचा त्याच्या बालस्वभावानुरूप त्याला अत्यंत मोह झाला; व त्याप्रमाणें तो तें वाचणार इतक्यांत "सर्व पापापासून वेळींच सोडविणारी ती सुंदरीची सुंदर मूर्ति" त्याच्या दृष्टीस पडून तो त्या मोहापासून परावृत्त होतो. असो. पण ही सुंदरी आपल्यास न मिळतां आपल्या प्रतिस्पर्ध्यास मिळणार, ही नुसती कल्पनाच त्याला इतकी तापदायक होते कीं, तो लागलींच खूप आजारी पडतो. त्याच्या या आजाराचें वर्णन व शुद्धीवर येतांच जवळ बसलेल्या, नुकत्याच इच्छेविरुद्ध लग्न झालेल्या बहिणीकडे पाहून "ताई, लग्न झालं का ग ?" असा प्रश्न; व त्यावर ताईचें "आतां कुणाचं बाबा लग्न व्हायचं राहिलं आहे ?" असें शोककारक उत्तर; हा सर्व भाग मनाला चटका लावणारा आहे. यामुळें भाऊचें सुंदरीवरील प्रेम जसें व्यक्त होतें, तसेंच ताईच्या करुणास्पद स्थितीचेंही उत्तम दिग्दर्शन होतें. या भाऊच्या आजाराचा दुसरा एक उपयोग कथानकांत होतो. तो म्हणजे त्याचा शेवटचा स्वार्थत्याग अधिक उठवून दाखविण्याचा. सुंदरीचें दुसऱ्याशीं लग्न

होणार या खोट्या गप्पेनेंच जो भाऊ अत्यवस्थ आजारी पडतो, तोच भाऊ पुढें देशसेवेसाठीं लहानपणापासून इतक्या उत्कण्ठेनें पोसलेल्या प्रेमाचा त्याग करून सुंदरीस सोडून संन्यास घ्यावयास तयार होतो ! यानंतर दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे भाऊच्या वडिलांचें आगमन व त्यांचा ५।६ महिने वेगळा संसार ही होय. या रावजींचा भाऊच्या आयुष्यांत फारसा संबंध येत नाहीं. पण येथें त्यांचा उपयोग भाऊच्या आईकडे वाचकांची आणि स्वतः भाऊचीही सहानुभूति वळविण्याकडे होतो ( मी, प्र. २७ ). रावजींचा विक्षिप्तपणा, व त्यापायीं त्यानीं आपल्या संसाराचें केलेलें वाटोळें पाहून भाऊच्या आईसारख्या मानी व कर्तबगार स्त्रीची कींव कोणास येणार नाहीं ! आपल्या आईची स्थिति पाहून, ताईमुळें स्त्रीजातीबद्दलचें आधींच कोमल झालेलें भाऊचें हृदय अधिक मृदु होतें. यानंतरची तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे भाऊचे वडील पुनः देशोधडीला लागल्यावर त्याला शिवरामपंतांनीं आपल्या स्थितीबद्दल केलेला उपदेश. आतांपर्यंत भाऊ शिवरामपंतांच्या व सुंदरीच्या सहवासानें पुष्कळ निवळला हें खरें; पण आपल्या परावलंबी स्थितीकडे त्याचें आतांपर्यंत लक्ष गेलें नव्हतें; व या स्थितींत आपल्या पायावर उभें राहून आपलें नांव काढण्याची आवश्यकताही त्याच्या ध्यानांत आली नव्हती. त्याचें वय या सुमारास १४ वर्षांचें होतें, हें पाहतां याबद्दल आश्चर्यही वाटण्याचें कारण नाहीं. परंतु त्याची बुद्धि आधींच कुशाग्र असून त्याच्या सर्वच विलक्षण परिस्थितीमुळें त्याला अकाल-प्रौढत्व प्राप्त झालें होतें. त्यामुळें शिवरामपंतांनीं त्याची खरी स्थिति त्याला समजावून देतांच, व दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा न करितां स्वतःच्या हिंमतीवर आपलें नांव काढण्याची आवश्यकता पटवून देतांच, आपल्या खऱ्या परिस्थितीचें त्याला आकलन होऊन यापुढें तो निश्चित ध्येय ठेवून आपला उद्योग करूं लागला. यामुळें

त्याच्या आयुष्यक्रमांत एक मोठेंच स्थित्यंतर झालें. येथें त्याच्या आयुष्यांतला तिसरा विभाग संपला. या विभागाची कालमर्यादा ३ वर्षांची असून या वेळीं भाऊचें वय १४ वर्षांचें होतें अशाबद्दल २८ व्या प्रकरणाचे शेवटीं शिवरामपंतांच्या तोंडीं स्पष्ट उल्लेख आहे.

यानंतर भाऊच्या आयुष्यांतील चौथा विभाग चार वर्षांचा २९ ते ४१ प्रकरणांअखेरपर्यंत आहे. या चार वर्षांत भाऊच्या आयुष्यांत पुष्कळच महत्त्वाच्या गोष्टी घडतात. प्रथमतः ताईचें लग्न शेवटीं दुःखपर्यवसायी झाल्याबद्दलची हकीकत आपणांस कळते. ताईचा नवरा अत्यंत हलकट व दुर्वर्तनी असून त्यानें बायकोस अत्यंत छळल्यामुळें तिला पुढें माहेरीं येऊन राहावें लागतें. आपण हट्टानें केलेल्या कृत्याचा परिणाम असा लेकीचा नाश होण्यांत झालेला पाहून भाऊच्या आईच्या मनास धक्का बसतो व त्यानेंच ती मरते. आईच्या मरणानें भाऊवर मोठी जबाबदारी येऊन पडली. बहिणीला सासरीं जाऊन राहण्याची सोय नाहीं; व स्वतःचें तर अद्यापि सर्व शिक्षण व्हावयाचें, तेव्हां मामांनीं मदत न केली तर दोघांचें निभावें कसें ? पण यांतूनही मार्ग निघून भाऊचें शिक्षण सुरू राहतें. आई वारल्यानंतरची भाऊची मनःस्थिति या ठिकाणीं हरिभाऊंनीं फारच चित्तवेधक रीतीनें वर्णिली असून नायकाच्या पुढील विकासामध्यें (development) तिचें स्थान महत्त्वाचें आहे. आई वारल्यावर ताई मामाकडे जाते आणि भाऊ तिला स्टेशनावर पोंचवून बंडगार्डनवर फिरावयास जातो; मनाच्या औदासीन्यामुळें त्याला आपल्या एकटेपणाची विशेष रीतीनें जाणीव होते; व तो आपल्या भावी स्थितीचा विचार करितो. विचार करितां करितां परोपकार हेंच तो आपल्या आयुष्याचें ध्येय ठरवितो. यापुढें वर्षभर तो शिवरामपंतांच्या घरीं राहतो. या काळांत विशेष कांहीं घडलें नाहीं. कारण त्याची मॅट्रिकची

परीक्षा जवळ आली असल्यामुळें त्याचा सर्व वेळ परीक्षेची तयारी करण्यांतच गेला. अभ्यासाशिवाय इतर गोष्टींकडे पाहावयास त्याला वेळ मिळाला नाहीं. या अवधींत सुंदरी बरीच प्रौढ होऊन शाळेंत जाऊं लागली; व तिचें शिक्षण पद्धतशीर होऊं लागलें. शिवरामपंतांचे सुंदरीबद्दलचे बेत भाऊस स्पष्टपणें या वेळींच समजतात; आणि काय उदात्त हेतूनें ते आपल्या मुलीला अविवाहित ठेवून सुशिक्षित करणार आहेत, हें समजून त्याचा त्यांच्याबद्दलचा आदर दुणावतो. खरी सामाजिक सुधारणा म्हणजे काय, हेंही त्याला येथें पाहावयास सांपडतें. शेवटीं भाऊ मॅट्रिक होऊन कॉलेजांत जातो व चौथा विभाग संपतो. या वेळीं भाऊचें वय १८ वर्षांचें आहे.

नायकाच्या आयुष्यांतील पांचव्या विभागानें ४२ पासून ५१ पर्यंत ९ प्रकरणें व्यापिलीं आहेत. या अवधींत भाऊचा कॉलेजचा कोर्स संपून तो बी. ए. झाला आहे. त्या वेळीं बी. ए. चा कोर्स तीन वर्षांचा असल्यामुळें या विभागाची कालमर्यादाही तीन वर्षांचीच धरण्यास हरकत नाहीं. या तीन वर्षांत भाऊच्या स्वतःच्या मानसिक प्रगतीची विशेष गोष्ट म्हणजे तो आतां देशाच्या सद्यःस्थितीबद्दल स्वतः विचार करूं लागला ही होय. परंतु हें त्याचा कॉलेजांतील शिक्षणक्रम संपण्याच्या बेताला आला असतांना झालें. कॉलेजांतील पहिलीं वर्षें ताईच्या काळजींत गेलीं. ताई मामाकडे राहण्यास गेली; पण तेथें तिला सुख होईना. घरांतील जुन्या मताच्या बायकांकडून तिला त्रास होऊं लागला. तो सर्व त्रास तिनें सुंदरीस पत्रांतून कळवावा पण भाऊच्या अभ्यासांत व्यत्यय येऊं नये म्हणून त्याला तिनें कांहीं कळविलें नाहीं. तथापि भाऊनें तर्कानें तें ओळखलेंच; आणि शेवटीं सुंदरीकडून त्याला सर्व हकीकत समजून, ताईला पुण्यासच विद्याभ्यासासाठीं आणून ठेवावी असा भाऊ, सुंदरी व शिवरामपंत या त्रिवर्गांनीं बेत करून तो लागलींच अमलांतही आणला. ही

कल्पना प्रथम भाऊकडूनच निघाली यावरून त्याचे विचार या सुमारास किती पुढें गेले होते हें स्पष्ट दिसून येतें.

त्या काळच्या समाजाची पुराणप्रियता; भाऊची स्वतःची परावलंबी स्थिति; ताईचीही विचित्र परिस्थिति, हीं सर्व लक्षांत घेतां आपल्या बहिणीला पुण्यास आणून शाळेंत ठेवणें म्हणजे केवढें धैर्याचें कृत्य होतें याची कल्पना होईल. पण एवढें धैर्य दाखविण्याची भाऊची तयारी झाली होती, यावरूनच त्याची प्रगति शिवरामपंतांच्या तालमींत किती झाली होती, याची साक्ष पटते. ताईला पुण्यास आणण्याच्या बाबतींत ४३ व्या प्रकरणाच्या शेवटीं भाऊचा व सुंदरीचा जो संवाद झाला आहे, तो भाऊच्या मनाची तयारी स्पष्टपणें दाखवितो. एकाद्या पात्राचा स्वभाव अगर विचार ग्रंथकारानें स्वतः सांगण्यापेक्षां, त्या पात्राच्या कृतीवरून दाखविणें हें अधिक कौशल्याचें काम आहे. या दृष्टीनें आपण भाऊच्या एकेक कृत्याकडे पाहिलें असतां त्याची प्रगति आस्ते आस्ते कशी होत चालली होती, याचा इतिहास आपल्या डोळ्यांपुढें क्रमवार उभा राहतो. ताईला पुण्यास आणल्यावर तिच्या नवऱ्याकडून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष तिला बराच त्रास झाला; पुढें ताईच्या व भाऊच्या वडिलांचा धूमकेतूप्रमाणें मध्येंच उदय होऊन या धूमकेतूच्या शेंपटीचा तडाखा दोघांस बसला. पण त्या सर्व संकटांस न जुमानतां त्या दोघांनीं धीरानें व निश्चयानें आपला मार्ग चालू ठेविला. या कामीं या बहीणभावांच्या धैर्याचें जितकें कौतुक वाटतें, तितकेंच त्यांना सहानुभूति व पाठबळ देणाऱ्या शिवरामपंतांचेंही वाटतें. या संबंधांत भाऊच्या मामाचें भाऊला ४४ व्या प्रकरणांत जें पत्र आलें आहे तें वाचनीय व मननीय आहे. त्यावरून या संधिकाळांत विचारी मनुष्याची स्थिति कशी झाली होती हें चांगलें समजतें. त्याच्या मामाचें त्याला या वेळचें आणि पुढें त्याच्या संन्यास घेण्याच्या

वेळचें अशीं दोन्ही पत्रें वाचनीय असून त्यांवरून त्या गृहस्थाबद्दल आदर वाटल्यावांचून राहात नाहीं. भाऊचे कित्येक मार्ग नापसंत असतांही हा गृहस्थ त्याला शेवटपर्यंत निरपेक्षपणें साह्य करीत आहे याबद्दल त्याचें कौतुक वाटतें. याप्रमाणें अडचणींत व नित्य नव्या काळज्यांत दिवस जात जात भाऊचा कॉलेजचा शिक्षणक्रम संपण्याच्या बेताला येतो. त्याचें आतांपर्यंतचें आयुष्य येईल त्या परिस्थितीप्रमाणें घडत चाललें असून त्याचीं मतें व विचार तयार होण्यांतसुद्धां अंतःपरिस्थितीपेक्षां बाह्य परिस्थितीच बहुतांशीं कारण झाली आहे. पण आतां तें बदललें. बी. ए. झाल्यावर पुढें काय करावयाचें, हा प्रश्न त्याच्यापुढें उभा राहिला, आणि शेवटीं त्याची प्रगति कोणत्या टोंकाला जाऊन पोंचणार याचा प्रकाश कथानकावर पडण्यास येथपासून आरंभ झाला. ५० आणि ५१ हीं दोन्ही प्रकरणें या दृष्टीनें अत्यंत वाचनीय आहेत. शेवटीं शेवटीं त्याच्या मनाची जी विलक्षण खळबळ उडाली आहे, त्याचा लहानसा आरंभ येथें दिसतो. शिवरामपंतांनीं आपलीं मतें त्याच्यावर लादून त्याला केव्हांच "तूं अमुक कर" असें स्पष्टपणें सांगितलें नाहीं. त्याच्याशीं प्रत्येक गोष्टीवर सर्व बाजूंनीं वादविवाद करून, प्रत्येक प्रश्नाच्या सर्व बाजू त्याच्या पुढें मांडून त्यालाच स्वतः विचार करून आपला मार्ग शोधून काढावयास त्यांनीं लाविलें आहे. खऱ्या गुरूचें काम हेंच होय. ५० व्या प्रकरणांत त्याच्याशीं झालेल्या संभाषणांत त्याच्या कल्पना व विचार किती तरल (nebulous) आहेत हें त्यांनीं त्याला दाखवून दिलें; आणि हातून प्रत्यक्ष कार्य व्हावयाचें असल्यास आपल्या कल्पना मर्यादित व व्यवहार्य करण्याची किती जरुरी आहे, हेंही त्यांनीं त्याला पटवून दिलें. देशहिताचे मार्ग अनंत आहेत; पण त्या सर्वांच्या बुडाशीं एक किल्ली आहे, ती ओळखल्याशिवाय देश-

हिताच्या गप्पा व्यर्थ आहेत, असें त्यांनीं त्याला सांगितलें. या वेळचे शिवरामपंतांचे उद्गार मननीय व महत्त्वाचे आहेत. ते म्हणतात, "पण सगळ्या प्रकारांच्या मुळाशीं कांहीं तरी एक महत्त्वाची गोष्ट आहे. ती काय तें सांग? अत्यंत परिश्रम,—वेळीं स्वतःच्या शरिराकडे, अगर द्रव्याकडेही न पाहातां परिश्रम—करण्याचा निश्चय हा सगळ्यांच्या मुळाशीं आहेना? तो एक पाहिजे. आणखी असले परिश्रम कांहींतरी विशेष मार्ग आपला आपण आपल्याला शक्य असा रेखून घेऊन त्या मार्गांत सुरू केले पाहिजेत. या दोन गोष्टी तूं आपल्या अंगीं आणल्याखेरीज तुझ्या हातून कांहीं होईल असें मनांतसुद्धां आणूं नकोस!" देशाची हलाखीची स्थिति, दारिद्र्य व पारतंत्र्य पाहून भाऊचें मन बाहेरल्या व वरच्या कारणांकडेच वेधलें जाईल, म्हणून शिवरामपंतांनीं त्याला दुसरी एक सूचना लागलींच दिली आहे. ते म्हणतात, "भाऊ, कोणतीही गोष्ट सुधारावयाची म्हटली म्हणजे ती अगदीं अंतर्भागापासून सुधारली पाहिजे. कोठें कीड लागली असली तर तिचें मूळ शोधून काढून तेथें उपाय करण्याला सुरुवात केली पाहिजे. नाहींतर, कांहींच फायदा होणार नाहीं." या संभाषणांत त्यांनीं हाच मुद्दा पुनःपुनः आणून देशहिताच्या कार्यक्रमांत समाजसुधारणेलाही महत्त्वाचें स्थान आहे, हें त्यांनीं भाऊच्या मनावर ठसवून दिलें. परंतु भाऊनें कोणत्याच रीतीनें एकदेशी होऊं नये म्हणून ते त्याला पुढें लागलींच सांगतात, "तूं सर्व बाजूंनीं उद्योगाला लाग. आधीं राजकीय कीं आधीं सामाजिक, हा प्रश्न ज्यांना कांहीं करायला नको त्यांचा. ज्यांना उद्योग करायचा त्यांनीं जें हातून होईल तें करण्याचा सपाटा चालवावा..........माझ्या मनावर जो धडा बिंबला आहे तो हा कीं, 'आधीं तें, आणि मग हें, आधीं अमुक सुधारा आणखी मग तमुक सुधारा' असें म्हणण्यांत कांहीं अर्थ

नाहीं. सगळ्या शरीराला अशक्तता आली असतां एक हात आधीं धष्ठ करून घ्या, मग बाकीच्या शरिराचं पाहूं, असं म्हणण्यापैकीं 'आधीं अमुक, मग तमुक' असं म्हणणाऱ्यांचं म्हणणं असतं; तर तसं कांहीं नाहीं."

अशा रीतीनें बोलून बोलून व आपली स्वतःची हकीगत व आकांक्षा सांगून त्यांनीं भाऊला भावी कार्याबद्दल विचार करावयास भाग पाडलें. त्या काळीं निव्वळ राजकीय आणि निव्वळ सामाजिक असे दोन पक्ष होते, त्यांशिवाय, उभयसुधारणावादी पक्ष नवीन उत्पन्न व्हावा, एतदर्थ ज्यांनीं विचार केले त्यांची स्पष्ट छाया येथें प्रथम पडलेली दिसते. हेच विचार अधिकाधिक दृढ होत जाऊन त्या पक्षाला पक्कें रूप पुढें भाऊनें आणलें. "आपण अनेक दिवस एक पंथ तयार करीत आहों तो आज तुझ्या हवालीं करितों" असें पुढें ६६ व्या प्रकरणांत शिवरामपंतांनीं भाऊला सांगितलें आहे, तो पंथ हाच होय. या पंथांत अमुक एका विशिष्ट मार्गाचा अभिमान नाहीं; सर्व नद्या ज्याप्रमाणें शेवटीं सागराला मिळतात, त्याप्रमाणें सर्व मार्ग शेवटीं देशहिताच्या सागरांतच मिळतात ही भावना धरून सर्वांबद्दल सारखी सहानुभूति व औत्सुक्य ठेवणें हा तो पंथ. या विचारांचा भाऊवर योग्य तो परिणाम झाला व त्यानें आपल्या गुरूस अपेक्षित तेंच उत्तर दिलें. याप्रमाणें भाऊचें ध्येय व कार्यदिशा निश्चित झाली. आतां फक्त मार्गच ठरावयाचा राहिला. पण सर्व शिक्षण पूर्ण झाल्याशिवाय तो ठरणें अशक्य होतें. त्याचे तरल विचार स्थिर होऊन येथें त्याच्या आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाचा असा पांचवा विभाग संपला. येथें नायकाच्या जीवनवृत्ताचा पूर्वार्ध संपून उत्तरार्धास आरंभ झाला; व असे ५१ व्या प्रकरणाच्या शेवटीं त्यानें स्वतःच उद्गार काढले आहेत.

आतां यापुढील नायकाचें चरित्र अल्प आहे. एका कार्यकर्त्या

व कर्मक्षम पुरुषाची वाढ ( Growth ) कशी झाली, हें मुख्यतः दाखवावयाचें असल्यामुळें ग्रंथकारास कादंबरीचा इतका भाग खर्ची घालावा लागला. हा पहिला भाग फारच बारकाईनें वर्णिला आहे, असा हरिभाऊंवर आरोप आहे. कांहीं अंशीं तो खरा आहे. पण आपण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, हें एका व्यक्तीचें आत्मचरित्र आहे. आपल्या चरित्रांतील ज्या गोष्टी आपणांस महत्त्वाच्या वाटतील त्या दुसऱ्यांस तितक्या महत्त्वाच्या वाटणार नाहींत. भाऊनें आपला बालपणाचा भाग इतक्या पाल्हाळानें वर्णिला त्यांत यथार्थत्वाची (Realism) बरीचशी छटा आहे; कारण प्रत्येक मनुष्याला आपल्या स्वतःच्या बाल्याबद्दल फार प्रेम वाटत असतें. बालपणाच्या स्मृति पाल्हाळानें घोळविण्यांत त्याला एक प्रकारचा आनंद वाटतो. शिवाय येथें सुंदरी व शिवरामपंत यांचा वारंवार संबंध आल्यामुळें प्रत्येक गोष्टीचें सूक्ष्म रीतीनें स्मरण करण्यांत भाऊला पुनः पुनः आनंद वाटत असे, असें त्यानें स्वतःच एकदां सांगितलें आहे. (प्र. १५.) दुसरें असें कीं, हें आत्मचरित्र त्यानें सर्वसंगपरित्याग करून संन्यास घेतल्यानंतर लिहिलें असल्यामुळें त्याला आपली लहानपणची मूळची वृत्ति कशी होती, ती कसकशी बदलत गेली; कोणाच्या सहवासाचे कसकसे परिणाम आपल्यावर झाले; या आठवणी काढून कल्पनेनें त्या काळांत पुनः वास करण्यांत फारच आनंद वाटला असला पाहिजे. या अनेक गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे पूर्वार्ध इतका सविस्तर असला तरी तो, हें आत्मचरित्र असून तें एका संन्याशानें, ज्यानें देशासाठीं अत्यंत प्रिय वस्तूचा त्याग केला, अशा संन्याशानें लिहिलें आहे, हें लक्षांत आलें, म्हणजे हा सर्व विस्तार क्षम्य वाटतो. उत्तररामचरितांत रामचंद्र, सीतेची स्मृति होऊन शोक करितांना ज्याप्रमाणें लोकांस उद्देशून "अरे, मी तुमच्यासाठीं सीतेचा वनांत तृणाप्रमाणें त्याग करून त्या वेळीं बिलकुल

शोक केला नाहीं; तर आतां तरी मला पोटभर रडूं द्या" असें दीनवाणीनें म्हणतो; त्याप्रमाणेंच येथेंही भावानंद वाचकांस उद्देशून जणूं कांहीं, " अहो, मीं देशासाठीं सुंदरीचा त्याग केला आणि कार्य करीत असतां त्याबद्दल पश्चात्तापाचा एकही विचार मीं मनांत येऊं दिला नाहीं; तर आतां तरी कल्पनेनें मागल्या आठवणी काढून मला तिच्याबरोबर आपलें बाल्य पुनः एकदां घालवूं द्या" असें तितक्याच दीनवाणीनें म्हणत आहे, असें वाटतें. अशा वेळीं त्यास कोणाच्यानें नाहीं म्हणवेल ? असो.

भाऊच्या आयुष्यांतील उत्तरार्धास ५२ व्या प्रकरणापासून आरंभ झाला, व हा त्याच्या आयुष्यांतील सहावा विभाग होय. याची कालमर्यादा चार वर्षांची असून ५७व्या प्रकरणापर्यंत त्याचा विस्तार आहे. या अवधींत स्वतः नायकाबद्दल विशेष कांहींच घडलें नाहीं, हें त्यानें स्पष्टपणें ५२ व्या प्रकरणाच्या आरंभींच सांगितलें आहे. हा सर्व काळ त्यानें मुंबईस एल्एल्. बी. च्या अभ्यासांत, व पुढें ज्या गोष्टी करावयाच्या त्यांच्या तयारींत घालविला. म्हणजे पुढें लोकांत जाऊन व्याख्यानें देऊन ज्ञानप्रसार करावयाचा, त्यासाठीं वाचन वगैरे करण्यांत घालविला असावा असें दिसतें. भाऊचा प्रत्यक्ष कृति करण्याचा काळ जरी याप्रमाणें कांहीं दिवस लांबला गेला तरी इकडे सुंदरी व ताई यांनीं आपापल्यापरी कार्यास आरंभ केला. या वेळीं भाऊचें वय सुमारें २१ वर्षांचें, सुंदरीचें १८ वर्षांचें व ताईचें २३ वर्षांचें होतें. ताई व सुंदरी यांनीं अर्थातच स्त्रियांमध्यें ज्ञानप्रसार करून त्यांची उन्नति करण्याचें काम अंगावर घेतलें. या कामांत त्यांना आरंभीं आलेले मजेचे अनुभव व चिकाटीमुळें शेवटीं आलेलें थोडेंबहुत यश, यांचा इतिहास या ३।४ प्रकरणांत दिला आहे. चार वर्षांनीं भाऊ एल्एल्. बी. होण्याच्या सुमारास ताईच्या आयुष्यांत बहुतेक इष्ट असाच बदल झाला. तिचा नवरा—ज्यानें तिच्या

सर्व आयुष्याचा व सुखाचा नाश केला तो, या सुमारास आजारी पडून मरण पावला. या समयीं ताईनें केलेली त्याची सेवा, हिंदु स्त्रियांची संस्कृति व क्षमाशीलता दाखविते. हरिभाऊंनीं ताईचें चित्र पहिल्यापासून शेवटपर्यंत खरोखरीच विलक्षण मोहक व चित्ताकर्षक रंगविलें असून भाऊच्या चरित्राबरोबर तिच्या चरित्राचा विकास कसा झाला, याचें निरीक्षण करणेंहि जरूर आहे ज्याप्रमाणें भाऊ हा अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतून स्वतःच्या जोरावर आपला मार्ग काढून पुढें मोठा कार्यकर्ता झाला, त्याप्रमाणेंच ताईचाही इतिहास आहे. ताईचें चित्र काढण्यांत सामाजिक काम करण्यासाठीं कोणत्या प्रकारची स्त्री पाहिजे, हें दाखविण्याचा हरिभाऊंचा हेतु दिसतो. या विभागांत भाऊच्या भावनाप्रधान स्वभावाचा आणखी एक मासला हरिभाऊंनीं दाखविला आहे. तो असा कीं, ताईला तिच्या नवऱ्याच्या आजाराची बातमी कळून ती त्याच्या शुश्रूषेसाठीं आपल्या घरीं जाते व तेथून भावास सविस्तर पत्र लिहितें. पण त्या पत्रांतील "मी हें पत्र आपल्या घरून लिहितें आहें" या पहिल्या वाक्यानेंच भाऊ इतका संतप्त होतो कीं, त्याला तें सबंध पत्र वाचण्याचीही शुद्धि राहत नाहीं; तो त्या भरांत ताईला तिच्या कल्पित चंचलतेबद्दल व मनाच्या अस्थिरतेबद्दल अगदीं खरमरीत लिहितो. या प्रसंगाचा हेतु इतकाच कीं, भाऊचा स्वभाव पूर्वींप्रमाणें भावनाप्रधान आहे हें दाखवून वाचकांचें मन पुढील आघाताला (Catastrophe) तयार करावयाचें.

यानंतर ५७ व्या प्रकरणापासून नायकाच्या आयुष्यांतील सातव्या विभागाला आरंभ होतो. हा विभाग कालमर्यादेनें अत्यंत लहान म्हणजे सुमारें एक वर्षाचाच; पण कथानकांत उपांत्य व अत्यंत महत्त्वाचा असा आहे. कथानकाची गाडी आतांपर्यंत ज्या मार्गानें आली, तो मार्ग शेवटीं कोठें जाणार, याची अंधुक कल्पना आतां-

पर्यंतच्या दोन तीन प्रसंगांनीं वाचकांस आलीच आहे. पण अद्यापि तें बहुतेक गूढ आहे. कथानकाचा (Action) ओघ आतांपर्यंत सावकाशीनें वाहात होता. तो आतां या शेवटच्या विभागांत फार जलद झाला आहे. या विभागाच्या आरंभीं भाऊ एल्‌एल्. बी. होऊन वकिलीची पाटी लावून बसलेला दाखविला आहे. आजपर्यंतचें भाऊचें आयुष्य म्हणजे सुखाचें व निश्चिंत गेलें असें मुळींच नव्हे. उलट त्याच्या वयाच्या मनानें अधिक अशा अडचणी व काळज्या येऊन त्याच्या शरिरावर व मनावर वाजवीपेक्षां अधिक ताण पडला. त्याची या वर्षांत तर कमालच झाली. पुढें त्याचा जो शारीरिक पात (Physical Breakdown) झाला त्याचें बीं येथें पेरलें गेलें. एल्‌एल्. बी. झाल्याबरोबर शिवरामपंतांनीं त्याला जो बहुमोल उपदेश पुनः केला, त्यांत सर्व बाजूंनीं कार्याला लागण्याची आवश्यकता त्याच्या मनावर बिंबविली. आपल्या गुरूच्या उपदेशानें तो धंद्यांतील यशःप्राप्तीच्या व पैशाच्या लोभापासून आधींच मुक्त झाला होता. त्याची देशसेवा करण्याची तर उत्कट इच्छा होतीच; पण त्याबरोबरच किंबहुना अधिकच आपल्या गुरूला व सुंदरीला संतुष्ट करण्याची इच्छा होती. शिवरामपंतांनीं आपल्यासाठीं आजपर्यंत जे श्रम घेतले व जो स्वार्थत्याग केला, त्याचें आपण चीज करून दाखवावें; व सुंदरीचें आपल्यावर प्रेम आहे, व तिला आपल्याबद्दल जो आदर आहे त्याला आपण पात्र व्हावें, ही त्याची मुख्य इच्छा. याच इच्छेनें प्रेरित होऊन त्याचें आजपर्यंतचें वर्तन झालें. त्याच्या आजपर्यंतच्या आयुष्यांतलें मुख्य इंगित हेंच. बी.ए. व्हावयाचे वेळीं ठरल्याप्रमाणें आता देशकार्यास आरंभ तर करावयाचा; पण भाऊनें स्वतःच म्हटल्याप्रमाणें "प्रारंभ करावयाचा तो कुठें करावा, हा काय तो प्रश्न?" पुढील कार्य तर प्रचंड. इकडे समाजांतील अज्ञानाचा नाश करून लोक सज्ञान करावयाचे; व तिकडे सरकारचें प्रजा-

जनांविषयींचें अज्ञान आहे त्याचा नाश करून त्यांना प्रजेस अधिक हक्क देण्याबद्दल तयार करावयाचें. दोन्ही कामें सारख्याच महत्त्वाचीं व जरूरीचीं. या परिस्थितींत त्यानें प्रथम लोकच सज्ञान करण्याचा मार्ग स्वीकारला. लोक जमवून व्याख्यानें द्यावीं, नानाप्रकारचें ज्ञान त्यांस द्यावें, अनेक देशांतील इतिहासांतील गोष्टी सांगून स्वतःच्या हीन स्थितीची जाणीव त्यांना उत्पन्न करून द्यावी अशी त्यानें सुरुवात केली. या कामीं थोडेंसें यश येत चाललें तसे निष्कारण शत्रूही उत्पन्न झाले. त्याची स्वतःची बहीण सुशिक्षित असल्यामुळें व ज्या गुरूच्या हाताखालीं तो तयार झाला होता त्या गुरूची मुलगी जनरूढीविरुद्ध अविवाहित राहिल्यामुळें साहजिकच त्याच्या शत्रूंस त्याच्या मार्गांत अडचणी आणण्यास फावलें. त्यांनीं त्याच्याविरुद्ध कंड्या पिकवून, व त्याच्या व्याख्यानांत दंगे करून त्याचा तो प्रयत्न बंद पाडला. हा व्याप मागें असतां, ताईच्या इस्टेटीबद्दल वाद निघून त्यांतही त्याला अत्यंत मानसिक व शारीरिक त्रास झाला. पण यापेक्षां आपल्या प्रयत्नांचें लोकांत चीज होऊं नये, याबद्दल त्यास विशेष वाईट वाटलें. आपल्या विचारांच्या प्रसारार्थ त्यानें एक वर्तमानपत्रही काढलें. परंतु त्याचे सर्व श्रम व्यर्थ होतात, असें त्यास आढळून आलें. याबद्दलचे त्याचे उद्गार मनाला चटका लावणारे आहेत; तसेंच हातीं घेतलेल्या कार्याशीं त्याचा किती एकजीव झाला होता हेंही त्यांवरून दिसतें. (प्र. ६१) इकडे या सार्वजनिक काळज्या व इकडे ताईबद्दलच्या कौटुंबिक काळज्या यांमुळें " माझ्या चरित्राच्या उत्तरभागांत हे दिवस अगदीं कृष्णपक्षाच्या रात्रीप्रमाणें गेले" असे उद्गार त्यानें काढले आहेत. आपल्या कार्याचें फळ तावडतोब दिसणारें नव्हे, हें त्याला समजत नव्हतें असें नाहीं; पण " जें कांहीं करायला जावें, त्याच्या तळींचा हेतु जरी अत्यंत विशुद्ध तरी तो पुष्कळांस कळत नसे, आणि

त्याचा अर्थ ते भलताच करून कार्यास जितकीं विघ्नें आणवतील तितकीं ते आणीत;" याचा त्याच्या भावनाप्रधान मनावर परिणाम झालाच. पुढें त्याला अनुभवानें असें वाटूं लागलें कीं, हें कार्य एकट्या दुकट्याच्या हातून फावल्या वेळीं करण्यानें होणारें नसून पांचपंचवीस लोक जमवून एकजुटीनें व स्वार्थत्यागपूर्वक जर केलें तरच कांहीं होईल. या वेळची त्याची मनःस्थिति, त्याच्यापुढील अनेकविध विचार, मनाची मार्गाविषयींची अनिश्चितता, या सर्वांचें ग्रंथकारानें फारच कुशलतेनें हृदयंगम असें चित्र काढलें आहे. विचार करितां करितां, आपल्या स्वभावाप्रमाणें तो त्यांत इतका एकजीव झाला कीं, तो आपले पाश विसरला, सर्व बाह्य जग त्याच्या स्मृतिपटलावरून पुसून गेलें, आणि आपण व आपलें कार्य एवढेंच त्याच्या विचारांत राहिलें. होतां होतां त्याला स्फूर्ति झाली कीं, अशा एका कार्याला कायावाचामनें वाहून घेणाऱ्यांचा एक वेगळा पंथच काढला पाहिजे. सर्वसंगपरित्याग करून, सर्व आयुष्य देशसेवेला वाहिल्याशिवाय कांहीं एक होणें नाहीं. झालें; त्याचा लागलाच निश्चय झाला. तो ताईला विसरला, शिवरामपंतांना विसरला, आपल्या सुंदरीला विसरला, आणि लागलीच आपल्या मनाशीं संन्यास घेऊन राष्ट्रकार्यासाठीं देह झिजविण्याची त्यानें शपथ घेतली. इतक्यांत सुंदरीशीं विवाह करण्याची संधी—जी कधीं प्राप्त होईल असें त्याला शिवरामपंतांच्या आजपर्यंतच्या उद्गारांवरून वाटलें नव्हतें—अकस्मात् पुढें येऊन उभी राहिली. यापुढील कथाभाग अत्यंत करुणरसपूर्ण असून तो वाचून डोळ्यांतून पाणी न येणारा वाचक विरळा. या वेळीं नायकाच्या स्वतःच्या मनाशीं झालेल्या तुमुल युद्धाचें वर्णन एकट्या हरिभाऊंनींच करावें. त्यांत मौज ही कीं, या सर्व प्रसंगांत सुंदरीचा प्रत्यक्ष प्रवेश कोठेंच नाहीं. परंतु प्रत्येक शब्दाच्या मागें, प्रत्येक विचाराच्या मागें, सुंदरीची प्रेमळ परंतु निराशापूर्ण

मूर्ति वाचकांच्या दृष्टीला पडते; आणि तिच्या प्रत्यक्ष अभावानेंच तिचें अप्रत्यक्ष अस्तित्व क्षणोक्षणीं मनास भासतें. शेवटीं भाऊ नाशवंत व्यक्तीच्या सुखापेक्षां अधिक काल टिकणाऱ्या समाजाच्या सुखाला महत्त्व देऊन आपला आत्मत्याग करण्याचा निश्चय कायम करतो. परंतु त्याच्या निश्चयाची परीक्षा पाहण्यासाठींच कीं काय, सचिंत अशी सुंदरी त्याच्या दृष्टीस पडते. त्याचें चित्त पुनः विरघळतें. पण छे! आपला मोह तो आवरतो. आणि पहिला निश्चय कायम करितो.

या ठिकाणीं भाऊच्या आत्मत्यागाचें जितकें कौतुक व आदर वाटतो, तितकाच किंबहुना त्याहूनही अधिक आदर व आश्चर्य शिवरामपंतांच्या स्वार्थत्यागाबद्दल वाटतें. भाऊनें त्यांना आपली सर्व परिस्थिति व निश्चय सांगितला; व आपला विचार तुम्हांला अशक्य वाटत असला तर मोडीनही असेंही त्यानें आश्वासन दिलें. शिवरामपंतांना सुंदरीचा त्याच्याशीं विवाह घडवून आणण्याची ही किती उत्कृष्ट संधी होती! सुंदरी ही वेलीप्रमाणें असून दुसऱ्याच्या आधारानेंच तिचा जीवितक्रम सुखकारक होईल; आपल्या कल्पनेप्रमाणें स्वतंत्र रीतीनें कार्य करण्यासारखी तिची मनोरचना नसून उत्तम गृहिणी होण्यासच ती योग्य आहे, असें त्यांना आढळून आलें होतें. भाऊशिवाय दुसरीकडे तिचा विवाह होणें शक्य नाहीं, हें तर त्यांना स्पष्ट दिसत होतें. आपल्या स्वतःला छातीचा व काळजाचा विकार असल्यामुळें स्वतःच्या जीविताचा भरंवसा नाहीं; अशा स्थितींत आपल्या मुलीच्या भावी सुखासाठीं कोणता बाप धडपडणार नाहीं? त्यांच्या एका शब्दावर सुंदरीचें जन्माचें सुख अवलंबून होतें. केवढा मोह! पण नव्हे. त्यांना स्वार्थाचा विचार शिवला नाहीं! सुंदरीच्या व पर्यायानें आपल्या स्वतःच्या वैय्यक्तिक सुखापेक्षां त्यांना भाऊच्या आत्मिक कल्याणाचें व देशहिताचें महत्त्व

अधिक वाटलें. त्यांच्या एका शब्दानें भाऊनें आपली शपथ मोडली असती, तरी त्यांनीं त्याला सांगितलें, "तुला जी स्फूर्ति झाली आहे ती अगदीं योग्य आहे........तूं आरंभ कर, बेलाशक आरंभ कर." (पृ. ५०५) भाऊच्या स्वार्थत्यागाइतकाच उदात्त व श्रेष्ठ हा शिवरामपंतांचाही स्वार्थत्याग नाहीं काय? यापुढें भाऊस त्याच्या नव्या मार्गाबद्दल, व आशेची तार फार उंच स्वराला न लावण्याबद्दल त्यांनीं उपदेश केला. भाऊनेंही सर्व निरवानिरव करून ताईपुढें आणि सुंदरापुढें एकवार मनोभावानें—अत्यंत कळकळीनें आपलें अंतर्याम स्पष्ट उघडें करून आश्रमांतर केलें; व यापुढें तो भावानंद बनला. येथें म्हणजे ६७ व्या प्रकरणाच्या मध्यभागीं त्याच्या आयुष्यांतला अत्यंत महत्त्वाचा असा विभाग संपला. या वेळीं त्याचें वय २६ वर्षांचें असावें. या विभागाची कालमर्यादा एकाच वर्षाची असावी असें म्हणण्यास कारण असें कीं, ताईच्या इस्टेटीबद्दलचा वाद वर्षभर चालला होता, असें ५६ व्या प्रकरणाच्या शेवटीं म्हटलें आहे. त्यानंतर ५७ ते ६१ प्रकरणांपर्यंत भाऊनें आपल्या इतर व्यवसायांची हकीकत दिली असून ६१ व्या प्रकरणांत ताईच्या वादाची हकीकत सविस्तर दिली आहे व त्या प्रकरणांतच या सर्व काळज्या एकाच वेळीं मागें लागल्या होत्या, असें म्हटलें आहे. हा सर्व वाद ६१ व्या प्रकरणाचे अखेरीस संपला; आणि लागलींच पुढील कथाभाग घडला. ताई त्याला रात्रीं कुंजांत जातांना दिसल्यावर लागलींच "पंधरा दिवसांनीं" (प्र. ६३) सुंदरीच्या विवाहाबद्दल गोष्ट निघते. त्यावरून हा सर्व कथाभाग ताईचा वाद वर्षभर चालू होता त्या अवधींत घडला असें मानावें लागतें.

६७व्या प्रकरणाच्या निम्या भागापासून शेवटच्या ७२ व्या प्रकरणापर्यंत भाऊच्या आयुष्याचा शेवटचा आठवा विभाग पडतो. यांत त्याच्या संन्यासाश्रमाचें व मठस्थापनेचें वर्णन आहे. आता

भाऊ पूर्णपणें तयार झाला; व शिवरामपंत आजपर्यंत जो व्यापक असा पक्ष तयार करीत होते, त्याची प्राणप्रतिष्ठा त्यानें केली. हें संन्यासाश्रमांतील त्याचें कार्य तीन वर्षें झालें; व पुढें आजपर्यंतच्या अविश्रांत श्रमानें त्याचा अकालीं अंत झाला. भाऊनें—आतां भावानंदानें—संन्यासाश्रमानें तीनच वर्षें काढलीं, हें त्याचा प्रथम शिष्य रामानंद याजकडून समजतें. हा शिष्य आपल्याला संन्यास घेतल्यानंतर थोड्याच दिवसांनीं येऊन मिळाला असें भावानंदानें म्हटलें आहे. पुढें भावानंद वारल्यावर त्याच्या कार्यक्षमतेची स्तुति करितांना आपण भावानंदाच्या सहवासांत तीन वर्षें अहोरात्र काढल्याबद्दल रामानंदाचे उद्गार आहेत. म्हणजे संन्यास घेतेसमयीं भावानंदाचें वय २६ वर्षांचें असावें असें धरलें, तर मृत्युसमयीं तो २९ वर्षांचा असावा असें निष्पन्न होतें या तीन वर्षांत त्यानें जे अविश्रांत श्रम केले ते व आजपर्यंत त्याच्या शारीरिक व मानसिक बळाचा जो अपव्यय झाला तो, पाहतां त्याच्या या अकालनिधनाचें आश्चर्य वाटत नाहीं किंबहुना संन्यास घेण्याच्या आधीं त्याचें व त्याच्या ताईचें जें संभाषण झालें आहे त्यांत ताईनें "तुझी या वर्षांत अतिविचारानें व काळजीनें काय दशा झाली आहे!" अशा अर्थाचे उद्गार काढून त्याच्या अकालीं होणाऱ्या शेवटाबद्दल वाचकांचें मन थोडेंबहुत तयार करून ठेविलें आहे. या तीन वर्षांत भावानंदानें ज्या मार्गानें काम केलें, त्या मार्गाबद्दल आजच्या स्थितींतही कोणाचा मतभेद होणार नाहीं. त्यानें आपलें कार्यक्षेत्र अज्ञ जनतेंत ठेविलें होतें. कारण अज्ञ जनता सुज्ञ झाल्याशिवाय, सामान्य लोकांची स्थितीच सुधारून त्यांना स्वोन्नतीबद्दल उत्सुक केल्याशिवाय, कोणतेंही कार्य सफल होणार नाहीं हें त्यानें ओळखलें होतें * यावरून अर्थातच हरिभाऊंनींही देशस्थितीचें

* अज्ञ जनांत ज्ञानप्रसार केल्याखेरीज देशोन्नतीचा कोणताच उपाय यशस्वी

अचुक निदान केलें होतें हें सिद्ध होतें. असो. भावानंदाचा असा अकालीं शेवट करण्यांत हरिभाऊंचा काय हेतु होता, हें पाहणें जरूर आहे. सुंदरीच्या प्रेमाचा त्याग केल्याबद्दल मनाला एकसारखी खंत वाटून कदाचित् भावानंदानें जाणूनबुजून असा आपला अकालीं शेवट करून घेतला असावा, अशी एक शंका प्रथम येते. पण तिचें निराकरण भावानंदाच्याच मरतेवेळच्या एका वाक्यावरून होतें. तें वाक्य असें, "रामानंद, मला हें जग सोडून जाण्याबद्दल

---

होणार नाहीं; आणि या बाबतींत शिकलेल्या लोकांकडून अशिक्षित लोकांची कशी हेळसांड झाली आहे, यावद्दल भाऊनें आपल्या मामास लिहिलेले पुढील विचार मननीय आहेत:—

"××× माझ्या मनाची पक्की खात्री झाली आहे कीं; आतां यापुढें ज्याला लोकहित साधावयाचें असेल, त्यानें सर्वसंगपरित्याग करून लोकांत ज्ञानाचाच प्रसार केला पाहिजे. एकट्या दुकट्याच्या वर्तीनें एकादुसरी गोष्ट प्रत्यक्ष करून दाखवून तादृश उपयोग नाहीं. साधारण लोकांची सद्य:स्थितीच श्रेष्ठावली पाहिजे. ज्या आम्हांला लोकांच्यामुळेंच ज्ञान मिळतें त्या आम्हीं तेंच ज्ञान आमच्या हातीं केवळ ठेव समजून, तें त्यांना पोंचतें केलें पाहिजे. ×××" "आजपर्यंत सुशिक्षित लोकांनीं आहारादि प्राप्तीखेरीज कोणचें दुसरें कृत्य कर्तव्य समजून केलें आहे? ज्या लोकांच्या कराबर आम्हीं आपलें सर्व शिक्षण मिळविलें त्यांचें ऋण फेडण्याकरितां आम्हीं अणुमात्र तरी खटपट केली आहे काय? जें काय आम्हीं केलें असेल तें केवल वरवर. आम्ही गरीब-गुरीब लोकांत कधीं मिसळून वागलों नाहीं. त्यांच्या वांच्छा, त्यांचे हेतु, त्यांची महत्वाकांक्षा काय, याच्याविषयीं कधीं चौकशी केली नाहीं. जे त्यांचें हेतु, ज्या त्यांच्या वांच्छा, अयोग्य असें आम्हांला वाटलें, त्या वांच्छा व ते हेतु काढून टाकण्यास कधीं झटलों नाहीं; त्यांचें स्वरूप पालटण्याला आमच्या हातून कधीं यत्न झाला नाहीं. त्यांच्या आमच्यांतील भेद नष्ट करून टाकण्यास कधीं झटलों नाहीं. ही स्थिति कोण नाकबूल करील? ज्यांच्या कराच्या पैशावर सरकारनें आम्हांस शहाणे केलें, त्यांना आम्ही आपल्या शहाणपणाचा फायदा

वाईट वाटत नाहीं असं नाहीं. फार वाईट वाटतं आहे. इतकं वाईट मला याच्यापूर्वीं एकदांच वाटलं होतं. ज्या वेळीं मीं आपल्या कार्याला लागण्याचा निश्चय केला-आणि या कार्याला हात घातला, तेव्हां मी आपल्या जीवसर्वस्वाला सोडून या कामांत शिरलों, त्या वेळीं जसं वाईट वाटलं, तसंच आतां वाटत आहे." त्यानें आपला मुद्दाम शेवट करून घेतला असता तर असे उद्गार निघतेना. उलट आतां आपण मानसिक यातनांतून कायमचे मुक्त होऊं अशाबद्दल त्याला आनंदच झाला असता. पण त्याचा आपल्या कार्याशीं इतका एकजीव झाला होता कीं, त्याच्यापुढें त्याला कशाचीच आठवण होत नव्हती. भावानंदाचा अकालीं शेवट करण्यांत ग्रंथकाराचा जो हेतु होता तो अविश्रांत काम केल्यानें आपल्या देशांतील कार्यकर्ते पुरुष कसे लवकर मृत्युमुखीं पडतात, व त्यामुळें देशाचें कसें नुकसान होतें, हें दाखविण्याचा होय. हें सार त्यांनीं रामानंदाच्या तोंडून पुढीलप्रमाणें वदविलें आहे. "ज्याच्या चरित्रांत लहानपणापासून मानसिक उद्विग्नतेच्या-अर्थात् शारीरिक बळाचा अतिव्यय होण्याजोग्या गोष्टी अतोनात घडल्या, व पुढें ज्यानें आपलें शारीरिक व मानसिक बळ किती पुरेल, तें कसें तगवावें, याच्या विचाराकडे फार थोडें लक्ष देऊन किंबहुना अगदीं दुर्लक्ष करून सपाटून खर्च केलें, तो महात्मा फार दिवस जगणें शक्यच नव्हतें. अगदीं लहानपणापासून जर आपण लक्षपूर्वक हें समग्र चरित्र पाहिलें, तर मानसिक बळाचा विलक्षण व्यय झाला आहे असें स्पष्ट दिसून येईल. असा मानसिक बळाचा विलक्षण व्यय जेथें होतो, तेथें शारीरिक बळ कसेंही विलक्षण असलें तरी तें टिकणें अगदीं

---

देण्याला खटपट केली काय? त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्याला आम्हीं काय उद्योग केला? याचें उत्तर साफ "कांहीं नाहीं" असेंच जरी कोणीं देण्याला कांकूं केलं, तरी त्या बाबतींत आमचें मन कांहीं निःशंक नाहीं हें खास." मी. प्र. ६७.

कठीण—किंबहुना अशक्य. माझ्या वैद्यक्रियेच्या ज्ञानावरून मला मुळीं हेंच आश्चर्य वाटतें कीं, ही इहलोकींची शर्यत ज्या व्यक्तीनें इतक्या विलक्षण वेगानें धांवून जिंकली, तो आपल्या इष्ट स्थानाच्या जवळ येतांच पडला कसा नाहीं, इतका जगला कसा ?" या वाक्यामध्यें रामानंदानें आपल्या गुरूच्या सर्व आयुष्यक्रमाचें थोडक्यांत आणि मार्मिक पर्यालोचन केलें आहे. या शोकपर्यवसानाचीं बीजें कथानकांत पहिल्यापासून पेरलीं गेलीं आहेत असें जें आरंभीं म्हटलें तें कसें, हेंही यावरून लक्षांत येईल. तसेंच कथानक शोकपर्यवसायी करावयाचें असलें तर ग्रंथकाराला त्याची तयारी पहिल्यापासूनच करावी लागते असें जें मागें म्हटलें आहे, तेंही यावरून स्पष्ट होईल.

भावानंदाचा अकालीं शेवट झाला त्याचें वर्णनही शेवटीं हरिभाऊंच्या कौशल्यास साजेसेंच चटका लावणारें झालें आहे. भावानंदासारख्या कार्यकर्त्या व स्वकार्यांत एकजीव झालेल्या पुरुषाचा शेवट असाच असावयाचा. त्याच्या मृत्युसमयीं त्याला अत्यंत प्रिय अशी सर्व मंडळी—विशेषतः सुंदरी—जवळ असल्यानें हा प्रसंग फारच हृदयद्रावक झाला आहे. एकमेकांचीं हृदयें परस्पराविषयीं अत्यंत अनुरागपूर्ण असतां त्या दोघांनाही जिवंतपणीं एकमेकांशीं स्पष्ट बोलतां आलें नाहीं, याबद्दल मनाला तळमळ वाटल्यावांचून रहात नाहीं; आणि शेवटीं मरणापूर्वीं त्यानें लिहून ठेवलेल्या पत्रांत जेव्हां त्याच्या मृत्यूनंतर सुंदरीच्या नांवचें पत्र सांपडतें, आणि तें पत्र सुंदरी "अश्रूंनीं भिजलेल्या व थरथरणाऱ्या हातांनीं" घेऊन आपल्या वडिलांच्यापुढें करिते, तेव्हां तिच्या वडिलांना आणि रामानंदाबरोबर वाचकांसही गहिंवर येतो. भावानंदाचें निधन सुंदरीला किती दुःखदायक होतें याचें रामानंदानें फारच बहारीचें वर्णन केलें आहे. तो म्हणतो, "भावानंदाचें प्राणोत्क्रमण होतांच (सुंदरी) तेथून तात्काल उठून गेली होती. तिच्या अंतःकरणाची

स्थिति वर्णन करून सांगणें केवळ अशक्य. सुंदराताईनीं स्वतःच त्या स्थितीचें वर्णन लिहिलें तर तें कोणास कळणें शक्य परंतु त्यांनीं लिहिणें जितकें अशक्य, तितकी दुसरी कोणतीही गोष्ट अशक्य नाहीं. एवढें मात्र खास सांगतों कीं, सुंदराताईंना दुःख झालें तें दुसऱ्या कोणासही झालेल्या दुःखाच्या हजारोंपट लाखोंपट असलें पाहिजे. भावानंदाचें प्राणोत्क्रमण हें सुंदराताईच्या प्राणोत्क्रमणासमान होय." मरेपर्यंत भावानंदाचा जीव अर्थातच आपल्या मठांत व आपल्या कार्यांत गुंतला होता; व त्याचे शेवटचे शब्द जितके स्फूर्तिकारक तितकेच करुणरसपरही आहेत. ते हेः "एक माणूस गेला म्हणून काय झालें? एक शिपाई पडला तर दुसऱ्यानं लगट केली पाहिजे." हा काल्पनिक प्रसंग लिहिल्यानंतर बरोबर वीस वर्षांनीं हुबेहूब असाच प्रसंग सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटींत घडला. भावानंदाच्या मृत्यूचा व ना. गोखल्यांच्या मृत्यूचा प्रसंग यांमध्यें आपल्यास फारच आश्चर्यकारक साम्य वाटलें, असें स्वतः हरिभाऊ मजजवळ एकदां म्हणाले. कादंबरीकारांना व कवींना दिव्य दृष्टि असते असें म्हणतात, त्यायोगानें भावानंदासारख्याच एका आत्मत्यागी व कार्यकर्त्या देशभक्ताचा मृत्यु आपल्या कल्पनाशक्तीनें वीस वर्षें अगोदर हरिभाऊंनीं पाहिला तर नसेलना? तसें असेल तर Life imitates Art far more than Art imitates Life हे ऑस्कार वाइल्डनें विनोदानें काढलेले उद्गार खरेच आहेत असें म्हणावें लागेल !

याप्रमाणें आपण नायकाच्या आयुष्यक्रमाचें परीक्षण केलें. त्यावरून अवघ्या २३ वर्षांच्या अवधींत त्यानें स्वतःची केवढी प्रगति केली, याचें आश्चर्य वाटल्यावांचून राहात नाहीं. सर्व कथानकांत अर्थातच भावानंदाचें पात्र मुख्य असल्यामुळें, व त्याची उत्क्रांति

चित्रित करण्यासाठींच सर्व कादंबरीचा अवतार असल्यामुळें आपण त्याच्याकडे इतकें लक्ष दिलें, तथापि शिवरामपंत, ताई व सुंदरी हीं दुसरीं तीन पात्रेंही तितक्याच महत्त्वाचीं आहेत, यामुळें त्यांचा थोडक्यांत विचार करणें जरूर आहे. शिवरामपंतांच्या हातून सर्व कथानकांत कांहीं क्रिया ( Action) घडत नाहीं असें सकृद्दर्शनीं वाटतें; आणि फक्त बाह्य क्रियेच्या ( Physical action ) दृष्टीनें पाहिलें तर तें थोडेंबहुत खरेंही आहे. पण कथानकाची आंतरक्रिया ( Psychalogical action ) सर्व शिवरामपंतांवर उभारली आहे, आणि भावानंदासारखा कार्यकर्ता देशभक्त केवळ त्यांच्याच शिकवणीनें तयार होतो, ही गोष्ट लक्षांत घेतली असतां शिवरापंतांचें पात्र अगदींच निष्क्रिय आहे, असें म्हणतां येणार नाहीं. शिवरामपंत व सुंदरी यांचें कथानकांत किती महत्त्व आहे, याबद्दल एक वेदांतांतील उपमा घेतां येण्यासारखी आहे. जीवात्मा हा संसारांत परमात्म्याच्या प्रेरणेनें व मायेच्या मोहानें कार्यप्रवृत्त होतो; त्याप्रमाणें भावानंदही शिवरामपंतांच्या प्रेरणेनें व सुंदरीच्या मोहानेंच कार्यप्रवृत्त झाला आहे. ही उपमा जरा आणखी पुढें न्यावयाची म्हटलें तर असेंही म्हणतां येईल कीं, मग मुक्त झाल्यावर जीवात्मा ज्याप्रमाणें मायेच्या मोहाचा त्याग करून परमात्म्यांत लीन होतो, त्याप्रमाणें भावानंदही पुढें सुंदरीच्या मोहाचा त्याग करून शिवरामपंतांच्या विचारांत पूर्णपणें लीन झाला आहे. शिवाय शिवरामपंतांची भूमिका रंगविण्यांत हरिभाऊंचा दुसरा हेतु होता; तो असा कीं, खरा सुधारक कसा असला पाहिजे हें दाखवावयाचें. पहिल्यांदां सामाजिक सुधारणेचा आरंभ फक्त श्रीमंत लोकांत झाला; आणि तें सुद्धां पाश्चात्यांचें अनुकरण म्हणजेच सामाजिक सुधारणा, व ती केवळ पैशानेंच साध्य, अशी सार्वत्रिक समजूत त्यावेळीं झाली होती; पण तसें नसून खरी सुधारणा म्हणजे काय व खरा सुधारक कसा असतो

हें हरिभाऊंनीं शिवरामपंतांवरून दाखविलें. हरिभाऊंच्या सर्वच सामाजिक कादंबऱ्यांतील सुधारणाभिमानी व्यक्ति मध्यम व गरीब स्थितींत असून त्यांनीं लोकांपासून फटकून गांवाबाहेर युरोपियन पद्धतीनें बंगल्यांत राहून सुधारणा करण्याऐवजीं लोकांत राहून केली आहे. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांपासून सत्यत्वप्रतीति लवकर होते याचें इंगित हेंच होय. असो. एकंदरींत शिवरामपंतांचें शील व स्वभाव सर्वतोपरी अनुकरणीय असा वर्णिला आहे. परंतु यामुळेंच हरिभाऊंनीं निर्मिलेल्या सर्व पात्रांत शिवरामपंत ही एक अस्वाभाविक व्यक्ति आहे असा त्यावर माझ्या एका टीकाकार मित्राचा आक्षेप आहे. तथापि सूक्ष्म रीतीनें पाहणारांस, भाऊ व सुंदरी यांच्या संबंधांत शिवरामपंतांवर एक मोठा दोष येऊं शकतो असें दिसून येईल. तो असा कीं, सुंदरीस अविवाहित ठेवण्याचा आपला निश्चय शिवरामपंत ज्या कारणास्तव मोडतात, तें कारण त्यांचें आजपर्यंतचें धैर्य व चिकाटी पाहतां अगदींच असमर्थनीय आहे. स्वतःच्या आयुष्याचा भरंवसा नाहीं, आणि सुंदरीमध्यें स्वतंत्रपणें राहण्याची धमक नाहीं, यामुळेंच ते शेवटीं सुंदरी भाऊला देऊं करितात. म्हणजे यावरून भाऊ व सुंदरी यांच्या परस्परप्रेमाला ते कांहींच महत्त्व देत नाहींत. त्यांच्या या वेळच्या बोलण्यावरून (प्र. ६३) असें दिसतें कीं, त्यांची स्वतःची प्रकृति चांगली असती व सुंदरींत ताईप्रमाणें स्वतंत्रपणें राहण्याची धमक असती, तर त्यांनीं तिचें भाऊवर प्रेम असतांही तिला अविवाहित ठेविलें असतें. तिचें व भाऊचें परस्परांवर प्रेम आहे, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली नसेल ही गोष्ट मुळींच संभवत नाहीं. कारण तसें म्हणावें तर त्यांच्यांत निरीक्षणशक्तीचा पूर्ण अभाव होता असें मानावें लागेल. बरें, हें प्रेम त्यांच्या लक्षांत आलें होतें असें मान्य केलें तर दोन प्रेमी जीवांस त्यांच्या परस्परसुखाचा विचार न करितां केवळ आपल्या

हेतूच्या सिद्धयर्थ जन्मभर दूर ठेवण्याइतका दुराग्रह त्यांच्यांत होता असें म्हटलें पाहिजे. म्हणजे ते शेवटीं सुंदरीचें लग्न करावयास तयार होतात, तें तिचें व भाऊचें परस्परांवर प्रेम आहे म्हणून नव्हे तर आपल्या डोळ्यांदेखत सुंदरीची नीट व्यवस्था लागलेली पाहावी या स्वार्थपर हेतूनेंच होय असें म्हणावयास हरकत नाहीं.

ताई व सुंदरी या दोघींचे स्वभाव एकमेकींपासून इतके भिन्न आहेत कीं, या दोघी दोन भिन्न वळणाच्या (Type) स्त्रिया वर्णिल्या आहेत; व हें हरिभाऊंनीं ६३ व्या प्रकरणांत शिवरामपंतांच्या तोंडून स्पष्टपणें वदविलेंच आहे. ते म्हणतात, "कांहीं स्त्रिया वेलीप्रमाणें जात्याच दुसऱ्याच्या आधाराची अपेक्षा करितात; कांहींना अगदीं स्वतंत्रपणानें राहतां येतं. सुंदरी पहिल्या वर्गातली आहे, तुझी ताई दुसऱ्या वर्गातली आहे."

नवऱ्याच्या घरीं असह्य अपमान व छळ होतांच त्याचें घर सोडून ज्या बाणेदारपणानें ताई शिक्षण संपादन करते त्यावरून तिच्या मनाची स्वतंत्र वृत्ति व्यक्त होतेच, पण पुढेंही तिची वृत्ति किती निर्भय व धीट आहे हें ६० व्या प्रकरणांतील एका प्रसंगावरून दिसून येतें. तो प्रसंग म्हणजे भाऊच्या एका व्याख्यानाचे वेळीं दंगा होऊन त्याच्यावर हल्ला होतो तो होय. या वेळीं सुंदरी आपल्या स्वभावानुरूप "असा प्रसंग पुनः येण्यापेक्षां हीं व्याख्यानेंच बंद करावीं. त्यापासून फायदा तर कांहीं नाहीं, उलट असा आणखी कधीं प्रसंग आला तर भलतंसलतं मात्र व्हायचं" असा सल्ला देते. तर ताई, "काय, हा असा प्रसंग एकदां आला म्हणून हातीं घेतलेलं काम सोडून द्यावयाचं! वाहवा........मग त्यांत काय राह्यलं! तुला त्रास झाला असेल, जिवाची देखील भीति पडली असेल, मला दिसतं आहे. पण बाई, तेवढ्यासाठीं आपलं कार्य बंद करणं हें कांहीं चांगलं नाहीं" असा सल्ला देते!

सुंदरीच्या बाबतींत दोन शंका निघण्यासारख्या आहेत त्यांचा आतां विचार करूं. पहिली शंका ही कीं, आपलें सुंदरीवर प्रेम आहे ही गोष्ट भाऊ स्वतः वारंवार कंठरवानें सांगत आहे. पण सुंदरीचें भाऊवर प्रेम आहे ही गोष्ट कथानकांत कोठेंच स्पष्ट केली नाहीं. ही गोष्ट स्पष्ट न करितां ती अनुमानानें ओळखण्याइतका भरपूर पुरावा हरिभाऊंनीं दिला आहे. कांहीं उघड गोष्टी स्पष्ट न करितां व्यंग्य ठेवून त्या वाचकांच्या अनुमानावर सोंपविणें यांतच कादंबरी-काराचें कौशल्य आहे. प्रकाश व छाया यांचा योग्य ठिकाणीं योग्य उपयोग करण्यावर ज्याप्रमाणें फोटोग्राफीचें कौशल्य अवलंबून असतें, त्याप्रमाणें कवीचें कौशल्यही काय व्यक्त करावयाचें व काय व्यंग्य ठेवावयाचें यांत आहे. म्हणून कवीच्या मार्मिकतेची व चातुर्याची खरी कसोटी त्याच्या कृतींतील व्यक्त स्थलांपेक्षां व्यंग्य स्थलांवरूनच होते. शिवाय दुसरी गोष्ट अशी कीं, हें आत्मचरित्र असल्यामुळें ज्या गोष्टी नायकाला प्रत्यक्ष समजल्या त्याच तो वाचकांना स्पष्टपणें सांगणार. भाऊ व सुंदरी यांजमध्यें अत्यंत स्नेह खरा; पण ते परस्परांशीं जरा संकोचानें वागत आहेत, हें स्पष्ट दिसतें. आजच्या काळीं स्त्रीपुरुषांमधील संमिश्रण अधिक वाढल्यामुळें आजचा भाऊ आणि सुंदरी एकमेकांशीं अधिक मोकळेपणानें वागतील हें खरें; पण ज्या काळीं स्त्रीशिक्षणाच्या नुसत्या नांवानेंच समाज बिचकून जाई, त्या काळीं प्रौढ स्त्रीपुरुषांमध्यें इतकें अंतर ठेवणेंच रास्त होतें. सुंदरीचेंही भाऊवर तितकेंच प्रेम लहानपणापासून होतें हें सुचविणारीं स्थळें कादंबरींत कोणतीं आहेत तें पाहूं. १४ व्या प्रकरणाचे शेवटीं जो प्रसंग वर्णिला आहे त्यावरून सुंदरीला भाऊच्या सहवासाची आवड किती आहे हें दिसतें; व हें १६ व्या प्रकरणांत तिनें आपल्या आईला गांवाला जातेवेळीं भाऊला बरोबर घेण्याविषयीं विनंती करून स्पष्ट सांगितलें आहे. त्याच वेळीं

भाऊला पत्र लिहिण्याबद्दल तिनें आपण होऊन प्रथम आईला विचारिलें आहे, हें सर्व बालपणांतील झालें. पण पुढें प्रौढपणीं भाऊची परीक्षा पास झाल्याबद्दल तिला फारच आनंद (४२ व्या प्रकरणांत) झाल्याचें वर्णन करून तिचें प्रेम सूचित केलें आहे; आणि ६० व्या प्रकरणांत भाऊवर हल्ला झाल्यावेळीं सुंदरीला वाटलेली अधिक काळजी दाखवून हें दिग्दर्शन अधिक स्पष्ट केलें आहे. सुंदरीचें प्रेम यापेक्षां अधिक स्पष्टपणें दाखविणें आपल्या सामाजिक कल्पनांप्रमाणें शक्य नाहीं. ती एकादी कादंबरींतील नायिका असती तर कदाचित् तिनें आपलें प्रेम नायकाजवळ स्पष्ट शब्दांनीं उच्चारून दाखविलें असतें.

दुसरी शंका अशी कीं, सुंदरीचा व भाऊचा विवाह झाला असता, तर कथानकाचा शेवट आहे यापेक्षां परिणामकारक झाला असता कीं नाहीं, ही शंका मीं स्वतःच हरिभाऊंस समक्ष विचारिली होती. त्याला त्यांनीं जें उत्तर दिलें तें मनोरंजनच्या १९१९ च्या एप्रिलच्या अंकांतील "हरिभाऊंच्या कांहीं आठवणी" यांत प्रसिद्ध झालें आहे.

याप्रमाणें बहुतेक सर्व कादंबरीचें आपण परीक्षण केलें. यांत विचार करण्यासारख्या आणखीही कांहीं गोष्टी आहेत. उदाहरणार्थ, हरिभाऊंचा विनोद, त्यांचें सृष्टिनिरीक्षण, त्यांचा अतींद्रिय (occult) शक्तीवरील विश्वास, वगैरे. परंतु कालाभावामुळें व निबंध बराच वाढल्यामुळें त्यांचा विचार तूर्त बाजूला ठेवणें प्राप्त आहे. आतां आणखी एकाच गोष्टीचा विचार करून हा लांबलेला निबंध पुरा करूं. ती गोष्ट म्हणजे कादंबरीची फलश्रुति होय. या कादंबरीच्या द्वारें कोणत्या गोष्टी हरिभाऊंनीं समाजापुढें मांडल्या? यांपैकीं दोन तीन बाबींचा म्हणजे, खरी सामाजिक सुधारणा, देशहिताचा खरा मार्ग, वगैरे गोष्टींचा वर प्रसंगानुरोधानें उल्लेख आलाच आहे.

त्याशिवाय आणखी दोन तीन गोष्टी आहेत, यांपैकीं पहिली म्हणजे देशहितासाठीं लागणाऱ्या आत्मत्यागाची आवश्यकता. ही गोष्ट भावानंदाच्या द्वारानें फारच उत्तम रीतीनें दाखविली आहे. दुसरी गोष्ट म्हणजे ऐहिकापेक्षां आध्यात्मिकाचें, असत्यापेक्षां सत्याचें श्रेष्ठत्व. सुंदरीशीं विवाह करून सुखी व्हावें, का संन्यास घेऊन शारीरिक सुखाचा त्याग करून परहित साधावें, असा जेव्हां कर्माकर्माचा मोह भाऊपुढें उत्पन्न झाला तेव्हां त्याचा निकाल भाऊनें कसा केला हें दाखवून ही गोष्ट हरिभाऊंनीं सिद्ध केली आहे. या प्रसंगींचें शिवरामपंतांचें भाषण व स्वतः भाऊच्या मनाचीं आंदोलनें यांमध्यें या प्रश्नाचें विवेचन हरिभाऊंनीं केलें आहे. हा सर्वच भाग अप्रतिम असल्यामुळें तो मुळांत साग्र वाचूनच त्याचें स्वारस्य कळणार आहे.

तिसरी व विशेष महत्त्वाची गोष्ट जी हरिभाऊंनीं या कादंबरीच्या द्वारें समाजापुढें मांडली आहे ती सार्वजनिक चारित्र्यास आध्यात्मिक स्वरूप देण्याची आवश्यकता ही होय. ही गोष्ट त्यांनीं आपल्या यापुढील "कर्मयोग" या कादंबरींत अधिक स्पष्ट केली आहे. पण येथें भावानंदाकडून शेवटीं संन्यास घेववून तिचें दिग्दर्शन केलें आहे. संन्यासाश्रम हा स्वभावतःच निष्काम आणि आध्यात्मिक स्वरूपाचा आहे. त्याचा राजकीय कामांत उपयोग केला तर राजकीय चळवळीला आध्यात्मिक स्वरूप येऊन हल्लीं निष्क्रिय व निरुपयोगी झालेल्या संन्यासाश्रमाचेंही पुनरुज्जीवन होईल असें त्यांचें मत दिसतें. "आजच" या कादंबरींतील स्वामींच्या तोंडून ही गोष्ट त्यांनीं अधिक स्पष्टपणें वदविली आहेच; पण येथेंही भाऊनें संन्यास घेण्याच्या आधीं आपल्या मामास जें पत्र लिहिलें आहे त्यांतही त्यानें तेच उद्गार काढले आहेत. "तूं ज्या कारणासाठीं संन्यास घेणार आहेस त्यामुळें जुन्या पवित्र संन्यासाश्रमाची थट्टा

मात्र होणार आहे." या मामाच्या आक्षेपास उत्तर देतांना भाऊ म्हणतो, "मी आश्रमांतर करणार तो भगवीं वस्त्रें नेसून 'नारायण नारायण' करीत घरोघर पुड्या उकळण्यासाठीं नव्हे. पूर्वींचे चतुर्थाश्रमी आपण संसारत्याग करून दुसऱ्यासही त्यापासून अलिप्त राहण्यास सांगत; परंतु मी चतुर्थाश्रमांत शिरून आपल्या मित्रांना सांगणार कीं, आपण थोड्यांनीं सर्वसंगपरित्याग कां करावयाचा? तर सगळ्या लोकांना सर्वसंगोपभोग उत्तमपणें मिळावा म्हणून! आपण संसारत्याग करून लोकांना ज्ञान देण्यासाठीं भिरीभिरी कां हिंडावयाचें? तर त्यांना यथेच्छ संसारसुख मिळावें म्हणून." संन्यासाश्रमाचें या दृष्टीनें पुनरुज्जीवन झालें तर तें इष्ट नाहीं असें कोण म्हणेल?

झालें. मला या कादंबरीबद्दल जें सांगावयाचें होतें तें मीं सांगितलें. यांत आणखी कांहीं मुद्दे राहिले आहेत, हें मी जाणून आहें; पण येथेंच थांबावें हें बरें. आतांपर्यंत जें विवेचन केलें तेवढया-वरून या कादंबरींतले उरलेले गुणदोष वाचक तेव्हांच काढूं शकतील अशी माझी खात्री आहे. कादंबरींत कांहीं लहानसहान दोष आहेत, हें मला मान्य आहे; पण त्याबरोबर गुण इतके आहेत कीं, त्या दोषांपेक्षां त्यांतील गुणांकडेच वाचकांचें लक्ष वेधणें मला अधिक युक्त वाटलें. आणि त्याप्रमाणें ही कादंबरी केवळ परिक्षेच्या दृष्टीनें विद्यार्थ्यांनीं न वाचतां आयुष्यांतील एक मार्गदर्शक ग्रंथ या दृष्टीनें तिचें पुनःपुनः वाचन करून स्वतःचा आणि त्याबरोबर देशाचा फायदा करून घ्यावा अशी आशा करून मी रजा घेतों.

## पुरवणी.

मनोरंजनानें हरिभाऊ वारल्यावर, एप्रिल १९१९ मध्यें आपटे अंक काढला, त्यांत शेवटीं "हरिभाऊंनीं पूर्वीं एकदां लिहिलेला 'मी' कादंबरीचा शेवटचा भाग" या सदराखालीं पुढील

माहिती प्रसिद्ध केली आहे. "हरिभाऊंनीं आपली 'मी' ही कादंबरी लिहिण्यास १८९३ सालीं सुरुवात केली; व तिचें पहिलें प्रकरण करमणुकीच्या चौथ्या वर्षाच्या पहिल्या अंकांत (ता. ४ नोव्हेंबर १८९३) प्रसिद्ध झालें. त्यापुढील प्रकरणें त्या वर्षाच्या व त्याच्या पुढील वर्षाच्या अंकांत प्रसिद्ध झालीं. पण या कादंबरीचा शेवटचा भाग लिहून त्या वेळींच नव्हे तर त्यानंतरही कित्येक वर्षांत ही कादंबरी त्यांनीं पुरी केली नाहीं." याप्रमाणे या कादंबरीचा अगदीं अखेरचा भाग त्या वेळीं लिहिला गेला नसून केवळ तेवढ्यासाठीं ही कादंबरी अनेक वर्षे पडून राहिली; पुढें १९१२ सालीं तो भाग हरिभाऊंनीं लिहिला; पण तो मनासारखा न उतरल्यामुळें रद्द करून पुनः १९१५ सालीं हल्लीं आहे तो भाग लिहून कादंबरी पूर्ण झाली अशी माहिती दिली आहे. परंतु शोध करितां ही माहिती चुकीची आहे असें समजतें. कारण 'मी' कादंबरीचें शेवटचें प्रकरण अगदीं आज आहे तसेंच, करमणुकीच्या १२ आक्टोबर १८९५ च्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे. एवढेच कीं, त्या वेळीं ६७ प्रकरणांत ही कादंबरी पुरी झाली आहे. ही कादंबरी त्यानंतर दोन वर्षांनीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध होण्यासाठीं सर्व छापून तयारही झाली होती; पण ती ज्या छापखान्यांत छापली तो छापखाना जळून त्या आगींत या पुस्तकाचे सर्व फॉर्म जळून गेल्यामुळें पुस्तक प्रसिद्ध होण्याचे राहिलें. त्यानंतर कादंबरी पुनः छापून प्रसिद्ध करावयाची पण कांहीं अडचणींमुळें तें तसेंच राहिलें. त्यानंतर १९१६ सालीं ती प्रसिद्ध झाली. तींत आतां ७२ प्रकरणें आहेत. हीं वाढलेलीं ५ प्रकरणें नवीन घातलीं नसून मूळचीं कांहीं फार मोठीं प्रकरणें होतीं, त्यांत भाग पाडल्यामुळें हीं ५ प्रकरणें वाढलीं आहेत. कित्येक ठिकाणीं कमीअधिक मजकूरही घालण्यांत आला; पण तेव्हांच्या आणि आतांच्या कादंबरींत काय फरक आहे,

हें त्या वेळच्या करमणुकीचे सर्व अंक पाहावयास मिळाल्याशिवाय सांगतां येणार नाहीं. परंतु शेवटलें प्रकरण मात्र तेव्हांचें आणि आतांचें अगदीं एकच आहे. यामुळें केवळ शेवटल्या भागासाठीं कादंबरी २३ वर्षें पडून राहिली, व तो शेवटला भाग १९१२ सालीं लिहून तो मनासारखा न वठल्यामुळें रद्द करून पुनः १९१५ सालीं लिहिला हें विधान बरोबर नाहीं.

---

# हरिभाऊ आपट्यांची HUMOUR

[ ता. ३ मार्च १९२३ रोजीं आपट्यांच्या दुसऱ्या पुण्यतिथीचे प्रसंगीं न्यू पूना कॉलेजमध्यें वाचलेला निबंध.]

आजचा विषय आपल्यापुढें नीटपणें मांडतां यावा म्हणून मी प्रथमतः Humour (विनोद) या विषयाचा विचार करणार आहें. आपण इंग्रजींत ज्याला Humour असें म्हणतों तो अर्थ 'विनोद' या शब्दानें योग्य रीतीनें व्यक्त होतो असें मला वाटत नाहीं. Humour हा शब्द उच्चारतांच ज्या कल्पना आपल्यापुढें येऊन उभ्या राहतात त्या कल्पना "विनोद" या शब्दानें उत्पन्न होत नाहींत. तीच गोष्ट इतरही अनेक इंग्रजी शब्दांची आहे. तथापि प्रत्येक इंग्रजी शब्दास मराठी शब्दाचा उपयोग करण्याची हल्लीं प्रवृत्ति असल्यामुळें अशा शब्दांस प्रतिशब्द म्हणून कांहीं मराठी शब्द वाङ्मयांत हल्लीं रूढ झाले आहेत. मूळ शब्दांचा व्यापक अर्थ प्रकट करण्यास हे नवीन शब्द जरी अपुरे पडत असले, तरी यांपेक्षां अधिक चांगले शब्द सांपडेपर्यंत याच शब्दांचा उपयोग करणें भाग आहे. इंग्रजी Realism या शब्दाचीही गोष्ट अशीच आहे. या शब्दाला मराठींत पुष्कळदां वस्तुस्थितित्व अगर "यथार्थत्व" असे प्रतिशब्द योजतात, पण "रिअलिझम्" या शब्दाचें खरें स्वरूप व्यक्त करण्यास हे दोन्ही शब्द अपुरे पडतात असें मला वाटतें. तथापि असे प्रतिशब्द केवळ कामचलाऊ आहेत हें लक्षांत ठेवलें व मूळ इंग्रजी शब्दांचा व्यापक अर्थ प्रत्येक वेळीं ध्यानांत ठेवला म्हणजे, या प्रतिशब्दांची अडचण विशेष भासणार नाहीं. हें खरें तरीपण, सोयीसाठीं या निबंधांत Realism आणि Humour हे शब्द पुष्कळ ठिकाणीं मीं जसेच्या तसेच वापरले आहेत. कारण भाषांतर करण्यास

अवघड अशा परदेशी शब्दांना स्वभाषेंतील अपरिचित असे नवीन शब्द हुडकून काढण्यापेक्षां अगर तयार करण्यापेक्षां, ते परदेशी शब्द जसेच्या तसेच कायम ठेवल्यानें तो विषय समजण्यास फार सोपें पडतें असा माझा अनुभव आहे. असो.

वाङ्मयांत Humour चें स्थान किती महत्त्वाचें आहे याचें विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. Humour ला वाङ्मयांत बराच श्रेष्ठ दर्जा दिला जातो, येवढें सांगून पुढें जाण्यास हरकत नाहीं. हास्यरसप्रधान वाङ्मयाचे Wit आणि Humour असे साधारणतः दोन भाग पडतात. यांपैकीं Wit सुभाषित याचा संबंध मुख्यत्वें-करून शब्दाशीं येतो. एकाच शब्दाचा अनेकार्थीं उपयोग केला असतां मनास चमत्कृति वाटून आनंद होतो; अशा प्रकारची शब्दचमत्कृति करणें म्हणजे Wit होय. पण Humour चा गोष्ट किंवा क्षेत्र Wit पेक्षां वेगळें आहे. Wit ही नेहमींच जरी शब्दचमत्कृतिजन्य असते असें जरी नाहीं, तरी तिला शब्दाचें साह्य विशेष लागतें, इतकेंच नव्हे तर शब्दयोजना हा तिचा आत्मा आहे. Wit व Humour यांमध्यें काय भेद आहे याबद्दल पाश्चात्य लेखकांनीं विवेचन केलें असून, रा. केळकर यांनीं आपल्या " सुभाषित व विनोद " या ग्रंथांतही याबद्दल बरीच मार्मिक चर्चा केली आहे. त्या सर्वांची येथे पुनरुक्ति न करितां, शब्दचमत्कृतीपासून उत्पन्न होणारी ती Wit; व असंबद्धतादर्शनापासून उत्पन्न होणारी ती Humour असा या दोहोंत स्थूलमानानें भेद आहे येवढें गृहीत धरून चाललें असतां पुरें आहे. परंतु Wit आणि Humour यांचें अंतिम कार्य (effect) हास्यरसपरिपोष हें एकच असल्यामुळें; व वाङ्मयांत या दोहोंचें साहचर्य पुष्कळदां आढळून येत असल्यानें Wit व Humour यांचा बरेच वेळां घोटाळा होतो; आणि Humour च्या वर्गीकरणांत Wit ची भेसळ झालेली आपणांस आढळून येते; तथापि

या दोहोंचे हेतु–ध्येयें–भिन्न आहेत हें लक्षांत ठेवलें म्हणजे Wit आणि Humour यांचा भेद आपणांस तेव्हांच पाडतां येईल. Witचें कार्य केवळ मनरंजन होय. आतां Wit करण्यास शब्दज्ञान चांगल्या प्रकारचें लागत असल्यामुळें, चांगली Wit करण्यास विद्वत्ता, कल्पकता, सुसंस्कृतता, समयसूचकता इत्यादि गुण लागत असतील हें खरें; पण त्यामुळें त्याचें अंतिम कार्य (object) बदलत नाहीं. पण Humour चें तसें नाहीं. ह्यूमरचें कार्य Wit पेक्षां श्रेष्ठतर आहे. मनरंजन तर व्हावेंच, पण त्याबरोबर सद्बोधही व्हावा हा Humour चा हेतु आहे. यामुळेंच Wit ही बुद्धिप्रधान तर Humour ही भावनाप्रधान असते, असा या दोहोंत रा० केळकरांनीं आपल्या ग्रंथांत भेद केला आहे. Humour करणाराला विद्वत्ता नसली तरी चालेल; पण केवळ विद्वत्तेपेक्षांही श्रेष्ठ गुण "निरीक्षण" हा पाहिजे. ज्याच्यामध्यें हा गुण नसेल त्याला असंबद्धताप्रत्यय होणार नाहीं, व स्वतःस असंबद्धताप्रत्यय झाल्याविना त्याला असंबद्धतादर्शन करितां येणार नाहीं.

असंबद्धतादर्शन व बोध हे दोन्ही गुण जरी असले, तरी त्याला सहानुभूति व सदयता यांची जोड असल्याशिवाय ती खरी ह्यूमर होऊं शकणार नाहीं. सहानुभूतिशून्य असंबद्धतादर्शनापासून कांहीं काळ हंसूं येईल, पण त्यापासून खरा आनंद होणार नाहीं. आणि ही आनंदप्रतीति न झाल्यामुळें त्या Humour मध्यें खरी कला नाहीं. इंग्लिश लेखक स्विफ्ट याची Humour हें याचें उत्कृष्ट उदाहरण होय. स्विफ्ट हा नामांकित विनोदी खरा, पण त्याच्यांत मनुष्यजातीबद्दल सहानुभूतीचा व प्रेमाचा ओलावा नसल्याकारणानें त्याच्या विनोदापासून शुद्ध आनंदप्रतीति उत्पन्न न होतां, खेद उत्पन्न होतो. थॅकरेनें स्विफ्टबद्दल लिहितांना असें म्हटलें आहे कीं, " We have in swift, a humourous philosopher

whose truth frightens one; & whose laughter makes one melancholy." परंतु हेच त्याचे Addisonबद्दलचे उद्गार पहा. ॲडिसनचें वर्णन थॅकरेनें पुढीलप्रमाणें केलें आहे. " A wit that makes us laugh and leaves us happy; one of the kindest benefactors that society has ever had." विनोदी लेखकांमध्यें ॲडिसन यास उच्च स्थान मिळण्याचें कारण याप्रमाणें एकच होय. तें हें कीं, त्याच्या Humour चा हेतु सद्बोध हा असून ती सदा सदयतेनें ओथंबलेली असे. आपल्या विनोदी लेखनाचा हा हेतु स्वत: Addison नेंच एके ठिकाणीं कबूल केला आहे. तो म्हणतो; " I would not willingly laugh, but in order to instruct." विनोदांतर्गत बोधाचें ग्रहण करण्यास मनुष्याचें मन केव्हां तयार होईल; तर तें सुप्रसन्न असेल तेव्हांच. विनोदापासून मनास आनंद झाला तरच ही सुप्रसन्नता प्राप्त होईल; आणि विनोदाच्या बुडाशीं सदिच्छा, मनुष्यजातीबद्दल प्रेम, सदयता असून आपली सुधारणा व्हावी अशी लेखकाची इच्छा आहे अशी वाचकांची जेव्हां खात्री होईल तेव्हांच त्या विनोदापासून त्याला आनंद होईल.

येथें यावर असा आक्षेप येईल कीं, विनोदाचे मागें बोधाचें हें नसतेंच शेपूट चिकटवून देण्यानें, बोधरहित पण केवळ आनंदजनक अशा विनोदास, Humour च्या साम्राज्यांतून आपण हद्दपार करीत नाहीं का ? याला उत्तर एवढेंच कीं, विनोद बोधप्रद पाहिजे याचा अर्थ इतका कांटेतोल घ्यावयाचा नाहीं. कला बोधप्रद असली पाहिजे कीं नाहीं, या प्रकारचाच हा वाद होय. त्या ठिकाणीं एकाद्या कृतीपासून शुद्ध आनंदाचा अनुभव होत असल्यास त्या कृतीची जशी बोधप्रद कलेंत गणना केली जाते; त्याप्रमाणेंच येथेंही आहे; कारण शुद्ध आनंदाचा अनुभव हासुद्धां

एक प्रकारचा बोधच आहे. ॲडिसननेंसुद्धां म्हटलें आहे कीं, " When my mirth ceases to be instructive, it shall never cease to be innocent." याचा अर्थ असा कीं, " माझ्या विनोदापासून प्रत्यक्ष बोध जरी झाला नाहीं, तरी त्यापासून कांहीं अनिष्ट परिणाम तरी होणार नाहीं." म्हणजे त्यापासून शुद्ध आनंदाचीच प्रतीति होईल. शुद्ध आनंदाची असें म्हणण्याचें कारण म्हणजे विकृत आनंदाची नव्हे, कारण कांहीं गोष्टींपासून शुद्ध आनंदाऐवजीं विकृत आनंद होतो. दुसऱ्याचें व्यंग पाहून, किंवा आपल्या शत्रूचें अहित झालेलें पाहून जो आनंद उत्पन्न होतो तो विकृत आनंद होय. एकाद्या ग्राम्य अगर अश्लील प्रकारापासूनही आनंद उत्पन्न होतो; पण तोहि विकृत आनंदच होय. असा विकृत आनंद आपल्या विनोदापासून उत्पन्न न होईल अशाबद्दल विशेष खबरदारी घेण्याबद्दल ॲडिसननें मुद्दाम बजाविलें आहे. विनोदानें वाचकांच्या मनावर अनिष्ट परिणाम न व्हावे याबद्दल लिहितांना ॲडिसन म्हणतो; " A scrupulous conduct in this particular has perhaps more merit in it than the generality of readers imagine; did they know how-many thoughts occur in a point of humour, which a discreat author in modesty suppresses; how many strokes in railcery present themselves, which could not fail to please the ordinary taste of mankind but are stifled in their birth by reason of some remote tendency which they carry in them to corrupt the minds of those who read them; did they know how many glances of illnature are in industrially avoided for fear of doing injury to the reputation of another, they would be apt to think kindly of those writers who endeavour to

make themselves diverting, without being immoral." या अवतरणांतील "diverting, without being immoral" हे शब्द विशेष लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. त्यांचा अर्थ, "अभिरुचि न बिघडवितां मनरंजन करणें" असा आहे. विनोद प्रत्यक्ष बोधप्रद नसला तरी तो अभिरुचि बिघडविणारा तरी नसला पाहिजे. म्हणजे यांतही अप्रत्यक्ष बोध आलाच. ॲडिसननें म्हटल्याप्रमाणें इतकी काळजी घेऊन लिहिली जाणारी Humour आज आमच्या वाङ्मयांत किती आहे? कादंबऱ्यांचा विचार सोडला तरी आजकालच्या नाटकांतील विनोदानें (?) काय गोंधळ माजविला आहे? परंतु याबद्दचा विचार आतांच करण्याचें कारण नाहीं; येथें सांगावयाचे तें येवढेंच कीं, विनोदाचा हेतु प्रत्यक्ष बोधप्रद नसला तरी त्यापासून शुद्ध आनंदाची प्रतीति झाली पाहिजे. विकृत आनंदाची होतां उपयोगी नाहीं. कारण शुद्ध आनंदाची प्रतीति हाहि एक सद्बोधच आहे.

विनोदाचे द्वारें बोधाचें ग्रहण होण्यास विनोद सहृदय असला पाहिजे, हा आपला मुद्दा होता. कारण अशा प्रकारच्या विनोदापासूनच खरी आनंदप्रतीति होऊन मन सुप्रसन्न होतें. म्हणून सहृदयता अथवा प्रेमळपणा हा गुण Humour मध्यें (विनोदांत) मुख्य पाहिजे. हा गुण नसेल तर तो विनोद परिणामकारी होणार नाहीं; किंवा झाला तरी त्याचें खरें कार्य त्यापासून कधीं साध्य होणार नाहीं. विनोदास वाङ्मयांत जें श्रेष्ठ स्थान मिळालें आहे त्याचें कारण त्याचे द्वारें मनुष्यास सुप्रसन्न ठेवून शिकवितां येतें हें होय. "सुख पाहतां जवापाडें, दुःख पर्वतायेवढें" अशी संसाराची वास्तविक स्थिति असतां, त्यांतील पर्वताएवढ्या दुःखाकडेच सुखाच्या दृष्टीनें मनुष्याला पहावयास लावून त्याला आशावादी व उत्साही बनविणें एवढें महत्तर कार्य विनोदाचें आहे. तेव्हां हा विनोद करणारा मनुष्य जर

स्वतःच स्विफ्टप्रमाणें निष्प्रेम व जगाकडे तुच्छता व उपहासपूर्वक दृष्टीनें पाहणारा असेल तर, अगर दुसऱ्यांच्या दोषांकडे विजयी दृष्टीनें पाहून त्यांत विकृत आनंद मानणारा असला, तर त्याच्या विनोदापासून जगास काय फायदा होणार? दुसऱ्याच्या दोषांकडे सदय दृष्टीनें पाहून सर्वांबद्दल भूतदया बाळगावी ही शिकवण मिळण्याची आशा अशा मनुष्यापासून कशी धरावी? लोकांचा कमीपणा पाहून निर्दयपणें हंसण्याची जी प्रवृत्ति प्रत्येकांत असते ती मात्र अशा प्रकारच्या विनोदापासून अधिक बळावण्याचा संभव आहे. थॅकरे यानें आपल्या "Charity and Humour" या निबंधांत ही गोष्ट फारच मार्मिक रीतीनें स्पष्ट केली आहे. तो म्हणतो, "ह्यूमर म्हणजे काय, तर चतुर वचन व प्रेम यांचें संमिश्रण होय; आणि ज्यामध्यें अत्यंत भूतदया भरलेली आहे; ज्यांत आमूलाग्र प्रेमळपणा खेळत आहे तोच उत्तम विनोद होय. विनोदी लेखकाचा मनुष्यजातीशीं असलला संबंध, प्रेमळ बापाचा आपल्या मुलाशीं असलेल्या संबंधाप्रमाणें असतो. उठल्या बसल्या आपल्या मुलांना कुरवाळून त्यांचें चुंबन घेऊन आपल्या प्रेमाचें प्रदर्शन बाप करीत नाहीं. त्याच्या प्रेमाला अशा प्रकारचें व्यक्त स्वरूप कारणप्रसंगानें एकादे वेळीं येईल; पण इतर वेळीं हें प्रेम प्रच्छन्न असून ज्या सदयतेनें तो आपल्या मुलांच्यासाठीं श्रम करितो त्यावरूनच अनुमेय असतें. तें घटकोघटकीं व्यक्त न झालें तरी तेंच त्याच्या आयुष्याचें सार होय. प्रेमळ विनोदाची गोष्ट अशीच आहे. ज्याप्रमाणें प्रेमळ पित्याच्या प्रत्येक कृत्यामध्यें आपल्या मुलाच्या हिताविषयींची काळजी व प्रेम दिसून येतें; त्याप्रमाणें खऱ्या विनोदी लेखकाच्या प्रत्येक शब्दांत मनुष्यजातीच्या हिताविषयींची काळजी व मनुष्यजातीबद्दलचें प्रेम दिसून येतें. बाप ज्याप्रमाणें पदोपदीं आपल्या मुलांचे 'लाडक्या छकुल्या' म्हणून मुका घेत बसत नाहीं त्याप्रमाणें विनोदी लेखकहि

वाक्यागणिक आपल्या वाचकांना खो खो करून हंसविणार नाहीं. कारण त्याच्या विनोदाचें कार्य प्रत्येकाला शब्दागणिक हंसविणें हें नव्हे, तर सदयतेनें, प्रेमानें, प्रत्येक वस्तूकडे पाहून आनंदोत्पादन करून सर्वांस सुखविणें हें होय; व हीच खरी Humour होय. एखादा मनुष्य आपल्या प्रेमाचें फाजील प्रदर्शन करूं लागला तर त्याच्या प्रेमाच्या सत्यतेबद्दल आपणांस शंका येऊन त्याच्या प्रेमाचा कंटाळा येईल, त्याप्रमाणेंच विनोदी मनुष्य काळ-वेळ न पाहतां आपणांस हंसवूं लागला असतां, त्याच्या विनोदाच्या सत्यतेबद्दल आपणांस शंका येऊन त्याच्या विनोदाचा आपणांस कंटाळा येईल." हाच मुद्दा पुढें स्पष्ट करतांना थॅकरे स्विफ्टचें उदाहरण देऊन म्हणतो कीं, "स्विफ्टच्या विनोदाचें कौतुक वाटलें तरी त्याची एक प्रकारें शिसारी येते; कारण त्याला ज्या मनुष्यजातींत आपण जन्मलों त्या जातीबद्दल मुळींच प्रेम नाहीं. जगाच्या अवलोकनापासून त्याला जो आनंद होतो तो सहानुभूति-जन्य नसून तिरस्कारजन्य आहे."

येथपर्यंतच्या विवेचनावरून खऱ्या व उच्च प्रकारच्या विनोदाला बोधप्रदता व मनुष्यजातीबद्दल सहानुभूति व प्रेम हे गुण कसे अवश्य आहेत हें आपल्या लक्षांत येईल. पण विनोद पूर्णपणें परिणामकारी होण्यास त्यांत तिसराही एक गुण पाहिजे, तो म्हणजे रिआलिझम् हा होय. रिआलिझम् म्हणजे स्वाभाविकता. ही जर विनोदांत नसेल तर त्यापासून सत्यत्वप्रतीति होणार नाहीं. ॲडि-सन्नें विनोदाची जी वंशावळ दिली आहे, त्यांत सत्य या मूळ पुरुषापासून विनोदाची उत्पत्ति झाली आहे असें म्हटलें असून ज्या विनोदांत सत्याचा अंश नाहीं तो विनोद खरा नाहीं, विनोदाचा केवळ आभास होय असें म्हटलें आहे. याचा अर्थ असा कीं, विनोद जरी असला, तरी त्याला सत्याचा वस्तुस्थितीचा पाया

पाहिजे. जगांत दृष्टीस न पडणारी, असंभाव्य अशी असंबद्धता अगर दोष दाखविला तर त्यापासून मनाची क्षणभर करमणूक झाली तरी त्याचें असंभाव्यत्व मनांत येऊन त्याचा परिणाम लागलींच नाहींसा होतो. केवळ पाश्चात्य समाजांतच संभाव्य होणारा विनोद हिंदू समाजांत दाखविण्याचा प्रयत्न केला तर अशा विनोदापासून काय कार्य होणार? तसेंच गोकुळासारख्या विलक्षण विसरभोळ्या माणसाचें असंभाव्य चित्र काढल्यापासून क्षणभर हंसण्यापलीकडे कोणतें कार्य साधणार? दुसरें उदाहरण 'एकच प्याला' या नाटकांतील तळीरामाच्या मृत्यूच्या प्रवेशाचें घेऊं. या ठिकाणीं कोट्यांची रेलचेल असल्यामुळें त्या वेळेपुरतें पोट धरधरून हंसूं येईल हें खरें, पण त्या प्रसंगांत रिआलिझम्‌चा लेश तरी आहे काय? तळीरामाचें प्रेत समोर पडलें असतां अशा प्रकारचा विनोद चाललेला पाहून आनंदाच्याऐवजीं तिरस्काराची मात्र प्रतीति होते; कारण असला प्रकार सर्वथा सृष्टिक्रमाविरुद्ध होय. हीं उदाहरणें देण्याचा हेतु येवढाच कीं, विनोदांतसुद्धां रिआलिझम्‌ची किती जरुरी आहे हें स्पष्टपणें आपल्या लक्षांत यावें.

खऱ्या ह्यूमरचें स्वरूप याप्रमाणें निश्चित केल्यावर, ह्यूमर ही किती प्रकारची असूं शकते याचा विचार करूं. विनोदाचें वर्गीकरण करतांना विनोद म्हणजे काय, हें निश्चित करणें जरूर आहे. विनोदाची बरोबर व्याख्या करणें अवघड आहे. पुष्कळ पाश्चात्य ग्रंथकारांनीं आपापल्यापरी विनोदाची बरोबर व्याख्या करण्याचे प्रयत्न केले आहेत; पण शेवटीं विनोदाची खरी कल्पना व्याख्येपेक्षां वर्णनाच्याद्वारेंच अधिक चांगली होते असें ठरलें आहे. ॲडिसन्‌नें तर स्पष्टच म्हटलें आहे कीं, "It is indeed much easier to describe what is not humour than what is; very difficult to define it otherwise than by nega-

tive." तेव्हां याप्रमाणें आतापर्यंतच्या विवेचनावरून विनोदाची उत्पत्ति मुख्यतः असंबद्धतादर्शनापासून झाली असून, परिणामकारी होण्यास तो सहानुभूतिजन्य व स्वाभाविक असून बोधप्रद असला पाहिजे हें आपण पाहिलें. Wit आणि Humour यांत फरक काय याचाही आपण थोडक्यांत विचार केला; या दोहोंत आणखी एक फरक आहे तो असा कीं, कोटी ही एक प्रकारची शब्दांवरची कसरत असल्यामुळें तिची उडी कांहीं शब्दांपुरतीच असते. म्हणजे कोटी ही थोड्या शब्दांत संग्रहित करितां येते. उलटपक्षीं विनोदाचें साहित्य ( Material ) शब्दांपेक्षां असंबद्धतेंत अधिक असल्यामुळें असंबद्धता जितकी विस्तारानें वर्णावी तितका विनोद अधिक खुलतो. कोटीचें स्वारस्य शब्दांच्या मोजकेपणावर अवलंबून आहे; तर विनोदाचें शब्दविस्तारावर आहे. या दोहोंत इतका भेद असतांही विनोदाचें वर्गीकरण करितांना त्यांत पुष्कळदा कोटीची भेसळ झालेली आढळून येते. तथापि शब्दचमत्कृति हा कोटीचा विशेष लक्षांत ठेविला असतां तिचें विनोदापासून पृथक्करण करणें अवघड जाणार नाहीं. असो, या दृष्टीनें पाहिलें तर विनोदाचे स्थूलमानानें ६ मुख्य विभाग करितां येतील. लॉक् यानें Wit व Humour याचे १२ प्रकार कल्पिले आहेत; ली हंट यानें ११ प्रकारांचें वर्णन केलें आहे. रा. केळकर यांनीं आपल्या ग्रंथांत १९ प्रकार सांगितले आहेत; पण यांत सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर बरीच परस्पर व्याप्ति आढळून येईल. म्हणून या सर्वांच्या वर्गीकरणांच्या आधारें मी विनोदाचे सात मुख्य प्रकार करीन. ते असेः—१ नूतन किंवा अपरिचित वस्तूच्या दर्शनानें उत्पन्न होणारा विनोद. २ मनुष्यस्वभावांतील स्वाभाविक दोषांपासून उत्पन्न होणारा विनोद. ३ औचित्यभंगापासून उत्पन्न होणारा विनोद. ४ साकूत भाषण आणि अन्योक्ति. ५ मिथ्यासाम्य अथवा मिथ्याविरोधदर्शन.

६ समजुतीच्या घोंटाळ्यामुळें उत्पन्न होणारा विनोद. ७ अनपेक्षित परिस्थितीमुळें उत्पन्न होणारा विनोद. या सात प्रकारांपैकीं दुसऱ्याशिवाय बाकीच्या प्रकारांपासून उत्पन्न होणाऱ्या विनोदाचें क्षेत्र स्वभावतःच मर्यादित असतें. कारण अशा ठिकाणीं जरूर ती परिस्थिति वारंवार उत्पन्न होत नाहीं; व झाली तरी विनोदाला Realism आणि Sense किंवा Reason यांचीं जीं बंधनें पाळावीं लागतात त्यामुळें अशा विनोदाच्या विकासाचें क्षेत्र आपोआपच आकुंचित होतें. पण मनुष्यस्वभावांतील असंबद्धतेच्या दर्शनानें जो विनोद उत्पन्न होतो, त्याला मर्यादाच नाहीं. इतकेंच नव्हे तर जगांतील निम्मा विनोद या मानवी स्वभावांतील दोषांमुळेंच उत्पन्न होतो असें ली हंटनें म्हटलें आहे. मनुष्यस्वभाव व लोकव्यवहार जितके अनंत, तितकेंच या प्रकारच्या विनोदाचें क्षेत्रही अनंत. यामुळें विनोदाच्या सर्व प्रकारांत याप्रकारच्या विनोदाला पहिलें स्थान आहे. किंबहुना खऱ्या Humourist चें कौशल्य व यशस्विता या एकाच गोष्टीवरून मापली जाते. मोलिएरची कीर्ति त्याच्या शब्दचमत्कृतीमुळें नाहीं; तर त्यानें ज्या कुशलतेनें मानवी स्वभावांतील, अहंभावादि दोषांचें वर्णन केलें आहे त्यामुळें आहे. इंग्रजी वाङ्मयांत ॲडिसनचें नांव त्याच्या अनेक विनोदी लेखांमुळें चिरस्थायी झालें नसून, त्यानें निर्माण केलेल्या रॉजर डी कॉव्हर्ले या व्यक्तीमुळें झालें आहे. डिकन्सच्या कादंबऱ्या कोटिचातुर्यासाठीं प्रसिद्ध नाहींत तर मनुष्यस्वभावांतील अनेकविध असंबद्धतेचें विनोदी तऱ्हेनें वर्णन करण्याच्या कौशल्यासाठीं प्रसिद्ध आहेत. जेन् ऑस्टिनच्या "प्राइड अँड प्रेजुडीस्" या कादंबरींत कोटी, श्लेष अगर चतुर संभाषण फारसें आढळणार नाहीं, परंतु प्रत्येक मनुष्यांत आढळणारे, अहंभाव, मिथ्याभिमान, पोकळ डौल, मूर्खपणा इत्यादि दोष उत्कृष्ट रीतीनें व्यक्त करणाऱ्या, डार्सी, मिसेस्

बिंगले, कॉलिन्स या व्यक्तींमुळें ही कादंबरी इंग्रजी भाषेंतील उत्कृष्ट कादंबऱ्यांपैकीं एक म्हणून गणली जात आहे. असो.

या दृष्टीनें आजच्या मराठी वाङ्मयांतील Humour किती व कोणत्या दर्जाची आहे हें आपण पाहूं. हा विचार करितांना विनोदाचे इतर प्रकार आपण आजच्या विषयाच्या कक्षेंतून वगळले आहेत हे आधींच सांगितलें आहे. मानवी स्वभावांतील दोषांपासून अथवा असंबद्धतेपासून उत्पन्न होणारी Humour—जिचा विचार आपण मुख्यत्वेंकरून करीत आहोंत—प्रायः काव्यें, नाटकें व कादंबऱ्या यांतूनच आढळणार हें उघड आहे. कारण मनुष्याच्या गूढ, आणि अगूढ मनोवृत्ति उकलण्याचें कार्य कवि, नाटककार आणि कादंबरी-कार यांचें आहे. तेव्हां ही श्रेष्ठ व उच्च प्रकारची ह्यूमर आजकालच्या कोणत्या नाटककादंबऱ्यांत आहे याचा शोध केला तर हरिभाऊ आपट्यांशिवाय दुसऱ्या कोणत्याच लेखकास या बाबतींत इतकें यश आलें नाहीं असें म्हणावें लागतें. याप्रकारचा खरा व उच्च दर्जाचा विनोद एकट्या हरिभाऊंच्याच कादंबऱ्यांत आपणांस आढळून येईल, हें विधान पुष्कळांस धाडसाचें वाटेल; कारण विनोदी लेखक म्हणून कोल्हटकर यांचें नांव जितकें प्रसिद्ध आहे तितकें हरिभाऊंचें नाहीं. इतकेंच नव्हे तर विनोदी लेखकांत हरिभाऊंची गणना अद्यापपर्यंत कोणींच केली नाहीं म्हटलें तरी चालेल. आपल्या "सुभाषित आणि विनोद" या ग्रंथांत महाराष्ट्रांतील ज्या १०।१५ विनोदी लेखकांचीं नांवें रा. केळकरांनीं दिलीं आहेत, त्यांतहि हरिभाऊंचें नांव नाहीं. पण श्रेष्ठ दर्जाची ह्यूमर कोणती याचा विचार केला म्हणजे हरिभाऊंसारखा दुसरा ह्यूमरिस्ट मराठी भाषेंत झाला नाहीं असें म्हणावें लागतें. कोल्हटकर व गडकरी हे ह्यूमरिस्ट नव्हत; Wits होत. ह्यूमरिस्ट हा मनुष्यस्वभावांतील सर्वसाधारण दोषांच्या किंवा असंबद्धतेच्या नमुने-दार व्यक्ति, ( Typical characters ) उत्पन्न करितो. अशा व्यक्ति

कोल्हटकर किंवा गडकरी यांच्या हातून निर्माण झाल्या नाहींत. या दोघां ग्रंथकारांचीं नाटकें वाचतांना अगर पाहतांना हास्यरसाच्या उकळ्यावर उकळ्या फुटतात हें खरें; पण तें त्यांच्या नाटकांत ही Humour आहे म्हणून नव्हे, तर चतुर संभाषण--Wit--आहे म्हणून होय. परंतु हरिभाऊंचें तसें नाहीं. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांत -Wit-मुळींच नाहीं असें नाहीं; पण wit पेक्षां Humour अधिक आहे. हरिभाऊंनीं निर्माण केलेल्या, शंकर मामंजी, रा. ब. आडमुठे, श्रीधरपंत, सदूभाऊ, प्रो. ब्यांडी, गिरिधरपंत, किंवा कर्मयोगांतील भाऊसाहेब या व्यक्ति पाहून, कोल्हटकरांची किंवा गडकऱ्यांची wit ऐकून जितकें हंसू येतें तितकें हंसूं न आलें तरी मनास आनंद व मौज वाटते wit पासून होणाऱ्या आणि Humour पासून होणाऱ्या आनंदांत फरक आहे हें सूक्ष्म रीतीनें पाहाणारास तेव्हांच दिसून येईल. wit पासून उत्पन्न होणारा आनंद स्फुट असतो; तर Humour पासून उत्पन्न होणारा आनंद अस्फुट असतो. एक आनंद अकल्पित शब्दयोजनाचातुर्यामुळें होतो; तर दुसरा असंबद्धतेच्या चतुर आविष्करणामुळें होतो. सर रॉजर डी कॉव्हर्लेचें वर्णन वाचून एकादी चतुर wit ऐकून जसें खो खो हंसू येईल तसें हंसूं येणार नाहीं. पण स्वतःच्या मोठेपणाचा अभिमान आणि साधेपणा, प्रेमळपणा, मनमोकळेपणा आणि किंचित् आढ्यता इत्यादि परस्परविरोधी गुण एकवटलेली सर रॉजरची मूर्ति पाहून कोणास मौज वाटणार नाहीं? म्हणून Wit मुळें होणाऱ्या व Humour मुळें होणाऱ्या आनंदांत असा फरक करितां येईल कीं, एका आनंदाचें पर्यवसान हंसूं येण्यांत होतें, तर दुसऱ्या आनंदाचें पर्यवसान चित्तास मौज वाटण्यांत होतें. कोल्हटकरांच्या नाटकांतील कांहीं व्यक्तींत, उदाहरणार्थ, मतिविकारांतील आनंदराव; वधूपरीक्षेंतील वाराणशी, गंगू, अशा कांहीं व्यक्तींत चांगल्या प्रकारची ह्यूमर साधली

गेली आहे. पण एकंदरींत कोल्हटकरांचा भर ह्यूमरपेक्षां विट्वर अधिक आहे ही गोष्ट स्पष्टपणें दिसून येते. गडकऱ्यांच्या बाबतींत तर Humour मुळींच नाहीं असें म्हणावें लागतें. ज्या ठिकाणीं त्यांनीं ह्यूमर आणण्याचा प्रयत्न केला आहे त्या ठिकाणीं, स्वाभाविकता व सहृदयता यांच्या अभावामुळें तो सफल झाला नाहीं. उदाहरणार्थ, त्यांच्या गोकुळ, वसंतराव, लीला, कंकण, नूपुर या व्यक्ति घ्या. त्यांच्यांत स्वाभाविकता मुळींच नाही. ज्याप्रमाणें हरिभाऊंच्या शंकरमामंजी, आडमुठे, दिगंबरपंत इत्यादि व्यक्ति समाजांत पदोपदीं दृष्टीस पडतात, त्याप्रमाणें कितीकसे गोकुळ, वसंतराव अगर कंकण आपणांस व्यवहारांत आढळतील ? नाहीं म्हणायला भावबंधनांतील धुंडिराज या व्यक्तींत आरंभीं उत्तम प्रकारची Humour दृष्टीस पडते, पण पुढें ती मुळींच टिकली नाहीं. त्याच नाटकांत इंदू व बिंदू या दोन काळ्या व कुरूप मुली आणून त्यांचे द्वारें विनोद करण्याचा प्रयत्न केला आहे. पण ज्याला त्या बिचाऱ्या मुलींचा उपाय नाहीं अशा ईश्वरनिर्मित शारीरिक व्यंगावर त्या Humour ची उभारणी असल्यामुळें त्यांत सहृदयता मुळींच नाहीं. त्यामुळें ही Humour कठोर भासते. इंदूबिंदूच्या द्वारें जो विनोद उत्पन्न होतो त्यानें हंसू येतें पण हें हंसू विकृत आनंदाचें होय. कारण त्यांच्या कुरूपतेबद्दल त्यांची कींव येण्याचे ऐवजीं त्याजबद्दल हंसू येणें हा शुद्ध आनंद नव्हे. एकच प्याल्यांतील तळीरामाची Humour तर किळसवाणी झाली आहे. त्याच्या तोंडीं घातलेली wit पुष्कळदां उत्कृष्ट साधली आहे. परंतु Humour या दृष्टीनें तळीरामाचें पात्र शिसारी आणणारें आहे. गडकऱ्यांच्या विनोदी पात्रांत बोधप्रदता क्वचितच आढळते. व ज्या थोड्यांत आहे त्यांत स्वाभाविकता व सहृदयता नसल्यानें त्यांतील बोधप्रदतेचा मुळींच उपयोग होत नाहीं. कारण Humour स्वाभाविक व सहृदय

असेल तरच तिचा बोधप्रद या दृष्टीनें उपयोग होईल. भावबंधनांतील दुसरें विनोदी पात्र महेश्वर. त्याचा ईश्वरदत्त वेडगळपणा पाहून मौज वाटण्याचे ऐवजीं कींवच वाटते; आणि त्याच्या वेडगळपणाचा उपयोग घनश्यामासारखे लुच्चे लोक आपल्या नीच स्वार्थासाठीं करीत आहेत यामुळें ही कींव दुणावते. शारीरिक किंवा बौद्धिक व्यंगांवरून केलेली Humour केव्हांही मनोरंजक होत नाहीं. कारण अशीं व्यंगें ईश्वरदत्त असल्यामुळें त्याला मनुष्याचा उपाय नसतो. अशा व्यंगांबद्दल त्या मनुष्याबद्दल सहानुभूति दाखविणें सोडून उलट त्याची फजीती करणें सदभिरुचीस योग्य नाहीं. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांत अशाप्रकारची कठोर Humour कोठेंही आढळणार नाहीं. असो, कोल्हटकर व गडकरी यांच्या नाटकांतील प्रत्येक विनोदी व्यक्ति घेऊन तिचें विस्तारानें पृथक्करण करणें येथें अर्थातच शक्य नाहीं. येथें दाखवावयाचें एवढेंच कीं, हे दोन्ही ग्रंथकार उत्कृष्ट wits आहेत; Humourists नव्हेत. Humourist ला जीं अंगें लागतात तीं यांच्या व्यक्तींत नाहींत. खाडिलकरांच्याबद्दल तर विचार करण्याचें मुळींच कारण नाहीं. त्यांची गणना मराठींतल्या उत्कृष्ट लेखकांमध्यें होत असली तरी विनोदाच्या बाबतींत त्यांना एकही गुण देतां येत नाहीं. wit आणि Humour हीं दोन्ही त्यांना साधलीं नाहींत. इतकेंच नव्हे तर त्यांच्या नाटकांतील विनोदी म्हटलीं जाणारीं कांहीं पात्रें तर ह्यूमर कशी नसावी, किंवा ॲडिसनूनें वर्णन केलेली False Humour कशी असते याचीं उत्कृष्ट उदाहरणें म्हणून उपयोगी पडतील.

आपटे हे मराठी भाषेंतील उत्कृष्ट Humourist आहेत म्हणून आतांच म्हटलें; परंतु, त्यांची ह्यूमर वर सांगितलेल्या श्रेष्ठ व खऱ्या Humourist च्या कसाला कशी उतरते, याचा विचार केल्याशिवाय हें विधान मान्य होणार नाहीं. त्यांची ह्यूमर कठोर नाहीं हें वर प्रथम सांगितलेंच आहे. आतां खऱ्या Humour ला अवश्य असणारा

पहिला गुण स्वाभाविकता हा आपट्यांच्या Humour मध्यें किती पूर्णपणें आहे हें त्यांनीं निर्मिलेली प्रत्येक व्यक्ति आपणांस किती परिचयाची वाटते यावरूनच समजण्यासारखें आहे. या ठिकाणीं आपट्यांच्या सामाजिक कादंबऱ्याच मी विचारांत घेतों; कारण त्यांतील व्यक्ति आपल्या रोजच्या समाजांतील असल्यामुळें त्यांची स्वाभाविकता अथवा यथार्थता आपणांस अधिक लवकर पटेल. या सामाजिक कादंबऱ्यांतून पुढील व्यक्तींच्या द्वारें हरिभाऊंनीं Humour चें आविष्करण केलें आहे.

| | | |
|---|---|---|
| १ पण लक्ष्यांत कोण घेतो. | .... | शंकरमामंजी; माईसाहेब. |
| २ गणपतराव. | .... | गणपतराव; |
| ३ यशवंतराव खरे. | .... | रावबहादूर आडमुठे; श्रीधरपंत; |
| | .... | यशवंतराव. |
| ४ मी. | .... | रावजी. |
| ५ जग हें असें आहे | .... | चिंतोपंत; |
| ६ भयंकर दिव्य, | .... | सदूभाऊ; सोन्याबापू; प्रो० डँडी. काकासाहेब; गुंडभट. |
| ७ मायेचा बाजार. | .... | गिरिधरपंत; दिगंबरपंत; कृष्णाजीपंत दादा. |
| ८ कर्मयोग | .... | भाऊसाहेब. |

या केवळ मुख्य मुख्यच व्यक्ति घेतल्या आहेत. मनुष्यस्वभावांतील अनेकविध असंबद्धता दाखविण्यासाठीं, यांशिवाय दुसरीं अनेक पात्रें हरिभाऊंनीं वर्णिलीं आहेत; पण Humourist या दृष्टीनें हरिभाऊंचें श्रेष्ठत्व दाखविण्यास इतकींच पात्रें पुरेत. वर दिलेल्या व्यक्तींकडे पाहिलें तर त्यांतील अनेकविधता पाहून मनास आश्चर्य वाटतें. मनुष्यस्वभावांतील ढोंगीपणा दाखविणाऱ्या शंकरमामंजी, सदूभाऊ व दिगंबरपंत या व्यक्ति आहेत. यांपैकीं शंकरमामंजींबद्दल तर बोलावयासच नको. कारण स्वार्थ, खुनशीपणा व जुन्या रूढींचें ढोंग यांचें

निदर्शक म्हणून व्यवहारांत ती एक उपमाच होऊन बसली आहे. दिगंबरपंत म्हणजे दुसरे शंकरमामंजीच. दोघांत बरेंचसें साम्य आहेच; पण शंकरमामंजींच्या ढोंगाचें व दुसऱ्यास त्रास देण्याचें क्षेत्र फक्त आपल्या कुटुंबापुरतेंच आहे व दुसऱ्यांचें कुटुंबाच्या बाहेरही आहे. सदुभाऊ हा मनुष्य नीच नाहीं; फक्त जमेल तेथें रूढीला चिकटून, सोयीप्रमाणें रूढीला गुंडाळून ठेवील; पण बाहेरून मात्र मी रूढीप्रमाणें वागतों असा आव घालील इतकेंच. मला वाटतें. असे सदुभाऊ समाजांत शेंकडा ८० तरी सांपडतील. बळवंतराव पुनर्विवाहित म्हणून त्यांच्या घरीं पाणी न पिणाऱ्या सदुभाऊस त्यांच्याच येथलें सोडावाटर मात्र पिण्यास हरकत वाटत नाहीं. बरें इतकेंही असून स्नानसंध्येचा नित्य फार्स करून पुनः धार्मिकपणाचा व कर्मठपणाचा डौल मिरवावयास तयारच! सरकारी अधिकारी म्हणून रा. ब. आडमुठे व मायेच्या बाजारांतील डे. ए. इ. रा. सा. गिरिधरपंत या दोन व्यक्ती फार मजेच्या आहेत. आपल्या अधिकाराचा दर्प, हाताखालच्या लोकांशीं बेपर्वाईनें व तुच्छतेनें वागण्याची पद्धति, ज्याच्या त्याच्यावर तोंड टाकण्याची संवय, इत्यादि गुणांचें इतकें यथायोग्य चित्र रा०ब० आडमुठे यांचेखेरीज अन्यत्र क्वचितच पहावयास मिळेल. बरें, यांतील एकही गोष्ट अशी नाहीं कीं, जी आपल्याला समाजांत हरघडी पहावयास मिळत नाहीं. दुसऱ्या प्रकारच्या अधिकाऱ्याचा मासला गिरिधरपंत. यांच्यांत आडमुठ्यांचा अरेरावीपणा, दर्प वगैरे दुर्गुण नाहींत; पण आपल्या हाताखालच्या मास्तरांनीं आपली हांजी हांजी करावी ही मात्र हौस फार. गिरिधरपंताच्या इथला तो चहाचा बेत; फक्त स्वतःच्याच घरचा चहा उत्तम व शास्त्रोक्त होतो अशाबद्दलचा अभिमान; मोर मास्तरचा लघळपणा व खुशामत, पाहून आपण खरोखरीच्याच व्यक्ति पहात आहोंत कीं काय असा भास होतो. या गृहस्थाचा आपल्या चहाबद्दलचा अभिमान इतका विलक्षण आहे कीं, त्यांची मर्जी सुप्रसन्न करून घेण्यास, व त्यांच्या-

कडून आपलें एकादें काम करून घेण्यास, त्यांच्या घरीं चहाचे वेळेस जाऊन त्यांच्या चहाची स्तुति करणें हा एक रामबाण उपाय होता. या गमतीच्या अधिकारी लोकांबरोबर, कांहीं गुंडांची व टवाळांचींही चित्रें हरिभाऊंनीं फार चातुर्यानें काढलीं आहेत. तीं चित्रें म्हणजे, 'भयंकर दिव्यां'तील काकासाहेब, व गुंडभट; 'मायेच्या बाजारां'तील दिगंबरपंत, कृष्णाजीपंत, हीं होत. या गांवगुंडांतही फरक एवढाच आहे कीं, काकासाहेब व त्यांचे पित्ते हे खेडेगांवांतील गुंड असून, दिगंबरपंत व कृष्णाजीपंत ही दुक्कल शहरांतील गुंड आहेत. खाण्यापिण्याची मागें काळजी नसलेले, हीन बुद्धीचे सुखवस्तु लोक लष्करच्या भाकरी भाजण्यांत आपल्या काळाचा व्यय कसा करितात, याचें चित्र म्हणून सुद्धां या व्यक्ति पहाण्यासारख्या आहेत. निरुद्योगी, परोपजीवी, टिवल्याबावल्या करणारे लोक कसे असतात, हें सोन्याबापू व प्रो० डँडी या व्यक्तींवरून दाखविलें आहे. बाईलबुद्धी मनुष्य हलक्या मनाच्या बायकोच्या नादानें किती हास्यास्पद स्थितीला जातो याचें "जग हें असें आहे" यामधील चिंतोपंत हें उत्कृष्ट उदाहरण आहे. मोठ्या वयाच्या बिजवराशीं लग्न झाल्यानें स्वतःस मोठेपणा घेऊन पोक्तपणाची ऐट मारणाऱ्या, "पण लक्षांत कोण घेतो" यांतील माईसाहेबांचें चित्रही किती उत्कृष्ट उतरलें आहे! बढाईखोर माणसाचें अत्यंत मनोरंजक चित्र हरिभाऊंनीं "कर्मयोगांत" काढलें आहे. या व्यक्तीचें नांव भाऊसाहेब. या गृहस्थाच्या तोंडांतील प्रत्येक भाषण म्हणजे Humour चा एकेक उत्कृष्ट नमुनाच आहे. हरिभाऊंच्या या सर्व विनोदाचे मासले, प्रत्यक्ष उतारे घेऊन आपणांपुढें मांडतां आले असते तर फार बरें झालें असतें; पण कोटीचा विस्तार थोड्याच शब्दांत होत असल्यामुळें कोटींचीं अवतरणें देणें जसें सुलभ आहे तसें विनोदाचें नाहीं. एकादी कल्पना ज्या विस्तारानें आणि ज्यासंबंधानें वर्णिली असेल त्यावर त्यांतील विनोदाचें माधुर्य

असल्यामुळें तो संदर्भ समजल्याशिवाय, आणि तितक्या विस्तारानें विनोदाचा विकास वाचल्याशिवाय, त्या विनोदाचें स्वारस्य समजणार नाहीं. यामुळें नकाशावर स्थळें दाखविल्याप्रमाणें हरिभाऊंच्या कादंबरींतील त्या त्या व्यक्तींवर बोट ठेवून येथें खरा विनोद आहे, एवढें सांगण्यापलीकडे कांहीं करितां येत नाहीं.

मनुष्यस्वभावांतील लहानसहान दोषांमुळें कशी Humour उत्पन्न होते हें आपण पाहिलें; परंतु कांहीं चांगल्या गुणांमुळेंसुद्धां व्यवहारांत Humour उत्पन्न होऊं शकते. याचीं उदाहरणें म्हणजे 'गणपतराव' कादंबरींतील नायक गणपतराव; 'यशवंतराव खरे' या कादंबरींतील नायक यशवंतराव, व त्याचा गुरु श्रीधरपंत हीं होत. यांपैकीं श्रीधरपंतांत Wit आणि Humour या दोहोंचाही मिलाफ झालेला आहे. गणपतराव हा अत्यंत भावनाप्रधान व ज्याला आपण Sincere म्हणूं असा मनुष्य; परंतु त्याची उतावळी, सरळपणा, तापटपणा, आपल्या ध्येयाशीं एकतानता इत्यादि गुणांच्या समुच्चयामुळें गणपतरावाचें स्वभाववर्णन फारच मनोरंजक झालें आहे. यशवंतरावाच्या स्वभावविकासामध्येंहि अशीच मजेदार ह्यूमर साधली आहे. आपट्यांच्या ह्यूमरचीं हीं सर्व उदाहरणें पाहिलीं असतां त्यांच्या विविधतेमुळें मन आश्चर्यचकित होतें. मनुष्यस्वभाव व लोकव्यवहार यांप्रमाणें Humour ही कशी अनंत असते हें यावरून लक्षांत येतें.

हरिभाऊंची ही सर्व ह्यूमर किती स्वाभाविक (Realistic) आहे हें सांगावयास नकोच. कारण प्रत्येकाला आपापल्या अनुभवानेंच हें पटणार आहे. आतां दुसरा गुण सहृदयता; हाही गुण यांत आहे, ही गोष्ट प्रत्येकास थोड्या विचारांतीं पटणार आहे. कारण या सर्व Humourमध्यें एकही स्थल किंवा प्रसंग असा नाहीं कीं ज्यावरून हरिभाऊंनीं मनुष्यजातीला एकदांहि तुच्छ लेखलें असें म्हणतां येईल. मनुष्यस्वभावांतर्गत दोषांचें व असंबद्धतेचें

आविष्करण हरिभाऊंनीं केलें आहे खरें, पण तें प्रेमळपणानें,–त्या दोषांबद्दल त्या व्यक्तीची आपणांस कींवच यावी अशा रीतीनें–केलें आहे. तान्ह्या मुलाचें शरीर, तें घांसतांना दुखावलें न जातां स्वच्छ व्हावें म्हणून आई त्याला जितक्या नाजुकपणानें हात लावील तितक्या नाजुकपणानें हरिभाऊंनीं मनुष्यस्वभावास हात लावला आहे. मनुष्यांतील दोष तर स्पष्टपणें दिसावा, पण त्याबद्दल त्याचा तिटकारा न यावा, व मनुष्यजातीच्या चांगलेपणाबद्दल आपण निराश न व्हावें असा परिणाम हरिभाऊंच्या Humour मध्यें साधला आहे. हीच कोणत्याही Humour मधील सहृदयतेची खूण आहे. सहृदय Humour चा परिणाम असा होतो कीं, एकाद्या दोषामुळें, असंबद्धतेमुळें किंवा गुणातिरेकामुळें होणारी हास्यास्पदता वाचकांस चटदिशीं पटून आत्मनिरीक्षणाकडे त्याची प्रवृत्ति अधिक लवकर वळते. जगांतील नीचपणा, स्वार्थ इत्यादि दुर्गुण पाहून मनुष्याचें मन जगाला विटण्याचा संभव असतो; व असें झालें म्हणजे तो मनुष्य फाजील शंकेखोर किंवा एकदम निराशावादी बनण्याचें भय असतें. इतरांपेक्षां मी स्वतः मात्र अधिक नीतिमान् व सद्गुणी असून इतर लोक सुधारण्याचा किमपिही संभव नाहीं; त्यांच्या दुष्कृत्यांकडे किंवा मूर्खपणाकडे पाहून हंसण्याचा मला माझ्या श्रेष्ठत्वामुळें हक्कच आहे; अशी मनोरचना या लोकांची होते. पण जो सहृदय मनुष्य असतो त्याची जगाकडे पहाण्याची दृष्टि वेगळ्या प्रकारची असते. ओस्कार वाईल्डनें म्हटल्याप्रमाणें, you must love the world not inspite of, but because of its faults. या दृष्टीनें तो प्रत्येक मनुष्यप्राण्यावर प्रेम करितो. प्रेमळ बाप आपल्या मुलांच्या चुकांचा किंवा दोषांचा विचार कसा करतो? तो काय त्यांचा तिटकारा करितो? नव्हे. उलट "मुलें आहेत, त्यांना समजत नाहीं म्हणून चुकतात; त्यांची चूक त्यांना समजावून दिली म्हणजे

तेव्हांच सुधारतील" असें म्हणून तो त्यांचेवर अधिकच माया करितो. सहृदय Humouristचेंही असेंच आहे. मनुष्यांच्या चुका किंवा दोष पाहून तो रागवत नाहीं, त्यांची फजिती करीत नाहीं; उलट "अज्ञपणामुळें लोक असें करतात; त्यांचे दोष व चुका त्यांना दाखवून दिल्या म्हणजे ते तेव्हांच सुधारतील" असें म्हणून हंसत खेळत प्रेमानें त्या चुकांचें व दोषांचें वर्णन करितो. विनोदी लेखकाचें मनुष्यजातीशीं नातें प्रेमळ बापाचें असतें, असें जें थॅकरेनें म्हटलें आहे त्याचें मर्म हेंच होय. या दृष्टीनें हरिभाऊंच्या Humour कडे आपण पहा; म्हणजे त्यांतील सहृदयत्व आपल्या लक्षांत येईल. सहृदयत्व ही चीज अशी नाहीं, कीं ती बोटानें नेमकी दाखवितां येईल. सहृदयत्व हें केवळ स्वसंवेद्य आहे; आणि तें प्रत्येकानें अनुभवानेंच जाणलें किंवा ओळखलें पाहिजे. हरिभाऊंनीं निर्माण केलेलीं दोषयुक्त किंवा असंबद्धतायुक्त माणसें पाहून मनांत त्या माणसांबद्दल कायमचा तिटकारा उत्पन्न होत नाहीं. शंकरमामंजीबद्दल आरंभीं त्वेष उत्पन्न झाला, तरी सर्व प्रकारच्या उच्च मनोविकारांना हा मनुष्य इतका पारखा असावा याबद्दल वाईट वाटल्यावांचून राहात नाहीं. आणि शेवटीं त्याच्याच मुलाकडून त्याचा अपमान होऊन त्याला दुःख होतें; तेव्हां आतांतरी हा मनुष्य सुधारेल अशी आशा वाटूं लागते. रावबहादूर आडमुठ्यांबद्दल सुद्धां तिरस्कारापेक्षां मौजेचीच भावना अधिक जागृत होते. व पुढें त्यांचीं मुलें दुर्वर्तनी होऊन त्याचें रावबहादुरांना दुःख होतें, तेव्हां अशा मानी मनुष्यावर असा खालीं मान घालण्याचा प्रसंग यावा याचें वाईट वाटतें. ही जी या व्यक्तीबद्दल कळकळ वाटते त्याचें कारण त्या व्यक्तींत तसा कांहीं अंगचा गुण आहे असें नव्हे. तर त्यांचीं चित्रेंच अशा सहानुभूतीनें रंगविण्यांत आलीं आहेत कीं, ती सहानुभूति वाचकांसही वाटल्यावांचून राहात नाहीं. स्विफ्टच्या विनोदाबद्दलचें थॅकरेचें मत वर सांगितलेंच आहे कीं. "त्यानें केलेल्या

सत्यदर्शनाचें भय वाटतें व त्याच्या हास्यानें मन कष्टी होतें," हा परिणाम हरिभाऊंच्या विनोदाचा होत नाहीं. हेंच त्यांच्या विनोदाच्या सहृदयतेचें लक्षण होय. याप्रमाणें विचार केला असतां, "A wit that makes us laugh and leaves us happy one of the kindest benefators Society ever had" हें थॅकरेचें वर्णन मराठींतील कोणा ह्यूमरिस्टला बरोबर लागू पडत असेल तर तें एकट्या हरिभाऊंसच होय, असें म्हणण्यास मला किमपिही प्रत्यवाय वाटत नाहीं.

यानंतर उत्कृष्ट विनोदाचा तिसरा गुण बोधप्रदता हा हरिभाऊंच्या विनोदांत आहे कीं नाहीं, याबद्दलहि मत देण्याचें कारण नाहीं. कारण तो त्यांच्या प्रत्येक शब्दांत ढळढळीत अक्षरांनीं लिहिलेला आहे. I would not willingly laugh, but to instruct हें ॲडिसन्चें वाक्य हरिभाऊंचें ब्रीदच आहे. केवळ वाचकांस हंसविण्यासाठीं म्हणून कथानकांत घुसडलेलें असें एकही पात्र हरिभाऊंच्या कादंबरींत आढळणार नाहीं. त्यांच्या कादंबरींतील प्रत्येक व्यक्ति विशिष्ट हेतूंसाठींच निर्माण झालेली आहे.

यामाणें आपण खरी ह्यूमर म्हणजे काय, याचा प्रथम विचार केला; त्यानंतर तिचे मुख्य गुण काय हें पाहिलें व शेवटीं अशा प्रकारची खरी Humour आजकाल विनोदी म्हटल्या जाणाऱ्या लेखकांपैकीं कोणांत आहे हें पाहिलें. या सर्व गोष्टींचा विचार करितां ही खरी ह्यूमर फक्त एकट्या हरिभाऊंतच आहे असें माझें नम्र मत आहे. हें विवेचन करितांना कांहीं थोर लेखकांचे दोष दाखविले, यावरून त्या लेखकांचा मीं अनादर केला असा मात्र कोणाचा गैरसमज होणार नाहीं अशी मला आशा आहे. आतां हा निबंध संपविण्यापूर्वीं आतांपर्यंतच्या विवेचनावर एक आक्षेप येण्यासारखा आहे त्याचा विचार करितों. तो आक्षेप असा कीं, मनुष्यस्वभावांतील गुणदोष व असंबद्धता दाखविणारी ह्यूमर तीच

श्रेष्ठ, असें म्हणण्यानें विनोदाचें क्षेत्र फारच आकुंचित होतें. आणि या मर्यादित क्षेत्रांत हरिभाऊंनीं अग्रेसरत्व मिळविलें म्हणून त्यांना सर्व मराठी ह्यूमरिस्टांत अग्रस्थान देण्यांत दुसऱ्या प्रकारच्या विनोदी लेखकांवर अन्याय होत आहे. शिवाय, अनेकविध मानवी स्वभावाचीं हुबेहूब चित्रें रंगविण्याबद्दलची हरिभाऊंची कुशलता कोणीही अमान्य करीत नाहीं. यांत आतांपर्यंत ज्या प्रकारची ह्यूमर वर्णन करण्यांत आली तिचाही अंतर्भाव होतोच; असें असतांना पुनः मुद्दाम ह्यूमरिस्ट म्हणून हरिभाऊंचा वेगळा गौरव करण्याचें प्रयोजन काय? या आक्षेपाला उत्तर असें आहे कीं, मनुष्यस्वभावांतील दोषांपासून उत्पन्न होणारी Humour ही Humour च्या अनेक प्रकारांपैकीं एक भाग असला, तरी तो भाग इतका मुख्य व महत्त्वाचा आहे कीं, एखाद्या ह्यूमरिस्टचें कौशल्य याच एका गोष्टीवरून अजमाविलें जातें; कारण इतर प्रकारची Humour म्हणजे उदाहरणार्थ, व्याजोक्ति, व्यंग्योक्ति, अतिशयोक्ति इत्यादि साधण्यापेक्षां ही Humour साधणें आणि तीही उत्कृष्ट रीतीनें साधणें, हें फार अवघड आहे. मी वर सांगितलेंच आहे कीं, पाश्चात्यांतील मोठमोठ्या विनोदी ग्रंथकारांची कीर्ति त्यांच्या इतर प्रकारच्या विनोदी लेखांमुळें झालेली नसून, मनुष्यस्वभावाचें वर्णन करण्यांत त्यांनीं विनोदाचा जो उपयोग केला आहे त्यामुळें झालेली आहे. अशा प्रकारच्या विनोदाला मुख्य वाव नाटकें आणि कादंबऱ्या यांतूनच मिळत असल्यामुळें साधारणतः ह्यूमरिस्टमध्यें कादंबरीकार व नाटककार यांची गणना प्रथम करण्यांत येते. पण यामुळें इतर प्रकारचे विनोदी लेखक ह्यूमरिस्ट नाहींत असें नव्हे. दुसऱ्या मुद्यावर उत्तर असें कीं, मनुष्यस्वभावाचें वर्णन करण्याचें कौशल्य एखाद्यांत असलें तरी त्याकामीं Humour चा उपयोग करण्याचें कौशल्य वेगळेंच आहे. कारण केवळ अवलोकन व मार्मिकता असलेला लेखक मनुष्यस्वभावाचें मार्मिक वर्णन गंभीरपणानें अगदीं यथार्थ करूं शकेल. पण तेंच विनोदानें करावयाचें

असल्यास त्या गुणांना सहृदयतेची जोड असल्याशिवाय तें करतां येणार नाहीं. मनुष्यस्वभावाचें यथार्थ्य वर्णन करण्याची कला व विनोदविकास करण्याची कला, या दोन्ही कला परस्परापासून आहेत. एकीच्या साहाय्यानें दुसरी कला अधिक उठावदार दिस. पण जेथें दोन कलांत भेद करण्याचा प्रसंग येतो तेथें त्यांची एकमेकांत गुंतागुंत करणें रास्त नाहीं. गणितांत शास्त्रीय विषय आहे. आ शास्त्रीय विषयांत गणित आहे म्हणून ज्याप्रमाणें गणित व शा (Science) हे विषय एक नाहींत त्याप्रमाणेंच हें आहे; वि Humour म्हणजे हंसविण्याची—हास्यरस उत्पन्न करण्याची—क या कलेचा जेव्हां आपण पृथक्करणें करा या दृष्टीनें विचार करितों, तेव्हां ज्यांनीं ज्यांनीं या कलेचा उत्कर्ष केला असेल मग तो कोणत्या प्रकारें असो—त्यांचा त्यांचा या कलेचे सेवक म्हणून वेगळा उल्लेख होणें जरूर आहे. असो.

हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचें Humour च्या दृष्टीनें अवलोकन करून मला सुचलेले चार विचार मी याप्रमाणें आपल्यापुढें ठेविले आहेत. हरिभाऊंनीं वाङ्मयांत जें कार्य करून ठेविलें आहे, त्याचें हरएक दृष्टीनें परिशीलन करणें, वाङ्मयाच्या अभिवृद्धीच्या दृष्टीनें अवश्य आहेच. पण या परिशीलनानें हरिभाऊंची स्मृति जागृत राहून त्यामुळें वाङ्मयाच्या उपवनांत आपल्या हातून चार वृक्ष लागावे अशी लालसा असणारांनाही प्रोत्साहन मिळतें. आजच्या प्रसंगीं हरिभाऊंसारख्या थोर व श्रेष्ठ सरस्वतीभक्ताची अल्पसेवा करण्याची मला संधी देऊन आपण माझा मोठाच मान केला असून याबद्दल मी आपला फार ऋणी आहे. ही माझी सेवा आपण कृपाळूपणें मान्य करून घ्यावी एवढीच विनंति आहे.

समाप्त

...दूार,